
# काळांतील निवडक निबंध

भाग

१०

शि. म. परांजपे



य. गो. जोशी प्रकाशन, पुणे.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८९०
REFBK-0006712

७३६९२
२८।२।६९
३९६
निबंध

# काळांतील निवडक निबंध

१८९०

भाग दहावा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७३६९२ वि: निबंध
क्रमांक १८९० नों: दि: २८-२-६९

शिवराम महादेव परांजपे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६०९२

प्रस्तावना लेखक :

काका कालेलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०
REFBK-0006712

पुनर्मुद्रण : २७ सप्टेंबर १९४६

साधी बांधणी ३॥ रुपये ]     [ कापडी बांधणी ४ रुपये

प्रकाशक :
**यशवंत गोपाळ जोशी**
६२३।१५, सदाशिव पुणें २.

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे,
भाषांतराचे, रूपांतरांचे वगैरे
सर्व प्रकारचे हक्क
प्रकाशकाकडे आहेत.
या पुस्तकांतील उतारे
प्रकाशकाच्या परवानगीशिवाय
कोणासही छापतां येणार नाहींत.

मुद्रक :
**विष्णु गंगाधर केतकर,**
चालक, लोकसंग्रह छापखाना
६२४, सदाशिव, पुणें २.

# अनुक्रमणिका


| अ. न. | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठीं प्रार्थना | १ |
| २ | नाट्यकलेसंबंधीं कांहीं टिपणें | ६ |
| ३ | हिंदुस्थानांत काय संतोष माजला आहे ! | १२ |
| ४ | एक लष्करी गोष्ट | २१ |
| ५ | दोन स्नेही | २३ |
| ६ | जशास तसें पाहिजे होतें ! | २६ |
| ७ | शिवाजीची एक रात्र | ३६ |
| ८ | पंजाबांत बंड कधीं होणार ? | ४६ |
| ९ | मोठेपणाचा वीट ! | ५४ |
| १० | जोसेफ मॅझिनी यांचें आत्मचरित्र व राजकारण | ५८ |
| ११ | भारतभू ही माता नव्हे काय ? | ६७ |
| १२ | शर्यतीमधील एक प्रसंग | ७७ |
| १३ | लो० टिळक हेच अध्यक्ष व्हावेत | ८२ |
| १४ | तें झाड अजून आहे ना हो ? | ९० |
| १५ | असंतोषावर औषध | ९२ |
| १६ | इंग्लिशांची परोपकारबुद्धि | ९८ |
| १७ | प्रतिनिधींच्या बहुमतानें अध्यक्षांची निवड | १०४ |
| १८ | स्वदेशभक्तीचें एक उदाहरण | १११ |
| १९ | कॉंग्रेस मोडण्याकरितां नेमस्तांचीं कारस्थानें | ११५ |
| २० | विविध विचार | १४० |
| २१ | माझ्या पर्वता ! | १५४ |
| २२ | अदृश्य क्रांतिकारकांची परिषद् | १६० |
| २३ | चंद्राचा सोनेरी राजवाडा | १६८ |
| २४ | साहेब आणि मद्रासी | १७३ |

एकंदर चालू महर्गतेमुळें **काळांतील निवडक निबंधाची पुस्तकें** जितक्या स्वस्त किंमतींत द्यावयाची माझी इच्छा होती तितकी देतां आली नाहींत. या करितां काळांतील निवडक निबंधाचे **पहिले भागांत एक सवलतीचें "कूपन" टाकलें आहे.** सवलतीची समग्र माहितीही त्याच भागांत दिली आहे. ग्राहकांनीं अवश्य वाटल्यास त्याचा फायदा घ्यावा. अशी विनंति आहे.

**व्यवस्थापक**

**य. गो. जोशी प्रकाशन कार्यालय**

**सदाशिव पेठ पुणें २.**

# काळांतील निवडक निबंध

## भाग दहावा

य. गो. जोशी–प्रकाशन, पुणें

# वाद-विवेचन माला

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | रु. | १–०–० |
| २ | फॅसिझम | ,, | ,, | १–०–० |
| ३ | साम्राज्यशाही | ना. ग. गोरे | ,, | १–०–० |
| ४ | अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | ,, | १–०–० |
| ५ | लोकशाही | आचार्य जावडेकर | ,, | १–८–० |
| ६ | मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | ,, | १–०–० |
| ७ | विश्व-कुटुंबवाद | ना. ग. गोरे | ,, | १–८–० |
| ८ | ईश्वरवाद | आचार्य दांडेकर | ,, | १–८–० |
| ९ | गांधीवाद | आचार्य जावडेकर | ,, | १–८–० |
| १० | राष्ट्रवाद | कोल्हटकर | ,, | २–०–० |
| ११ | जडवाद | तर्कतीर्थ जोशी | ,, | १–४–० |
| १२ | हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | ,, | २–८–० |
| १३ | मार्क्सचा कॅपिटल-सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | ,, | १०–०–० |

या तेरा पुस्तकांत वाद–विवेचन–माला पूर्ण होते.

या आवृत्तीचे सोल एजंट

## महाराष्ट्र ग्रंथ भांडार

गिरगांव मुंबई

ग्राहकांनीं व पुस्तक विक्रेत्यांनीं पुस्तकें परस्पर ग्रंथ भांडाराकडून मागवावींत

# ग्रस्तमुक्तांचें अभिनन्दन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र०
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

नवविवाहित वधूवरांना ज्या काळीं एकमेकांशीं उघडपणें बोलण्याची किंवा विनोद करण्याची मोकळीक नसे, त्या दिवसांत चोरून मारून तसे प्रसंग साधण्यांत त्यांना जें काव्य अनुभवावयास मिळत असे तें आज सर्व प्रकारची मोकळीक झाल्यानंतर मिळत नाहीं असें, आजचे तरुणतरुणी कबूल करतात. पण त्यांना जर म्हटलें कीं, 'तर मग जुना रिवाज पुन्हा सुरू करूं या' तर तें मात्र त्यांना मान्य नसतें. जुन्या काळच्या बंधनामुळें आणि मर्यादेमुळें जें काव्य निर्माण होत असे त्याचीं वर्णनें 'पण लक्षांत कोण घेतो?' यासारख्या कादंबरींतून वाचण्याची मौज आजहि वाटते. पण त्या काळची समाजस्थिति आज कोणी पसंत करणार नाहीं. रवीन्द्रनाथांच्या 'नौकाडुबी' या कादंबरीमध्यें स्त्रीसहज संकोचामुळें काय काय अनर्थ उत्पन्न झाले याचें उत्कृष्ट वर्णन आहे. किंबहुना त्या कादंबरींतील मुख्य रसच तो आहे. पण त्या काळच्या त्या संकोचाचें आदरयुक्त कौतुक करूनहि ते दिवस पुन्हा यावेत असें कांहीं आपल्याला वाटत नाहीं.

स्वातंत्र्यलक्ष्मीचें महिम्न अनेक प्रकारें गाणाऱ्या काळकर्त्या परांजप्यांच्या जप्त वाङ्मयाचें परिशीलन करीत असतां वरीलप्रमाणेंच मनाची स्थिति होते. आजच्या पिढीच्या तरुणांना कसें काय वाटतें हें सांगतां यावयाचें नाहीं; पण आम्ही जेव्हां कॉलेजांत शिकत होतों आणि शिवराम महादेव परांजपे यांचें व्याख्यान आहे असें कळतांच ती पर्वणी साधण्यासाठीं रेसिडेन्सींतून धांवत जात असूं तेव्हांचा आनंद कोठें तरी नमूद करून ठेवलाच पाहिजे असें आजहि वाटतें.

तो काळ म्हणजे पारतंत्र्य समाजाच्या पचनीं पडलेला काळ होता. स्वराज्य किंवा स्वातंत्र्य हीं नांवें उच्चारायला देखील जीभ धजत नव्हती. एखादा मुलगा रस्त्यावर वन्दे मातरम् ओरडला तर तेवढ्यासाठीं देखील त्याला शिक्षा होई. बंगालमध्यें एक मुलगा रस्त्यानें कोणी साहेब जात असतां स्वतःच्या तंगड्या फाकून दिमाखानें उभा राहिला एवढ्यासाठींच त्याला शिक्षा झाली होती. त्या काळच्या एका पत्रानें लिहिलें होतें 'Even the breach of the legs is the breach of the law. एखाद्यानें सरकारी नोकरी धरली तर

त्याचीं मुलेंबाळें, पुतणे, नातू वगैरे सर्व गोतावळ्यानें राजनिष्ठ असलेंच पाहिजे असा सरकारचा आग्रह असे. सरकारच्या या आग्रहाविषयीं विचार करतां मला दिसून आलें कीं, आपल्या लोकांच्या स्वभाववैशिष्ट्यामुळेंच साहेब लोकांना तसा आग्रह बाळगण्याचें सुचलें. सरकारी नोकराला जर त्याच्या अंमलदारानें विचारलें कीं, 'तूं सरकारी नोकर असून तुझा भाऊ जाहीर व्याख्यानें कां देतो ?' तर 'तो त्याचा प्रश्न आहे. तो कांहीं तुमचा नोकर नाहीं किंवा माझाहि नोकर नाहीं' असें सडेतोड उत्तर देण्याची आपल्या लोकांना हिम्मतच होत नसे. सी. आय्. डी. खात्यानें नात्यागोत्याच्या सर्व लोकांची माहिती सरकारला पुरवतांनाच सरकारला शिकवून ठेवलें, कीं या देशांत एकानें नोकरी धरली म्हणजे सबंध कुटुंबाची राजनिष्ठा सरकारनें विकत घेतली असें म्हणावयास हरकत नाहीं.

अशा काळांत लोकांच्या मनांत बंडाचे विचार सहजच आले पाहिजेत. पण कोणी अवतारी पुरुष जन्म घेईल तेव्हांच आपलें दुःखनिवारण होईल, तोंपर्यंत आपण कसेंबसें जगलें पाहिजे अशीच कल्पना दीनजनांची होती.

लोकांमध्यें सुप्तपणें वसणाऱ्या बंडखोर वृत्तीला सनदशीर चळवळीचें वळण लावावें म्हणून काँग्रेसची स्थापना झाली. राष्ट्रांतील स्वातंत्र्यप्रीतीला भलतेंच व हीन वळण लावणारी ही संस्था आहे असें समजून माझेसारखे तरुण त्या वेळीं काँग्रेसचा द्वेष करीत. लोकमान्य टिळक उघडपणें काँग्रेसच्या चळवळीला उचलून धरतात; पण मनांतून त्यांना हें सरकार उलथून पाडणारें बंडच इष्ट आहे असें आम्हां तरुणांना त्या वेळीं वाटे. आणि म्हणूनच त्यांच्या भाषेंत वारंवार दिसून येणारा मवाळपणा आम्हांला सहन होत असे. हे दाखवावयाचे दांत असेनात का पोचट, हें राजकारण आहे, मुत्सद्देगिरी आहे, जुलमी सरकारच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा हा सुंदर प्रयत्न आहे असें समजून आम्ही संतोष मानीत असूं.

असल्या या वातावरणांत जेव्हां निर्भेळ आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या व तत्प्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या बंडाच्या गोष्टी युक्तिप्रयुक्तीनें लोकांपुढें मांडणारा एक तेजस्वी लेखक आणि वक्ता सापडला तेव्हां आम्हां तरुणांना परमावधीचा आनंद झाला.

आज जर एखादा लेखक उठल्याबसल्या एकाच विषयावर लिहूं बोलूं लागला, तिन्ही त्रिकाळ एकच राग आलापूं लागला, तर आपण कंटाळून जातों. पण

शिवरामपंत बोलूं लागले किंवा लिहूं लागले म्हणजे त्यांचा विषय महाराष्ट्रांतील किल्ले हा असो किंवा दगडी कोळसा हा असो; त्यांच्या हृदयांत एकच आग आहे आणि ती म्हणजे स्वातंत्र्याची, याविषयीं आम्हांला खात्री असे व याचाच संतोषहि असे. ते बोलूं लागले म्हणजे छन्नीपणानें ते इंग्रजांवरच प्रहार करणार, त्यांच्या राज्यव्यवस्थेचे वाभाडे काढणार, ही अपेक्षा आणि आकांक्षा अगदीं पहिल्या वाक्यापासून असे. जर कधीं सबंध विषयच सोवळा ठरला तर तो त्यांनीं कितीहि उत्तम रीतीनें रंगविला असला तरी आम्ही हिरमुसले होऊन परत येत असूं.

सरळ बोलण्याची सोय नसतांना आडमार्गानें, वक्रोक्तीनें, व्यंग्यपूर्ण उपरोधानें सर्व कांहीं उघड उघड कसें सूचित करतां येतें याचे उत्कृष्ट नमुने जनतेपुढें मांडून काळकर्त्यांनीं मराठी भाषेची अप्रतिम सेवा केली आहे. आपल्या भाषेंत केवढी शक्ति गुप्तपणानें वसत आहे याचा साक्षात्कार होणें म्हणजे एखाद्या दरिद्रयाला भूमिगत अपूर्व रत्ननिधि सांपडण्यासारखें आहे. काळकर्त्यांचे लेख वाचून त्या काळच्या महाराष्ट्र वाचकवृन्दाला हर्षवायु होत असे असें म्हटलें तर त्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं.

सरळ सरळ बोलण्याची त्या वेळीं मुभा नव्हती ही गोष्ट तर खरीच, पण सरळ गोष्ट व्याजोक्तीनें किंवा व्यंग्यभाषेंत लिहिण्यानें विशेष गोडी येत असते ही गोष्ट सर्वच कवींना आणि रसिकांना माहीत आहे. कांहीं कवि स्वतःला वक्रोक्तिमार्गनिपुण म्हणवून घेण्यांत अभिमान बाळगीत. यावरून वक्रोक्तीची शैली प्राचीन काळापासून लोकांमध्यें प्रिय होती हेंच सिद्ध होतें. आणि शिवराम महादेव परांजपे म्हणजे त्या काळच्या गद्यशैलीचें अप्रतिम कविच होते. त्यांना स्वतःचा संदेश वक्रोक्तीनें महाराष्ट्रीय जनतेपर्यंत पोंहोचवितांना असाधारण स्फुरण येत असलें पाहिजे. त्यांचेविषयीं जो विशेष आदर वाटतो तो अशासाठीं कीं, त्यांनीं आपली ही सर्व काव्यशक्ति स्वातंत्र्यदेवीचा भाटचारण होण्याकडेच खर्च केली.

त्यांच्या लेखनाचा महाराष्ट्रावर जो प्रत्यक्ष परिणाम झाला त्याचें पहिलें दृश्य फळ म्हणजे श्री. विनायक दामोदर सावरकर आणि त्यांचा नाशिकचा समाज यांची क्रान्तिकारी प्रवृत्ति होय. सावरकर त्या वेळीं नेहमीं म्हणत कीं, "राष्ट्रापुढें त्याचें अंतिम ध्येय अगदीं स्पष्ट शब्दांत आणि असंदिग्ध रूपांत एकसारखें

तळपत राहिलें पाहिजे. नागरिकाचे हक्क आणि वसाहतीचें स्वराज्य ही सर्व मुत्सद्देगिरीची भाषा राजदरबारी कारस्थानांना खुशाल उपयोगी असो; पण जनतेचा आत्मा स्वातंत्र्याच्या उद्घोषानें आणि तळमळीनेंच जागृत होत असतो.

त्या वेळीं काँग्रेस म्हणजे नेमस्तांची काँग्रेस. सनदशीर पद्धतीनें चारदोन हक्क मिळवावे अशासाठीं धडपड धरण्याचें त्यांचें राजकारण असे. सरकारला सांगून सांगून ते काय सांगत? तर—

'पूर्वी जें झबलें अम्हांस शिवलें
आतां न अंगास ये ॥'

तेव्हां आतां वाढत्या अंगाचें दुसरें झबलें शिवून द्या. याच्याऐवजीं 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें?' असा संदेश राष्ट्रापुढें ठेवला पाहिजे म्हणजे त्याची दिशाभूल होणार नाहीं' आणि स्वातंत्र्याच्या तोलाचाच प्रयत्न त्याच्या हातून होईल अशी विचारसरणी शिवरामपंत महाराष्ट्राला एकसारखे सुचवीत राहिले.

या सूचनेप्रमाणें त्यांच्या हातून प्रत्यक्ष अशी कांहीं कृति घडली नाहीं अशी टीका आजकाल कांहीं लोक करतात. मनुष्यानें एखादें सत्कृत्य केलें तर त्यानें शतकृत्य केलें नाहीं म्हणून तो कमी ठरतो अशी टीका केव्हांहि कोणावरहि करतां येईल. गाय घोडा नाहीं किंवा घोडा गाय नाहीं हाहि त्या त्या प्राण्यांचा दोष आहे असें म्हणतां येईल. यात्रेकरूंना त्यांच्या निजधामाचा रस्ता अचूकपणें दाखविणाऱ्या रस्त्यावरील मार्गदर्शक पाटीलाहि म्हणतां येईल कीं, 'तूं रस्ता दाखवितेस तर चालून कां दाखवीत नाहींस?' त्या त्या युगांतील त्या त्या लोकांकडे देवानें त्यांच्यापुरती कामगिरी सोपविलेली असते. उघड बंडाचा संदेश आणि इतिहासपूत गुप्तकटांचा मार्ग जरी शिवरामपंतांनीं राष्ट्रापुढें ठेवला तरी तशा प्रकारच्या कामाला लागणारी पूर्वतयारी त्यांचेकडे नव्हती. पण पुढें जेव्हां गांधींनीं उघड जाहीर केलें आणि नवीन प्रकारची साधना राष्ट्रापुढें मांडली तेव्हां शिवरामपंतांचा स्वातंत्र्यासाठीं तळमळत असलेला आत्मा खडबडून जागा झाला आणि त्यांनीं उघड बंडाच्या उघडया सामुदायिक मार्गांत हिरीरीनें भाग घेतला. एवढेंच नव्हे तर गांधीयुगांत त्यांनीं जे लेख लिहिले त्यांतून वक्रोक्ति, व्यंग्य वगैरे सर्व अलंकार काढून टाकून सरळ सरळ भाषा ते बोलूं लागले. काळकर्ते परांजपे आणि स्वराज्यकर्ते परांजपे व्यक्ति एकच, पण त्यांना आतां घालून पाडून बोलण्याचा कंटाळा आला. मर्दाची

भाषा मर्दाला साजेल अशी बंदुकीच्या गोळीसारखी सरळ असते हें त्यांनीं ओळखलें. चारणाची भाषा सोडून ते वीराची भाषा बोलूं लागले आणि वीराची भाषा बोलणाऱ्याला वीरोचित कृति करण्याचें आपोआपच सुचतें. तशी त्यांनीं कृतीहि करून दाखविली.

काळांतील निवडक निबंधांवर जप्ती आणून सरकारनें शिवरामपंतांच्या शैलीची कदर केली आणि लोकांनाहि त्या साहित्याची चुटपुट लागली. तें साहित्य स्वतःच्या गुणानें आणि सरकारनें केलेल्या कदरीमुळें महाराष्ट्रांत प्रतिष्ठा पावलेंच; पण महाराष्ट्राला शिवरामपंतांच्या तेवढ्याच साहित्याची आठवण होणें इष्ट नाहीं. संस्कृत साहित्य, अितिहास, भाषाशास्त्र, वेदान्त, तर्क इत्यादि सर्वच अभिजात साहित्यामध्यें सहजलीलेनें वावरणाऱ्या या रसिक पंडिताचें सगळेंच साहित्य महाराष्ट्राला आदरार्ह वाटलें पाहिजे; आणि त्या सर्व साहित्याचें आजच्या विद्वानांनीं व विद्यार्थ्यांनीं आदरपूर्वक अध्ययन केलें पाहिजे.

ही गोष्ट खरी आहे, कीं त्यांच्या काळची मराठी आणि आजची मराठी यांत अंतर पडत चाललें आहे. आजच्या मराठीला पूर्वींच्या सारखे जड-भारी दागिने पेलत नाहींत, आवडत नाहींत. थोडक्या आणि नेमक्या शब्दांत आपला भाव व्यक्त करून पुढें कसें धांवावें याचीच साधना आजची मराठी करीत आहे. शिवरामपंतांच्या शैलीचें आज आपण कितीहि उत्कटतेनें अध्ययन केलें तरी तिचें अनुकरण आपण करणार नाहीं; परंतु त्यांच्या साहित्याचें सखोल अध्ययन केल्यामुळें आजची आपली मराठी अधिक सकसच होअील. भाषेच्या शक्तीचा साक्षात्कार झाल्यावांचून कोणीहि लेखक आपल्या भाषेला नव्या नव्या टप्प्यांपर्यंत नेऊं शकत नाहीं. पूर्वाचार्यांचें जुनें ठेवणें ज्यांनीं हस्तगत केलें नाहीं, त्यांनीं कितीहि भराऱ्या मारल्या तरी, त्यांना आपला भाषाक्षय लपवितां यावयाचा नाहीं. ज्ञानेश्वराचें वैभव, वामनपंडिताचें माधुर्य, तुकारामाचा प्रांजळपणा, मोरोपंतांचें वक्तृत्व, चिपळूणकरांचें गौरव, रानड्यांचा प्रसाद आणि शिवरामपंतांची व्यंजना, हरिभाऊ आपट्यांचा प्रवाह आणि वामन मल्हारांची संस्कारिता या सर्व गुणांचा ज्यानें अध्ययनपूर्वक साक्षात्कार करून घेतला आहे त्यानेंच मराठीला नवीन वळण लावावें आणि नवे नवे विक्रम करून दाखवावेत.

काळांतील निवडक निबंध वाचून आज महाराष्ट्रांत स्वातंत्र्याची तळमळ उत्पन्न व्हावयाची नाहीं. काळकर्त्यांनीं जी वाङ्मयीन तपस्या केली ती फळास येऊन महाराष्ट्र केव्हांच स्वातंत्र्यवादी होऊन चुकला आहे. अिंग्रजांच्या कुटिल नीतीचा आपल्याला अितका अनुभव येऊन चुकला आहे कीं, त्या नीतीच्या वर्णनपर एक वाक्यहि वाचण्याची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. जर आज देखील स्वातंत्र्याच्या प्रेरणेसाठीं काळांतील निवडक निबंध वाचावे लागले, तर काळकर्त्यांची तपस्या राखेंत आहुती घातल्याप्रमाणें व्यर्थ झाली असें म्हणावें लागेल. आणि या गेल्या दोन पिढयांत महाराष्ट्रानें कांहींच पुरुषार्थ केला नाहीं असें सिद्ध होईल. आज काळकर्त्यांच्या निबंधांचें स्वागत करतांना त्यांना उद्देशून आपण म्हटलें पाहिजे, "हे तेजस्वी निबंधांनो! तुमची तपस्या फुकट गेली नाहीं. तुम्ही जें बीज रोवलें त्याचा फोफावलेला वृक्ष महाराष्ट्रांत कबीरवडाप्रमाणें पसरलेला पाहण्यासाठीं आम्ही तुम्हांला आमंत्रण देतों. तुमच्या पारायणानें परिपुष्ट झालेले असंख्य महाराष्ट्रीय लेखक तुम्हांला श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं सज्ज आहेत. ती अंजलि स्वीकारून त्यांना तुमचे उतराई होऊं द्या. ज्याप्रमाणें आजचे ब्राह्मण कृतज्ञतापूर्वक वैदिक वृत्तींचें तर्पण करतात त्याप्रमाणें आम्ही तुमचें आदरपूर्वक तर्पण करीत आहोंत. आम्हांला आशीर्वाद देणें आणि आमच्या विक्रमाचें कौतुक करणें एवढेंच काम आतां तुमच्या वांटयाला उरलेलें आहे. ब्रह्मकर्माच्या प्रारंभीं ज्याप्रमाणें पूर्वज, पूर्वऋषि आणि पूर्वाचार्य यांचें स्मरण करावयाचें असतें त्याप्रमाणें आम्ही तुमचें स्मरण करूं आणि तुमच्या दर्शनानें व पारायणानें आमच्या थोर परंपरेची आठवण कायम ठेवूं. ज्या सरकारनें तुम्हांला अंधारांत टाकलें त्या सरकारचा शुक्लपक्ष संपला, कृष्णपक्ष चालू झाला आहे; त्याची अमावस्या अगदीं जवळ आली आहे. म्हणूनच तर तुम्हांला उजळ माथ्यानें पुन्हा उजेडांत येतां येत आहे. घोर अंधारांत तुम्हीं जो प्रकाश पाडला आणि दिशा दाखविली त्याचें स्मरण करून अरुणोदयाचे वेळीं तुमचे पुन्हा एकदां स्वागत करतों:—

**नमस्तेऽस्तु ब्रह्मन्! स्वस्ति मेऽस्तु।**

**—दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर**

काकावाडी, वर्धा,
२१।७।४६



महाराष्ट्र कॉलेजांतील प्रोफेसर
शि. म. परांजपे. (१८९६)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ......

## रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठीं प्रार्थना : : १

काळ : अग्रलेख ता. ५-४-१९०७

● काळ : वर्षारंभींची प्रार्थना.

**जनीं भक्ति नाहीं, मनीं भाव नाहीं**
**मला युक्ति ना बुध्दि कांहींच नाहीं !**
**कृपाळूपणें राज्य रंकासि द्यावें**
**समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ।।**

ही सुमारें अडीचशें वर्षांची जुनी प्रार्थना आहे. सतराव्या शतकांत रामदासस्वामींनीं आपल्याकरितां आणि आपल्या देशाकरितां देवापाशीं ही प्रार्थना केलेली आहे. आणि तीच प्रार्थना करण्याची आतांही वेळ येऊन ठेपलेली आहे. रामदासस्वामींच्या वेळची स्थिति आणि आतांची स्थिति यांच्यामध्यें पुष्कळ साम्य आहे. त्या वेळीं हिंदुस्थानावर मुसलमानांचें राज्य चालू होतें. हिंदूंचीं क्षेत्रें बुडालीं होतीं, आणि हिंदूंच्या धर्माचा ऱ्हास होत चालला होता. गाईचा वध, देवळांचा विध्वंस आणि ब्राह्मणांचा छळ, या गोष्टींना ऊत आलेला होता. आणि सर्व हिंदुस्थान देश परकीय लोकांच्या गुलामगिरीमध्यें कुजत पडला होता. एखादा देश कालगतीनें गुलामगिरीमध्यें सांपडला असतांही तेथील लोकांना जर गुलामगिरी ही वाईट आहे आणि हिच्यापासून आपण स्वतंत्र झालें पाहिजे असें वाटूं लागलें, तर त्यांना पुढें-मागें केव्हांतरी खात्रीनें स्वतंत्रता मिळण्याची आशा असते. परंतु सतराव्या शतकांतील या देशाच्या स्थितीकडे पाहिलें तर लोकांच्या मनामध्यें तो गुलामगिरीचा तिटकारा उत्पन्न झाला होता असें दिसत नाहीं. साधुसंत आपआपल्या देवाच्या आणि सामान्य लोक आपआपल्या पोटाच्या भजनीं लागलेले जिकडे तिकडे दिसत होते. अशा स्थितींत रामदासस्वामींचा अवतार हिंदु-

स्थानच्या भूमीवर झाला. आणि तोच त्या वेळीं आपल्या हिंदुस्थान देशाला स्वतंत्र करण्याला कारणीभूत झाला. रामदासांच्या ग्रंथांमध्यें आपल्या गुलामगिरीच्या स्थितीबद्दल अनेक वेळां उद्विग्नता प्रदर्शित केलेली आढळून येते. "अहा रे विधी हें असें काय केलें। पराधीनता पाप माझें उदेलें ॥" "परत्रीं जिणें दीन कंटू किती रे।" "पराधीन कैसा बरा दीसशी रे।" इत्यादि प्रकारचे जे अनेक उद्‌गार रामदासांच्या ग्रंथांतून मधून मधून आढळतात, त्यांवरून आपल्या देशाच्या परतंत्रतेसंबधानें त्यांना अतिशय वाईट वाटत असलें पाहिजे, व आपल्या देशबांधवांनीं असल्या या पराधीनतेच्या स्थितीमध्यें न राहतां स्वतंत्र व्हावें असा ते सर्वांना नेहमीं उपदेश करीत असले पाहिजेत असें दिसतें. रामदासस्वामींचा मुख्य कल जरी पारमार्थिक विचारांकडे होता, तरी ते व्यवहाराकडे थोडेंथोडकें लक्ष देत असत असें नाहीं. संसारबंधनापासून आपण मुक्त व्हावें हें त्यांना जसें वाटत होतें, त्याचप्रमाणें आपला देशही परकीय पराधीनतेच्या बंधनापासून मुक्त व्हावा, आणि त्यानें स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घ्यावा, असें त्यांना वाटत असे. पारमार्थिक महत्त्वाकांक्षांचा प्रस्तुत विषयाशीं संबंध नसल्यामुळें त्या आपण क्षणभर बाजूला ठेवूं; परंतु रामदासांची ऐहिक महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे आपला देश परकीयांच्या जुलमापासून स्वतंत्र झालेला आपण पहावा, ही होती. पण ही आपल्या स्वतंत्रतेची इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाल्यानंतर ज्यांनीं आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीकडे पाहिलें, त्या वेळीं ती इच्छा परिपूर्ण होण्याचीं साधनें त्यांना कोठेंच दिसेनात, आणि त्यामुळें त्यांची अनेक वेळां निराशा झाली असली पाहिजे. स्वदेशाकरितां स्वतंत्रता मिळवूं इच्छिणाऱ्या देशभक्तांना निराशेचे क्षण किती तरी वेळां येतात! आणि रामदासस्वामींचे त्यांच्या ग्रंथांतून जे उद्‌गार आढळतात, त्यांवरून त्यांच्या मनाचें पृथक्करण केलें असतां त्यांनाही असे निराशेचे क्षण वारंवार प्राप्त होत असले पाहिजेत, असें दिसतें. स्वदेशाला स्वराज्य प्राप्त व्हावें अशी रामदासस्वामींची इच्छा तर खरी; पण ते बिचारे एकटे काय करणार! ज्यांनीं त्यांच्या देशाला आपल्या जबड्यांत धरलें होतें ते लोक असंख्य, प्रबळ आणि सुसंपन्न. त्यांच्यापुढें या एकट्या स्वदेशभक्तानें काय करावें! अशा कामाला वास्तविक सर्व लोकांची मदत असली पाहिजे. अर्वाचीन काळांतील सीक्रेट सोसाइटीजप्रमाणें आपला एक

'राघवाचा अनंत पंथ' त्यांनीं काढला होता व स्वातंत्र्यप्रीतीच्या आणि स्वदेश-भक्तीच्या उपदेशाचें काम त्यांनीं सगळीकडे सुरू केलें होतें. तरी पण त्यांच्या प्रयत्नाला जशीं फळें यावींत तशीं येईनात. स्वराज्यप्राप्ति हें साध्य फार मोठें, आणि त्या मानानें त्याची साधनसामग्री आपल्याला फारच थोडी अनुकूल असें वाटून, निराशा त्यांच्या अंतःकरणावर आपलें काळें पांघरूण वारंवार पसरीत असे. अशाच एखाद्या निराशेच्या वेळीं त्यांच्या तोंडून या लेखाच्या शिरोभागीं दिलेले उद्‌गार निघालेले असले पाहिजेत. "जनीं भक्ति नाहीं, मनीं भाव नाहीं ! मला युक्ति ना बुद्धि कांहींच नाहीं ॥" हे पूर्ण निराशेचे उद्‌गार आहेत. लोकांकडे पहावें तर स्वदेशाच्या स्वतंत्रतेसाठीं महत्कृत्यें पार पाडण्याला लोकांच्या मनामध्यें जी भक्ति किंवा श्रद्धा पाहिजे, ती रामदासस्वामींना त्यांच्या ठिकाणीं मुळींच आढळेना. बरें स्वतःकडे पहावें, तर इतका मोठा कार्यभार आपल्या डोक्यावर घेण्याइतकी युक्ति किंवा बुध्दि आपल्यामध्यें आहे अशीही रामदासस्वामींना स्वतःबद्दल खात्री वाटेना आणि असें वाटणें स्वाभाविकच आहे. जरी महाराष्ट्राच्या त्या वेळच्या स्वतंत्रतेला रामदासस्वामी हेच मुख्यत्वेंकरून कारणीभूत झाले, तरी ती गोष्ट घडून येण्याच्यापूर्वीं सभोंवतालच्या एकंदर प्रतिकूलतेमुळें कित्येक क्षणीं त्यांचें मन निराशेनें हतवीर्य होणें साहजिक होतें. मनुष्याला प्रथमतः असें वाटत असतें कीं आपल्याला जी एखादी गोष्ट करावयाची आहे ती मानवी प्रयत्नानें सफळ होईल. परंतु अनुभवानें हा भ्रम दूर होऊन अखेरीस भयंकर निराशा उत्पन्न होते आणि अशा रीतीनें मग मनुष्याचें मन मानवी प्रयत्नांना जिच्यापासून साफल्य प्राप्त होतें अशा त्या भगवत्कृपेकडे वळतें, व परमेश्वर कृपा करील तरच हें कार्य तडीस जाईल असें वाटूं लागतें. निराशेचा अंधःकार जेव्हां आपल्याभोंवतीं चोहोंकडे पसरतो, तेव्हां आकाशांत दूर दूर अंतरावर ताऱ्यांच्याही पलीकडे जें भगवत्कृपेचें लहानसें अंधुक तेज चमकत असतें, तिकडे मनुष्याचे साहजिकपणें डोळे लागतात. युक्तीचा गर्वपरिहार होतो, बुध्दि हातपाय टेकते, आणि भगवत्कृपेशिवाय मनुष्यप्राणी पाय असून लंगडा, हात असून थोटा, आणि डोळे असून आंधळा आहे असें भासूं लागतें. आणि दोरी तुटलेल्या पतंगाप्रमाणें मानवी प्रयत्नांच्या दौर्बल्यानें निरधार झालेलें मन आकाशांत इतस्ततः तरंगतां तरंगतां अखेरीस परमेश्वराच्या चरणांपाशीं शरण जातें. या लेखाच्या अग्रभागीं दिलेला

श्लोक जेव्हां रामदासांनीं उच्चारला तेव्हां त्यांच्या मनाची हीच अवस्था झाली असली पाहिजे; आणि तशा स्थितींत रामदासस्वामी परमेश्वराला म्हणतात कीं, मी तर बोलूनचालून रंक आहें. स्वराज्यप्राप्तीसाठीं जें द्रव्य पाहिजे तेंही माझ्यापाशीं नाहीं. लोकांची मदत नाहीं, आणि स्वतःजवळ युक्ति किंवा बुद्धिही नाहीं. आणि द्रव्य तर रंकापाशीं नसतेंच. तरी पण आमचा देश स्वतंत्र होऊन तेथील आमचें राज्य आम्हांला मिळावें अशी माझी इच्छा तर आहे. ती इच्छा पूर्ण होण्याला माझ्यापाशीं कांहीं एक साधन नाहीं. तुझा कृपाळुपणा हेंच काय तें माझें साधन. तूं कृपाळु होऊन देशील तरच आमचें राज्य आम्हांला मिळणार आहे. बरें, कदाचित् तूं कृपाळु होऊन आतां राज्य देशील आणि मग म्हणशील कीं, आतां माझ्या कृपाळुपणाची तुम्ही परतफेड करा. तर त्यावर रामदास म्हणतात कीं, हे समर्था परमेश्वरा, तुझ्या कृपाळुपणाबद्दल आम्ही काय उतराई होणार! तुझी कृपा अनंत आहे. तिची फेड अल्पज्ञ मनुष्यप्राणि काय करूं शकणार आहे! तेव्हां उपकाराच्या फेडीचीही तूं आशा ठेवूं नको; तर निरपेक्षबुद्धीनें आणि केवळ कृपाळुपणानें तूं आमच्या देशाचें राज्य आम्हांला दे!

रामदासस्वामींच्या ग्रंथांबद्दल अलीकडे पुष्कळ शोध चालले आहेत व नवीन नवीन ऐतिहासिक माहितीनें भरलेल्या शुध्द आवृत्त्या प्रसिध्द होत आहेत. परंतु हा वर दिलेला श्लोक रामदासांनीं केव्हां आणि मनाच्या कोणत्या अवस्थेमध्यें लिहिला असला पाहिजे इतक्या खोलपर्यंत मार्मिक मीमांसेची मजल अद्यापि खालीं उतरलेली नाहीं. ती तितक्या स्थितीपर्यंत येऊन पोहोंचण्याला काव्यपरीक्षणाच्या पध्दतीमध्यें अद्यापि पुष्कळ प्रगति व्हावयाला पाहिजे आहे. सुधारलेल्या पाश्चिमात्य देशांतील प्रमुख कवींच्या कांहीं विशेष उक्तींसंबंधानें तिकडील टीकाकार अशा प्रकारची विचिकित्सा करीत असतात. तशी कांहीं माहिती जर या प्रस्तुत श्लोकासंबंधानें उपलब्ध असती तर विशेष मौज झाली असती. परंतु जेथें प्रत्यक्षाच्या हद्दीच्या खुणा नाहींत, त्या जागेवर अनुमानाचा हक्क शाबीत धरला जातो, हा शास्त्राचा नियम सर्वांना विदितच आहे. त्याप्रमाणें या श्लोकांतील अर्थाच्या अनुरोधानें रामदासस्वामींच्या हा श्लोक करतेवेळच्या मानसिक स्थितीसंबंधानें अनुमान करावयाचें असेल, तर असें दिसतें कीं, स्वराज्यप्राप्तीसाठीं स्वतः पुष्कळ प्रयत्न करून

आणि लोकांना पुष्कळ उपदेश करूनही कांहीं एक होत नाहीं असें पाहून, अत्यंत निराश आणि उदासीन होऊन ते कोठें तरी एकांतांत जाऊन बसले असतील, किंवा एखाद्या टेकडीच्या शिखरावर जाऊन उभे राहिले असतील, किंवा एखाद्या प्रशांत व गंभीर अशा नदीच्या कांठीं ते अंग टाकून पडले असतील ; ते दीर्घ श्वास टाकीत असतील, आणि त्यांच्या देशाच्या स्वतंत्रतेच्या दुष्प्राप्यतेकडे पाहून त्यांच्या डोळ्यांतून खळखळ अश्रु वाहूं लागले असतील. त्या वेळीं त्यांना दिशा उदास भासूं लागल्या असतील, आणि सूर्य प्रकाशमान असतांहि जिकडे तिकडे त्यांना अंधकार पसरलेला दिसला असेल आणि "हा स्वदेशा!" "हा स्वतंत्रते!" असे उद्‌गार त्यांच्या बाष्पनिरुध्द कंठामधून अडखळत अडखळत अनेक वेळां बाहेर निघाले असतील आणि अखेरीस आतां परमेश्वरावांचून कोठें कांहीं आधार नाहीं, त्याच्याच कृपेनें आपल्याला स्वतंत्रता मिळाली तर मिळेल, असें वाटून "जनीं भक्ति नाहीं, मनीं भाव नाहीं। मला युक्ति ना बुध्दि कांहींच नाहीं॥ कृपाळुपणें राज्य रंकासि द्यावें। समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें॥" हा श्लोक त्यांच्या तोंडांतून बाहेर प्रकट झाला असावा.

रामदासांची इच्छा या श्लोकाच्या रूपानें परिणत झाली त्या वेळीं जी स्थिति होती तीच बहुतेक अंशीं आपल्या देशाची आज स्थिति झालेली आहे. हा श्लोक अडीचशें वर्षांचा जुना आहे, तरी पण आजच्या स्थितीला त्याचा उपयोग करावयाचें कोणी मनांत आणल्यास तो श्लोक जणूं काय कोणी आजच्या स्थितीला अनुलक्षूनच केला आहे असा भास उत्पन्न करण्याइतका नवीनपणा त्याच्यामध्यें भरलेला आहे. आजकाल आपलीही अशीच स्थिति झालेली आहे. हल्लींचें देशावरील संकट इतकें प्रचंड आहे कीं, कोणीही एकटा मनुष्य म्हणेल कीं, मी त्याचें निवारण करीन, तर त्याची युक्ति किंवा बुद्धि कांहीं चालावयाची नाहीं. बरें, त्यासाठीं अनेक लोकांचे संघ करावे तर त्याकरितां लोकांमध्यें जी एक प्रकारची भक्ति किंवा श्रध्दा लागत असते तीही नाहीं. आणि संपत्तीविषयीं म्हणावें तर हल्लींच्या हिंदुस्थानांतील लोकांनां इंग्लिशांनीं कधींच रंक करून ठेविलें आहे. बरें, हीं जर साधनें नाहींत, तर स्वराज्याच्या हक्काची मागणी करण्याचा नाद तरी आपल्याला नसावा. पण तेंही आतां शक्य नाहीं. कारण हिंदुस्थानांतील सगळ्या लोकांच्या मनामध्यें स्वराज्याची

कल्पना फारच जोरानें ठसून गेलेली आहे. ती कल्पना आतां मन विसरूं शकत नाहीं. आणि त्या कल्पनेची गोडी चाखल्यानंतर आतां मन त्या कल्पनेपेक्षां खालच्या प्रतीच्या आणि घाणेरडया अशा दुसऱ्या एखाद्या कल्पनेकडे कधीं ढुंकूनसुध्दां पाहणार नाहीं. त्या मनाला स्वराज्याचीच प्राप्ति झाली पाहिजे. अशा स्थितींत भगवत्कृपेशिवाय आपल्याला दुसरा कांहीं एक मार्ग नाहीं. म्हणून ह्या रामदासांचा वरील श्लोक घेऊन त्यांच्याप्रमाणें आपणही परमेश्वराची प्रार्थनाच केली पाहिजे आणि कृपाळुपणानें तूं आम्हां रंकांना आमचें राज्य दे, अशी त्याची विनवणी केली पाहिजे.

---

## नाट्यकलेसंबंधीं कांहीं टिपणें : : २

स्वतंत्र : काळ. ता. ५-४-१९०७; ता. १२-४-१९०७

● सगळेंच नाटक !

आपणापाशीं पात्रें असतील त्यांत चांगलें बसेल असें नाटक घ्यावें. दुसरें चांगलें करतात म्हणून तें नाटक आपण पसंत करूं नये. एखाद्या विशिष्ट नटाचे अभिनय आपल्याला आवडले म्हणून त्याचें अनुकरण करूं नये, तर आपण स्वतः विचार करून आपले अभिनय बसवावे. अनुकरणापेक्षां स्वतःच्या विचारानें काम अधिक चांगलें वठेल. भाषणें चांगलीं पाठ झालीं पाहिजेत, नाहीं तर तिकडे लक्ष गुंतून अभिनयाचें अंग कमी पडतें. जितक्या पुष्कळ तालमी करतां येतील तितक्या कराव्या व रंगाच्या तालमी निदान दोन तरी कराव्या. कोणत्याही प्रवेशाची तालीम चालली असली तरी सर्वांनीं नेहमीं तालमेच्या वेळीं हजर असलें पाहिजे. आपल्या भूमिकेमध्यें कोणते मनोविकार आहेत इकडे प्रत्येक नटानें लक्ष द्यावें. एका प्रसंगीं जो अभिनय केला तोच नेहमीं कायम ठेवावा. जर नाटककार प्रत्येक खेपेला आपलीं वाक्यें बदलीत नाहीं, तर नटानें तरी आपला अभिनय कां बदलावा ? नवीन प्रेक्षकांपुढें जुनाच अभिनय केला तरी तो त्याला नवीनच आहे. आणि जुन्या प्रेक्षकांपुढेंही तोच अभिनय कर-

ण्याला हरकत नाहीं. याचें कारण असें कीं, त्यांना पहिला अभिनय आवडलेला असतो म्हणून ते तोच अभिनय फिरून पहाण्यास येतात व तो दृष्टीस पडला नाहीं म्हणजे ते निराश होतात. आयत्या वेळीं जसा सुचेल तसा अभिनय करूं असें असूं नये. तो आधीं ठरवूनच ठेवावा. गलबत फुटून पाण्यांत बुडूं लागल्यावर मग पोहावयाला शिकणें चांगलें नाहीं. अभिनयाचें शिक्षण वाचण्यापेक्षां पाहण्यानें अधिक चांगलें मिळतें. कपाळावर हात चोळणें हे विचार करण्याचें लक्षण आहे. डोकें हलविलें असतां तें संमतीचें सूचक आहे व शंका आणि नापसंतीही त्यांनीं दर्शविल्या जातात. डोकें मागें नेलें असतां नावड, तिटकारा, भीति हीं सूचित होतात. लक्ष लावून एखादी गोष्ट ऐकावयाची असली म्हणजे आपण डोकें पुढें करतो. धैर्य व गर्व दाखवावयाचा असतांना आपण डोकें वर ताठ धरतों. लज्जेच्या वेळीं खालीं मान घालतों, आणि दुःखाच्या वेळीं आपण आपली मान कोठल्या तरी एका खांद्यावर टाकतों. नीच पात्रानें फक्त हास्यरसाचे वेळीं नुसत्या डोक्यानें अभिनय करावा. बाकी कोणी केव्हांही नुसत्या डोक्यानें अभिनय करूं नये. आपले केस धरून ओढणें हें जिवावर उदार झालेल्या मनुष्याचें लक्षण आहे. रागाच्या वेळीं भिवया वांकडया होतात. डोळ्याचा आणि मनाचा निकट संबंध असल्यामुळें आपले विचार डोळ्यांतून आधीं ऐकूं येतात नाकाच्या टोंकाला बोटानें स्पर्श करणें हें शहाणपण व लुच्चेगिरी दाखवितें. आपल्या मनांत एखादा मनोविकार आला आणि तो आपण तसाच दाबून ठेविला तर त्या वेळीं आपल्या नाकपुडया रुंद होतात व स्फुरण पावतात. हनुवटीला बोटानें स्पर्श करणें हें विचाराचें लक्षण आहे. तिरस्कारमुद्रा दाखवितेवेळीं आपला अधरोष्ठ किंचित् वांकडा होतो. धाडसाविषयीं बोलत असतां मनुष्य छातीला हात लावतो. बोट किंवा मूठ हलविणें हें धमकी, राग वगैरेचें चिन्ह आहे. बहुतेक सर्व अभिनय उजव्या हातानें करावे. परंतु याला अपवाद असे कीं, एक वस्तु उजव्या बाजूची आणि दुसरी डाव्या बाजूची अशा दाखवायच्या असतील, तेव्हां उजवाच हात आपल्या शरीरापुढून नेणें चांगलें नसल्यामुळें तेथें डाव्या हाताचाच उपयोग करावा. एक गोष्ट उजव्या हातानें दर्शविली असली तर त्याच्याविरुध्द असलेली गोष्ट डाव्या हातानें दर्शवावी. रागाचा वगैरे अभिनय करतांना उजव्या हाताची मूठ वळली

असतां डावा हात नेभळटपणानें तसाच लोंबत ठेवूं नये, तर त्यानेंही थोडासा तसाच अभिनय करावा. मागणें, वचन देणें, बोलावणें, झिडकारणें, धमकावणें, विनविणें, धिक्कारणें, भिणें, प्रश्न विचारणें, नाकबूल करणें, वगैरे गोष्टी हाताच्या अभिनयानें आपल्याला करतां येतात. हातांत हातमोजे कधींही असूं नयेत. नटाप्रमाणें वक्त्यालाही हाताच्या अभिनयाची आवश्यकता आहे. वाजवीपेक्षां फाजील हातवारे करणें हा नटाच्या अंगचा मोठा दोष आहे. रंगभूमीवर स्थिरपणानें उभें राहणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. प्रत्येक शब्दाला हाताचा अभिनय करूं नये. त्यानें महत्त्वाच्या शब्दाकडील लक्ष कमी होतें. फक्त महत्त्वाच्या ठिकाणीं अभिनय करावा; इतरत्र करूं नये. मनांत कल्पना आली म्हणजे ती आधीं अभिनय उत्पन्न करते आणि मग शब्द उच्चारले जातात. हात वगैरे न हालवितां गंभीरपणानें काम केल्यास त्याचा फार परिणाम होतो. समुद्रांतील गलबताविषयीं बोलत असतां हात वर छताकडे दाखविणें हें खोट्या अभिनयाचें उदाहरण होय. हातानें अभिनय करावयाचा असेल तेव्हां खांद्यापासून सर्व हात खुल्या रीतीनें हालला पाहिजे. कित्येकांना खांद्यापासून कोपरापर्यंतचा भाग पोटाशीं चिकटून धरण्याची संवय असते, तशी असूं नये. स्वाभाविक स्थितींत हात उघडा असावा, मूठ वळलेली नसावी, अंगठा फार वर उचललेला नसावा; तळहात उघडा धरला असतां सांत्वन, विश्रांति वगैरेचा तो द्योतक होतो. दोन्ही हातांच्या बोटांचीं टोंकें एकमेकांना लावून दृष्टि वर लाविली असतां ती मुद्रा विचाराची सूचक होते. रागाच्या किंवा निश्चयाच्या वेळीं मुठी मिटतात. बोट पिळणें व सर्व अंगालाही पिळके देणें हें दुःख किंवा पश्चात्ताप यांचें चिन्ह आहे. फक्त एकट्याच तर्जनीचें बोट लांब केलें असतां त्याचा फार परिणाम होतो. उजव्या हाताच्या तर्जनीचें टोंक डाव्या तर्जनीच्या टोंकावर मुद्द्याची गोष्ट दाखविण्याचे वेळीं बहुधा ठेवितात. उदाहरणार्थ, 'अहो, येथेंच तर खुबी आहे,' अशा ठिकाणीं हृदयाच्या मध्यभागावर सबंध हात ठेविला असतां प्रेम व सात्विक विचार दर्शित होतात, व धैर्याचें भाषण किंवा शपथपुरस्सर सत्य भाषण हेंही सूचित होतें. परंतु वक्त्याला आपल्या स्वतःचा निर्देश करावयाचा असेल तर तो फक्त आपल्या हाताचीं बोटें आपल्या छातीला लावतो. ओठांवर हात ठेवणें म्हणजे गप्प

चसावयास सांगणें किंवा विचार करणें होय. कपाळावर हात चोळणें, कानशिलें चोळणें, दृष्टि वर लावणें, ह्यांनीं शंका, भीति व चिंता यांचा अभिनय करावा. जेव्हां तशीच महत्त्वाची कल्पना असेल, तेव्हां मात्र दोन्ही हात वर उचलावे. पण अशा वेळीं ते दोन्ही एकदम वर उचलावे व एकदम खालीं आणावे.

प्रॉम्प्टरनें प्रत्येक तालमीला हजर असावें. कोणाचा केव्हां प्रवेश व्हावयाचा हें त्याला चांगले माहीत झालें पाहिजे व एखादें पात्र रंगभूमीवर बोलतांना थांबलें तर थांबणें सहेतुक आहे किंवा पुढलें आठवत नाहीं म्हणून आहे, हें त्याच्या चांगलें लक्षांत पाहिजे. वुइंगमध्यें पुढल्या प्रवेशाची पात्रें तयार करून ठेवणें हेंही त्याचें काम आहे. ज्या प्रवेशांत जी स्टेजची व्यवस्था एकदां केली असेल, ती फिरून बदलूं नये. कारण त्यामुळें पात्रांना अडखळल्यासारखें होतें. स्टेजमॅनेजरनें स्वतः कधींही सोंग घेऊं नये. दोन अंकांच्या मधील वेळ दहा मिनिटांपेक्षां जास्त असूं नये. पण सहा किंवा आठ मिनिटें असला तर चांगला; व तो वेळ संपल्याबरोबर पडदा वर उचलण्याला उशीर कधींही लागूं नये. ग्रीन रूम हें नांव पडण्याचें कारण असें कीं, त्या ठिकाणच्या सतरंज्या व इतर सर्व सामान हिरव्या रंगाचें असतें; ग्रीन रूमचे कॉन्व्हेंट गार्डन आणि ड्रूरी लेन थिएटरमध्यें दोन भाग असत. एकामध्यें नाटकांतील सर्व पात्रें रंगण्याची वगैरे सोय केलेली असे; व दुसरा म्हणजे एक मोठा भव्य दिवाणखाना असे. मध्यभागीं एक मोठें झुंबर असे आणि मनुष्याचा सबंध आकार दिसेल असा व पाहिजे तसा फिरवितां येईल असा, एक विस्तीर्ण आरसा तेथें ठेविलेला असे. पात्र सजून तेथें आलें म्हणजे त्याला आपलें सोंग कसें काय झालें आहे हें ह्या योगानें मागून पुढून व पायापासून डोकीपर्यंत पाहतां येतें. याप्रमाणें पाहून झाल्यावर पात्रें तेथील खुर्च्यांवर इतर मंडळींशीं बोलत बसतात व त्यांना हाक मारली म्हणजे तीं पात्रें बाहेर जातात. हाक मारण्याचें काम मुलाकडे असतें. त्याला Call Boy असें म्हणतात. पात्राच्या प्रवेशाला सुमारें पांच मिनिटें राहिलीं, किंवा सुमारें १२० ओळी भाषण उरलें, म्हणजे त्या सुमारास प्रॉम्प्टरच्या बुकामध्यें आंकडे घातलेले असतात. त्याप्रमाणें त्या नंबरच्या पात्राला बोलावून आणण्याविषयीं प्रॉम्प्टर त्या कॉल बॉयला सांगतो. कॉल बॉयपाशीं एक याद असते; त्या यादींत नंबरांच्यापुढें पात्राचें नांव असतें. प्रॉम्प्टरनें तीन

हा नंबर सांगितला तर कॉल बॉयच्या यादींत तिहीच्यापुढें हॅम्लेटचें नांव असलें तर हॅम्लेटला, किंवा तें सोंग ज्यानें घेतलें असेल त्या इसमाला तो बोलावून आणतो, व तें पात्र वुइंगच्या आंत येऊन उभें राहतें. नाटकाला कोणी राजे, सरदार किंवा बडे लोक आले आणि त्यांना कॉफी वगैरे द्यावयाची असली तर तो समारंभ ग्रीन रूमच्या दुसऱ्या दिवाणखान्यांत होतो. कोणी ग्रंथकार नवीन नाटक घेऊन आला, तर सर्व पात्रें ग्रीन रूममध्यें जमतात व तेथें तो ग्रंथकार आपलें नाटक त्यांना वाचून दाखवितो.

फॅरेन आणि व्हॅन्डेनहॉफ हे दोघेही उत्तम नट होते. पैकीं फॅरेन हा फार वाकबगार झालेला होता, व व्हॅन्डेनहॉफ हा नुकताच नटाचें काम करूं लागला होता. अशा स्थितींत एकदां या दोघांचा रंगभूमीवर एका नाटकांत प्रसंग आला. फॅरेन रंगभूमीवर आधीं आलेला होता आणि व्हॅन्डेनहॉफ यानें पाठीमागून प्रवेश केला व दोघांचें बोलणें सुरू झालें. तरी पण फॅरेननें आपला चेहरा जो प्रेक्षकांकडे लाविला होता तो व्हॅन्डेनहॉफकडे बिलकूल वळविला नाहीं व तो बोलतांना व्हॅन्डेनहॉफला उद्देशून खरें, पण लोकांकडे पाहून बोले. दुसऱ्या पात्राचें काम फिकें पाडून प्रक्षकांचें सारें लक्ष आपल्याकडेच ओढून घेण्याची पुष्कळ नटांची खुबी असते, त्यांतलीच ही फॅरेनची होती. व्हॅन्डेनहॉफ हा नवीन असल्यामुळें तर फॅरेननें त्या वेळीं त्याच्याकडे फारच दुर्लक्ष केलें, आणि सारें लक्ष आपल्या अभिनयाकडे आकर्षून घेतलें. य उद्दामपणाबद्दल व्हॅन्डेनहॉफला अतिशय वाईट वाटलें. पण दुसरे दिवशीं फिरून तोच खेळ लागला व मागच्या दिवसाप्रमाणेंच चवथ्या अंकांत फॅरेन रंगभूमीवर असतां, व्हॅन्डेनहॉफ उजव्या बाजूच्या टोंकाला येऊन उभा राहिला, आणि फॅरेन डाव्या बाजूच्या टोंकाला उभा होताच. व्हॅन्डेनहॉफ रंगभूमीवर आल्याबरोबर त्यानें आपली पाठ फॅरेनकडे वळविली आणि प्रेक्षकांकडे पाहून तो आपलें भाषण बोलूं लागला व त्याचप्रमाणें व्हॅन्डेनहॉफकडे पाठ वळवून व लोकांकडे पाहून फॅरेनही आपलें भाषण बोलूं लागला. याप्रमाणें दोघांचें संभाषण सुरू झालें. पण हा त्याच्याकडे पाहीना व तो ह्याच्याकडे पाहीना त्यामुळें अर्थातच जरी फॅरेन फार उत्तम रीतीनें बोलत होता तरी त्या भाषणांत लोकांना गोडी लागेना. याचा परिणाम असा होऊं लागला कीं, फॅरेनला नेहमीं जेथें टाळी पडावयाची तेथें ती पडेनाशी झाली. त्यामुळें त्याचें चित्त अस्वस्थ

झालें. तरी पण एकमेकांकडे पाठी वळवूनच संभाषण चाललें होतें. त्यामुळें अधिकाधिक बेरंग होऊं लागला, व फॅरेनला शाबासकी मिळेनाशी झाल्यामुळें तो अगदीं गांगरून गेला, आणि बोलतांना अडखळूं लागला व अखेरीस अतिशय त्रासून असें कां होत आहे हें जाणण्यासाठीं त्यानें व्हॅन्डेनहॉफकडे पाहिलें तेव्हां त्याला त्या वेळीं पहिल्यानें कळलें कीं, व्हॅन्डेनहॉफचा चेहरा आपल्याकडे वळलेला नसून तो लोकांकडे वळलेला आहे! हें पाहून त्याला फार राग आला. त्यानें व्हॅन्डेनहॉफला खुणा केल्या. पण कांहीं उपयोग होईना. तेव्हां तो हळूहळू व्हॅन्डेनहॉफजवळ येऊं लागला आणि अखेरीस त्याच्या खांद्यावर हात टाकून त्याच्याशीं बोलूं लागला. तेव्हां व्हॅन्डेनहॉफनेंही आपलें तोंड त्याच्याकडे वळविलें, आणि फिरून त्या प्रवेशाला रंग भरला. पण फॅरेन अतिशय संतापलेला होता. प्रवेश संपून ते दोघे वुइंगच्या आंत गेले नाहींत तोंच फॅरेन म्हणाला, 'वा! तूं आज माझ्या सगळ्या कामाचा बेरंग करून टाकलास!' व्हॅन्डेनहॉफ म्हणाला, 'तें कसें? मी तर तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें बरोबर देत होतों.' फॅरेन म्हणाला, तें सगळें खरें. पण तूं माझ्याकडे पाठ केली होतीस. माझ्याकडे मुळींच न बघतां तूं सारें प्रेक्षकांपाशींच बोलत होतास. याजवर व्हॅन्डेनहॉफनें उत्तर दिलें, 'यांत माझा काय दोष? मी नवशिका आहें. तुमच्यासारख्या प्रसिध्द नटांची पध्दत पाहून त्याप्रमाणें अभिनय करण्याला मी शिकत आहें!' तेव्हांपासून फॅरेन आणि व्हॅन्डेनहॉफ यांच्यामध्यें कधींही अशा प्रकारची विसंगतता उत्पन्न झाली नाहीं.

हार्ले हा एक हास्यरस उत्पन्न करण्यामध्यें अतिशय निपुण असा नट होता. आपल्यासमोर बसलेल्या प्रेक्षकांपैकीं कोणा तरी एकाकडे तो आपली नजर लावी; व त्याच्याकडे पाहून तो गाऊं लागे. त्याच्याकडे पाहून तो आपल्या माना हालवी. त्या गाण्यांत जे विनोदात्मक शब्द असत ते तो त्या मनुष्याला लावून म्हणे व याचा परिणाम असा होई कीं, तो मनुष्य पहिल्यानें गालांतल्या गालांत हसूं लागे. पण हार्ले हा आपलीं तोंडें जसजशीं वेडींवांकडीं करूं लागे, तसतसें त्या मनुष्याला अधिकच हसूं येई, आणि अखेरीस तर त्याला हंसणें सहन होईनासें होई. ह्याचा परिणाम असा होई कीं त्या मनुष्याचें हंसणें पाहून त्याच्या शेजारचे लोक हसूं लागत, व त्यांचें पाहून दुसरे हसूं लागत. ह्याप्रमाणें ही हंसण्याची स्पर्शजन्य सांथ साऱ्या थिएटरभर

पसरत असे. कधीं कधीं असे होई कीं, ज्या मनुष्याला उद्देशून हालें आपल्या विनोदाचा अभिनय करीत असे, तो मनुष्य एखादे वेळीं चिडत असे, पण तो चिडलेला पाहून त्याच्या शेजाऱ्यांना गंमत वाटे आणि ते हंसत व त्यांचें पाहून इतर लोकांनाही हसूं येई. सारांश, तो मूळचा मनुष्य हसो किंवा चिरडीस जावो, बाकीचे लोक ह्या युक्तीनें हसूं लागत हें खास. कोणा तरी एका मनुष्यावर आपली नजर कायम करावी व त्याच्याकडे वेडींवांकडीं तोंडें करावीं म्हणजे तो व त्याच्यामागून सर्व लोक हसूं लागतात, ही युक्ति मंडेन यानें आपल्याला सांगितली असें हालें म्हणत असे.

---

## हिंदुस्थानांत काय संतोष माजला आहे ! : : ३

काळ : अग्रलेख, ता. २-८-१९०७

---

● एडवर्ड बादशहांच्या वाढदिवसाच्या निमित्तानें हिंदी संस्थानिक व सरकारमान्य प्रतिष्ठित यांचेमध्यें राजनिष्ठेच्या प्रदर्शनाची व दडपशाहीच्या समर्थनाची सांथ आली होती. ‘ब्लॅकवुड’ मासिकांत एका लेखकानें प्रतिपादन केलें कीं, संस्थानिकांची राजनिष्ठा स्वार्थबुध्दीनें प्रेरित झालेली असते; वेळप्रसंग पडल्यास व संस्थानिकांची स्वतंत्र संघटना करण्याची वेळ दिसल्यास ब्रिटिश सत्तेस मदत करण्यास ते तयार होतील असें मानणें कठीण आहे. बिकानेर महाराजांनीं ‘लंडन टाइम्स’मध्यें या लेखांतील विधानांचा इन्कार केला, आपली राजनिष्ठा व्यक्त केली, बादशहांचें निशाण हिंदुस्थानवर फडकत ठेवण्यासाठीं आपण खुषीनें इंग्लिशांच्या खांद्यास खांदा भिडवून लढण्यास सज्ज आहों अशी ग्वाही दिली व सर्व संस्थानिकांचे विचार असेच असल्याबद्दल खातरजमा दिली. कोल्हापूर, काश्मीर व बोब्रिली महाराजांनीही असेच बाष्कळ उपद्व्याप केले. काळकर्ते इतरत्र (२८-६-१९०७) म्हणतात, “पुढील दिवस जास्त आणीबाणीचे येणार आहेत. आपण

हिंदुस्थानच्या पक्षाचे किंवा इंग्लिशांच्या पक्षाचे हा प्रत्येकासमोर प्रश्न आहे. राजांनीं नेहमीं हिंदुस्थानच्या बाजूला असणें जरुरीचें आहे. हिंदुस्थानचें कल्याण करण्याला ते बांधले गेले आहेत."

**देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे,**
**जड मूढ अज्ञान जीवें । तें सत्य मानिजे ।।** —दासबोध

या चार चरणांत रामदासांनीं जें तत्त्व ओविलें आहे तें प्रस्तुत प्रसंगीं लक्षांत बाळगणें अत्यंत आवश्यक आहे. बाह्यरूपाला फसून न जाण्यासाठीं या तत्त्वाची मदत कित्येक शहाण्या मनुष्यांनीं सुद्धां घेतली पाहिजे. हल्लीं कांहीं विलक्षण प्रकार दृष्टोत्पत्तीस येऊं लागले आहेत. हिंदुस्थानांत असंतोष उत्पन्न झाला आहे, अशी ओरड इंग्लिशांनीं अलीकडे दोनतीन महिने उठविली आहे व तो असंतोष दाबून टाकण्यासाठीं त्यांनीं हद्दपारी, मुस्कटदाबी वगैरे कित्येक जुलमाचे उपाय जारीनें सुरू केले आहेत. इंग्लिशांनीं हा क्रम सुरू केला त्याच सुमारापासून हिंदुस्थानांतील दुसऱ्या कित्येक लोकांनीं एक निराळाच क्रम सुरू केला आहे. तो कांहीं नवीन आहे असें नाहीं. त्याचीं कांहीं उदाहरणें वाचकांना पूर्वीं माहीत झालेलींच आहेत. इंग्लिशांच्या कृतीला मदत करण्याच्या सध्देतूनें प्रेरित होऊन काश्मीरचे महाराज, कोल्हापूरचे महाराज वगैरे महाराजांनीं आपापल्या संस्थानांतून कसे विलक्षण जाहीरनामे काढले आहेत, हें आतां नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. काश्मीर, कोल्हापूर आणि बोबिली या तीन ठिकाणच्या त्रिशंकुमहाराजांनीं त्रिशंकूसारखें कसें वर्तन केलें, हें अद्यापि कोणीही विसरले नसतील. परंतु या वर्गांत, दिवसेंदिवस जास्तच भर पडत चाललेली आहे. धारच्या महाराजांनीं शिवाजी-उत्सवास बंदी करून कशी धार मारली आणि त्या शिवाजी-उत्सवांतील कित्येक मुलांना शाळेंतून हद्दपार करून लाला लजपतराय यांना हद्दपार करणाऱ्या इंग्लिशांशीं त्यांनीं सामना देण्याला कशी सुरुवात केली आहे, हें चांगलें जगजाहीर झालें आहे. त्यांच्या वर्गांत बिकानेरचे महाराजांनीं आपलें नांव नवीन दाखल करून घेतलें न घेतलें तों त्याच वर्गांत शिरण्याकरितां नेपाळचे महाराज उमेदवार म्हणून पुढें सरसावले आहेत. परंतु एवढयानेंच या वर्गांतील लोकांची यादी संपत आहे असें कोणी समजूं नये. कलकत्त्याच्या प्रसिद्ध घराण्यांतील प्रद्योतकुमार टागोरमहाराज यांनींही असाच क्रम

चालविला आहे. यांच्या हातांत नासण्याकरितां एखादें संस्थान नसल्यामुळें वर्तमानपत्रांना बंदी, हद्दपारी, तोंडदाबी वगैरेसारखे झोटिंगपाच्छाईचे हुकूम यांना सोडतां येणें शक्यच नव्हतें. सबब यांनीं पंजाबच्या आर्यसमाजिस्ट लोकांप्रमाणें एक मॅनिफेस्टो (जाहीरनामा) प्रसिद्ध करण्याचा उद्योग सुरू केला आहे. मग टागोरमहाराज आणि बाकीचे महाराज यांच्यामध्यें एक फरक आहे. बाकीचे महाराज हीं इंग्रजी ताटाखालचीं मांजरें आहेत, परंतु टागोरमहाराज हे सामान्य लोकांपैकीं एक स्वतंत्र मनुष्य आहेत. त्यांना दाबून ठेवण्याकरितां त्यांच्या छातीवर कोणी रेसिडेंट बसविलेला नाहीं, किंवा त्यांची जीभ शिवून टाकण्याकरितां पोलिटिकल एजंटच्या हुद्द्याचा कोणी शिंपी त्यांच्या घरीं ठेविलेला नाहीं. तसेंच पिंजऱ्यांत घालून पोपटाप्रमाणें त्यांना राजनिष्ठेची भाषा शिकविण्याला कोणी युरोपियन ट्यूटर नेमलेला नाहीं, अगर त्यांनीं गडबड केली तर त्यांचें राज्य घशांत टाकण्यासाठीं त्यांच्या दाराशीं त्यांच्याच पैशानें पोसलेलें कांहीं इंग्रजी कॉंटिंजंटचें सैन्यही नाहीं. त्यामुळें बाकीच्या महाराजांप्रमाणें यांना बनावट राजनिष्ठेचें ढोंग आणण्याची आवश्यकता होतीच असें नाहीं. पण असें असूनही तें हा जाहीरनामा काढीत आहेत, तेव्हां अर्थात् ही मोठी अद्भुत गोष्ट असली पाहिजे असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. मि. प्रद्योतकुमार टागोर हे आपल्या जाहीरनाम्यांत लिहितात कीं, "हल्लीं हिंदुस्थानांत जो असंतोष वाढत चालला आहे, त्यापासून आपण आपल्याला अलिप्त ठेविलें पाहिजे. सरकार आणि लोक यांच्यामध्यें जो बेबनाव उत्पन्न होत आहे तो फार अनिष्ट आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक लोक राजनिष्ठ आहेत, तेव्हां इंग्रजी राज्याबद्दल ज्यांच्या योगानें असंतोष उत्पन्न होईल असलीं मतें पसरूं न देण्याचा प्रयत्न त्या सर्वांनीं केला पाहिजे; आणि लोकांनींच जर हें काम हातीं घेतलें, तर सरकारला हल्लीं जें जुलमी पद्धतीचें अवलंबन करावें लागत आहे तें करण्याचा सरकारवर अनिष्ट प्रसंग येणार नाहीं. जीवित आणि मालमत्ता यांची सुरक्षितता, विद्येचा प्रसार, वगैरे गोष्टी आपल्याला इंग्रजी अंमलापासून प्राप्त झालेल्या आहेत. हें लक्षांत ठेवून आपण त्याबद्दल कृतज्ञ असलें पाहिजे. जें आपल्याला स्वदेशभक्त म्हणून म्हणवितात त्यांनीं या प्रसंगीं आमच्या या बाजूला आलें पाहिजे आणि ब्रिटिश प्रजेवर करडा अंमल चालविण्याची सरकारी अधिकाऱ्यांना

पाळी न येईल अशी त्या सर्वांनीं तजवीज केली पाहिजे." अशा आशयाचा जाहीरनामा हल्लीं कलकत्त्यास बनत आहे. हे सगळे प्रकार पाहून कोणालाही आश्चर्य वाटणें साहजिक आहे. राजनिष्ठेचे इतके अनेक जाहीरनामे जर एका पाठीमागून एक हिंदुस्थानांत बोकळू लागले, तर मग राजद्रोहाला कशानें थारा मिळणार आहे ! हिंदुस्थानांत असंतोष वाढत आहे म्हणून इंग्लिशांची ओरड आहे. 'Unrest in India', 'Discontent in India' असें मथळे इंग्रजी वर्तमानपत्रांतून वरचेवर दृष्टीस पडतात. त्यावरून हिंदुस्थानांत काय असंतोष माजला आहे, असें कदाचित् कोणाला वाटेल. पण वर दिलेली इंडियन महाराजांच्या राजनिष्ठेच्या जाहीरनाम्यांची लांबलचक यादी पाहिली म्हणजे हिंदुस्थानांतील असंतोषाचा भ्रम डोक्यांतून पार निघून जातो, आणि त्याच्याऐवजीं हल्लीं "हिंदुस्थानांत काय संतोष माजला आहे !" असे उद्‌गार तोंडांतून निघण्याची पाळी येते.

या सगळ्या उदाहरणावरून इंग्लिशांचे प्रयत्न कसकसे चालले आहेत आणि इंग्रजी राजनीति एखाद्या अत्यंत कुशल वारांगनेप्रमाणें हिंदुस्थानच्या रंगभूमीवर कसकशीं निरनिराळीं सोंगें घेत आहे, हें कोणाच्याही लक्षांत येईल. हे नेटिव महाराजांचे जाहीरनामे कसे तयार होतात, त्यांना स्फूर्ति कशी मिळते, पहिल्यानें कोण कोणाच्या कानांत कुजबुजतो, मग त्याचे पेन्सिलीचे मसुदे कोण तयार करतो, आणि अखेर त्यावर महाराजांच्या सह्या कशा होतात, या गुप्त गोष्टी सामान्य लोकांना प्रत्यक्ष समजल्या नाहींत, तरी त्यांना त्याबद्दल बरोबर अनुमान करतां येतें. या कामांत इंग्लिश लोक आपलें कर्तव्यकर्मच करीत आहेत, परंतु आपले हे महाराज मात्र आपलें कर्तव्यकर्म करीत आहेत किंवा नाहींत, याबद्दल कोणालाही शंका उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. परंतु कोणाला जरी अशी शंका उत्पन्न झाली, तरी त्यांनीं भिण्याचें कांहीं कारण नाहीं. जाहीरनामे लिहिणाऱ्या आणि प्रसिध्द करणाऱ्या महाराजांची ही दावण जरी इतकी लांब झाली असली, आणि बाकी राहिलेल्या महाराजांपैकींही कांहींना जरी त्यांच्या रेसिडेंटांनीं यांच्या ओळीला आणून बांधिलें, तरी त्यांत डगमगण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. कारण इंग्लिश लोक या महाराजांकडून जी बतावणी करवीत आहेत ती खरी नाहीं. लोकांना काय वाटतें ? काश्मीर, कोल्हापूर, धार, बिकानेर, नेपाळ वगैरे ठिकाणच्या

राजांना हिंदुस्थान हा आपला देश नव्हे, असें का वाटत आहे ? किंवा हिंदुस्थान हिंदुस्थानांतील लोकांकरितांच असलें पाहिजे हें तत्त्व त्यांना माहीत नाहीं, असें कां लोक समजत आहेत ? अशी कोणाची समजूत असेल तर ती अगदीं चुकीची आहे. त्यांच्या कृतीकडे अशा बहिर्मुख दृष्टीनें पाहून उपयोगी नाहीं. "देखिलें तें सत्यचि मानावें। हें ज्ञात्याचें देखणें नव्हे।" हें जें रामदासांचें वचन वर दिलें आहे तें सर्वांनीं लक्षांत बाळगिलें पाहिजे. नेटिव राजे इंग्रजांना फसविण्याच्या कामांत इतके तरबेज असतील असें सकृद्दर्शनी कोणालाही वाटावयाचें नाहीं हें खरें आहे. परंतु स्वदेशाबद्दल अप्रीति आणि परकीय इंग्लिश लोकांबद्दल अतिशय आस्था अशा निसर्गविरुध्द गोष्टी जेव्हां आपल्या दृष्टोत्पत्तीस येतात, तेव्हां त्यांत कांहीं तरी हेतु असला पाहिजे, असेंच अनुमान काढिलें पाहिजे. जेव्हां पहिल्यानें एकटयाच काश्मीरच्या महाराजांनीं आपला जाहीरनामा प्रसिध्द केला, तेव्हां इंग्लिशांना फसविण्याचें काम या एकटया महाराजांकडून कसें होईल, अशी कोणालाही चिंता पडली असेल. पण त्यांच्या मदतीला कोल्हापूरचे, बोबिलीचे, धारचे, नेपाळचे असे एकामागून एक महाराज धांवून येऊं लागल्यामुळें ती काळजी आतां अगदीं दूर झाल्यासारखी झाली आहे. स्वदेशसेवेसाठीं असेंच धांवून यावें लागतें ! व आतां इतके राजे एकदिलाचे जमले तर ते आपल्या वरकांति राज्यनिष्ठेच्या फसवणुकीनें इंग्लिशांना लवकरच केव्हां तरी गोत्यांत घालतील अशी भीति भासूं लागली आहे. बिकानेरच्या महाराजांनीं तर या सगळ्यांच्यावर ताण करून सोडली आहे, व आपल्या एकटयाच्याच वरकरणी राजनिष्ठेचें प्रदर्शन करून न थांबतां, इंग्रजी राज्य बुडूं लागले (फार चांगली इच्छा !) तर सगळे नेटिव राजे तें वर उचलून धरण्याला पुढें येतील असें त्यांनीं इंग्लिशांना भासविलें आहे व त्या योगानें या प्रस्तुतच्या असंतोषाच्या प्रसंगीं सगळे देशी राजे आपल्या बाजूचे आहेत अशी खोटी कल्पना इंग्लिशांच्या मनांत भरवून देण्याच्या कामीं त्यांना पुष्कळ यश आलें आहे. आपल्या हिंदुस्थानाकरितां हें काय त्यांनीं लहान काम केलें आहे ? ऐन प्रसंगीं न मिळणाऱ्या मदतीबद्दल भरंवसा उत्पन्न करून ठेवून वेळ येतांक्षणीं तोंडघशीं पाडणें याच्यासारखी राजकीय महत्त्वाची दुसरी कामगिरी कोणतीही नसेल. पण अशा या राजांच्या टोळीच्या नादीं लागून इंग्लिश लोक फसत आहेत

याच्याबद्दल मात्र आम्हांला मनापासून अतिशय वाईट वाटत आहे. हिंदुस्थान देश ही ह्या सगळ्या महाराजांची जन्मभूमि असल्यामुळें स्वमातेप्रमाणें तिच्यावर त्यांचें सहज प्रेम असलेंच पाहिजे व तिच्याशीं ते कधींही बेइमान होणार नाहींत, ही गोष्ट इंग्लिशांना कशी समजत नाहीं कोण जाणे ! नेटिव राजांच्या असल्या ह्या बनावट जाहीरनाम्यांत इंग्लिशांना काय अर्थ वाटत असेल तो त्यांचा त्यांनाच माहीत ! असल्या जाहीरनाम्यांचें छप्पनहजार खरडे गोळा करून त्यांनीं सिमल्याच्या ऑफिशयल पिजनहोल्समध्यें ठेविले किंवा विलायतेस पार्लमेंटकडे पाठविले, म्हणून त्याच्या योगानें काय ब्रिटिश राज्य बचावणार आहे ? बनावटच जाहीरनाम्यांनीं इंग्लिशांची तृप्ति होत असेल, तर त्यांना फसविण्याकरितां प्रत्येक नेटिव राजा मोठ्या राजनिष्ठेनें पुढें सरसावेल आणि पाहिजे तर सोन्याच्या नळकांड्यांत घालूनही आपला बनावट राजनिष्ठेचा जाहीरनामा सरकारच्या पुढें ठेवील. पण त्यांत काय अर्थ आहे ? धूर्त म्हणविणाऱ्या इंग्रजी मुत्सद्द्यांना हे अगदीं पहिले आणि साधे डावपेच समजूं नयेत हें आश्चर्य आहे ! सामान्य इंडियन लोकांना देखील यांतील कारस्थानीपणाचा वास येऊं लागला आहे ; व पुष्कळ लोक असें स्पष्ट बोलूं लागले आहेत कीं, हिंदुस्थानांतील बऱ्याच नेटिव राजांचा इंग्लिशांना फसविण्याकरितां एक गुप्त कट झालेला असला पाहिजे. कारण असें कांहीं तरी संगनमत झालेलें असल्याशिवाय पटापट एकामागून एक असे हे एकाच फसवणुकीच्या धोरणाचे जाहीरनामे किंवा लेख कसे बाहेर पडले असते ? हिंदुस्थानांत गुप्त कट करण्याच्या आणि गुप्त बातम्या पसरविण्याच्या कांहीं विलक्षण पद्धति आहेत ! १८५७ सालीं कोठें कांहीं नसतांना एकाएकीं येथें एक बंड, तेथें एक बंड अशीं अनेक बंडें उत्पन्न झालीं, तसेंच हे जाहीरनामे उत्पन्न होत आहेत ! यावरून या असंतोषाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं इंग्लिशांना मोह पाडून फसविण्याकरितां आपण खोट्या राजनिष्ठेचे जाहीरनामे काढावे असें संगनमत होऊन मग एकेका महाराजानें हे जाहीरनामे काढण्याला सुरुवात केली आहे, अशी पुष्कळ मर्मज्ञ नेटिव लोकांची ठाम समजूत झालेली आहे व या कटांतील ज्या बऱ्याच महाराजांनीं अद्यापि आपले खोटे जाहीरनामे प्रसिद्ध केले नाहींत, त्यांचेकडून ते लवकरच प्रसिद्ध करण्यांत येतील, अशीही दाट बातमी आहे व या फसवणुकीच्या जाहीरनाम्यांच्या कटांत

आपण सामील झालेले आहों असा कोणाला संशय येऊं नये म्हणून पोलिटिकल एजंटानें किंवा दिवाणांनीं जाहीरनामा काढण्याविषयीं कितीही आग्रह केला तरी मला तुम्ही पदच्युत करीपर्यंत मी असल्या जाहीरनाम्यांवर कधींही सही करणार नाहीं इतकें ओढून चंद्रबळ आणण्याचाही कित्येकांनीं बेत केला असल्याची वदंता आहे. शिवाय या फसवणुकीच्या जाहीरनाम्यांवर खुद्द इंग्लिशांचा आणि नेटिवांपैकीं अडाण्यांचा विश्वास बसत चालल्यामुळें त्या कटांतील पुढाऱ्यांना एक प्रकारचें उत्तेजन येत आहे. पूर्वी इंग्लिशांना हिंदुस्थानांतून घालवून देण्याकरितां "मराठा कॉन्फिडरसी" या नांवाचा जो इतिहासप्रसिद्ध कट झाला होता, त्याच्यापेक्षां देखील हल्लींचा हा नेटिव राजांचा कट जास्त मुत्सद्दीपणाचा आणि बंदोबस्ताचा आहे यांत शका नाहीं. आपल्या देशांतील राजे लोकांनीं स्वदेशोद्धाराचें काम हातीं घेऊन त्याबद्दल एक गुप्त कट स्थापन करून दोन तीन महिन्यांच्या अल्पावकाशांत इंग्लिशांचा इतका भरंवसा संपादन करून घेतला, याबद्दल स्वदेशाभिमानी नेटिव लोक गुप्त रीतीनें त्यांचीं अभिनंदनेंसुद्धां करीत आहेत. आणि खरोखरच इतक्या राजकारस्थानी गोष्टींबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन कां करूं नये? देशभक्त लोकांच्या मंडळाकडून ज्या राजांना अद्यापि कावेबाजपणाबद्दल गुप्त रीतीनें मानपत्रें आणि अभिनंदनपत्रें जावयाचीं राहिलीं असतील, त्यांना बरोबर पुढील शब्दांचींच नव्हेत, तर तशासारख्या सामान्य मतलबाचीं पत्रें एखाद्या गुप्त द्वारानें कोणी जवळ नसेल अशा वेळीं पोंचतीं करण्यांत येणें जरूर आहे. तो मतलब असा :—

"श्रीमंत........महाराज, संस्थान......यांस :—आपले अंतःस्थ हेतु समजून आल्यामुळें आम्हांस अतिशय आनंद होत आहे, व आम्ही आपले फार आभारी आहों. हिंदुस्थानचें पूर्वीचें स्वराज्य हें तुमच्या पूर्वजांनीं स्थापलेलें व संरक्षिलेलें होतें. त्या स्वराज्याबद्दल आपण त्यांचेच वंशज फिरून प्रयत्न करीत आहांत हें पाहून कोणाचें मन गहिंवरून येणार नाहीं? स्वदेशहिताच्या कृत्यांत आपल्याला आम्हां सर्व हिंदुस्थानवासी लोकांचें पूर्ण पाठबळ आहे हें आपण पक्कें समजावें. देशकार्याच्या कामांत अनेक कृत्यें करावयाचीं असतात, यांपैकीं आपण इंग्लिशांना मोह पाडण्याचें पहिलें आणि महत्त्वाचें काम पत्करलें आहे, याबद्दल आपले जितके गुण गावेत तितके थोडे आहेत.

परमेश्वर आपल्याला दीर्घायुषी आणि आपल्या देशकार्याला यशस्वी करो ! ”

अशा सामान्य मतलबाचीं पत्रें या कटांत सामील असल्याबद्दल प्रसिद्धीस आलेल्या नवीन नवीन राजांना पाठविणें फार जरूर आहे. त्यांनीं हातीं घेतलेल्या सत्कृत्याला अशा पत्रांनीं उत्तेजन येईल. मात्र असलीं पत्रें पोस्टांतून कधींही पाठवितां कामा नये. कारण या राजांचे अंतःस्थ हेतु कांहीं निराळेच आहेत असा इंग्लिशांना संशय आला तर त्यांच्या खोट्या राजनिष्ठेच्या जाहीरनाम्यांना कांहीं किंमत उरणार नाहीं, व विश्वासाच्या जोरावर आपल्या देशाच्या राजमान्य मित्रांना जीं कामें करतां यावयाचीं त्यांत व्यत्यय आणल्यासारखें होईल. याकरितां या कामांत फार गुप्तपणा ठेवणें आवश्यक आहे. जे राजे सरकारजवळ अतिशय पुढें पुढें करीत आहेत तेच आंतून अतिशय स्वदेशाभिमानी आहेत हें लोकांनीं आपल्या वर्तनांनीं कोणाही सरकारी अधिकाऱ्याला बिलकूल कळूं देतां कामा नये. हल्लीं पुढें आलेल्या उपरिनिर्दिष्ट दहा पांच महाराजांपैकीं कोणाबद्दलही सरकारला अजून यत्किंचित्‌देखील संशय आला नाहीं ही फार समाधानाची गोष्ट आहे व आपल्या लोकांना कांहीं कांहीं राजकीय गुप्त गोष्टी किती सफाईनें करतां येतात याचीही यावरून चांगली साक्ष पटत आहे. या गुप्त कटाची बातमी गुप्त ठेवण्याविषयीं नेटिव राजांनीं आणि लोकांनीं फार जपलें पाहिजे. कारण, असल्या कटाचा कांहीं यत्किंचित् जरी गंध अधिकाऱ्यांना आला तरी ते मग असल्या प्रकारचा बनावट राजनिष्ठेचा एकही जाहीरनामा कोणाला काढूं देणार नाहींत. दुर्दैवानें अशी वेळ आली तर मात्र फार वाईट प्रसंग आहे. परंतु त्या वेळींही धीर न सोडतां नेटिव राजांनीं मोठा कांगाव केला पाहिजे, व राजनिष्ठेच्या भडिमाराखालीं त्यांनीं इंग्लिशांना अगदीं जेरीस आणून सोडलें पाहिजे. राजनिष्ठेचे जाहीरनामे काढूं नका, असें जे कोणी म्हणतील त्यांच्याशीं नेटिव राजांनीं हातघाईस येऊन भांडलें पाहिजे, आणि म्हटलें पाहिजे कीं, “जाहीरनामा काढूं नका म्हणजे ? आम्ही राजनिष्ठ नव्हे कीं काय ? राजनिष्ठ होण्यालादेखील इंग्रजी राज्यांत बंदी आहे कीं काय ? आम्ही जाहीरनामे काढणार ! तुम्हांला काय करावयाचें असेल तें करा ! राजनिष्ठेच्या अपराधाबद्दल आज तरी निदान पिनल कोडमध्यें कलम नाहीं. पण राजनिष्ठा दाखविल्याबद्दल तुमच्या मनांतून आम्हांला जर शिक्षाच द्यावयाची असेल, तर तुम्हांला त्याच्यासाठीं

कायदा बदलावयाला लावूं, तेव्हांच तुम्हांला ही गोष्ट करतां येईल. स्ट्रॅची साहेबांचे वेळीं जसें तुम्हांला कायद्यांत पकडून टाकिलें आणि १२४ (अ) चा नवीन कायदा करण्याशिवाय दुसरें गत्यंतरच उरूं दिलें नाहीं, तसा प्रसंग तुमच्यावर आणूं व दुसरें १८९७ साल तुमच्याभोंवतीं उत्पन्न करूं! तोंपर्यंत आम्ही राजनिष्ठच राहणार. तुम्हीं कायदा बदलल्यानंतर पाहिजे तर हा राजनिष्ठेचा गुन्हा करण्याचें आम्ही सोडून देऊं!" असें आवेशयुक्त भाषण करून प्रत्येक राजानें आपल्या राजनिष्ठेच्या जाहीरनाम्याच्या तीस कोटि प्रती छापवाव्या आणि हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाच्या हातांत एकेक प्रत पडेल अशी शाळेंतील व्हॉलंटियर विद्यार्थ्यांच्या द्वारें तजवीज करावी. परंतु इतकेंही करून जर 'युगांतर' वर्तमानपत्राप्रमाणें सरकारनें ह्या जाहीरनाम्यावर १२४ (अ) कलमाप्रमाणें फिर्याद करून तो जाहीरनामा छापणाऱ्या छापखान्यासह तो जाहीरनामा बंद पाडला, किंवा त्याच्या प्रती गोळा करवून आणून सरकारनें जाहीर रीतीनें त्या जाळून टाकल्या, तर अशा विपत्तिकाळींही कोणी राजानें अगर महाराजानें खिन्न होण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण सरकारनें तसें केलें तरी तिकडूनही आपला फायदा आहेच. या गुप्त कटाची ज्यांना माहिती नाहीं अशा कित्येक अज्ञ लोकांना असें वाटत आहे कीं, या बनावट जाहीरनाम्यांतून निरनिराळ्या महाराजांनीं बाह्यात्कारीं जें लिहिलें आहे त्यांतील प्रत्येक गोष्ट अगदीं अक्षरशः खरीच आहे! असे लोक पुष्कळ असण्याचा संभव आहे. कारण मूर्ख लोक नेहमींच पुष्कळ असतात! आणि शिवाय कोणताही गुप्त कट म्हटला म्हणजे, त्यांतील रहस्य थोडक्यांनाच माहीत असावयाचें. गुप्त कट आणि तो सगळ्यांना माहीत, असें कधीं व्हावयाचेंच नाहीं. तेव्हां सरकारनें आपण होऊनच जर हे राजांचे राजनिष्ठेचे जाहीरनामे बंद केले, तर असे जे कांहीं मूर्ख लोक या जाहीरनाम्यांनीं विनाकारण खिन्न होत असतात व फसले जात असतात, त्यांच्या मनाचा शीण अनायासानें वांचेल आणि त्यांना आपला मूर्खपणा दुसऱ्या एखाद्या सत्कर्मी उपयोगांत आणण्याला फुरसत सांपडेल. सारांश, ही गुप्त कटाची बातमी दोन धारेच्या शस्त्राप्रमाणें कशीही वापरली गेली तरी ती आपला कार्यभाग साधून देणारीच आहे!

## एक लष्करी गोष्ट : : ४

स्वतंत्र. काळ : ता. २-८-१९०७

एके प्रसंगीं नेपोलियनचें सैन्य स्पेन देश काबीज करण्याकरितां त्या देशांत जिकडे तिकडे पसरलें असतां फ्रेंचांच्या छावणीला स्पॅनिश लोकांनीं वेढा दिला. स्पॅनिश लोक त्या देशांतील पुरे माहीतगार असल्यामुळें व त्यांनीं ज्या जागा रोखल्या होत्या त्या फार मजबूत असल्यामुळें, त्यांचा वेढा फोडून त्यांतून बाहेर जाण्याची फ्रेंच सैन्याला मुळींच आशा उरली नाहीं. त्या वेळीं नेपोलियन माद्रिद शहरीं होता. त्याला ही स्थिति कळवावी म्हणजे तो स्पॅनिश लोकांवर दुसरीकडे कोठें तरी हल्ला करील म्हणजे त्यांच्या मदतीकरितां येथील स्पॅनिश सैन्य आपोआपच उठून जाईल, अशी एक युक्ति सुचविण्यांत आली. पण ही युक्ति अमलांत येते कशी ? शत्रूचा वेढा इतका कांहीं कडेकोट बंदबस्ताचा पडला होता, कीं त्यांतून एक मनुष्यसुद्धां बाहेर जाण्याची आशा नव्हती. परंतु स्वदेशभक्तीच्या परीक्षेची हीच वेळ असते. इतक्या सगळ्या अडचणींतून मी नेपोलियनकडे जातो, असें म्हणणारा एक तरुण शिपाई निघाला. त्याच्या ऑफिसरनें त्याला म्हटलें कीं, "तूं कसा जाशील ? तूं खात्रीनें शत्रूच्या हातीं सांपडणार, आणि ते तुला फांसावर चढवणार !" यावर तो शिपाई म्हणाला, "त्याची तुम्हांला काळजी नको. तुम्ही मला हुकूम द्या म्हणजे झालें." अशा रीतीनें त्यानें एकदांचा हुकूम मिळविला. पुढें तेथें एक वृद्ध साधु राहत असे त्याच्याकडे तो गेला, आणि त्याला सगळी हकीकत सांगून तो म्हणाला, "तुम्ही माझ्याबरोबर आलें पाहिजे. आपण बरोबर दोन पिस्तुलें घेऊं. एक तुमच्याकरितां व एक माझ्याकरितां. तुमचा साधूचा पोशाख असल्यामुळें व येथील लोक तुम्हांला पूज्य मानीत असल्यामुळें आपण स्पॅनिश सैन्यामधून जाऊं लागलों असतां बहुतकरून

आपणांला कोणी अडवणार नाहीं. आणि याही उपर जर कोणी तुम्हांला विचारलेंच, तर तुम्ही काय वाटेल तो बहाणा करा. हा आमचा चेला आहे म्हणा, हा आमच्या मठांतील आहे म्हणून सांगा, किंवा तुम्हांला जें कांहीं सुचेल तें बोला. मला कोणी विचारलें तर मी एक अक्षरही बोलणार नाहीं. अर्धांगवायूच्या झटक्यानें माझी जीभ लुळी पडली आहे, माझ्यानें बोलवत नाहीं, माझा बाप माद्रिद शहरांतील एक बडा माणूस आहे, त्याच्याकडे मला औषधोपचारासाठीं नेऊन पोंचविण्यांत येत आहे, असा किंवा दुसरा कोणताही तुम्ही बहाणा करा. दोघांनीं बोलतां उपयोगी नाहीं. दोघे बोलूं लागलों म्हणजे आपल्या दोघांच्या बोलण्यांत फरक पडून आपली लबाडी उघडकीस येईल. याकरितां मी मुक्याचें सोंग घेतों आणि याही उपर जर आपण ओळखले गेलों, तर मग मात्र आपल्याला जिवंत राहण्याची आशा नको. परंतु आपल्याला या स्वदेशसेवेच्या कामांत अपयश यावयाचेंच नाहीं, असें माझी मनोदेवता मला सांगत आहे.'' अशा रीतीनें त्याचें मन वळवून ते दोघेजण निघाले. धैर्यावर संकटें क्वचितच येतात, आणि दृढनिश्चयाला व स्वदेशभक्तीला परमेश्वर यश देत नाहीं असे प्रसंग विरळा आढळतात. वेढा घालणाऱ्या स्पॅनिश सैन्यांतील लोक त्या साधूच्या पायां पडूं लागले, इतकेंच नव्हे तर त्याच्याबरोबर जो दुसरा मुका बनलेला साथीदार होता त्याच्यापासूनही ते आशीर्वाद मागूं लागले. अशा रीतीनें स्पॅनिश लोकांना फसवून तो शिपाई नेपोलियनजवळ सुरक्षित येऊन पोंहोचला आणि नेपोलियनला ती बातमी कळतांक्षणींच त्यानें तो वेढा उठविण्याची तजवीज केली.

---

## दोन स्नेही ::५

स्वतंत्र. काळ: ता. १९-७-१९०७

● हा साहेब चांगला, तो खराब, असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. सगळेच उडीद.

एका शहरामध्यें कोणी दोन गृहस्थ एकमेकांचे अत्यंत स्नेही होते. त्यांच्यामध्यें कपट हें कसें तें कधीं नव्हतेंच. ते एकमेकांपाशीं अगदीं मोकळ्या मनानें बोलत असत. त्यांपैकीं एकजण सुखवस्तु गृहस्थ होते आणि दुसऱ्यांना कस्टम खात्यांत नोकरी होती. ते एकमेकांच्या बऱ्यावाइटाची नेहमीं चौकशी करीत असत, व एकमेकांचीं दुःखें हलकीं करण्यासाठीं झटत असत. एके दिवशीं ते दोघे सहज गप्पा मारीत बसले असतां, "तुमचे हल्लींचे नवीन आलेले साहेब कसे काय, चांगले आहेत का?" म्हणून एकानें दुसऱ्याला सहज प्रश्न विचारला. त्या वेळीं त्यांचे स्नेही जे सरकारी नोकरींत होते ते चवताळून उठले आणि आपल्या स्नेह्याला म्हणाले:—"हा काय तुम्ही प्रश्न विचारतां? साहेब म्हटला म्हणजे तो कसा असणार, हें तुम्हांला अजून समजूं नये, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! साहेब दुसरा कसा असणार? साहेब आणि तो आपल्याला चांगला हें कसें संभवणार? आमचा नवीन आलेला साहेब एका दृष्टीनें चांगला आहे! किती छान दिसतो! त्याच्या अंगावरील कातडीचा रंग अतिशय गोरा आहे! आणि त्याचे अंगावरील कपडे अगदीं स्वच्छ असतात! शिवाय तो बोलतो देखील किती गोड! हा असला चांगलेपणा पाहिजे तर आमच्या नवीन साहेबांत पुष्कळ आहे. पण तो आपल्याला काय करावयाचा आहे? आपल्या नेटिव लोकांत हा साहेब चांगला आणि तो साहेब वाईट असे भेदाभेद करण्याची मोठी वाईट चाल पडून गेलेली आहे. पण एका साहेबाला चांगलें म्हटल्यानें दुसऱ्या साहेबाचें मन दुखविलें जातें हें कोणाच्याच लक्षांत येत नाहीं! शिवाय आपले लोक एखाद्या साहेबाला चांगला म्हणतात, याचा अर्थ काय?

एखाद्या जज्जानें आपल्या शिरस्तेदाराच्या मार्फत एखाद्या वादीचे पैसे घेऊन त्याच्या बाजूचा फैसला दिला म्हणजे त्याला तो साहेब चांगला झाला. एखाद्या कमिशनरनें सडकून लांच खाऊन कोणाचीं वतनें सोडविलीं, तर त्या कमिशनरसारखा दुसरा साहेब नाहीं! एखाद्या एंजिनियरनें आपला गुप्त हिस्सा ठेवून एखाद्या कॉन्ट्रॅक्टरचें टेंडर पास केलें कीं, त्या कॉन्ट्रॅक्टरच्या पितृगणांच्या यादींतच त्याला जागा मिळते! आणि एखाद्या पोलिटिकल एजंटनें रत्नखचित नजराणे घेऊन एखाद्या संस्थानिकाचें कांहीं भिकारडें काम करून दिलें असलें, तर तो विलायतेस गेल्यावरही येथून त्याला त्याच्या चांगुलपणाबद्दल पत्रें आणि नजराणे जात असतात! अशा अर्थानें मी कोणत्याही साहेबाला चांगला म्हणण्याला तयार नाहीं. कारण अशा रीतीनें चांगलें म्हणणें म्हणजे त्याला शेलक्या शिव्याच देणें होय. कारण अशा ठिकाणीं अमुक अमुक साहेब चांगले होते म्हणजे काय तर ते लांच खाऊन विश्वासघाताचीं कामें करणारे होते! पण साहेबांना असल्या झांकलेल्या शिव्या देणें मला बिलकूल पसंत वाटत नाहीं. उघड उघड रीतीनें बोलावयाचें असेल, तर साहेबांत चांगला आणि वाईट हा भेद कसला? राष्ट्रीय दृष्टीनें कोणताच साहेब चांगला नाहीं, हें तुमच्या नाहीं का लक्षांत येत? कोणता साहेब चांगला तुम्ही म्हणणार? आणि तो कशासाठीं? आजपर्यंत कोणता साहेब चांगला होऊन गेला कीं, ज्यानें तुमचें राज्य तुमच्या हवालीं केलें? ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाल्यापासून तों आजपर्यंत जो साहेब आला तो तुमच्यापासून कांहीं तरी घेऊनच गेलेला आहे! बरें, एखाद्यानें कोहळा नेऊन त्यांतला आवळा दिला असला, तरी तो देखील तुमचाच तुम्हांला दिला ना? इंग्लंडांतील कांहीं दहा पांच रुपये आणून त्यानें तुमच्या हातावर ठेवले असें कधीं तुम्हीं ऐकलें आहे काय? क्लाइव्हसाहेबांपासून तों कर्झनसाहेबांपर्यंत सगळ्यांनीं मिळून हिंदुस्थान घेतलें. हिंदुस्थानला देणारा यांतला एक तरी साहेब निघाला आहे काय? जुन्या लोकांपैकीं कांहीं कांहीं लोक मोठे खुळसट असत. त्यांच्या तोंडून एल्फिन्स्टनसाहेबांची स्तुति ऐकण्यांत येत असे. "एल्फिन्स्टनसाहेब मोठे चांगले! ते त्या वेळीं होते म्हणून कोणाला त्रास झाला नाहीं! त्यांनीं सगळ्यांना आश्वासनें दिलीं आणि सर्वांचे हक्क कायम राखले!" असले स्तुतिवाद पेशवाई बुडाल्यानंतर एल्फिन्स्टनसाहेबांसंबंधानें

ऐकूं येत असत! ज्यांच्या हातून खुद्द पेशवाई बुडाली त्यांच्यासंबंधानें हे जुने उद्गार ऐकून हल्लींच्या कोणत्याही मनुष्याला शरम वाटल्यावांचून राहणार नाहीं. एल्फिन्स्टनसाहेबांनीं कोणालाहि त्रास दिला नाहीं! आणखी काय त्रास द्यायचा? सगळें राज्य घेतलें हा कांहींच त्रास नव्हे! स्वराज्य जाणें हा ज्या मूर्खांना त्रास म्हणून वाटत नाहीं; त्यांना त्रास देण्याला खुद्द ब्रह्मदेवानें जरी एखाद्या जुलमी राजाचा अवतार घेतला, तरी त्याला यांना त्रास देतां येईल किंवा नाहीं, कोण जाणे!—मोठ्या फुशारकीनें सांगतात कीं, एल्फिन्स्टनसाहेबांनीं सगळ्यांचे हक्क कायम राखले!—स्वराज्य घेतल्यावर कोणते हक्क राहिले?—एल्फिन्स्टनसाहेबांनीं सगळ्यांचे गुलामगिरीचे हक्क कायम राखले, एवढें मात्र खरें! दुसरी अशी एक आपल्या लोकांत म्हणण्याची चाल पडून गेली आहे कीं, मागें साहेब लोक फार चांगले येत असत आणि अलीकडे फार वाईट साहेब येऊं लागले आहेत. या तारतम्यांतही कांहीं अर्थ नाहीं. पहिले साहेब लोक चांगले म्हणजे, जेव्हां साहेबांचीं कसबें अज्ञानी नेटिव लोकांस समजत नव्हतीं, आणि लोकांची बोलीचाली, रीतभात, वगैरे अज्ञानी साहेबांना कळत नव्हती, तेव्हां साहेब लोक आवश्यकतेनेंच चांगले केलेले होते. पण देशहिताच्या दृष्टीनें पाहिलें, तर पहिले चांगले आणि आतांचे वाईट हे दोघेही सारखेच! पहिल्या चांगल्या साहेबांनीं 'हिंदुस्थानांतील हजारों लोक उपाशी मरत आहेत, आपल्या एकट्याला दोन हजार रुपये पगार कशाला पाहिजे' म्हणून पगारांतील एक कवडी कधीं कमी केली होती का? तुम्ही हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, साहेब लोक हे हिंदुस्थानांत तुमच्या फायद्यासाठीं आलेले नाहींत. आणि हें लक्षांत बाळगून तुम्ही काय ती चांगल्या-वाइटाची निवड करीत चला. हें भाषण ऐकून त्यांचे स्नेही अगदीं थक्क झाले, आणि त्यांच्या युक्तिवादाच्या भडिमाराखालीं अगदीं चीत होऊन पडले. पुढें कांहीं वेळानें सावध होऊन ते म्हणाले, "छे बुवा! ही तुमची सत्य विचाराची सरळ दिशा माझ्या डोक्याला अजून कधीं माहीतच नव्हती. त्यामुळें मला ती अजून पचवितां येत नाहीं! माझे डोक्यांत कसेसेंच होत आहे. तेव्हां तें शांत करण्याकरितां मला एखादें नेमस्त वर्तमानपत्र बराच वेळ फिरून फिरून वाचीत बसलें पाहिजे!" असें म्हणून ते सुधारक पत्राचे अंक शोधण्याकरितां गडबडीनें उठून गेले!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
ग्रंथक्रम .................... दि: ....................

## जशास तसें पाहिजे होतें : : ६

काळ : अग्रलेख, ता. ४-१०-१९०७

● दोनशें वर्षांपूर्वी—Drive out the English अशी आरोळी सर्व हिंदुस्थानभर उत्पन्न व्हावयाला हवी होती. बेचाळीस सालीं शिवरामपंत असते तर—

हिंदुस्थान देश हा हिंदुस्थानांतील लोकांकरितां आहे, हें राजकीय तत्त्व आतां कोठें हिंदुस्थानांत उदय पावूं लागलें आहे. हें तत्त्व लोकांच्या अंतःकरणभूमिकेमध्यें रुजून त्याचा चांगला वृक्ष बनून त्याच्यावर येणारीं फळें हिंदुस्थानांतील लोक चाखूं लागतील याला अजून अवकाश आहे, तोंच तेथें आलेल्या युरोपियन लोकांच्या पोटांत कळा निघूं लागल्या आहेत. या सद्‌गुणी युरोपियन लोकांना मात्र दुसऱ्याचे देश बळकावून बसावयाला पाहिजे. पण यांच्या देशांत जर कोणी परकीय मनुष्य जाऊं लागले, तर मात्र ती गोष्ट यांना खपत नाहीं. युरोपियन आणि अमेरिकन लोकांनीं चीनमध्यें जाऊन वाटेल तसा धिंगाणा घालावा; पण चिनी लोकांना मात्र अमेरिकेच्या किनाऱ्यावर पाऊल टाकण्याची सक्त मनाई! ट्रान्सवालमध्यें चिनी लोकांना खाणींतील काम करण्याला मजूर म्हणून अगदीं आणणें भागच पडतें; पण हें देखील युरोपियन लोकांना खपत नाहीं, व त्यासाठींच चिनी मजुरांच्याविरुद्ध इंग्लंडमध्यें नेहमीं कुरकूर चाललेली असते. हिंदुस्थान हें वास्तविक इंग्लिशांचें घर नसून त्यांत इंग्लिशांनीं मनसोक्त शिरावें आणि वाटतील तसे लांब हातपाय पसरावे, पण त्याच हिंदुस्थानांतील लोक दक्षिण आफ्रिकेमध्यें गेले तर चोराप्रमाणें त्यांच्या अंगठयांचे ठसे उमटून घेतले जातात आणि जेथें परवानगी मिळेल तेथेंच त्यांना दुकान घालून बसावें लागतें! इतके जरी अपमान होत

आहेत, तरी इंग्लिशांनीं हिंदुस्थान देश दरिद्री करून सोडल्यामुळें गरीब इंडियन लोकांना परदेशांत कोठें तरी निर्वाहासाठीं जाणें भाग पडतें. त्यामुळें इंग्लिशांच्या लोभानें हिंदुस्थानांतून पिटाळून लावलेले इंडियन लोक जिकडे वाट फुटेल तिकडे गेलेले आहेत. अमेरिका खंडांतील कानडा देशांतही आपले कित्येक देशबांधव गेलेले आहेत, हें आपल्यापैकीं पुष्कळांना माहीत नसेल. कानडा आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका यांची हद्द एकमेकांना लागून असल्यामुळें कानडयांत ज्यांची सोय लागली नाहीं असे कित्येक मजूर युनायटेड स्टेट्समध्येंही गेलेले आहेत. ह्या प्रांतांतील वॉशिंग्टन संस्थानामधील बेलिंग-हॅम या नांवाच्या शहरीं अशा प्रकारचे पुष्कळ हिंदु गिरणींतून मजुरीचें काम करण्याकरितां राहिले होते. हे हिंदु मजूर थोडया मजुरीवर पुष्कळ काम करीत असल्यामुळें त्यांना तेथील गिरण्यांमधून पटापट जागा मिळत असत. परंतु ही गोष्ट तेथील गोऱ्या मजूरदारांच्या डोळ्यांत अतिशय सलूं लागली. त्यांचें तर्कशास्त्र अगदीं साधें आणि सरळ होतें. ते आपल्या मनाशीं म्हणाले, "अमेरिका हा आमचा देश आहे, व तो आमच्याकरितां असला पाहिजे. तो हिंदु मजुरांकरितां नाहीं. यांना आपल्या देशांतून हांकलूनच लावलें पाहिजे." हा सरळ विचार तेथील लोकांच्या मनांत येऊन त्यांपैकीं सुमारें पांचशें गोरे अमेरिकन लोक गेल्या सप्टेंबर महिन्याच्या ४ थ्या तारखेच्या रात्रीं एकत्र जमले आणि हे परकीय हिंदु लोक ज्या ठिकाणीं गिरणींत काम करीत होते, तेथें त्यांनीं त्यांच्यावर हल्ला केला. तसेंच त्या हिंदु लोकांची राहण्याचीं जीं घरें होतीं, त्यांचे दरवाजे फोडून ते आंतमध्यें घुसले आणि ब्रिटिश साम्राज्याच्या छत्रीखालील त्या हिंदु लोकांना त्यांनीं खूप मार दिला. जे गरीब बिचारे हिंदु लोक आपल्या घरीं अंथरुणावर निजले होते, त्यांना त्यांच्या अंथरुणांतून ओढून मार देण्यांत आला, व पुष्कळांना अतिशय जबरदस्त दुखापती करण्यांत आल्या. "हिंदु लोकांना आपल्या देशांतून घालवून द्या!" अशा आवेशाच्या आरोळ्या साऱ्या रात्रभर उत्तर अमेरिकेंतील बेलिंगहॅम शहरीं ऐकूं येत होत्या, व जिकडे तिकडे दारें फोडणें, खिडक्या मोडणें, हिंदूंना मारणें, बायकांना गटारांत फेंकून देणें, असे प्रकार चालले होते. असें चाललें असतां अखेरीस रात्र संपली, पण अमेरिकन लोकांचे दंगे संपले नाहींत. सकाळ झाल्याबरोबर फिरून त्यांच्या टोळ्या गिरण्यांकडे वळल्या, व त्या वेळीं जे कोणी

हिंदु लोक गिरण्यांतून कामें करतांना आढळले, त्यांना त्यांनीं ओढून गिरण्यांच्या बाहेर काढलें. या दंग्यांत दुखापत होऊन चार हिंदु दवाखान्यांत पडले आहेत. सुमारें चारशें वस्त्रहीन आणि अर्धवट नागवे झालेले लोक तुरुंगामध्यें (!) पोलीसच्या संरक्षणाखालीं आहेत. आणि ७५० लोक भयभीत होऊन आपल्यी सत्ताधारी इंग्रज सरकारची जी कानडा देशची सरहद्द तिकडे पळत सुटले आहेत. हा दंगा करण्याला बेलिंगहॅम येथील जरी सगळे लोक एकत्र झालेले नव्हते, तरी ज्या लोकांनीं दंगा केला त्यांना बाकीच्या लोकांचें इतकें पाठबळ आहे, कीं दंगेखोरांतील कोणी पुढारी पकडून त्यांच्यावर खटले करावयाचे म्हटल्यास ती गोष्ट अगदीं अशक्य झालेली आहे.

हिंदु लोकांची परदेशांतून अशी दुर्दशा चालली आहे, तरी पण त्यांचे अद्यापि डोळे उघडत नाहींत. पूर्वेकडील लोकांचा अलीकडे पश्चिमेकडील लोक बराच तिटकारा करूं लागले आहेत. याचीं उदाहरणें ठिकठिकाणीं दिसून येत आहेत. व्हँकोव्हर येथेंही पूर्वेकडील जपानी, चिनी आणि हिंदु लोकांवर तेथील गोऱ्या लोकांनीं हल्ला केल्याची हकीकत पूर्वींच प्रसिद्ध झाली आहे. त्या प्रसंगीं जपानी आणि चिनी लोक गोऱ्या लोकांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठीं एकत्र झाले; व तुम्हीही आमच्यामध्यें सामील व्हा, म्हणजे आपण सगळे मिळून या गोऱ्या लोकांचा फन्ना पाडून टाकूं, असें ते हिंदु लोकांना म्हणत होते. त्या वेळीं हिंदु लोकांनीं मुकाट्यानें मार खाण्याचें पत्करिलें पण ते जपानी लोकांशीं सामील झाले नाहींत! "आम्ही ब्रिटिश सरकारची प्रजा आहों आणि ब्रिटिश सरकार फार बलाढ्य आहे! तें आमचें संरक्षण करण्याला किंवा आमच्याकरितां सूड घेण्याला समर्थ नाहीं असें नाहीं!" अशी आपल्या मानेवरील ब्रिटिश साम्राज्याच्या जोखडाच्या शौर्याची महती गात गात व्हँको-व्हरमधील हिंदु लोकांनीं पोटभर मार खाल्ला! पण त्यांनीं आपल्या राज्य-कर्त्यांच्या सजातीयांवर यत्किंचितही हात उगारला नाहीं! जपानी लोकांनीं मात्र एकत्र होऊन आपलें संरक्षण करून घेतलें, व त्यांच्यावर जी गोऱ्या लोकांची टोळी चालून येत होती तिला त्यांनीं चोप देऊन माघारी पिटाळून लाविली. या आत्मसंरक्षणाच्या कृत्याबद्दल कानडाच्या फिडरल गव्हर्मेंट-कडून जपानी लोकांची अतिशय तारीफच करण्यांत येत आहे व त्यांचें झालेलें नुकसान भरून मिळालें असून शिवाय लवकर न्यायही मिळेल असें आश्वासन

देण्यांत आलें आहे. यावरून पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत. स्वतंत्र देशांतील मनुष्य असला म्हणजे तो स्वभावतःच कसा स्वावलंबी असतो; आणि आमचें ब्रिटिश साम्राज्य आपल्या छत्रीखालीं कसलीं माणसें निर्माण करीत असतें हें या ठिकाणीं परस्परतुलनेवरून चांगलें लक्षांत येणारें आहे. गुलामगिरींतील मनुष्याचे अंगांत हिंमत उरतच नाहीं. त्याचे जुलूमकर्ते त्याला कितीही चांगलें शिक्षण देत असोत, किंवा त्याच्या उन्नतीसाठीं कितीही झटत असोत, जें एक प्रकारचें तेज स्वतंत्रतेमधील मनुष्यांच्या अंगांत स्वाभाविकपणेंच उत्पन्न झालेलें असतें तें गुलामगिरींतील गुलामांच्या अंगांत मोठया प्रयासानेंही उत्पन्न होऊं शकत नाहीं. व्हँकोव्हरमधील हिंदु लोकांनो, तुम्हीं जपानी लोकांशीं एक होऊन तुमच्यावर उठलेल्या गोऱ्या लोकांना त्या वेळीं सडकून चोप द्यावयाला पाहिजे होता! परंतु व्हँकोव्हरपेक्षांही बेलिंग-हॅममधील हिंदु लोकांनो, तुम्हांला एकत्र होऊन गोऱ्या लोकांच्याविरुद्ध टक्कर देण्याची जास्त आवश्यकता होती. पण हें काम दोन्ही ठिकाणींही तुमच्या हातून झालें नाहीं. अन्यायानें गोरे लोक तुमच्याविरुद्ध उठत असतां तुम्हींही त्यांच्याविरुद्ध एकत्र होऊन उठलेंच पाहिजे! लोक तुमच्यावर काठया उगारतात आणि तुम्ही ब्रिटिश साम्राज्यावर हवाला ठेवून त्या काठयांचा स्वस्थ मार खातां, याला काय म्हणावें! तुमच्यावर ब्रिटिश साम्राज्य आहे हें खरें, पण तें फक्त तुमच्यापासून कर घेण्याकरितां आहे. गोऱ्या लोकांच्याविरुद्ध जगाच्या कोनाकोपऱ्यांतून तुमचें संरक्षण करण्याकरतां तें आहे असें तुम्हांला कोणी सांगितलें? असा तुमच्या डोक्यांत अजून भ्रम असेल, तर तो लवकर टाकून द्या. हिंदु लोकांनो, तुम्हीं आपल्याला कोण समजतां? तुम्ही कांहीं गोरे लोक नव्हे? तुम्ही नुसते ब्रिटिश साम्राज्याखालीं राहत असलां, म्हणून काय झालें? जरा आपल्या अंगाकडे पहा! तुमच्या कातडीचा रंग कांहीं गोरा नाहीं! तुम्ही जर गोरे लोक असतां, तर मग तुमची समजूत बरोबर ठरली असती. मग तुमच्यासाठीं सगळ्या उत्तर अमेरिकेबरोबर देखील एक जंगी लढाई झाली असती! कांहीं धार्मिक मिशनरी आणि राजकीय वकील मारले गेल्याबद्दल युरोपियन राष्ट्रांनीं चीन देशावर सूड उगविला तसें ब्रिटिश साम्राज्य तुमच्याकरतां धांवून येईल, असें तुम्हांला वाटलें होय! सगळ्यांच्याचकरतां ब्रिटिश साम्राज्य असें धांवतें असें नाहीं! एकदां कांहीं

बैलांच्या पायांखालीं एक मुंग्यांचें वारूळ तुडविलें जाऊन त्यांत तीन लक्ष त्रेसष्टहजार सातशें त्र्याण्णव मुंग्या मारल्या गेल्या, व दुसऱ्या एके वेळीं नुकत्याच एका पावसाळ्यांत एका शेणखळीजवळ कांहीं टोणगे एकमेकांपाशीं लाडानें झुंजत असतां त्यांच्या पायांखालीं किड्यांचें आणि गांडुळांचें सुमारें पांच लक्ष वस्तीचें एक शहरच्या शहर नामशेष होऊन गेलें व या दोन्ही गोष्टी ब्रिटिश साम्राज्याच्या निर्विवादपणें ठरलेल्या हद्दीच्या आंत घडून आल्या होत्या! पण त्याबद्दल ब्रिटिश साम्राज्यानें कधीं लढाई केल्याचें कोणाच्या ऐकिवांत नाहीं! तुम्हांला असा गर्व वाटत असेल कीं, ट्रान्सवालमध्यें ब्रिटिश साम्राज्यानें आपल्याकरतां लढाई केली होती! पण मूर्ख सद्गृहस्थहो, तुमचें नांव हें जरी त्या वेळीं एक दिखाऊ निमित्त करण्यांत आलेलें होतें, तरी ती लढाई वास्तविकपणें तुम्हां लोकांकरतां नसून ती ट्रान्सवालमधील हिऱ्यांच्या खाणींकरतां होती. हिंदु लोकांनो, तुम्हीं हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, तुमच्याकरतां तुम्ही स्वतःच जर लढला नाहीं, तर तुमच्याकरतां दुसरें कोणीही लढणार नाहीं!

हिंदुस्थानांतील लोकांनो, तुमच्यावर आज जो हा स्वसंरक्षणासाठीं देखील ब्रिटिश साम्राज्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आला आहे तो कदाचित् खात्रीनें कधींही आला नसता. आज इतर देशांतील गोरे लोक तुमच्याशीं ज्या रीतीनें वागत आहेत त्या रीतीनें जर तुम्ही त्यांच्याशीं दोनशें वर्षांच्या पूर्वीं वागलां असतां, तर खात्रीनें तुम्हांला आपलें पोट जाळण्यासाठीं बेलिंगहॅम शहरांत जाऊन मार खाण्याची पाळी आली नसती. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत तुम्ही स्वतंत्र होता, आणि पाहिजे तें करण्याला समर्थ होता. हल्लीं इंग्लिश आणि आपण तहानें स्नेही झालों आहों आणि करारानें राजा व प्रजा यांचें नातें आपल्यामध्यें उत्पन्न झालें आहे. त्यामुळें हल्लीं तूर्त आपण त्यांच्याशीं जरी राजनिष्ठेनें वागलें पाहिजे हें खरें आहे, तरी त्या वेळीं तुम्ही असे बांधले गेलेले नव्हतां. त्या वेळीं तुम्हांला आपल्या घरांत पाहिजे तें करतां आलें असतें. हल्लीं परकीय लोक तुम्हांला वागवीत आहेत त्याचप्रमाणें तुम्हीं त्या वेळीं त्यांना वागवावयाला पाहिजे होतें. इतकेंच नव्हे तर तसें करण्याला तेव्हां तुम्हांला अतिशय जबरदस्त कारणेंही होतीं. तुम्ही यःकश्चित् मजुरी करण्यासाठीं म्हणून दुसऱ्यांच्या देशांत

जातां ; पण दुसरे लोक तुमच्या हिंदुस्थान देशावर राज्य करण्याकरितां, तुमच्या छातीवर नाचण्याकरतां, आणि तुमच्या हातापायांत परतंत्रतेच्या बेडया घालून तुम्हांला गुलाम करण्याकरतां, आणि तुमच्या वंशजांना भिकेस लावण्याकरितां तुमच्या देशांत येत होते! तुम्ही नुसते मजूर होण्याकरतां दुसऱ्या देशांत गेलां तर तुम्हांला लोक आपल्या देशांतून हांकलून लावतात, आणि तुमच्या देशांत लोक तुम्हां बैलांच्या मानेवर परवशतेचें जोखड ठेवून तुमचे राजे होण्याकरतां आले, त्यांचें तुम्हीं त्या वेळीं मोठ्या थाटानें आगतस्वागत केलें आणि त्यांच्यावर चौऱ्या मोर्चेलें फिरवूं लागला! The state of Washington is a white man's country म्हणजे वॉशिंग्टन हें संस्थान गोऱ्या लोकांकरितां आहे, येथें हिंदु लोकांना आम्ही येऊं देणार नाहीं, असें म्हणून दुसरे लोक तुम्हांला आपल्या देशांतून पिटाळून लावीत आहेत. हिंदु लोकांनो, तुम्हांला दोनशें वर्षांच्या पूर्वीं असेंच म्हणतां येत नव्हतें काय? किंवा त्या वेळीं तुमची वाचा बसली होती? इतर देश जर काळ्या लोकांकरितां नाहींं, तर हिंदुस्थान तरी गोऱ्या लोकांकरितां आहे कीं काय, असें तुम्ही त्या वेळीं कां विचारलें नाहीं? तुम्हांला आपल्या वंशजांची कांहींच काळजी कशी वाटली नाहीं? आपले नातू आणि पणतू पुढें परतंत्रतेच्या आणि क्षुधेच्या एकवटलेल्या वेदनांनीं व्याकुळ होऊन दारोदार फिरतील, भीक मागतील, आणि दुष्काळामध्यें उपासमारीनें प्राण सोडतील, हे पुढील अघोर आणि भयंकर परिणाम तुमच्या कल्पनेच्या डोळ्यांला कधीं दिसलेच नाहींत कसें? ज्या तुम्हीं आपल्या भावी पिढयांच्याबद्दल इतका निष्काळजीपणा दाखविला, ते तुम्ही खरोखर फार पाषाणहृदयी असलां पाहिजे. दुसरे कोणीही बाप आपल्या वंशांतील पुढील मुलांबद्दल इतके निर्दय झाले नसते. आपल्या मुलांनीं गुलामगिरीच्या चिखलांत रांगावें, त्यांच्या पायांतून स्वतंत्रतेच्या मंजुमंजीरनिःस्वनाच्या ऐवजीं परतंत्रतेच्या शृंखलांचा कर्णकटुध्वनि निघावा, आणि त्यांनीं भिक्षांदेहीचें रडणें रडून अखेरीस दारिद्र्याच्या पाळण्यांतच मरून जावें. ही स्थिति तुमच्या कल्पनेला सहन तरी झाली कशी? तुम्हांला त्या वेळीं कोणी हिंदुस्थानांत पाठविलें होतें? देवानें कीं सैतानानें? खात्रीनें तुम्ही इंग्लिशांचे साथीदार म्हणून हिंदु पूर्वजांच्या रूपानें हिंदुस्थानांत जन्मलेले असलां पाहिजे. एरवीं तुम्हीं त्या

वेळीं इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हांकलूनच लावलें असतें ? Drive out the Hindus ही जशी आरोळी बेलिंगहॅम शहरांत ४ सप्टेंबरच्या रात्रीं सगळीकडे ऐकूं येत होती, त्याचप्रमाणें त्या वेळीं Drive out the English अशी आरोळी सर्व हिंदुस्थानभर चोहोंकडे कोनांतून आणि कोपऱ्यांतून, शहरांतून आणि खेडयांतून, वृद्धांतून आणि तरुणांतून, पुरुषांतून आणि स्त्रियांतून, राजांतून आणि रंकांतून, अंतःकरणाच्या प्रत्येक अवयवांतून आणि मनगटाच्या प्रत्येक शिरेंतून उत्पन्न व्हावयाला पाहिजे होती ! आणि त्या वेळीं जर तुमच्या मनांत इच्छा असती, तर तुम्हांला हें काम सहज करतां आलें असतें. हल्लीं इंग्लिश आणि आपण स्नेही झालों आहों त्यामुळें ते जसे आपल्याशीं प्रजानिष्ठेनें वागत आहेत त्याचप्रमाणें आपणही त्यांच्याशीं राजनिष्ठेनें जरूर वागलें पाहिजे; परंतु त्या वेळीं ही राजनिष्ठा तुमच्याआड येत नव्हती ! शिवाय त्या वेळीं इंग्लिशांपाशीं इतकें सैन्यही नव्हतें ! तुम्ही जसे थोडेसे हजार लोक आज अमेरिकेंत होतां, तसेच तेही थोडेसे हजार लोक त्या वेळीं हिंदुस्थानांत होते. एखादा ढेकूण चिरडावयालाही जास्त वेळ लागला असता. त्यांनीं तुम्हांला एका रात्रींत घालविलें; तुमच्या डोक्यांत अक्कल असती, तर त्यांना घालवण्याला तुम्हांला एक रात्रसुद्धां लागली नसती. मोड मोडला जातो तसें एका क्षणांत तें काम उरकून गेलें असतें. राजद्रोह, बंड, राज्यक्रांति हे आतांचे शब्द आहेत. पण त्या वेळीं हें बंड कांहीं नव्हतें. त्या वेळीं हिंदुस्थानांतून थोडे का परकीय लोक उच्छिन्न झाले! डच गेले, पोर्तुगीज नाहींसे झाले ! फरेंचांची सत्ता नामशेष होऊन राहिली, तशीच ही पण एक गोष्ट होऊन गेली असती ! परंतु "हिंदुस्थान हा माझा देश आहे, मला तो देवानें दिला आहे, मी त्यांत कोणालाही पाऊल टाकूं देणार नाहीं !" ही कल्पनाच त्या वेळीं तुमच्या कोणाच्या डोक्यांत नव्हती. त्या महाभाग शिवाजीच्या मनांत हा अंकुर प्रमुखत्वानें होता. पण आसमंतात् सर्वत्र पसरलेल्या खडकामध्यें या एकटया अंकुराचें फारसें कांहीं न चालून तोच बिचारा लुटारू आणि दरोडेखोर ठरला आहे ! हिंदु लोकांनो, तुम्ही आपल्या घरीं निजलां होतां, त्या तुम्हांला अंथरुणांतून बाहेर ओढून काढलें, तुम्हांला अर्धवट नागवें केलें, आणि तुम्हांला स्वदेशाच्या सरहद्दीच्या पलीकडे पिटाळून लावलें; तसें तुम्हांलाही आपल्या देशांत येणाऱ्या परकीय लोकांना दोनशें

वर्षांच्यापूर्वीच करतां आलें असतें. कारण आज आम्हांला जीं कांहीं थोडींशीं ब्रिटिश साम्राज्याचीं चांगलीं फळें मिळत आहेत (आणि तीं खरोखरच मिळत आहेत!) तीं मिळतील म्हणून तुम्हांला त्या वेळीं काय कळलें होतें? तुम्हांला त्या वेळीं इतकेंच कळलें होतें कीं, हे परकीय लोक आपल्या घरांत घुसत आहेत आणि आपल्याला गर्दी करीत आहेत! आम्हांला आज जसे यांचे दोष तसे त्यांचे गुणही दिसत आहेत, आणि म्हणून आम्ही हल्लींची प्रजा त्यांच्या गुणांवर कायदेशीर राजनिष्ठेचें प्रेम करीत आहों; पण तुम्हांला त्या वेळीं यांचे फक्त परकीयत्वाचे दोषच दिसत होते. मग तुम्हीं यांची उपेक्षा त्या वेळीं कोणत्या कारणांवरून केलीत? तुम्ही कांहीं भविष्यज्ञानी होतां असें नाहीं. भविष्यज्ञानाच्या ऐवजीं अज्ञानच तुमच्या पदरांत येतें! हे परकीय लोक तुमच्या घरांत आले, त्यांना तुम्हीं रात्रीच्या प्रहरीं अंथरुणांतून ओढून काढलें नाहीं तर उलट आपल्या अंथरुणापैकीं बरीच जागा तुम्हीं त्यांना दिली! तुम्ही तेथें जाऊन स्वतः मजुरी करून अर्धी चतकोर भाकरी खात होतां ती त्यांनीं तुमच्या तोंडांतून काढून तुम्हांला आपल्या देशाच्या हद्दीच्याबाहेर लावलें; पण परकीय लोक जेव्हां तुमच्य देशांत आले तेव्हां आपल्या स्वतःच्या आणि आपल्या पोराबाळांच्या तोंडांतील अर्धी गिळलेली भाकरी काढून त्यांतील निमे अधिक तुम्हीं यांना दिली. तुम्ही पेज प्यालां आणि भात यांना खाऊं घातला. तुम्हीं त्यांच्या तोंडांतील भाकरी काढून त्यांना आपल्या देशाच्या हद्दीच्याबाहेर घालविलें नाहीं! परकीय लोकांनीं तुम्हांला अर्धवट नागवें केलें; पण परकीय लोक तुमच्या देशांत आले तेव्हां तुम्हीं आपल्या दुगणाचीं राजकीय वस्त्रें सोडून बळेंबळें त्यांना बोलावून त्यांच्या अंगांवर घातलीं! तुम्हीं त्यांचीं वस्त्रें छिनून घेऊन त्यांना आपल्या देशाच्या हद्दीबाहेर लावलें नाहीं! असें असूनही आपण मोठीं परोपकाराचीं कृत्यें केलीं म्हणून तुम्हांला वाटत असेल तर ही तुमची चूक आहे. हा परोपकार नव्हे. पशूंच्या अंगांचीं कातडीं लोकांच्या पायांचें कांट्यांपासून आणि खड्यांपासून सरक्षण करतात म्हणून त्या पशूंना कोणी परोपकारी म्हणत नाहीं! पिढ्यानूपिढ्या आपल्या पोराबाळांना धुळीचे दिवे खावयास लावून आपण आपलीं राज्यें दुसऱ्यांच्या गळ्यांत घालण्याचे परोपकार करण्यापेक्षां तुम्ही अतिशय अनुपकारी आणि अतिशय कृतघ्न झालां असतां, तरी तुमच्या

वंशजांनीं तुम्हांला जास्त दुवा दिला असता ! हिंदु लोकांनो, परकीय देशांत तुमच्या बायका रस्त्यांतून चालल्या असतां त्यांचा अपमान केला जातो आणि त्या गटारांत फेंकल्या जातात; परंतु इतर गोष्टींत परकीय लोकांशीं तुम्ही जशास तसें वागलां नाहीं म्हणून तुम्हांला कोणी दोष दिला, तरी तुमच्या बायकांना हल्लीं परकीय लोक गटारांत फेंकून देत आहेत त्याप्रमाणें तुम्हीं परकीय लोकांच्या बायकांना दोनशें वर्षांच्या पूर्वी गटारांत फेंकून दिलें नाहीं, याबद्दल तुम्ही निःसंशय स्तुतीसच पात्र आहां. अनाथ स्त्रिया, मग त्या कोणाच्याही असोत, त्या सदोदित अनुकंपनीयच होत. त्यांनीं आपलें कांहीं केलेलें नाहीं किंवा कांहीं केलेलें असलें तरी त्या शौर्य दाखविण्याचें स्थान नव्हेत. तें स्थान निराळेंच आहे. परकीय लोकांनीं स्त्रियांना गटारांत फेंकलें, असले जे लोक ते पशु होत. असले पशु हल्लींच्या सुधारलेल्या काळांत फक्त अमेरिकेमध्येंच आहेत असें नाहीं. बऱ्याच पाश्चिमात्य देशांतून हे पुच्छविषाणहीन प्राणी आढळतात. तैमूरलंग आणि नादिरशहा आणि इतर मुसलमान लोक जिंकलेल्या लोकांच्या स्त्रियांवर बलात्कार करीत असत, म्हणून त्यांना हे ख्रिश्चन लोक नांवें ठेवीत असतात. परंतु यांचीं कृत्यें तैमूरलंग आणि नादिरशहा यांच्यापेक्षां याही बाबतींत कांहीं कमी भयंकर आहेत असें नाहीं. नुकतीच सर्व सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या शिपायांनीं चीनपाशीं जी लढाई केली, त्या लढाईंत पेकिन शहराच्या वेढ्यानंतर एकंदर जीं पांच हजार माणसें पुरण्यांत आलीं त्यांपैकीं साडेतीन हजार चिनी स्त्रिया होत्या ! व या तोफेच्या गोळ्यांनीं मेलेल्या नसून लूट करण्याकरितां शहरांत घुसलेल्या पाश्चिमात्य सुधारलेल्या ख्रिश्चन शिपायांनीं पशुतुल्य बलात्कार केल्यामुळें ज्यांचे प्राण गेले होते, किंवा ज्यांनीं लज्जेस्तव आपले प्राण दिले होते, अशा स्त्रियांचीं हीं प्रेतें होतीं ! परंतु दुसऱ्यांचे असले कांहीही धर्म असले, तरी आपला हिंदूंचा अनाथावर दया करणें हाच धर्म होय ! आणि इतर गोष्टी जरी, हे हिंदु लोकांनो, तुमच्या हातून झाल्या नाहींत, तरी हें जें एक सत्कृत्य तुमच्या हातून झालें आहे, तें इतकें मोठें आहे कीं, त्यावर खुष होऊन परमेश्वर तुमचें अभीष्ट खात्रीनें परिपूर्ण करील. तुम्ही केवळ मजुरीकरतां दुसऱ्या देशांत गेलां तरी तुम्हांला हांकलून देण्याचा तावडतोब प्रयत्न झाला, आणि तुमचें राज्य घेण्याकरतां दोनशें वर्षांपूर्वी परकीय लोक

आले, तरी त्यांचा कांहीं एक प्रतिकार तुमच्या हातून झाला नाहीं, याचें कारण काय, असा साहजिकपणेंच एक प्रश्न उद्‌भवतो. याचें उत्तर असें आहे कीं, त्या लोकांत असलीं कामें करणाऱ्या संस्था असतात. आपल्याकडे अशी कोणाला कल्पनाही नाहीं आणि अशी कोठें संस्थाही नाहीं. सॅन्फ्रॅन्सिस्को येथें जपानी आणि चायनीज लोकांना हांकून देण्याकरतां मूळ एक लेबर-पक्षाच्या लोकांचीच संस्था स्थापन झाली, व तिचे हे सगळे परिणाम आहेत. आपल्या देशांत कोणी परकीय लोक घुसूं लागले तर त्यांना ताबडतोब हांकून लावण्याकरतां आपल्या हिंदुस्थानांत पूर्वी अशी कांहीं संस्था नव्हती, किंवा तशी एखादी संस्था स्थापन करण्याचा कोणी प्रयत्नही केला नाहीं, त्यामुळें हे भयंकर परिणाम घडून आले.

असो. हे दीडशें दोनशें वर्षांच्या पूर्वीचे विचार आहेत. ते आतां आठवून मनाला विनाकारण उद्विग्नता उत्पन्न करून घेण्यांत तरी काय हंशील आहे ? त्यापेक्षां हल्लीं आपण ज्या स्थितींत येऊन पडलों आहों तिच्यामधून बाहेर कसे निघूं आणि आपलें स्वराज्य आपल्याला कसें मिळेल याचे विचारच आपल्याला जास्त फायदेशीर आहेत.

## शिवाजीची एक रात्र : : ७

काळ : अग्रलेख, ता. १८–१०–१९०७

शिवाजी लहान होता. वडलांचा धाक आणि आईची प्रीति ह्यांच्या मिश्रणामध्यें कधीं विद्या तर कधीं क्रीडा अशा अवस्थेंत त्याचे दिवस जात होते. त्याच सुमारास दुसरीकडे हिंदुस्थानवर परकी लोकांचे अतिशय जुलूम चाललेले होते. देवळें मोडावीं, गाई कापाव्या, ब्राह्मण बाटवावे, लोकांना लुटावें, गांवच्या गांव बेचिराख करावे, गरीबांच्या कत्तली कराव्या, असे अनेक अनर्थावह जुलूम देशावर चाललेले होते. ते पाहून शिवाजीच्या कोंवळ्या मनावर फार विलक्षण परिणाम होत असत; व या सगळ्या जुलमांपासून आपल्या देशाला आणि आपल्या देशबांधवांना कसें स्वतंत्र करावें याच्याबद्दल तो रात्रंदिवस विचार करीत असे. परंतु हे विचार त्या वेळींसुद्धां उघडपणें बोलण्याची चोरी होती. यामुळें त्याच्यासारख्या कलाचे जे कोणी चार सोबती त्याला भेटत त्यांच्याशीं तो संध्याकाळच्या संधिप्रकाशांत किंवा मध्यरात्रीच्या निबिड अंधकारांत आपल्या भावी पराक्रमांचे गुप्त कट करीत बसे, व अशा वेळीं स्वदेशाच्या स्वतंत्रतेच्या मनोराज्यामध्यें पुष्कळ वेळां तो अगदीं गर्क होऊन जात असे.

असल्या स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांनीं त्याचें डोकें भणाणून गेलेलें असल्यामुळें आत्मसदृशवृत्तीच जेथें तेथें संचरून राहिली आहे असा सदोदित त्याला भास होत असे. अशा मनाच्या स्थितींत एके दिवशीं संध्याकाळीं तो एकटाच बसला असतां त्याचें लक्ष आकाशांत हळूहळू एकेक दिसूं लागणाऱ्या ताऱ्यांकडे आणि नक्षत्रांकडे वेधलें. त्यांच्याकडे पाहत तो स्तब्ध राहिला. त्याच्या मनानें पृथ्वीवरील दाट हवेचें वातावरण सोडलें, आणि तो मनाचा

अतिशय हल्का आणि अतिशय सूक्ष्म परमाणु वायूच्या सरोवराच्या पृष्ठभागावर पोहणाऱ्या एखाद्या पतंगाप्रमाणें वरवर तरंगत जाऊं लागला. जितकें जितकें उंच जावें तितका तितका जास्त विस्तीर्ण देखावा दिसूं लागतो, हा एक निसर्गदेवतेच्या राज्यांतील कायदा आहे. आणि त्यांतून कल्पनेची दृक्शक्ति तर फारच विलक्षण असते! शिवाजी त्या ताऱ्यांना उद्देशून म्हणाला :-

"हे ताऱ्यांनो, तुम्ही आहां तरी कोण? तुम्ही तारेच असाल अशी माझी आजपर्यंत समजूत होती. पण आतां मला तुमच्या नेहमींच्या कृतीवरून कांहीं निराळाच भास होऊं लागला आहे. आतां तुमचें खरें स्वरूप हळूहळू माझ्या लक्षांत येऊं लागलें आहे. मला वाटत आहे तेंच खरें असलें पाहिजे! जुलमाच्या अतिरेकावांचून आणि परिस्फोटाच्या दहशतीवांचून असली वर्तणूक संभवावयाचीच नाहीं! इतक्या उंचावर देखील जुलमी राजे गेले आहेत ना! शिव! शिव! या जुलमी राजांच्या जुलमानें ज्यांना जेरीस आणलें नाहीं असे लोक विरळाच सांपडतील. हें जग खालपासून वरपर्यंत देवानें जुलमी राजांच्या जुलमाकरतांच निर्माण केलें आहे कीं काय कोण जाणे!—तुमच्याबद्दल माझा तर्क अगदीं बरोबर आहे. सूर्य मावळून अंधार पडत चालला म्हणजे तुमच्यापैकीं एकेकजण या पटांगणामध्यें येऊं लागतो. एक पूर्वेकडून येतो तर दुसरा पश्चिमेकडून येतो, एक दक्षिणेकडून आला तर दुसरा हळूच उत्तरेकडून डोकावूं लागतो. कोठें कोणी दिसत नसतां एकदम तुम्ही या ठिकाणीं येतां. आपल्याला कोणी ओळखील म्हणून आपल्या गुप्त मसलतीच्या या गुप्त संकेतस्थानीं येऊन पोंहोचेपर्यंत आपली वाट गुप्त आणि अदृश्य रीतीनें चालण्याची मोठी अजब हातोटी तुम्हांला साधली आहे! कोठें कांहीं दिसत नसतां एकदम तुम्ही या शून्य संकेतस्थानीं कसे जमतां!—एक आला, दोन आले, दहा आले, पंचवीस आले, शंभर आले,—अबब! थोड्याशा वेळांत किती तरी हे गुप्त कटवाले या निर्मानुष मैदानामध्यें एकाएकीं जमा झाले! हे किती असतील! आतां यांची संख्या कसली मोजतां येते!—एखाद्या विस्तीर्ण रणमैदानावर लढाईच्या पूर्वी दबा धरून बसलेल्या असंख्य शिपायांच्या पलटणी लढाईची वेळ आली म्हणजे जशा चोहों बाजूंनीं एकदम पुढें सरसावतात, त्याप्रमाणें या आकाशांतील गुप्त कटवाल्यांची स्थिति दिसत आहे!—हे ताऱ्यांनो, तुम्हांला गुप्त रीतीनें एकत्र जमा होण्याची ही हातोटी किती तरी छान साधली आहे! तुम्ही इतकेजण

-येथें जमलां, पण कोठें एक पाऊल तरी वाजलें आहे का! किंवा कोठें थोडासा तरी गलबला झाला आहे का! किती गुपचूप पद्धत! इतक्या गुप्त रीतीनें तुम्ही वावरतां यावरून तुमच्यावर फारच कडक जुलूम चाललेला असला पाहिजे! रात्रीच्या अंधारांत तुम्ही लपून छपून येथें येतां यावरून दिवसास तुम्हांला एकमेकांपाशीं आपलीं अंतःकरणें मोकळीं करून आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्याची सक्त मनाई असली पाहिजे! अरेरे! इतक्या जाचांत तुम्हांला ठेवणारा असा कोणता तरी राजा तुमच्यावर जुलूम करीत आहे! आमची या पृथ्वीतलावरील लोकांची पुराणादिकांतील गोष्टींवरून साधारणपणें अशी समजूत झालेली आहे कीं, नरकलोक खालीं आहे आणि स्वर्गलोक वर आहे. पण छे, छे! वर देखील गुलामगिरीचा नरकलोक आहेच असें दिसतें! तुमच्यावर कोणता जुलमी राजा जुलूम करीत आहे?—सांगा, सांगा, मला तुम्ही त्याचें नांव निर्भयपणानें सांगा. माझ्याबद्दल तुम्हांला यत्किंचितही शंका नको. मी कांहीं कोणी जुल्मी राजांच्या जुल्माला मदत करणारा गुप्त हेर नव्हे. उलट मी तुमच्यासारखाच दुसऱ्या एका जुल्मी राजाच्या जुल्मानें गांजलेला प्राणी आहें. तुम्ही ज्या स्वतंत्रतेच्या प्राप्तीसाठीं गुप्त बेत करण्याकरतां या ठिकाणीं एकत्र जमले आहां, त्याच स्वतंत्रतादेवीचा मीही एक उपासक आहें. तुम्हांला जसें कोणी तरी गुलाम बनविलें आहे, त्याचप्रमाणें मी गुलामगिरीमध्यें सांपडलों आहें. पण या गुलामगिरीचे साखळदंड लवकरच तोडल्यावांचून मी कधीं राहणार नाहीं, असा माझा निश्चय आहे. असल्या मनुष्यापाशीं तुम्ही आपलें रहस्य सांगणार नाहीं, तर तुम्हांला माझ्यासारखा समदुःखी व माझ्यापेक्षां जास्त विश्वसनीय असा कोण स्वदेशभक्त भेटणार?—तेव्हां सांगा. मोकळ्या मनानें मला सांगा. तुमच्यावर कोण दुष्ट जुलूम करीत आहे? माझ्या देशाचें नांव हिंदुस्थान आहे, त्याप्रमाणें तुमच्या देशाचें नांव काय? तो आहे कोठें, आणि त्याची स्वतंत्रता गेली केव्हां, हें तुम्ही सगळें मला सांगा. तुमची स्वतंत्रता तुमच्या जुल्मी राजानें कशा रीतीनें फसवून घेतली हें तुम्ही मला आधीं सांगा. बहुतकरून सगळ्या जुलमी राजांची फसविण्याची एकच तऱ्हा असते. त्यानें तुमच्यांत फूट पाडून तुम्हांला जिंकलें काय? आणखी त्यानें तुमच्या देशांत काय काय अनन्वित कृत्यें केलीं? बहुतकरून त्यानें तुमचीं रत्नखचित देवळें तर खास फोडलीं असलीं पाहिजेत; कारण हे सर्व

आकाशभर अस्ताव्यस्त पडलेले त्या भग्न करून टाकलेल्या देवळांच्या कोंदणांतील लखलखित हिरे या गोष्टीची साक्ष स्पष्टपणें देत आहेत. इतके हिरे ज्यांनीं टाकून दिले त्यांनीं लुटून नेलेल्या हिऱ्यांची संख्या किती तरी प्रचंड असेल! काय ही लूट! आणि काय हा परचक्राचा भयंकर परिणाम! आकाशांत हल्लीं जी जी मोकळी जागा दिसत आहे ती सगळी पूर्वी हिऱ्यांच्या राशींनीं भरून गेलेली असेल! आणि त्या राशी लुटारूंनीं आपल्या कंठाळींत भरून नेल्यामुळेंच बहुतकरून आतां ही मधून मधून हजारों ठिकाणीं रिकामी जागा पडली असली पाहिजे! इतकी ही तुमची दुर्दशा कोणी केली?—हे ताऱ्यांनो, नक्षत्रांनो, आणि ग्रहांनो, तुमचे इतके हाल होत असून ते तुम्ही मुकाट्यानें कसे सहन करतां? तुमच्यापैकीं जे नवग्रह आहेत ते फार मोठे पराक्रमी म्हणून आमच्या मृत्युलोकांत त्यांची अतिशय ख्याति आहे. मग हे ग्रहांनो, तो तुमचा पराक्रम कोठें गेला?—अथवा कसला पराक्रम आला आहे? तुम्हां ग्रहांनादेखील केव्हां तरी ग्रहदशा असलीच पाहिजे? आणि या गुलामगिरीच्या ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडलेल्या कोणाचाही पराक्रम चालत नाहीं! आणि हे नवग्रहांनो, या नियमाला तुम्हीही अपवाद नाहीं. तुम्ही अनेक वेळां अनेक दानवांच्या गुलामगिरींत बांधलेले आहां, रावणानें तर तुम्हां नऊजणांना एकमेकांवर पालथे घालून आपल्या जिन्याच्या नऊ पायऱ्या केल्या होत्या! गुलामगिरींत सांपडल्यावर कोणाचें शहाणपण चालत नाहीं. तुमच्यापैकीं मंगळ लढवय्या आहे, बुध बुद्धिमान आहे, गुरु उत्कृष्ट मंत्री आहे, शुक्र अत्यंत कुशल आहे, आणि शनीसारखा उच्छेद करून टाकणारा दुसरा कोणी आढळणारच नाहीं. मग हे मंगळबुधादिक ग्रहांनो, स्वराज्य आणि स्वतंत्रता यांच्याकरितां लागणारे सर्व आवश्यक गुण तुमच्या अंगांत असतांना तुम्ही असे रात्रीचे, अंधारांत, आणि निर्मनुष्य जागेंत चोरट्यासारखे गुप्त खल करण्याकरतां कां जमतां! हे शनैश्चरा, तूं गरिबांच्या पाठीस लागून त्यांना आपल्या साडेसातींत बुडवून टाकतोस, तें तुझें विध्वंसक सामर्थ्य या जुलमी राजांवर तूं उपयोगांत कां आणीत नाहींस? तुझी आज्ञा शिरसावंद्य मानून तुझ्याभोंवतीं सदोदित घिरट्या घालीत असणाऱ्या आपल्या सर्व उपग्रहांसहवर्तमान तूं या जुलमी राजांना आपल्या पूर्ण दृष्टीच्या आकर्षणामध्यें आणून त्यांना रसातळाला कां नेऊन पोहोंचवीत नाहींस?—अथवा तुम्हीही आम्हां मनुष्यांप्रमाणेंच गुलामगिरीचें

जोखड झुगारून देण्याला असमर्थ आहां असें दिसतें, तरी पण तुम्ही सगळेजण रात्रीच्या अंधकारांत एकत्र जमून गुप्त विचार करीत आहां हें कांहीं वाईट नाहीं. तुम्ही स्वतंत्रतेच्या मार्गांत आहां आणि तुमची ही गुप्त कट करण्याकरतां जमण्याची जागा तर फारच मजेदार आहे! आम्हांला जर अशी जागा मिळती, तर किती छान झालें असतें! आमच्या या जमिनीवर कोठें कांहीं गुप्त गोष्ट बोलण्याची किंवा गुप्त बेत करण्याची सोय नाहीं. जिकडे जावें तिकडे चहाडखोर! हे ताऱ्यांनो, मी आपल्या साथीदारांना घेऊन आमच्या स्वतंत्रतेचे गुप्त कट करण्याकरितां तुमच्या या रमणीय जागेंत येऊन बसत जाऊं का? आम्हांस येथें कोठें चांगली जागा नाहीं. आमच्या ह्या जगांत फार घाण भरली आहे. दुष्ट, नीच, अधम, लबाड, विश्वासघातकी, अन्योन्यद्वेषी, क्षुद्र दृष्टीचे आणि स्थूल पातकांचे, अंतःकरणवृत्तीचे हलके आणि बुद्धीचे जड, अशा असंख्य प्राण्यांना यमाचे दूत नरकलोकाकडे नेत असतां त्यांची नजर चुकवून ते या भूलोकांत शिरून येथील किल्ल्यांतून आणि राजवाड्यांतून दडून बसलेले आहेत. असल्या ठिकाणीं बसून कोणतेही चांगले नवीन विचार मनांत उत्पन्न व्हावयाचे नाहींत. कारण, विषकुंडांत अमृतवल्ली कधींही उगवत नाहींत. उलट जे उदात्त विचार असतील ते यांच्या या घाणेरड्या संसर्गानें कुजून आणि सडून गेल्यावांचून राहावयाचे नाहींत. म्हणून मी म्हणतों कीं, हे ताऱ्यांनो, आम्ही तुमच्या त्या जागेंत गुप्त बेत करण्याकरतां येऊं का? ती तुमची जागा किती शांत दिसत आहे! तेथें जाऊन एखाद्या ढगावर बसावें असें वाटतें! आम्ही सगळे साथीदार जमून तेथें आलों तर खात्रीनें तेथें आम्हांला आपल्या स्वदेशाच्या स्वतंत्रतेच्या प्राप्तीचे कांहीं तरी उत्कृष्ट विचार सुचतील असें मला वाटतें. आम्ही तेथें येऊं का? तुमच्या जागेंतील ही रात्र किती प्रशांत, गंभीर आणि रमणीय दिसत आहे! आम्हांला पृथ्वीतलावर अशा रात्री फार दुर्मिळ असतात. येथील रात्री म्हणजे सगळ्या दुष्ट आणि निंद्य कर्मांच्या हंगामाची वेळ! व्यभिचार, वेश्यागमन, मद्यपान, जुगार, नाच, तमाशे, बीभत्सपणा, चहाड्या, घरें फोडणें, आगी, दरवडे, गुप्त छापे, खून वगैरे सर्व लहानमोठ्या पातकांच्या गर्दीनें येथील रात्रींचा शांतपणा अगदीं गजबजून गेलेला असतो! येथें कोणाला गुलामगिरीचा तिटकारा नाहीं आणि तोंडपुजेपणाचा वीट नाहीं. आपसांत भांडत

बसण्याबद्दल कोणाला लाज नाहीं, व क्षुद्र हेतु साधून घेण्यांतच मोठेपणा आहे असें मानण्यांत कोणाला कमीपणा नाहीं. असल्या जगापासून अलिप्त होण्याकरतां क्षणभर तरी आम्ही वर येऊं का? हे ताऱ्यांनो, तुमच्या प्रकाशाच्या किरणासारख्या दिसणाऱ्या तुमच्या त्या सोन्याच्या तारेनें विणलेल्या दोरखंडाच्या दोऱ्या जरा खालीं सोडाल काय? म्हणजे आम्ही सगळेजण पटापट त्यांना धरून वर चढून येऊं. आमच्यापैकीं सगळ्या साथीदारांना दोरीला धरून उंच उंच किल्ले चढण्याची चांगली संवय आहे. आम्हीं तुम्हांला ही तसदी दिली नसती, पण काय करावें? देवाच्या पक्षपातापुढें कोणाचाच इलाज नाहीं. यःकश्चित् पक्ष्यांनादेखील त्या देवानें पंख दिले आहेत. मग मनुष्यांवरच त्याची इतकी इतराजी कां झाली कोण जाणे! अतिशय सूक्ष्म आणि परमाणुप्राय अशी जी कल्पनाशक्ति तिलादेखील पंख आहेत! पण हा मनुष्याचा इतका स्थूल देह असून त्याच्या हातांत अंतरिक्षांतील स्वेच्छाचाराचें कांहीं एक साधन ठेविलेलें नाहीं! पाण्यावर पोहतां येण्याची तरी शक्ति देवानें मनुष्याच्या अंगांत ठेविली आहे, ही एक त्याची मेहेरबानीच समजावयाची! नाहीं तर त्यानें मनुष्याला ज्याप्रमाणें अकलेनें दगड केलें आहे, त्याचप्रमाणें वजनानेंही दगड केलें असतें, तर बिचारा मनुष्यप्राणी काय करणार होता! शरीराच्या पंचीकरणाच्या वेळीं या कातडीच्या पोत्यांत देवानें हे मातीचे गोळे जरा कमी भरले असते; तर आम्ही तुमच्या या शांत आणि रमणीय देशाच्या सरहद्दीवर येऊन तेथें किती तरी उपयुक्त गोष्टी केल्या असत्या. आमच्यावर जुलूम करणारे लोक आपल्या उंच उंच प्रतोल्किांवर आमच्या देशांतील साध्वी स्त्रियांना धरून नेऊन जो गुप्त बलात्कार करीत असतात, तो आम्हीं वरून पकडला असता, आणि आकाशांतील एखाद्या ढगाच्या अंतर्भागांत एखाद्या गुप्तीप्रमाणें गुप्त असलेली वीज क्षणभर उचलून घेऊन ती त्या दुष्ट अधमांच्या डोक्यांवर वरून खालीं फेंकून दिली असती! शत्रूच्या सैन्याची आम्हीं वरून टेहळणी केली असती, आणि त्यांची सगळी छावणी पूर्णपणें चिरडून जाईपर्यंत वरून आम्हीं ढगांचे ढीगच्या ढीग खालीं ढकलून दिले असते! — पण देव फार मत्सरी आहेत. ते आकाशांत मनुष्याला येऊं देत नाहींत. त्रिशंकु राजालादेखील अर्ध्या वाटेंत अडवण्यांत आलें! पण ते मनुष्याला अक्कल देऊन चुकलेले आहेत, आणि

याबद्दल त्यांना लवकरच केव्हां तरी पश्चात्ताप झाल्यावांचून राहणार नाहीं. —पण हे ताऱ्यांनो, आम्हांला वर येतां आलें नाहीं, तर निदान तुमचे काय काय बेत चालले आहेत ते तरी मला कळूं द्या. तुम्ही एकमेकांशीं काय बोलत आहां? तुमचे विचार काय चालले आहेत? तुमच्यावर जो राजा जुलूम करीत आहे, त्याचा तुमच्या देशांतून उच्छेद करून टाकण्यासाठीं तुम्ही काय उपाय योजीत आहां? तुमच्यापैकीं कोणी एकमेकांच्या कानाशीं लागून कांहीं कानगोष्टी करीत आहेत; कोणी हातांत हात घालून बसले आहेत; कोणी आपआपल्या पुढाऱ्यांच्या सभोंवतीं वर्तुळ करून त्यांची सल्लामसलत ऐकत आहेत; आणि कोणी एकटेच एकीकडे जाऊन विचार करीत आहेत; पण या सगळ्या खलबतानंतर तुमचा अखेर निकाल काय ठरतो, तो कोण तरी मला सांगा. आमच्या देशांत त्याची फार आवश्यकता आहे; म्हणून मी एवढ्या काकुळतीला येऊन तुमची याचना करीत आहें. तुमचीं काय बोलणीं चाललीं आहेत, तीं मी कान लावून ऐकत आहें; पण कांहीं ऐकूं येत नाहीं. तेव्हां तुम्हींच होऊन कांहीं सांगितलें तर तें मला कळण्याचा मार्ग आहे. —किंवा अजून पारतंत्र्याचें जोखड कसें मोडावें आणि स्वातंत्र्याचें निशाण कसें उभारावें, याच्याबद्दल तुमचा कांहीं निश्चय ठरलाच नाहीं? पण वास्तविक तुम्हांला इतकी अडचण पडूं नये. प्रत्यक्ष बृहस्पतीसारखे वक्ते तुमच्या या सभेंत हजर आहेत. राजधर्म, दंडनीति इत्यादिकांचा मुख्य प्रवर्तयिता जो देवयानीपिता शुक्र, तो तुम्हांला मसलत सांगण्याला बसलेला आहे. सप्तऋषि आकाशगंगेच्या निर्मळ प्रवाहांत स्नान करून तुमच्या स्वतंत्रतेकरितां ध्रुववृक्षाच्या पारासभोंवतीं प्रत्यहीं प्रदक्षिणा घालून तपश्चर्या करीत आहेत. अरुंधती-सारख्या पवित्र स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या तेजाचीही तुमच्या देशकार्याला मदत आहे. शत्रूशीं नेटानें टक्कर देणारे त्या अश्विनी नक्षत्राजवळील मेषासारखे योद्धे तुमच्यामध्यें आहेत. सर्व पशूंचा राजा आणि बलानें अति बलाढ्य असा जो सिंह त्याचेंही साहाय्य तुम्हांला आहे. इतकी सामग्री जवळ असतां तुमच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे बेत अजून कायम होत नाहींत, हें मोठें आश्चर्य आहे. याच्या निम्मे सामग्री माझ्या हातीं येती, तरीदेखील मीं आपला देश केव्हांच स्वतंत्र करून सोडला असता.—अरे, हे मृगशीर्ष नक्षत्रांतील व्याधा, मी तुला असा हा बाण मारतांना किती तरी दिवस पाहत आहें! आतां हें तुझें

शरसंधान पुरे. तो बिचारा मृग कधींच मरण पावलेला आहे. मग आतां रोजरोज तूं त्याच्या पाठीमागें कां धांवत असतोस ? आणि त्याच्या पोटांत रोज तूं आपला बाण कां फेंकीत असतोस ? मेलेल्यांना मारण्यांत किंवा गरीब मृगांची मृगया करीत बसण्यांत व्यर्थ कालक्षेप करून कांहीं मोठा पुरुषार्थ साधतो असें नाहीं. अरे, तुझे हे सगळे इतके देशबांधव आपल्या देशाच्या स्वतंत्रते-करतां गुप्त बेत करीत असतां तूं आपल्या भात्यांतील बाण या मृगयेमध्यें व्यर्थ दवडीत आहेस, त्या तुला काय म्हणावें ? तुझ्या हातांत परमेश्वरानें जे धनुष्यबाण दिले आहेत ते या गरीब मृगांना मारण्याकरतां नव्हेत, तर तुझ्या स्वतंत्रतेचे जे शत्रु असतील त्यांना मारण्याकरतां ते आहेत. —हे कृत्तिकांनो, तुम्ही या गुप्त मंडळीमध्यें हजर असतांना या मंडळीचें देशकार्य साधूं नये, हें शक्य तरी कोण मानील ? जगांतील सगळ्या सेनापतींचा आदिगुरु—देवांचा शिवाजी—जो षडानन त्याला तारकासुराच्या वधाकरितां आणि देवांच्या स्वातंत्र्याकरतां तुम्हीं धात्रीप्रमाणें आपल्या दिव्य शक्तीचें दूध पाजून वाढविलें, त्या तुमच्या दुधांतील शक्ति आजच कशी नाहींशी झाली? त्या पहिल्या दिव्य-सेनानीच्या मुखस्पर्शानें पवित्र झालेला तो दुधाचा झरा कधींही आटावयाचा नाहीं. जेव्हां जेव्हां जुलमी दैत्य गरीब प्रजेला छळतील, तेव्हां तेव्हां त्यांचें जोखड झुगारून देऊं इच्छिणाऱ्या भावी लोकांच्या चेतनेकरतां दूरदर्शी आणि परोपकारी भगवान् षडाननानें तें अमृततुल्य दुग्ध मुद्दाम कांहीं तरी अवशिष्ट ठेवलेलें असलें पाहिजे. त्याच दुग्धाचे बिंदु प्राशन करून श्रीरामचंद्र, युधिष्ठिर, चंद्रगुप्त, भोज, मांधाता, पृथ्वीराज आदिकरून महान् महान् महाभाग महाराजांनीं या आर्यमहीचें स्वातंत्र्य परकीयांपासून कायम राखण्याचे प्रयत्न केले. हे कृत्तिकांनो, अशा त्या पवित्र पूर्वपीठिकेच्या दुग्धापैकीं मला एक थेंब तुम्हीं दिला तरी मी या परकीय लोकांच्या जाचांतून आपल्या देशाला स्वतंत्र करीन ! —पण थांबा. तें दूध माझ्या तोंडांत घालतांना कदा-चित् एकदम फार पडेल. असें मात्र करूं नका. कारण, या स्वतंत्रतेच्या रसा-यनाची हल्लींच्यापेक्षां पुढें जास्त गरज लागणार आहे. त्या वेळेकरतां हा दिव्यरस फार जपून ठेवा. —हे ताऱ्यांनो, ज्या दुग्धाच्या प्रभावानें इतर लोक स्वतंत्र होऊं शकतात तें तुमच्या इतकें सन्निध असतांना मग तुम्ही इतक्या चिंतेंत कां पडलां आहां ? आणि शिवाय इतकेजण असून तुम्ही आधीं

परतंत्रतेंत पडलांच कसे ? आणि पडल्यावर अजून त्यांतून निघूं शकत नाहीं कसे ? मला वाटतें आमच्या हिंदुस्थानापेक्षां तुमच्या देशाची लोकसंख्या पुष्कळच कोटींनीं जास्त असली पाहिजे. तुम्ही इतके कोटि लोक एकत्र झाला तर आपल्या तेजानें वाटेल त्याचें भस्म करून टाकाल आणि वाटेल तसला अंधकार असला तरी तो प्रकाशित कराल. मग तुम्ही एकदिल कां करीत नाहीं ? तुमचीं शरीरें फक्त एकत्र झालेलीं दिसतात; पण तुमचीं मनें आमच्यासारखींच एकमेकांपासून विलग आहेत कीं काय ? मला जर आपल्या देशांतील इतके लोक गुप्तपणानें एकत्र करण्याला तुमच्यासारखी जागा मिळती तर मीं सगळ्यांचीं मनें एका क्षणांत आपल्या देशाच्या स्वतंत्रतेच्या बाबतींत एक करून टाकलीं असतीं. तुमच्यामध्यें परस्पराकर्षण आहे म्हणून म्हणतात. पण तुम्हांला परस्परांचीं मनें आकर्षण करून घेण्याची विद्या अद्यापि साध्य झालेली नाहीं असें दिसतें. —आणखी दुसरी गोष्ट अशी कीं, मी तुम्हांला असे रात्रीच्या प्रहरीं लपून छपून जमतांना येथें आज कित्येक वर्षें पाहत आहें, तरी अजून तुमचे राज्य-क्रांतीचे बेत कांहींच ठरत नाहींत हें कसें ? इतक्या सगळ्या रात्रीं तुम्ही विचार करण्यांतच फुकट दवडतां ? अतिविचार कार्यविघातक असतो. आणि राजकारणांत दीर्घसूत्रीपणा बिलकूल उपयोगी नाहीं. हीं तत्त्वें तुम्हांला समजतात ना ? तुम्ही माझ्या प्रश्नांचें कांहींच उत्तर देत नाहीं. माझा आवाज तुम्हांला ऐकूं येत आहे ना ? किंवा तुमच्यामध्यें श्रवणशक्तिच नाहीं ? किंवा कोणी म्हणतात तसे तुम्ही खरोखर जड तर नाहीं ? किंवा मी ज्यांना उद्देशून बोलत आहें ते त्या आकाशगंगेच्या वाळवंटांतील नुसते निरनिराळे पडलेले सोन्याचे कणच आहेत ? किंवा वर्षाऋतूच्या प्रारंभीं जो विजेचा सोनेरी पत्रा आकाशांत लखलखत आणि कडकड वाजत होता, तो आतांशा कोठें दिसत नाहीं, त्याचे तर कोणी लहान लहान तुकडे करून फेंकून दिलेले नाहींत ? बहुतकरून हाच तर्क खरा असला पाहिजे. कारण, जेव्हां हे सोन्याचे कण दिसत असतात त्या वेळेला तो विजेचा पत्रा दिसत नाहीं. आणि तो विजेचा पत्रा दिसत असतो तेव्हां हे सोन्याचे कण दिसत नाहींत. मला वाटतें, वर कोणी तरी एक प्रचंड शक्तीचा सुवर्णकार आपली ऐरण आणि घण घेऊन बसलेला असला पाहिजे; व पावसाळ्याचे दिवस

जवळ आले म्हणजे तो हे सगळे सोन्याचे कण एका ठिकाणीं ठोकून त्यांच्यापासूनच तो विजेचा सोनेरी पत्रा तयार करीत असला पाहिजे! —पण असें म्हणावें तर सोन्यापेक्षांही त्यांचें तेज जास्त दिसत आहे. शुद्ध हिऱ्यासारखे हे दिसत आहेत. तेव्हां ही उपडी ठेवलेली अथवा खालून वर पोंखरली जाणारी एखादी हिऱ्यांची खाण तर नसेल? —हीच कल्पना बरोबर दिसते. कारण, हे हिरे वरून खालीं पडतांना पुष्कळ वेळां आढळतात. लोक त्यांना तारा तुटून खालीं पडला असें म्हणतात. पण त्यांत कांहीं तथ्य नाहीं. हें हिऱ्यांचे दगड वरच्या उपड्या खाणींतून खालीं जमिनीवर पडतांना, त्यांचीं जीं दूरपतनामुळें झालेलीं व जमिनींत खोल गेलेलीं लहान छकलें सांपडतात त्यांनाच येथील लोक हिरे, माणकें, पाच, शनीचे दगड वगैरे नांवें देतात. पण ही कल्पनाही जुळत नाहीं. कारण, यांच्या ठिकाणीं गति आहे. तेव्हां हे कोणी तरी देदीप्यमान पुण्यवान् पुरुषच असले पाहिजेत. जे पुण्यकर्म करतात ते मरणोत्तर दिव्य देह धारण करून आकाशांत तारे होऊन बसतात अशी लोकांमध्यें एक समजूत आहे ती खरी असली पाहिजे. -- तर मग हे पुण्यवान् पुरुषांनो, चालू द्या. तुमचे स्वतंत्रतेबद्दलचे गुप्त कट अव्याहत चालू द्या. पुण्यवान् लोकांच्या कोणत्याही कृत्याला यश आल्यावांचून राहावयाचें नाहीं. —परंतु मघांशीं पूर्वरात्रीं तुमच्या गुप्त बैठकींत जितकीं माणसें दिसत होतीं तितकीं आतां पहांटेस कां दिसत नाहींत? आणि तुमच्यांतील हे कांहीं कांहीं लोक तुमच्या सभेंतून उठून कां जाऊं लागले आहेत?—अहो! काय हा चमत्कार! मी पाहतां पाहतां तुमच्यांतील बरेच असामी सभास्थानापासून पार नाहींसे झाले! तुम्हांला कोणी इशारत दिली? आतां उजाडण्याची वेळ होत आली, आपले शत्रु आपल्याला पाहतील, आतां आपण चौघांनीं चोहोंकडे पांगून जाण्याची वेळ आली आहे. याबद्दलची सूचना तुम्हांला कोणी दिली? —हं समजलों! पृथ्वीतलावर कानोसा घेण्याकरतां मुद्दाम दूरदूरच्या निरनिराळ्या पहाऱ्याच्या ठिकाणीं तुम्हीं जे पक्षी ठेविले होते ते तुमच्या खुणेच्या शब्दांचीं गाणीं भैरवी रागामध्यें गात गात आकाशांत तुमच्याकडे उंच उडत येऊन त्यांनींच बहुतकरून तुम्हांला ही इशारत दिली असली पाहिजे. —एकूण तुमच्या कटामध्यें हे पक्षीदेखील सामील आहेत ना? अथवा त्यांत काय आश्चर्य आहे! स्वतंत्रतेच्या पक्षाला कोण पाहिजे तो मदत करील! —ठीक आहे! ताऱ्यांनो, जा. तुम्ही आतां

लवकर जा. मागें उगीच रेंगाळत राहून शत्रूच्या दृष्टीस पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जा—लवकर जा. स्वातंत्र्याबद्दल खटपट करणारा कोणताही मनुष्य शत्रूच्या हातीं न सांपडावा म्हणून मला तुमची फार काळजी वाटते. म्हणून मी तुम्हांला विनंति करतों कीं, तुम्ही आतां या संकेतस्थानापासून लवकर नाहींसे व्हा. ही पहा पूर्वदिशा आरक्त झाली. आणि हा पहा, जगांतील पहिला रंगारी जो भगवान् सूर्यनारायण तो आपल्या कल्मानें सर्व उंच पर्वतांच्या शिखरांना संधिप्रकाशाचा तांबूस रंग देऊं लागला !"

असें म्हणून शिवाजी आकाशाकडे पाहतो तों बहुतेक सर्व आकाश स्वच्छ झालेलें त्याला दिसलें, आणि कोणीही कटवाला मागें उरलेला नाहीं असें पाहून त्याला आनंद झाला. आणि नंतर त्यानें आपल्या देशाच्या स्वतंत्रतेकडे फिरून आपलें लक्ष वळवलें.

---

## पंजाबांत बंड कधीं होणार ? : : ८

काळ : अग्रलेख, ता. १४-६-१९०७

● या सुमारास बनावट पुराव्यानिशीं कटाचे खटले उभारण्याचीं कारस्थानें चाललीं होतीं. बंडाच्या सबबीवर सरकारनें लालाजींना पकडून हद्दपार केलें. पण बंडवाल्यांनो, तुम्ही काय करीत आहांत.

लाला लजपतराय यांना पकडून बरेच दिवस झाले. ते ब्रह्मदेशांत जाऊनही पोहोंचले व तेथें ते सरकारनें दाखवून दिलेल्या मर्यादेच्या आंत आपला नित्यक्रम ठरवून त्याप्रमाणें वागूंही लागले असतील; तरी पण अजून त्यांना ज्या बंडाकरितां धरलें, तें बंड बाहेर पडत नाहीं हें कसें ? लाला लजपतराय यांस पकडलें त्याच सुमारास बंड व्हावयाचें होतें ! ही बंडाची उगीच बाजारगप्प असेल असें कोणी म्हणेल, तर त्याला तसें म्हणण्याला यत्किंचितही जागा नाहीं. कारण ही खुद्द सरकारी बातमी आहे ! मोठमोठ्या सरकारी इंग्रजी

अधिकाऱ्यांनीं ती लोकांमध्यें प्रसिद्ध केली आहे ! आणि इंग्रजी अधिकारी कधींही खोटें बोलत नाहींत ! तेव्हां ही बंडाची बातमी खरीच असली पाहिजे. आतां जर ही बातमी खरी आहे, तर बंड तें कोठें आहे ? तें बंड कधीं होणार ? आणि तें इतके दिवस कां झालें नाहीं ? लाला लजपतराय यांना सरकारनें पकडल्यामुळें या बंडाचा बीमोड झाला असें जर कोणी सरकारचा पक्षपाती मनुष्य म्हणेल, तर हें त्याचें म्हणणें हास्यास्पद ठरेल. हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारचें राज्य घेण्याकरितां आणि त्यांस हिंदुस्थानांतून हांकून लावण्याकरितां जें बंड व्हावयाचें होतें, तें एका माणसासाठीं कधीं तरी थांबून राहील काय ? जें बंड इतकीं मोठीं प्रचंड कार्यें करणार, त्या बंडांत लाला लजपतराय ही व्यक्ति असली काय आणि नसली काय सारखेंच आहे. असलीं अद्भुत कामें कोणत्याही एका व्यक्तीच्या हातून होण्यासारखीं नाहींत. हें कांहीं पंधरावें किंवा सतरावें शतक नाहीं, कीं ज्यांत एकेकटा मनुष्य मोठमोठीं साम्राज्यें उलथून पाडूं शकेल. लाला लजपतराय हे स्वतः कधीं शिपाई म्हणून प्रसिद्धीस आलेले नाहींत. यामुळेंही त्यांच्याकरितां पंजाबांतील बंड थांबून राहण्याचें कांहीं कारण नाहीं. फार झालें तर लाला लजपतराय यांनीं बंडवाल्यांना सल्लामसलत दिली असती, व अमक्या ठिकाणीं इंग्लिशांचें सैन्य कमी आहे; आणि तमक्या दिवशीं इंग्लिश लोक गाफील राहण्याचा संभव आहे; अशी कांहीं माहिती त्यांनीं बंडवाल्यांना दिली असती. परंतु जें बंड साऱ्या हिंदुस्थानचें आक्रमण करणार, तें या एकट्याच सल्लामसलतगारावर अवलंबून होतें असें मानणें शक्य नाहीं. एकट्याकरितां पंजाबांतील बंड थबकून राहण्याचें कांहीं एक कारण नव्हतें. कारण, बंडवाल्यांना दुसऱ्या कोणीही सल्लामसलत दिली असती. हिंदुस्थानांत लाला लजपतराय यांच्यासारखे, किंबहुना त्यांच्याहून जास्त माहीतगार आणि वाकबगार असे दुसरे लोक नव्हते असें नाहीं. मग तें बंड कां झालें नाहीं ? किंवा अजून तें बाहेर कां फुटत नाहीं ? प्रामाणिक इंग्रजी वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ज्यापेक्षां म्हटलें आहे, त्यापेक्षां पंजाबांत बंड तयार होऊन राहिलेलें असलेंच पाहिजे. त्याच्याबद्दल आतां कोणीही शंका घेणें वाजवी होणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर वरिष्ठ अधिकारी असें म्हणत असतां शंका घेणें म्हणजे त्यांचा अपमान केल्यासारखें होईल, आणि इंग्रजी अधिकारी असें म्हणत असतां शंका घेणें म्हणजे राजद्रोह केल्यासारखें होईल !

तेव्हां इंग्रजांचें राज्य हरण करून घेणारें बंड पंजाबमध्यें तयार होऊन राहिलें आहे, असें म्हणण्याला प्रत्येकजण कायद्यानेंच बांधला गेलेला आहे ! मग तें बंड आतां कोठें आहे ? त्याचें काय झालें ? तें बंड म्हणजे बर्फ असतें, तर वितळून गेलें असें तरी म्हणतां आलें असतें; किंवा तें उकळत ठेवलेलें पाणी असतें तर त्याची वाफ होऊन गेली अशी तरी कल्पना करतां आली असती. पण इंग्रजांना हाकलून लावणारें बंड म्हणजे त्यांत लाखों लोक सामील झालेले असले पाहिजेत, लाखों रुपयांचा दारूगोळा तयार झालेला असला पाहिजे, आणि लाखों रुपयांचीं हत्यारें व अन्नसामग्री तयार असली पाहिजे. इतका सगळा हा माणसांचा आणि जिनसांचा सांठा एकदम गेला कोठें ? हा लाला लजपतराय यांच्या खिशांत होता कीं काय, कीं त्यांना नेल्याबरोबर तोही त्यांच्याबरोबर पंजाबांतून नाहींसा व्हावा ! पण लाला लजपतराय यांचा खिसा इतका मोठा असू शकणार नाहीं ! तर मग ही सगळी एवढ्या मोठ्या बंडाची तयारी पंजाबांत आहे तरी कोठें ! आपणा सामान्य बुद्धीच्या लोकांना जरी या प्रश्नाचें मोठें गूढ पडलें असलें तरी सरकारला त्याची खडानूखडा माहिती असली पाहिजे ! पण आपलें सरकार धूर्त ! तें त्यांतील एक चकारशब्दही बाहेर फोडणार नाहीं ! त्या बंडांतील लाला लजपतराय यांच्याखेरीज बाकीचें सैन्य कोठें आहे, त्यांनीं आपलीं हत्यारें कोठें सांठविलीं आहेत, त्यांनीं आपला दारूगोळा कोठें पुरला आहे आणि त्यांचा धान्यसंचय कोठकोठल्या कोठारांतून आहे, याबद्दलची अगदीं बारीकसारीकसुद्धां माहिती सरकारपाशीं असली पाहिजे ! मात्र प्राण गेला तरी सरकार ती बातमी बाहेर फोडणार नाहीं ! खुद्द बंडवाल्यांच्याइतक्या गुप्तपणानें सरकार या बातम्या गुप्त ठेवीत आहे ! असंख्य बंडवाल्यांपैकीं फक्त एक लाला लजपतरायांखेरीज इतर कोणाचींही नांवें बाहेर फुटूं न देण्याच्या कामीं सरकारी अधिकारी जो दक्षता दाखवीत आहेत तिजवरून, जणूं काय ते देखील बंडांतीलच आहेत कीं काय असा कोणाला भास झाला तर तो अस्थानीं आहे असें कोणासही म्हणतां यावयाचें नाहीं. पण सरकारला इतकी दक्षता कशाला पाहिजे होती ? जर खरोखरच बंड आहे तर मग बाकीच्या बंडवाल्यांचीं नांवें सरकार पुढें कां आणीत नाहीं ! बंड मोडून टाकावयाचें अशी सरकारची इच्छा ना ? मग एकालाच पकडल्यानें

बंड मोडतें? लाला लजपतराय यांच्या पंजाबांतील बाकीच्या साथीदारांना अजून सरकार कां पकडीत नाहीं? परंतु अजितसिंहाशिवाय सरकारनें अजून कोणाला पकडलें नाहीं किंवा पकडण्याचा सरकारचा इरादाही दिसत नाहीं. पंजाबांत हल्लीं कित्येक लोकांवर खटले चालले आहेत, हें कबूल आहे. पण ते खटले बंडाच्या आरोपासाठीं नाहींत. वर्तमानपत्रांतील लेख आणि रावळपिंडीचा दंगा, यांच्यासंबंधानें तीं कामें चाललेलीं आहेत. बंडाकरितां आजपर्यंत पकडलेले असे काय ते लाला लजपतराय आणि अजितसिंह हे दोन प्राणी दिसत आहेत. बंडाची बातमी सरकारला कळून लाला लजपतराय यांना पकडल्याला जवळ जवळ महिना होऊन गेला. इतक्या एक महिन्याच्या अवधींत सरकारला अजितसिंहाशिवाय तिसरा कोणी बंडवाला सांपडूं नये किंवा कळूं नये, हें मोठें आश्चर्य आहे! इतके दिवस झाल्यानंतर बंडाची ही खोटी सबब त्या वेळेपुरती पुढें करण्यांत आलेली होती, असें सरकारनें प्रसिद्ध करावयाला पाहिजे होतें. परंतु प्रामाणिकपणाच्या व्याख्या अलीकडे बदलत चालल्या आहेत. आणि त्याचप्रमाणें बंडाचीही व्याख्या कोठल्या तरी एका १८१८ सालच्या जुन्या गव्हर्मेंट रेझोल्युशनवरून बदलण्यांत आलेली असली पाहिजे, आणि तो रेझोल्युशन फार जुना असल्यामुळें बंड म्हणजे काय हें अलीकडे लोक अगदीं विसरून गेले असले पाहिजेत! बंड म्हणजे दोन माणसांची किरकोळ चळवळ! आणि लाला लजपतराय आणि मि. अजितसिंह हे दोन बंडवाले! नानासाहेब आणि तात्या टोपी हीही बंडवाल्यांचीच जोडी होती. पण त्यांच्यामागें लक्षावधि सैन्याचा पसारा होता. पण यांच्यामागें कोठेंही तसा पसारा नसला तरी एक दोन माणसांनाही बंड करतां येतें असें सरकारनें अलीकडे ठरविलें आहे! आणि त्या अन्वयें लाला लजपतराय आणि अजितसिंह हे बंडवाले ठरत आहेत! लाला लजपतराय आणि अजितसिंह हे दोन बंडवाले! हे दोघेजण काय करणार होते? फिरंग्यांचें राज्य उलथून समुद्रांत फेंकून देणार होते काय? लाला लजपतराय एका टोंकाला आणि अजितसिंह दुसऱ्या टोंकाला, अशा रीतीनें उभे राहून हे दोघे इंग्रजी साम्राज्याला थरथर हालवून सोडणार होते काय? इंग्रजी साम्राज्य इतकें का लटपटीत आहे? दोन माणसांनीं दोन टोंकांना धरून हालवून खालीं पाडण्याइतकें का तें उथळ आहे? असें असेल तर इंग्लिशांनीं

हिंदुस्थानांत इतके दिवस काय केलें? इतकें ज्यांना आपल्या साम्राज्याचें स्थैर्य करतां आलें नाहीं, त्यांनीं आपल्या मोठेपणाची बडेजाव विनाकारण काय म्हणून मारावी? दोन माणसांच्या बंडानें जर इंग्लिश लोक हल्लीं इतके गांगरून गेले, तर १८५७ सालांत यांची काय दशा झाली असेल! दोन माणसांचें बंड! अशा प्रसंगाला बंड हा शब्द लावणारांना लाज वाटावयाला पाहिजे होती. या प्रचंड बंडांत आणखी लोक आहेत किंवा नाहींत? जर असतील तर त्यांना पकडलें कां नाहीं आणि जर नसतील तर पराच्या कावळ्याप्रमाणें याला बंडाचें स्वरूप कां दिलें, असें सरकारी अधिकाऱ्यांवर दोहोंकडून आक्षेप येतात. या बंडांत जर आणखी कांहीं लोक असतील, तर त्यांना इतके दिवसपर्यंत गुप्त रीतीनें राहतांच यावयाचें नाहीं. बंडाचा गुप्त बेत फार दिवस टिकूं शकत नाहीं. त्याचीं कृत्यें तावडतोब घडून येत असतात. जर खरोखरच कोणी बंडवाले असते, तर त्यांनीं लाला लजपतराय यांस कैद करूं दिलें नसतें. तेथेंच बंडाला पहिली सुरुवात झाली असती. बंडवाल्यांनीं इंग्रजी राज्य घ्यावयाचें मग पाहिलें असतें; पण पहिल्यानें त्यांनीं आपला पुढारी इंग्लिशांच्या हातीं लागूं दिला नसता. हीं जीं बंडाचीं सामान्य लक्षणें त्यांपैकीं एकही कोठें दृष्टोत्पत्तीस येत नसतां इंग्लिश लोक बंडाची सबब पुढें करतात, यावरून त्यांच्या अज्ञानपणाचा तिरस्कार करावा किंवा कावेबाजपणाचा स्तुतिवाद गावा, हें समजणें कठीण आहे. पण खरोखर बंड कशाला म्हणावें हें न समजण्याइतके इंग्लिश लोक खात्रीनें अज्ञानी नाहींत. हे जे विचार आम्ही लिहीत आहों हे हिंदुस्थानांतील सगळ्या लोकांच्या डोक्यांत येतात. ते अशाच विचारसरणीनें विचार करतात. ते हेच प्रश्न विचारतात कीं, बंड कोठें आहे? कधीं होणार? बंडांत एक किंवा दोनच मनुष्यें कशीं? बाकीचे ते १९०७ सालचे नानासाहेब आणि तात्या टोपे कोणीकडे आहेत? त्यांना अजून आम्ही घोडयावर बसून इंग्रजांच्या रस्त्यांतून दौड करतांना कां पाहत नाहीं? कोणत्याही हेतूसाठीं म्हणा, एकदां बंडाची अफवा उठवून दिल्यानतर लोक असे प्रश्न विचारणारच. त्यांत त्यांचा कांहीं दोष नाहीं. आणि लोकांच्या या प्रश्नांना उत्तर देण्याला सरकारपाशीं तर कांहीं जागाच नाहीं. कारण बंडच जर नाहीं, तर बंडांतील बाकीचे साथीदार कां पकडले गेले नाहींत याला सरकार झाले म्हणून तें तरी काय उत्तर देणार? अशा रीतीनें सरकार

अनुक्रम ५३६१२ दि: ....१९७४
६.६० नों: दि: २५-१२-७

इल्लीं मोठ्या पेचांत पडलें आहे. १८५७ सालचें बंड झालें त्या वेळीं किती तरी लोक पकडले आणि तोफेच्या तोंडीं दिले ! १९०७ सालीं ज्याला बंड असें नांव देण्यांत आलें आहे, त्यांत सारीं दोनच माणसें पकडलीं. यावरून लोक सरकारच्या व बंडाच्या धामधुमीबद्दल बरेच साशंक झालेले आहेत, व हें पंजाबांतील बंड कोणी केलें, सरकारनें कीं लाला लजपतरायनें, याचें कोडें त्यांना उकलेनासें झालें आहे. सारांश, सरकारची सद्यःस्थिति फार नाजूक झालेली आहे. त्यांनीं 'बंड' 'बंड' म्हणून साऱ्या हिंदुस्थानभर गवगवा करून सोडला; पण आतां पाठीमागून पाहतात तों कोठेंच कांहीं नाहीं. अशा रीतीनें पंजाबांतील लोकांनीं इंग्लिशांना अगदीं तोंडघशीं पाडण्याची वेळ आणली आहे ! लोक जर असें करूं लागतील, तर अशानें राजांच्या शब्दांना काय बरें किंमत राहील ! हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं 'इकडे बंड, तिकडे बंड' अशी एकच धांदल उडवून देत बिचारे इंग्लिश अधिकारी पुढें धूम ठोकीत चालले असतां, मागें जिकडे तिकडे सामसूम ठेवून पंजाबी लोकांनीं इंग्लिशांची अब्रू घेण्याची जी मसलत चालविली आहे ती कांहीं ठीक नाहीं ! आपल्या राजाच्या शब्दांची अशी नापत करणें हें कांहीं खऱ्या राजनिष्ठ लोकांचें कर्तव्यकर्म नव्हें. मोर्लेसाहेबांपासून तों थेट लाहोरच्या मॅजिस्ट्रेटसाहेबांपर्यंत सर्व लोक 'बंड बंड' म्हणत असतां, पंजाबांतील लोकांनीं कांहीं एक न करून त्यांची फजिती उडविणें याच्यासारखा दुसरा राजद्रोह नाहीं ! आपले राज्यकर्ते 'बंड बंड' म्हणून म्हणत आहेत, तर जे खरे राजनिष्ठ असतील त्यांनीं प्रसंगविशेषीं राजद्रोहाचा गुन्हा पतकरूनही एखादें बंड करून आपल्या धन्यांचा शब्द खरा करून दाखवायला नको होता काय ? पण तें कांहीं नाहीं ! इतकी राजनिष्ठा उरली आहे कोठें ? अलीकडे पंजाबांतील लोक फार राजद्रोही होऊं लागले आहेत, म्हणून इंग्लिश लोक जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हें !

बंडाची आरोळी उठवून अधिकाऱ्यांनीं लाला लजपतराय यांस कैद केलें आहे. परंतु ही गोष्ट इंग्लिशांना पुढें जड गेल्यावांचून कधींही राहणार नाहीं. बंडाची अफवा उठवून दिल्यामुळें लाला लजपतराय यांना पकडण्याला मिंटोसाहेबांची पसंती अधिकारी वर्गाला सहज मिळवितां आली असेल; पण या अधिकारी वर्गाचे राजे दोन आहेत. एक मिंटो-मोर्ले वगैरे इंग्लिश लोक व

दा. क्र. १०१२

दुसरे हिंदुस्थानांतील तीस कोटि लोक ! यांपैकीं दुसऱ्या राज्यकर्त्यांची पसंती इंग्रजी अधिकारी वर्गाला असल्या उपायांनीं मिळणें कधींही शक्य नाहीं. बंडाच्या घाबरण्यानें मिंटोसाहेब फसले, म्हणून स्वस्थिति जाणणारे हिंदुस्थानांतील लोक बंडाच्या बाबतींत तरी निदान कधीं फसावयाचे नाहींत. कारण, आपण किंवा आपल्यापैकीं दुसरे कोणी लोक कधीं बंड करूं किंवा नाहीं, याच्याबद्दल त्यांना पक्की माहिती आहे. असल्या कामांत इंग्लिश लोक नेहमीं फसतील, पण नेटिव लोक एकदांही फसावयाचे नाहींत ! अशी स्थिति असल्यामुळें ही बंडाची बातमी अगदीं खोटी असली पाहिजे, व लाला लजपतराय यांस विनाकारण त्रास सोसावा लागत आहे, अशी हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याची खात्री होऊन चुकलेली आहे, आणि त्यामुळें इंडियन लोकांचें इंग्लिशांपाशीं एक हक्काचें मागणें आहे. 'बाप दाखव नाहीं तर श्राद्ध कर' अशी एक हिंदुस्थानांत ग्राम्य म्हण आहे; त्या म्हणीप्रमाणें पंजाबांत बंड तरी होऊं द्या, नाहीं तर लाला लजपतराय यांना तरी सोडून द्या, असें म्हणण्यापर्यंत लोकांची मजल येऊन ठेपत चालली आहे. बंड झालें असतें, तर लाला लजपतराय यांना सोडण्याविषयीं कोणीही चकारशब्द काढला नसता. मग लालासाहेब आणखी कांहीं दिवस ब्रह्मदेशांत राहते म्हणून कोणी समंजस मनुष्यानें तक्रार केली नसती. पण हल्लींची स्थिति अशी आहे कीं, धड बंडही नाहीं आणि धड लाला लजपतरायही नाहींत ! बंड झालें असतें तर इंग्लिशांचें करणें उचित ठरलें असतें. पण इंग्लिशांनीं पंजाबी लोकांना इतकें चिडवून पाहिलें तरीही तेथें कांहीं केल्यानें बंड होत नाहीं ! तेव्हां आतां लाला लजपतराय यांच्या शरिराला उगीच त्रास कां ? पंजाबांत आतां कांहीं बंड होत नाहीं. पंजाबांत हल्लीं एक बंड चाललें आहे; पण तें पंजाबी लोकांत नव्हे. हल्लीं जो प्रकार तेथें चालला आहे तो इंग्लिशांचा आहे; आणि त्यामुळें तो त्यांना पाहिजे तेव्हां बंद करतां येण्यासारखा आहे. सबब तो त्यांनीं आतां बंद केल्यास लोकांवर मोठी मेहेरबानी होईल !

पंजाबांत वास्तविक बंडबिंड कांहीं एक नसून तेथें जी बारीकसारीक अस्वस्थता होती ती मोडण्याकरितां हा सर्व प्रयत्न आहे, हें सर्व लोकांना कळून चुकलेलें आहे. पण यावर अशी एक शंका येते, कीं बंगाल्यांत अशा प्रकारची अस्वस्थता आज एक वर्षाहून अधिक दिवसांपर्यंत चाललेली आहे.

इतकेंच नव्हे, तर पंजाबपेक्षां बंगाल्यांत कित्येक जास्तही चळवळी झालेल्या आहेत. पंजाबांत लाला लजपतराय यांनीं कदाचित् नुसत्या बंडालाच सुरुवात केली असेल; पण बंगाल्यांतील एका घरांत बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपलें प्रत्यक्ष राज्यही स्थापन केलें होतें! असें असून बंगाल्यांत कांहीं झालें नाहीं आणि पंजाबांत मात्र १८१८ सालची जुनी गंजलेली तरवार कायद्याच्या शस्त्रागारांतून हुडकून काढावी लागली, याचें कारण काय असावें, ही शंका कोणाच्या मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. सरकारची सगळीं अंतस्थ कारणें बाहेर लोकांस समजणें कठीण आहे. तरी पण जीं उघड दिसत आहेत तीं कोणत्याही ऑफिशिअल सीक्रेट्स ॲक्टला झांकून ठेवतां येणार नाहींत. बंगाली लोक आणि पंजाबी लोक यांच्या मानसिक रचनेमध्यें पुष्कळ भेद आहे. इंग्लिशांच्या पलटणींतून बंगाली लोकांपेक्षां शीख लोकांचाच भरणा जास्त आहे. आणि शीख शिपायांवर इंग्लिशांची जितकी मदार आहे तितकी गुरख्यांशिवाय दुसऱ्या कोणांवरही नाहीं. पंजाबांतील नवीन वसाहतीच्या मुलुखांत जे नवीन व्यवस्थेमुळें नाराज झालेले लोक आहेत त्यांपैकीं बरेच जुने लष्करी नोकर आहेत. ज्यांचा पलटणींतील नवीन लोकांशीं संबंध आहे अशा या लोकांत असंतोष वृद्धिंगत होऊं देणें श्रेयस्कर नाहीं. आर्यसमाज या संस्थे-सारखी वीर्यजनक संस्था बंगालमध्यें सर्व व्यापक नाहीं, आणि अखेरीस बंगालचा प्रांत पंजाबइतका सरहद्दीला जवळ नाहीं. पंजाब, सरहद्दीवरील मुलूख आणि अफगाणिस्थान हे तिन्ही प्रांत फार जवळ जवळ आहेत. बंगाल्यांत बंड झालें तरी चालेल, आणि मुंबईकडे राज्यक्रांति होऊं लागली तरी क्षणभर हरकत नाहीं; पण पंजाबमध्यें अस्वस्थता होतां कामा नये अशी इंग्लिशांनीं दक्षता बाळगणें साहजिकच आहे. पंजाबांत दंगा माजला आणि सरहद्दीवरचे पठाण लोक त्यांत सामील झाले, तर पठाण लोक, अफगाण लोक, रशियन लोक, वगैरे एकामागून एक जी परंपरा लागली आहे तिचे या विस्खलित झालेल्या परिस्थितीवर पडणारे आघात असह्य होतील, अशी भीति इंग्लिशांना वाटली तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं. परंतु त्यांना अशी भीति वाटली म्हणून, त्यांनीं निरपराधी माणसांना अटकेंत ठेवलेंच पाहिजे, असें सिद्ध होत नाहीं. आणि ठेवावयाचें असेल तर त्यासाठीं खोटेंच कारण पुढें करावयाला पाहिजे असें नाहीं. बंडाची खोटी सबब न सांगतां त्यांनीं लाला

लजपतराय यांना पकडलें असतें म्हणून लोकांनीं काय केलें असतें ? आतांच्या-प्रमाणेंच लोक अगदीं स्वस्थ बसले असते. पण ज्या अर्थीं इंग्लिशांनीं एकदां बंडाची सबब पुढें आणली आहे, त्या अर्थीं बंड कोठें आहे तें तरी त्यांनीं दाखविलें पाहिजे, किंवा लाला लजपतराय यांस तरी सोडून दिलें पाहिजे. पंजाबांत बंड नव्हते व आतांही होत नाहीं हें एक महिन्याच्या अवधीनें निश्चित झालेलें आहे. तेव्हां लाला लजपतराय यांना सोडून देण्याशिवाय आतां सरकारला दुसरें गत्यंतरच राहिलें नाहीं. आतां त्यांना सोडल्यास लोक आनंद प्रदर्शक सभा भरवतील अशी एक भीति आहे. पण त्यांना पकडलें तेव्हां कोणीही दुःखप्रदर्शक सभा भरवूं नयेत, हा जसा हुकूम सोडण्यांत आला होता तसा लाला लजपतराय यांना सोडल्यानंतर कांहीं मुदतीपर्यंत कोणीही आनंद-प्रदर्शक सभा भरवूं नयेत, असा हुकूम सोडला म्हणजे झालें !

---

## मोठेपणाचा वीट ! : : ९

स्वतंत्र. काळ : ता. ६-९-१९०७

या जगांतील बहुतेक गोष्टी अशा आहेत कीं, कांहीं काळपर्यंतच्या उप-भोगानंतर त्यांचा वीट येतो. एकदां अशी वेळ असते कीं, अमुक अमुक वस्तु आपल्याला केव्हां मिळेल असें होऊन जातें. परंतु कांहीं काळाच्या अनुभवानें मनाच्या वासनेची शांतता झाल्यानंतर आतां आपण यांतून कसे सुटूं अशा-बद्दलची विवंचना मनुष्याचें मनाला लागते. या मृत्युलोकांतील उपभोग्य वस्तु देवानें अशा चमत्कारिक करून ठेविल्या आहेत कीं, उपभोगानें त्यांचा वीट येतोच. साखर पुष्कळ खाल्ली म्हणजे साखरेचा वीट येतो, किंवा कांहीं तींच तींच पक्वान्नें पुष्कळ वेळां खाल्लीं म्हणजे त्यांचा वीट येतो, हे सामान्य अनुभव पुष्कळांना आहेत. परंतु मोठेपणा, नांवलौकिक, राज्यसुख, सागरान्त पृथ्वी आणि गजान्तलक्ष्मी यांची प्राप्ति, या गोष्टी अशा आहेत कीं, त्या फारच

थोड्या लोकांच्या आटोक्यांत असल्यामुळें पुष्कळांना त्याबद्दल कांहींच कल्पना नसते ! परंतु उपभोगानें याही गोष्टींचा वीट येतो. असल्या मोठ्या उदात्त कल्पनांचाही वीट आल्याचीं उदाहरणें मोठ्या लोकांच्या चरित्रांतून आढळावयाचीं. मोत्यांचे शिंपले झाले तरी जेथें मोतीं पिकत असतील तेथेंच ते सांपडावयाचे. दाण्याच्या राशींत त्यांचा अवगम कोठून होणार ? परंतु असे प्रसंग जेव्हां आमच्या दृष्टोत्पत्तीस येतात, जेव्हां मोठेपणाच्या शिखरावरील माणसांना त्यांच्या मोठेपणाचा कंटाळा आलेला आपण पाहतों, तेव्हां आपलें अंतःकरण सद्गदित होतें, गात्रें शिथिल पडतात, चित्त उद्विग्नता धारण करतें, आणि नेत्रप्रांतामध्यें ईषदश्रुबिंदु प्रादुर्भूत होतात ! महत्त्वाकांक्षेच्या हिमालय पर्वतावर अर्वाचीन इतिहासामध्यें नेपोलियन बोनापार्टइतका उंच कोणीही चढला नसेल. त्याच्या चरित्रांतील एक प्रसिद्ध प्रसंग मोठेपणाच्या कंटाळ्याच्या दृष्टीनें अतिशय हृदयद्रावक आहे. रशियामध्यें फरेंच सैन्य घेऊन नेपोलियन लढत असतां त्याच्या यशश्चंद्राच्या वद्य पक्षाला थोडी थोडी सुरुवात झाली होती. मोठेपणाच्या महापर्वतावरून तो हळूहळू खालीं उतरूं लागला होता. आणि असें हें होणारच ! एकट्या मनुष्याचा उत्साह आणखी किती दिवस टिकणार ? दहा बारा वर्षें त्या एकट्या प्राण्यानें जितक्या लढाया मारल्या असतील आणि जितकीं राज्यें उलथीं-पालथीं केलीं असतील, त्याच्या निम्मेनेंसुद्धां महत्कृत्यें या रेम्याडोक्या आत्मश्लाघी इंग्लिशांच्या हातून सबंध दोन-शतकांच्या विस्तीर्ण अवधीमध्येंही झालीं नसतील. इतक्या पराक्रमानंतर पराक्रम करण्याचाही क्षणभर कंटाळा आला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, मनुष्य म्हणजे कांहीं अखंड शक्तीचा परमेश्वर नव्हे. रशियावरील मोहिमेंत एके वेळीं एका टेकडीवर रात्रीचा छापा घालण्याचा प्रसंग आला होता. ज्या फरेंच टोळीला त्या टेकडीवरील माणसें कापून काढून ती हस्तगत करून घेण्याचा हुकूम होता, तिनें आपली कामगिरी चोख बजावली. या टोळीबरोबर त्या प्रसंगीं नेपोलियनही होताच. टेकडीवर रशियन शिपाई झोंपीं गेलेले होते, त्यांच्यावर अचानक छापा घालण्यांत आला, व ते सगळे झोंपेंत असतां कापले गेले. पण फरेंच लष्करांतील एका शिपायाला हें कृत्य आवडलें नाहीं. झोंपेंत एखाद्याला कापून काढणें हें शिपायाचें काम नसून खून करणाराचें कृत्य होय असें त्याला वाटलें व शिपाई आणि खून करणारा मनुष्य यांच्यामध्यें कांहीं फरक नाहीं, अशी

त्याची खात्री होऊन त्याला आपल्या धंद्याचा अगदीं वीट आला. ती ऐन रात्रीची वेळ होती. काळोख मिट्ट पडला होता. बारीक बारीक पाऊसही पडतच होता आणि जिकडे तिकडे चिखल झाला होता. अशा स्थितींत सदर शिपाई एका झाडावर थकून बसला असतां त्याच्या तोंडून असे उद्‌गार निघाले कीं, "मला आतां या लढाईच्या कामाचा वीट आला!" "मलाही पण तसाच वीट आला आहे!" जवळच काळोखांतून दुसरा एक आवाज निघाला; हा दुसरा आवाज त्या पहिल्या शिपायाला ओळखीचासा वाटला. पण तें कोण हें त्याला नक्की कळेना. म्हणून त्यानें जरा जास्त प्रयत्नानें निरखून पाहिलें तेव्हां त्याच्या सगळें लक्षांत आलें. त्या झाडाजवळ एकटाच कोणी एक मनुष्य उभा होता. त्याची मुद्रा खिन्न झालेली होती. घोडा वगैरे कांही एक त्याच्याजवळ नव्हतें. त्याचे पाय चिखलानें लडबडलेले होते. अंगांतील कपडे फाटून गेलेले होते आणि त्याच्या डोकीवरील टोपीच्या कांठावरून पावसाचें पाणी खालीं टिपकत होतें. अशा स्थितींत तो मनुष्य होता. त्याला त्या शिपायानें ओळखलें. बादशाही वैभवाचा एक लेशही त्या वेळीं त्याच्याजवळ नव्हता. इतर दहा शिपायांप्रमाणेंच नेपोलियन हा त्या वेळीं एक अकरावा शिपाई अशा स्थितींत होता. "तुला बढती मिळत नाहीं म्हणून का तूं या लढाईच्या धंद्याला कंटाळला आहेस?" असें नेपोलियननें त्याला विचारलें. "नाहीं, मला बढतीही नको!" असें त्या शिपायानें उत्तर दिलें. हें संभाषण चाललें आहे इतक्यांत आपल्या कांहीं शिपायांवर फ्रेंच लोकांनीं छापा घातला, ही बातमी शेजारच्या टेकड्यांवरील रशियन ऑफिसरांना कळून त्या ठिकाणावरून या फ्रेंच सैन्यावर तोफांचा मारा सुरू झाला आणि त्यांपैकीं तोफेचा एक गोळा नेपोलियनच्या पुढें अगदीं जवळ येऊन पडला. तो गोळा येऊन पडल्यामुळें जवळच जी पलटण होती ती घाबरून आणि दचकून मागें सरली. परंतु नेपोलियन मात्र त्या गोळ्याजवळ मुद्दाम गेला. तो गोळा आगीनें लालभडक झालेला होता व त्यांतून धूर बाहेर पडत होता. नेपोलियन अतिशय उत्सुकतेनें जवळ उभा राहिला! कांहीं वेळ जिकडे तिकडे अगदीं शांतता होती. आणि मग थोड्याच अवकाशांत तो गोळा फुटला. नेपोलियन मोठ्या आशेनें उभा होता! पण त्या गोळ्यानें कोणालाही कांहीं दुखापत झाली नाहीं. दुर्दैवी नेपोलियन! त्या गोळ्यानें त्याचा अंत झाला असता तर कांहीं वाईट नव्हतें. दुर्दैवाचा राहू त्याला हळूहळू

ग्रासूं लागला होता. त्याचें सैन्य लढाईला अगदीं कटाळलें होतें आणि त्याचे शिपाई एकेक गळत चालले होते. अशा स्थितींत पुढील दुःखें सहन करण्याकरितां जिवंत राहण्यापेक्षां त्या गोळ्यानें नेपोलियनचें शरीर हवेंत उडवून दिलें असतें, तर कांहीं वाईट नव्हतें. हेलिना बेटांतील तुरुंगापेक्षां व्हीम्सजवळील त्या टेकडीवरचें मोकळें वातावरण त्या स्वतंत्रताप्रिय प्राण्याला खात्रीनें जास्त हितावह झालें असतें ! लढायांचा, मोठेपणाचा आणि राज्यकारभाराचा नेपोलियनला अगदीं वीट आला होता व हा गोळा तरी मला या यातनेंतून सोडवील काय, असें म्हणून मोठ्या आशेनें त्या गोळ्याजवळ जाऊन नेपोलियन उभा राहिला होता, त्या वेळची त्याच्या मनाची स्थिति काय असेल ! पण नाहीं ! दैव अनुकूल नसेल तर मरणसुद्धां यावयाचें नाहीं ! युरोप खंडांतील दहा पांच रेमेडोके एकत्र जमून आणि इंग्लिश लोक हे त्यांतील दुढ्ढाचार्य बनून त्यांनीं त्या एकट्या वाघाला कोंडलें, हें शतकृत्य केल्याचा क्षुद्र लौकिक वेलिंग्टनसाहेबांना मिळावयाचा होता, म्हणून त्या गोळ्यानें नेपोलियनला मारिलें नाहीं काय ? पण असें असेल तर देवाच्या घरीं हा केवढा अंधेर ! असो, नेपोलियनला त्याचा मोठेपणा जड झाला होता. जीव द्यावा आणि या मोठेपणांतून आपली सुटका करून घ्यावी, इतका नेपोलियनला आपल्या मोठेपणाचा वीट आला होता. पण परमेश्वर त्याला त्यांतून सोडवीना. अशा प्रसंगीं काय करावयाचें ? त्या जड झालेल्या मोठेपणांत कष्टानें दिवस काढले पाहिजेत ! नेपोलियनसारखे महात्मे जेव्हां आपल्या मोठेपणाला कंटाळतात, तेव्हां पाडाव करण्याची मशकादिकांला संधि मिळते, व त्यांनीं चघळून चघळून टाकून दिलेल्या उच्छिष्टावर या जगांतील दरिद्री प्राणी पुष्ट होण्याची धडपड करतात, असें हें जग विचित्र आहे ! या जगांत सर्व गोष्टींचा मनुष्याला वीट येतो. ज्याचा वीट येत नाहीं अशी फक्त एकच गोष्ट आहे आणि ती परमेश्वराचें ध्यान ही होय !

---

## जोसेफ मॅझिनी यांचें आत्मचरित्र व राजकारण : १०

काळ : अग्रलेख, ता. १२-७-१९०७

● काळकर्त्यांच्या मनाजोगा विषय—त्यांच्या शिष्यानें लिहिलेला ग्रंथ! मॅझिनीच्या द्वारें दोघांनींही स्वातंत्र्याच्या लढाईचा हरहर महादेव दुमदुमविला.

या नांवाचें एक पुस्तक दे. विनायक दामोदर सावरकर, बी. ए., यांनीं नुकतेंच लिहून प्रसिद्ध केलें आहे. दे. सावरकर यांची माहिती महाराष्ट्र-वाचकांना पूर्वींच झालेली आहे. त्यांची नैसर्गिक तरतरी, त्यांची उज्ज्वल स्वदेशभक्ति, त्यांचे मुद्देसूद लेख, आणि त्यांची वक्तृत्वपूर्ण भाषणशैली यांच्या योगानें ते महाराष्ट्रांतील पुष्कळ लोकांच्या पूर्वींपासूनच परिचयाचे झालेले आहेत. मुंबईच्या विश्वविद्यालयांतून बी. ए.ची परीक्षा पास झाल्यानंतर ते पुढील कायद्याचा अभ्यास करून बॅरिस्टरची परीक्षा देण्याकरितां अलीकडे एक वर्षदीडवर्ष विलायतेस जाऊन राहिले आहेत. यांच्या अंगचा स्वदेशाभिमान आणि स्वदेशोन्नतीसाठीं योग्य ते प्रयत्न करण्याविषयींचा उल्हास पाहून पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांनीं त्यांना आपल्या फेलोशिप्सपैकीं 'शिवाजी फेलोशिप' दिली. त्यामुळें त्यांच्या विलायतेस जाण्याच्या उद्देशाला विशेष मदत मिळाली. विलायतेंतील शिक्षणाचा आणि प्रत्यक्ष अनुभवाचा त्यांना आज जो फायदा मिळत आहे त्याचें सगळें श्रेय मुख्यत्वेंकरून पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांज-कडेसच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या तरुण इंडियन लोकांच्या मनामध्यें स्वदेशाभिमानाची ज्योति पेटत आहे व ज्ञानसंपादनाची आणि अनुभवार्जनाची लालसा उत्कट होत आहे, त्यांना अशा प्रकारची कांहीं तरी संधि मिळणें अत्यंत अवश्य आहे. आणि अलीकडे सुदैवानें तशा

प्रकारच्या सोई उत्तरोत्तर जास्त वाढत चालल्या आहेत, हें एक सुचिन्हच आहे. दे. सावरकर हे जरी विलायतेस गेले आहेत तरी ते स्वदेशाला, स्वदेशबंधूंना आणि स्वभाषेला क्षणभरही विसरलेले नाहींत, हें त्यांच्या प्रस्तुतच्या कृतीवरून स्पष्ट होत आहे; आणि असेच लोक सदोदित परदेशांत जावयाला पाहिजे आहेत. परदेशांतील भव्य इमारती, प्रचंड कारखाने, आणि अगणित संपत्ति पाहून दिपून न जातां आपला गुलामगिरींत सांपडलेला देश, या देशासारखा कसा होईल, आपल्या देशांतील दारिद्र्यामुळें मोडकळीस आलेलीं लहान लहान घरें या देशांतील भव्य इमारतींप्रमाणें भव्य इमारती केव्हां होतील, आपल्या देशांतील कृपाळु राजांनीं धुळीस मिळविलेल्या उद्योगधंद्यांचे कारखाने या देशांतील प्रचंड कारखान्यांप्रमाणें प्रचंडतेला केव्हां चढतील, आणि आपल्या देशांतील पापभीरु लोकांकडून लुटली गेल्यामुळें नामशेष झालेली संपत्ति या देशांतील अगणित संपत्तीप्रमाणें पुनरपि गणन करण्याला कठिण केव्हां होईल, असा निदिध्यास ज्या अंतःकरणामध्यें चाललेला असेल तींच अंतःकरणें परदेशांत गेलीं तर त्यापासून स्वदेशाचा खरा फायदा आहे. अशा अंतःकरणांना परदेशाच्या स्वतंत्रतेंत आपल्या देशाचें पारतंत्र्य दिसत असतें, दुसऱ्यांचें अवाढव्य लढाऊ सामर्थ्य पाहून आपल्या देशाचा कमकुवतपणा त्यांना झोंबत असतो, आणि परदेशाच्या रात्रीच्या अंधारांत आपल्या भावी उन्नतीच्या आशेच्या प्रकाशानें त्यांना आनंद होत असतो. असलीं अंतःकरणें झाडाच्या मुळांप्रमाणें परदेशांतील स्वातंत्र्यपोषक रस आकर्षून घेऊन त्या योगानें अतितापानें आपल्या देशांतील करपत चाललेल्या झाडाना फिरून पालवी आणतात. परदेशांत गेलेली स्वदेशभक्ति ही कधींही निष्फळ जात नाहीं. ती परदेशांतील ज्ञानसमुद्राचें पाणी आपल्या तेजानें आटवून घेऊन त्याचा वर्षाव मेघजलाप्रमाणें आपल्या तृषित झालेल्या मातृभूमीवर करून संतापापासून तिचें सत्वर विमोचन करते. अशा प्रकारचीं अंतःकरणें हिंदुस्थानाला उत्तरोत्तर जास्त लाभत चाललीं आहेत ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. पुष्कळ लोक विलायतेस जाऊन इंग्रजीमध्यें ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत मोठा पुरुषार्थ मानतात. परंतु दे. सावरकर यांनीं इंग्रजी भाषेच्या जन्मभूमीच्या जागीं जाऊन तेथें आपल्या जन्मभूमीची स्वभाषा जी मराठी त्या भाषेमध्यें ग्रंथ लिहून तो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. यावरून पाश्चिमात्य

राजकारणांचीं तत्त्वें आपल्या देशबंधूंना समजावीं आणि त्यापासून त्यांनीं आपलें योग्य तें राजकीय हित साधून घ्यावें याविषयींची त्यांची इच्छा किती उत्कट आहे, हेंही चांगलें व्यक्त होत आहे. लंडनमध्यें बसून खऱ्या स्वदेशोन्नतीच्या मार्गासंबंधानें मराठीमध्यें लिहिलेला हाच बहुधा पहिला ग्रंथ होय. मनुष्यांच्याप्रमाणें पुस्तकांच्याही शरीरप्रकृतीवर हवेचे परिणाम होत असतात. राजकीय स्वतंत्रतेच्या पुस्तकांना स्वतंत्र देशांतील हवा म्हणजे महाबळेश्वरच होय, आणि हिंदुस्थानांतील हवा म्हणजे केवळ प्लेगदूषित प्रदेश होय हें कोणाला सांगावयाला पाहिजे असें नाहीं. प्रस्तुतचें पुस्तक इंग्लंडच्या स्वतंत्र हवेमध्यें काढलेलें असल्यामुळें त्याच्या अंगांत स्वतंत्रतेचें एक प्रकारचें विलक्षण पाणी खेळत असलें तर त्यांत विशेषसें आश्चर्य आहे असें नाहीं. मॅझिनीसारख्या स्वतंत्रदेवतेच्या निःसीम भक्ताचे स्वदेशाला स्वतंत्र करून सोडणारे स्वातंत्र्यभक्तिप्रचुर लेख, त्यांचें इंग्लंडसारख्या स्वतंत्र हवेमध्यें स्वदेशाभिमानी सावरकर यांनीं केलेलें भाषांतर, आणि तें वाचण्याकरितां उत्सुक झालेले हिंदुस्थानांतील परतंत्र लोक, हा त्रिवेणीसंगम जमल्यानंतर त्याचें पाणी हिंदुस्थानांतील लोकांना सर्व क्लेशांपासून विमुक्त केल्यावांचून कधींही राहणार नाहीं. परतंत्रतेंतील बुभुक्षित लोकांसारखे स्वतंत्र लेखांच्या मेव्याचे भोक्ते दुसरे कोणीही नाहींत. अशी स्थिति असल्यामुळें या पुस्तकाला एक प्रकारचें विशेष महत्त्व आलेलें आहे. आणि या कारणासाठींच आम्ही या पुस्तकांतील कांहीं निवडक वेंचे येथें देण्याचें योजिलें आहे.

'यंग इटली हें काय होतें?' या मथळ्याच्या एका अग्रलेखाखालीं आम्हीं कांहीं वर्षांपूर्वीं एक लेख लिहिला आहे; तो मॅझिनीच्या चरित्रांतील अनेक भागांपैकीं फक्त एक भाग असल्यामुळें, त्यांतील दुसरे जे कित्येक रमणीय प्रसंग आहेत त्यांचा उल्लेख करणें जरूरीचें आहे. जोसेफ मॅझिनी जेव्हां जन्मास आला, त्या वेळीं त्याची जन्मभूमि जो इटली देश तो गुलामगिरीच्या नरककुंडाच्या अगदीं तळाशीं जाऊन पोहोंचला होता. इटलींतील लोक आपसांत एकमेकांबद्दल अविश्वासी झालेले होते. इटलींतील लहान लहान संस्थानें एकमेकांपासून विस्खलित झालेलीं होतीं, आणि त्यांच्या आपापसांत लढाया चाललेल्या होत्या. इटलीच्या मानेवर ऑस्ट्रियाचे राजे आपल्या जुलमाचें जोखड ठेवून तेथील लोकांच्या छातीवर उन्मत्तपणानें नाचत होते. आणि

तरीही इटालियन लोक आपल्यावर जुलूम करणाऱ्या ऑस्ट्रियन राजांच्या पलटणींत नोकऱ्या धरीतच असत, आणि इटलींतील संस्थानिकही ऑस्ट्रियन बादशहाची मर्जी संपादन करून घेण्यांत कृतकृत्यता मानीतच असत. हिंदुस्थानांत जशीं लहान लहान नेटिव्ह संस्थानें आहेत, तशींच त्या वेळीं इटलीमध्यें होतीं ; परंतु त्या अनेक इटालियन संस्थानांपैकीं आपण सर्वांनीं मिळून आपलें एक राष्ट्र बनवावें अशी कल्पना एकाच्याही मनाला शिवली नाहीं. कवि गुलामगिरीची तारीफ करणारे, वर्तमानपत्रकर्ते ऑस्ट्रियन बादशहाचे इमानें-इतबारें स्तुतिपाठक, आणि लोक अज्ञानी व हताश, अशी इटलीची स्थिति झालेली होती. राजकीय हेतूसाठीं कांहीं गुप्त मंडळ्या अस्तित्वांत आलेल्या होत्या; पण त्यांच्यांतदेखील दक्षतेपेक्षां भ्रष्टताच जास्त शिरलेली होती. अशा स्थितींत मॅझिनी यानें आपल्या देशांतील लोकांच्या मनांत स्वतंत्रतेचें प्रेम उत्पन्न करणारे अनेक लेख लिहिण्याला सुरुवात केली. हे मॅझिनीचे लेख म्हणजे स्वतंत्रतेच्या अमृताचे झरे आहेत. स्वतंत्रतादेवीचीं मंदिरें आहेत. स्वातंत्र्यलक्ष्मीचीं तीं पावन स्तोत्रें आहेत. स्वातंत्र्याचा अंगांत संचार करून देणारे हे जागरूक असे महामंत्रच आहेत. हीं मॅझिनीचीं वाक्यें म्हणजे स्वतंत्रतेचा एक मूर्तिमंत वेदच होय. या वेदांतील स्वतंत्रतेच्या सुंदर ऋचांचा मंत्रद्रष्टा ऋषि जोसेफ मॅझिनी आहे. या स्वतन्त्रतेच्या वेदमंत्रामध्यें विलक्षण सामर्थ्य आहे. या मंत्राचें पुरश्चरण करून जर कोणी जुलुमाच्या सापावर याचा प्रयोग चालवील तर त्या सापाचें विष यानें ताबडतोब उतरेल आणि परतंत्रतेच्या विंचवाच्या वेदना जर कोठें अगदीं मस्तकापर्यंत जाऊन भिडल्या असतील, तर हा मंत्र जपून पाणी टाकलें असतां तें विष उतरेल, इतकेंच नव्हे, तर दंशाचे जाग्यावरसुध्दां फणफण राहणार नाहीं. असे जे मॅझिनीचे विलक्षण योगसामर्थ्याचे मंत्र त्यांपैकीं कांहीं वाचकांच्या माहितीकरितां पुढें देण्यांत येत आहेत.

मॅझिनीनें चार्ल्स अल्बर्ट याला जें पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें म्हणतो कीं, "जुलमानें व जबरदस्तीनें दाबण्याचा प्रयत्न कोणी करीत असेल तर त्यांनीं पक्कें समजावें कीं, रक्ताची तृषा रक्तानेंच शांत होते. परक्यांचा तिरस्कार आतां सर्व लोकांना आलेला आहे. या ऑस्ट्रियाच्या गुलामगिरीचा तिटकारा आलेला आहे. या ऑस्ट्रियाचा द्वेष इटलीचें अंतःकरणांत धगधगलेला आहे.

आतां एकट्यादुकट्या हक्कांनीं किंवा यःकश्चित् सवलतींनीं लोक शांत होणारे नाहींत. पिढ्यानुपिढ्या हिसकावून नेलेले आमचे नैसर्गिक हक्क व आमचें मनुष्यत्व आतां आम्हांस परत पाहिजे आहे. आम्हांला व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे आहे. आम्हांला स्वतःचे कायदे पाहिजे आहेत. एकराष्ट्रीयत्व पाहिजे आहे. स्वराज्य पाहिजे आहे. आम्हांला आतां पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. फूट पाडलेले, छिन्नभिन्न झालेले, जुलुमाच्या पायांखालीं तुडविलेले, त्यांना नांव नाहीं, त्यांना देश नाहीं ! असें म्हणून आमच्या तोंडावर 'तुम्ही गुलामांचें राष्ट्र' म्हणून परके लोक थुंकत आहेत. स्वतंत्र देशांतील लोक आमच्या देशांतून प्रवास करून गेल्यानंतर तेथें सर्व मढीं भरलेलीं आहेत म्हणून सांगतांना आम्ही ऐकत आहोंत. गुलामगिरीचा पेला तळच्या खळमळासुद्धां आम्हीं पिऊन टाकला आहे. परंतु तो पुन्हा न भरण्याची मात्र आम्हीं आतां शपथ घेतली आहे. अशा वेळेला आपण जर पुढाकार घ्याल तर त्या पीडमांट संस्थानच्या यःकश्चित् मुकुटाहून अत्यंत श्रेष्ठ अशा मुकुटानें आपलें मस्तक शोभूं लागेल. परंतु जर आपण यावरही आम्हांस मिळणार नाहीं, तर त्याच्या योगानें स्वातंत्र्यप्राप्तीचें पवित्र कर्तव्य पार पाडण्यास थोडासा उशीर लागेल, इतकेंच काय तें. परंतु खुद्द जगच्चालकानें इटली देशाच्या भाग्यावर लिहून ठेवलेली स्वातंत्र्यपत्रिका अजिबात पुसून टाकण्यास कोण समर्थ आहे ?"

मॅझिनीनें स्वदेशाला स्वतंत्र करण्यासाठीं अनेक प्रयत्न केले. तो दुसऱ्यांच्या गुप्त मंडळ्यांतून सभासद झाला. आणि त्यानें दुसऱ्यांच्या वर्तमानपत्रांतून आपले स्वातंत्र्यप्राप्तिकर लेख लिहिले. परंतु त्यांत त्याला यावें तसें यश आलें नाहीं. तेव्हां त्यानें 'यंग इटली' या नांवाची आपली स्वतःची एक गुप्त मंडळी काढली; आणि त्या नांवाखालीं त्यानें आपलें स्वतंत्र लेख लिहिण्याला ही सुरुवात केली. इटलीमध्यें जे राजे आपसांत लढत होते, त्यांनीं आपल्या देशाच्या स्वतंत्रतेला मदत करावी, म्हणून त्यानें त्यांचीही मदत मागितली व वर दिलेलें पत्र हें तशाच एका प्रसंगांतील आहे. फरान्समधील एका वर्तमानपत्रामध्यें मॅझिनीनें त्या वेळच्या जुलुमी राजांना जी इशारत दिली आहे, तीही वरील पत्राप्रमाणेंच फार उग्र, परंतु विचार करण्यासारखी आहे. मॅझिनीचें पत्र वंद पडून त्याला हद्दपारीची शिक्षा झाली त्या वेळीं तो जुलमी राजांना उद्देशून म्हणतो—"चालूं द्या! मदांध राजांनो, चालूं द्या! तुम्हीं आमच्यापासून

स्वतंत्रता, स्वदेश, आमचें प्रत्यक्ष अस्तित्व हिसकावून घेतलेलीं आहेत, आतां आमची वाक्स्वतंत्रता हिसकावून न्या. मार्सेलिस हें शहर माझ्या इटलीच्या लगत्यास आहे व तेथें इटलीमधून हद्दपार झाल्यावर नंतर आम्ही येऊन राहिलों. कारण, तेथें इटलीला स्पर्श करून धन्य झालेला वारा तरी आम्हांस स्पर्श करीत असे. आतां आमच्या श्वासोच्छ्वासाकरितां इटलीमधून पूत होऊन येणारा तो प्रिय वाराही आमच्यापासून हिसकावून न्या. मार्सेलिसच्या किनाऱ्यावर उभे राहून जेथें समुद्र व आकाश मिळून जाऊन आमच्या मातृभूमीला लपवूं पाहत होते तिकडे आम्हीं बोट करावें व दृष्टीला शक्य तितकी पुढें ढकलून स्वतःशीं म्हणावें, 'तेथें प्रिय इटली आहे!' आतां समुद्राकडे बोट दाखवून तसें म्हणण्याचाही हक्क आमचेपासून हिसकावून घ्या. एका नीच कृत्यापासून दुसऱ्या नीच कृत्याकडे चालत रहा. अपमानाच्या व नीचपणाच्या रस्त्यानें असेच चालत जा. म्हणजे तुमचें थडगें तुम्हांला सांपडेल. हेंच आमच्या मुक्ततेचें खरें साधन आहे कीं, आजपर्यंत अननुभूत अशा जुलमाच्या व दुष्टपणाच्या काळ्याकुट्ट रंगानें आपलें तोंड फांसून तुम्हीं जगापुढें प्रवेश करावा. पण जेव्हां घडा पूर्ण भरेल, जेव्हां लोकपक्षाची ती रणघंटा घणघणूं लागेल, तेव्हां तुमचें कसें होणार? तेव्हां हे मदांध राजांनो, तुमच्या दुर्दशेला पारावर नाहीं!" या लेखांत दर्शविल्याप्रमाणें मॅझिनीवर जरी अनेक संकटें येत होतीं तरी आपल्या देशाला स्वतंत्र करून सोडण्याचें व्रत त्यानें चालूच ठेवलें होतें. इटलींतील लोक असंतुष्ट झालेले होते; व ऑस्ट्रियाच्या साम्राज्याला कोठें तरी भोंक पाडावें या हेतूनें एकदां सार्डीनियन संस्थानांतून बंडाला सुरुवात करण्याचें ठरलें. त्या वेळीं तेथील सैन्य फितविण्यासंबंधानें मॅझिनीनें फारच प्रयत्न केले. "परंतु सैन्यांतील वरचे अधिकारी बंडांत सामील होईनात. मात्र दुसऱ्या वर्गाच्या लष्करी अधिकारी लोकांना इटलीच्या स्वातंत्र्याची कल्पना रुचून ते मदत करण्याला तयार झाले. इटलीमध्यें असलेल्या बहुतेक रेजिमेंटमध्यें दळणवळण सुरू करण्यांत व त्या परस्परांमध्यें एकदिल करण्यांत पूर्ण यश आलें. जीं आम्हीं बंडाचीं मुख्य ठिकाणें करणार होतों तेथील शस्त्रागारांत प्रवेश करण्याचा आम्हीं आटोकाट प्रयत्न केला व अखेरीस त्या शस्त्रागारांवरील तोफखान्यांचे अधिकाऱ्यांत आमचा पूर्ण शिरकाव झाला. सैन्य वळविण्यांत आम्हीं वरच्या अधिकाऱ्यांची फारशी पर्वा केली नाहीं

कारण शिपाई लोक हे त्यांच्या तुकडीवरच्या अधिकाऱ्यांच्याच पूर्ण ताब्यांत असतात. त्यांना श्रेष्ठ सेनापतीची ओळखही नसते. तेव्हां मुख्य अधिकाऱ्यांपेक्षां दुय्यम प्रतीच्या अधिकाऱ्यांचाच सैन्याशीं प्रत्यक्ष संबंध असल्यानें शिपाई आपल्या पक्षाकडे वळविण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे त्यांच्यावरील दुय्यम अधिकारी यांना दीक्षा देणें हें होय. नंतर दुय्यम प्रतीचे अधिकारी व शिपाई वळविले कीं, सैन्य पूर्णपणें क्रांतिपक्षाला मिळणें किंवा न मिळणें हें सर्वस्वीं लोकांच्या उठावणीच्या जोरावर अवलंबून राहतें व जर लोकांनीं कांहीं वेळ चांगला नेट धरला तर सर्व सैन्य बंड करावयास चुकत नाहीं." या लेखांत सांगितलेल्या तत्त्वाप्रमाणें मॅझिनीच्या लोकांनीं जरी सैन्य वळवून ठेविलें होतें, तरी त्या लोकांच्या बंडाचा बेत दुसऱ्या कांहीं एका कारणानें बिघडून गेला.

इतर देशांतल्याप्रमाणें इटलीमध्येंही चालत्या गाड्याला खीळ घालणारा एक पक्ष होता. त्या पक्षाच्या मतांना अनुलक्षून मॅझिनीनें जें एक पत्र लिहिलें आहे तें फार विचार करण्यासारखें आहे. तो लिहितो :—"राजकीय स्वातंत्र्य संपादणें इटलीस अशक्य आहे ? ज्या इटलींतील लोकांच्याजवळ आल्प्स पर्वत, ॲपिनाइन्स पर्वत आहेत, ज्यांचें संरक्षण करण्यास दोन्ही बाजूंनीं समुद्र सज्ज आहे, ज्यांना पूर्व पराक्रमांनीं भरलेलीं तीन हजार वर्षें उल्हसित करण्याला उभीं राहिलेलीं आहेत, त्या दोन कोटि साठ लक्ष लोकांच्या राष्ट्राला आपण भागूबाईसारखे नामर्द ठरवीत आहां काय ? इटलीमध्यें सामर्थ्याची कमतरता नाहीं. इटलीमध्यें जें नाहीं तें आत्मावलंबन नाहीं. इटलींत निष्ठा नाहीं. परमेश्वर गांजलेल्यांचा कैवारी आहे यावर इटलीची निष्ठा नाहीं. आपल्या आत्मबलांत व आपल्या तरवारींत तिची निष्ठा नाहीं. एक कर्तव्य, एक उद्दिष्ट, एक दुःख, एक आशा यांनीं प्रेरित केलेल्या उठावणींत एक जरी जय आला तरी त्या एका जयाच्या उत्तोलन दंडानें सर्व देश वर उठवितां येईल, यांत इटलीची निष्ठा नाहीं. परंतु ही निष्ठा आतां प्रादर्भूत होऊं लागली आहे. त्या निष्ठेचा प्रादुर्भाव सुशिक्षित तरुणांत गोचर होत आहे. मागच्या अपजयांवर जाऊं नका. तीं बंडें सर्व राष्ट्राचीं नव्हतीं. इतके दिवस इटलीचे शत्रु व मित्र तिला असेंच सांगत आले, कीं तुझे स्वतःचे पुत्र तुझें संरक्षण करण्याला असमर्थ आहेत. कोणीही अशी गर्जना केली नाहीं कीं, ऊठ ऊठ ! हे इटली देशा, स्वसामर्थ्यैनिष्ठेनें ऊठ ! तुझा सर्व भार त्या परमेश्वरावर व तुझ्या शूर पुत्रांवर आहे ! भिक्षा मागून

स्वातंत्र्य ? अणि तें कसें मिळणार ? व तें मिळालें—शशशृंग लाभलें—तरी त्याची शाश्वती कशी धरावयाची ? तें कांहीं नाहीं. एक धाडसाचें कृत्य तडीस गेलें कीं दुसरें करण्याचें अवसान चढतें. जेव्हां माझ्या इटलीच्य पुनरुज्जीवनाची कल्पना माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते तेव्हां माझा आनंद ब्रह्मांडांत मावेनासा होतो ! इटली ! स्वतंत्र इटली ! त्या स्वतंत्र इटलींत माझी व्यक्ति लीन झाली आहे ! आपल्यापैकीं प्रत्येकानें मी स्वतंत्र होणारच, असें म्हणण्याचा अवकाश ! वर्तमानकाळ गुलामगिराचा आहे, परंतु भविष्यकाळ स्वातंत्र्याचा येणार नाहीं काय ?"

मॅझिनीनें एके प्रसंगीं आपल्या देशबंधूंना स्वदेशप्रीतीसंबंधानें जो पुढीलप्रमाणें उपदेश केला आहे, तो फार निर्मळ आणि प्रेमळ आहे. तो म्हणाला, "तरुणहो, स्वदेशभूमीवर प्रेम करा. जेथें तुमचे पूर्वज स्वर्गीय निद्रा घेत आहेत ती भूमि म्हणजे तुमची स्वदेशभूमि होय. ज्या भाषेमध्यें तुमच्या प्रेमाची मूर्ति तुमच्याशीं पहिले प्रेम-शब्द उच्चारती झाली, ती भाषा जेथें वदली जाते ती तुमची स्वदेशभूमि होय. स्वदेश हें परमेश्वरानें तुम्हांला दिलेलें गृह होय. या गृहामध्यें वाढून तुम्ही त्याचें स्वरूपाला पोहोंचावें असा त्याचा हेतु आहे. स्वदेश हा तुमचा अभिमान, हें तुमचें वैभव, हे तुमचें चिन्ह ! त्या स्वदेशाला तुमचे विचार, तुमचे उपदेश, तुमचें रक्त अर्पण करा. युरोपच्या इतर राष्ट्रांनीं ज्याचा हेवा करावा, असा वैभवशाली भूतकाल तुमच्या मागें उभा आहे व आशेनें फुललेला भविष्यकाळ तुमच्या पुढें उभा आहे. ईश्वराच्या अंगुलीनें तुमच्या राष्ट्राच्या मर्यादा आंखल्या आहेत. परमेश्वरानें आल्प्सचा व समुद्राचा तुमच्याभोंवतीं पहारा ठेवला आहे. या राष्ट्रांत भीमबलवान् लोक निपजावेत असा त्याचा हेतु आहे. म्हणून ज्या आकाशाला गुलामगिरीचा डाग पडला आहे, त्या आकाशाखालीं राहण्यास तुमच्या अडीच कोटि लोकांतील एकही मनुष्य तयार नसला पाहिजे. एतदर्थ तुमचें राष्ट्र स्वतंत्र करा व रोम हें त्या स्वातंत्र्याचें मंदिर होऊं द्या !"

स्वातंत्र्याची लढाई बरीच निकरावर येऊन विजयाच्या जवळ जवळ पोहोंचत चालली होती, अशा एके वेळीं रोममध्यें मॅझिनीनें जो एक जाहीरनामा काढला त्यांत तो म्हणतो कीं :– "लोकसत्तेचे जानपदहो, आस्ट्रिया नजीक येत आहे. आठ दिवसपर्यंत स्वार्थत्यागाची व वीररसाची कमाल

करून बर्लीन शहर पडलें, त्या शहराची शेवटची आरोळी 'सूड' ही आहे. प्रत्येक इटॅलियन अंतःकरणानें त्या पवित्र आरोळीची पूर्तता करावी, प्रत्येक शहर व प्रत्येक गांव तो सूड उगविण्यासाठीं उठलें पाहिजे. प्रत्येक देवळांत शत्रूच्या निधनाची घंटा वाजली पाहिजे. तुमच्या पर्वतांतून या दरीपासून त्या दरीपर्यंत पवित्र क्रोधाची गर्जना झाली पाहिजे. प्रत्येक शिखरावर गुलामगिरीच्या मढयास जाळण्यासाठीं वैश्वानराच्या ज्वाळा भडकल्या पाहिजेत. स्वातंत्र्याचे रक्तध्वज शहरावरून फडकत राहिले पाहिजेत; व लढाईचा 'हर हर महादेव' स्वदेशामध्यें दुमदुमला पाहिजे. ईश्वर स्वातंत्र्याच्या बाजूला आहे, व तुम्ही एका शपथेवर बांधलेले स्वदेशाच्या पवित्र कार्यी देह ठेवण्यास सज्ज झालेले तीन कोटि लोक आहां. तीन कोटि लोक जे करूं म्हणतील तें करण्यास समर्थ आहेत. इटलीच्या पुत्रांना आजचा क्षण इतिहासांतील त्या पवित्र क्षणांपैकीं आहे, कीं ज्या क्षणीं राष्ट्राच्या जीवनाचा किंवा मरणाचा एकदम निकाल लागतो! तर मग तुम्ही जिवंत राहणार किंवा मरणार ? सामर्थ्यानें वैभवयुक्त होणार, कीं अखंड गुलामगिरीचा शिक्का कपाळावर ठोकून घेणार ? स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगाला मान्य होणार, कीं प्रेतांचे ढिगारे पडलेली स्मशानभूमि म्हणवून घेणार ? आपल्या देवालयांचे आणि यज्ञवेदींचे स्वतंत्र मालक होणार, कीं जुलमी राजांच्या गोठयांतील गुरें बनणार ? परमेश्वर तुमच्या पसंतीप्रमाणें तुमची किंमत ठरवील. म्हणून उठा व जय संपादा. ग्रीस उठलें व त्याला जय मिळाला. स्पेन उठलें त्याला सुयश मिळालें. स्वित्सर्लंड उठलें व त्याला स्वातंत्र्य मिळालें. मग इटलीलाच स्वातंत्र्य कां मिळणार नाहीं ? आपण का मनुष्य नाहीं ? इटलीचा जयजयकार होवो !"

अशा रीतीनें अनेक शब्दांनीं उत्तेजित करून जोसेफ मॅझिनी यानें अखेरीस आपल्या देशबांधवांच्या गळयांत विजयीश्रीकडून आणि स्वातंत्र्यलक्ष्मीकडून माळ घालविली. मॅझिनीच्या शब्दांत स्वर्गलोकाच्या मेघगर्जनेची आणि विद्युल्लतेची शक्ति सांठविलेली होती. त्या शक्तीनें इटॅलियन लोकांच्या अंतःकरणामध्यें वादळ उत्पन्न केलें आणि त्या वादळाच्या सोसाटयांत आस्ट्रियन साम्राज्याचें तारूं खडकावर आपटून त्याच्या चिंधडया झाल्या. असल्या अद्भुत सामर्थ्याचे मॅझिनीचे जे महामंत्र ते दे. सावरकर यांनीं आपल्या महाराष्ट्रदेशभाषेंत आणून त्यांचा सर्व लोकांस परिचय करून दिला याबद्दल त्यांचे जितके

आभार मानांवे तितकें थोडे आहेत. ज्याला वाचतां येते त्यांनीं असलीं पुस्तकें वाचल्याशिवाय कधींही राहूं नये. आणि ज्यांना वाचतां येत नसेल पण कान आहेत त्यांनीं, असलीं पुस्तकें ऐकल्यावांचून कधींही राहूं नये. या भगवद्‌गीतेचें श्रवण, मनन आणि निदिध्यासन आपल्या प्रत्येक भक्ताला जीवनमुक्तच करून सोडील, असें अलौकिक सामर्थ्य यांत आहे !

---

## भारतभू ही माता नव्हे काय ? : : ११

काळ : अग्रलेख, ता. १५-११-१९०७

● राष्ट्रीय चळवळींविरुद्ध मुसलमानांना उठविण्याच्या योजनेला या वेळीं मूर्त स्वरूप येऊं लागलें होतें.

मानवी सुखाचा संबंध बाह्य परिस्थितीवर सर्वस्वीं अवलंबून असतो, असें पुष्कळ वेळां आपल्याला वाटत असतें. पण प्रत्यक्ष अनुभवाची साक्ष त्याच्या अगदीं उलट पटलेली प्रत्यहीं आढळून येते. सार्वभौमपदावर विराजमान होणाऱ्या राजाधिराजांना कांहीं कमी असतें असें नाहीं. पण त्यांचे सर्व दिवस आणि त्यांच्या सर्व रात्री विचारांच्या लहरींत आणि चिंतेच्या जागरणांत कशा निमिषप्राय संपून गेलेल्या आढळून येतात हें इतिहास सर्वांना सांगतच आहे. उलट पक्षीं, एखाद्या गरीब शेतकऱ्याची स्थिति पाहिली, तर त्याला खावयाला अन्न किंवा पांघरावयाला वस्त्रही धडसें असत नाहीं, तरी पण त्याच्या मानसिक सौख्याचें प्रतिबिंब त्याच्या मनसोक्त घोरण्यांत पूर्णपणें उमटलेलें दिसून येतें. जगाच्या या वरील नियमाला आपल्या उदाहरणानें अधिक बळकटी आणण्याकरितांच कीं काय, सोळाशें चाळीसवेचाळीसच्या सुमारास असेंच एक विलक्षण बालक पूर्वी महाराष्ट्रांत निर्माण झालें होतें. चवदा पंधरा वर्षांचें वय तें काय असणार, व त्या अल्पवयांतील सुखदुःखाच्या कल्पनांची मजल तरी कशी कोठपर्यंत दूरवर जाऊन पोंचणार ! पण थोर

लोकांचा मोठेपणा वयासाठीं थांबून बसत नाहीं असें म्हणतात तेंच खरें असलें पाहिजे. जहागीरदाराचा मुलगा, बहुतेक बाल्य वय गर्भश्रीमंतींत घालविलेलें, आणि करील तें होणार आणि मागेल तें मिळणार ! अशा प्रकारची घरची स्थिति ! कुलाचा नांवलौकिक आणि संपत्तीची विपुलता अशा प्रकारच्या क्वचित् एकत्र नांदणाऱ्या सर्व गोष्टींची अनुकूलता असल्यावर त्या सुदैवी बालकाच्या सुखाला काय पारावार असणार आहे ? आणि त्याच्या सद्‌भाग्याबद्दल त्याच परिस्थितींत वाढलेल्या मुलांलेंकरांनीं अथवा थोरामोठयांनींसुद्धां त्याचा हेवा केल्यास त्यांत आश्चर्य तरी काय आहे ? पण अशा अगाध सौख्यसागरांत गटंगळ्या खात असतांना जरी तो इतरांना दिसत होता, तरी त्याला स्वतःला आपण कोरडेच आहों असें वाटत होतें. परोपरीचे खेळ, भरजरीचे पोषाख, चैनीचे डामडौल, वगैरें बाबतींसंबंधानें त्याच्या चाकरमाणसांनीं त्याच्याजवळ बोलणें लाविलें तर त्याला आपले सेवकजन आपल्याला दुःखाच्या दरींत अधिक अधिकच लोटीत आहेत असा भास होई. सुखाचीं सर्व बाह्य साधनें हात जोडून उभीं असतांनाही अंतःकरणांतील एका विशिष्ट विकाराच्या उपाधीमुळें शरीरस्वास्थ्याचें साध्य त्याच्या ठिकाणीं निश्चित झालेलें कधींच आढळून आलें नाहीं. सुखसमृद्धीची सभोंवार जरी दाटी झाली होती, तरी ती त्याच्या अंगीं लागली नाहीं. आईनें मांडीवर घेऊन त्याच्या बाललीला पाहून पाहिजे असल्यास कौतुक करीत करीत स्वतःच्या मनाशींच हंसावें. तो मात्र कधींही स्मितवदन करीत नसे. पहिलेच पुत्ररत्न म्हणून बापाला फार आवड वाटे; पण त्या आवडीची फेड मुलाकडून फार क्वचित् प्रसंगींच केली गेली होती. मुलाचें आठ दहा वर्षांचें वय होतांच त्याच्या वर्तनक्रमांत विलक्षण फरक दिसून येऊं लागला. मुलाची बुद्धि विलक्षण व हौसही दांडगी, आणि बाल्य वय हें अभ्यासक्रमाची दृढता कायम ठेवण्यास अधिक श्रेयस्कर, या सर्व गोष्टी लक्षांत बाळगून बापानें मुलाला शिकविण्यासाठीं एक शिक्षक ठेविला. मुलाची ज्ञानग्रहणशक्ति पदोपदीं दिसून येई. पण त्याचा दृश्य परिणाम कोणच्याच इंद्रियांना गोचर होत नसे. रामायण, भारत इत्यादिक प्राचीन ग्रंथांतील कथाप्रसंग ऐकण्याची उत्सुकता मुलाच्या चेहऱ्यावर प्रथमतः फार दिसून येई. पण ती उत्सुकता त्या पुराणग्रंथांतील गोष्टी सांगून झाल्यानंतर मुखश्रीमध्यें खिन्नतेबरोबर संमिश्रित झालेली पाहून गोष्ट-

सांगणाऱ्या शिक्षकाला मनांत बरेंच वाईट वाटत असे. मुलगा विचारवश फार झाला आहे, अशी सर्वांची ठाम समजूत झाली होती. आणि म्हणूनच स्फुलिंगाप्रमाणें असणाऱ्या विचारांचा अतिरेक होऊं नये म्हणून सर्वांची जारीनें खटपट सुरू होती. पण त्या प्रयत्नांना यशाचीं फळें न आणूं देण्याचा निश्चयच त्या मुलानें केला होता कीं काय कोण जाणे. दिवसाच्या सर्व घटका तो विचार करण्यांत खर्ची घालीत असे, व रात्रीचे कांहीं प्रहर चिंतेंत तर कांहीं स्वप्नांत, कांहीं निराशेंत तर कांहीं जागरणांत, असे बहुतकरून निघून जात असत. प्रातःकालचा मंद आणि शीतल वायु त्याचे सर्व अंगाला झोंबत असे. उदयाचलावर हळूहळू आरूढ होणाऱ्या भगवान् सूर्यनारायणाचे बालकिरण आपल्या हृदयाचा जणुं काय दाहच करण्यासाठीं प्रवृत्त झाले आहेत, असें त्यास वाटे. आणि जसजसा तो सूर्य अधिक वर वर जाऊन नभोमंडलाच्या मध्यभागीं आपल्या साम्राज्याच्या जुल्माचा प्रारंभ करण्यासाठीं पूर्ण प्रकाशित होई, तसतसा याचा विकारज्वर अत्यंत बळावत जाऊन पराकाष्ठेच्या बाह्य उद्रेकाच्या अवस्थेप्रत जाऊन पोहोंचत असे. संध्यासमयाची दशदिशांची आरक्तता त्याच्या नयनांतील रक्तता यत्किंचितही कमी करण्यास असमर्थ होती. किंबहुना, ती तिला अधिकच उत्तेजित करीत असे. हिमालयाच्या गगनगामी शिखरांवरून धांवत येणारे वितळलेल्या बर्फाचे तुषार त्याच्या देहाची तप्तता शांत करूं शकत नसत. रात्रीचें चांदणें त्याच्या मनाला उत्साह न देतां त्याचा उद्वेग अधिकच वृद्धिंगत करीत असे. शिशिरऋतूंतील कितीही कोमल वायूच्या लहरी वाहत असोत, वर्षाऋतु भविष्य काळच्या सुखाच्या स्थितीबद्दल सर्व जगाला कितीही कळकळीनें आश्वासन देत असो, अथवा वसंत सृष्टिनायिकेचें औदार्य वृद्धिंगत करण्यासाठीं आपल्याजवळ असलेल्या साधनवैपुल्याची कितीही कमाल करो, त्याच्या अंतःकरणाच्या दिनचर्येंत काडीमात्र फरक होत नसे. जसा दिवस उगवावा, तसाच तो मावळावा. कधीं चंद्रमा तर कधीं नक्षत्रें, कधीं बारीक बारीक तारे तर कधीं पूर्ण अंधकार, वाटेल त्यानें हवा तसा आणि हवा तेव्हां आपला अंमल क्षितिजावर गाजवावा, ह्याची स्थिति सदासर्वदा निर्विकार! आईजवळ प्रेमानें दोन शब्द बोलूं नये, बापापुढें हांक मारल्याशिवाय जाऊं नये, गुरुजींना आपल्या शंका निःशंकपणें विचारूं नयेत, किंवा नोकरलोकांबरोबर अघळपघळपणें गप्पा

मारूं नये; अशा एक ना दोन, शंभर हजार कुढेपणाच्या खोडी त्याच्या अंगीं दिसूं लागल्या होत्या. चेहऱ्यावर नेहमीं उदासीनता स्पष्टपणें दिसत असे. उल्हासाची आणि त्याची ओळखच नव्हती. त्याला एकान्त फार आवडे. मनाला विचारांची संवय भयंकर लागून राहिली होती. विशेष नवलाची गोष्ट ही कीं, तो जरी असा एकलकोंडा दिसे, तरी त्याच्या मित्रमंडळीचा समूह फार मोठा होता. त्याचे खेळगडी त्याच्यावर पराकष्ठेचें प्रेम करीत असत. चापल्य, धैर्य, दूरदर्शीपणा, महानुभावित्व वगैरे भविष्य कालच्या उन्नतावस्थेची साक्ष देणारे मोठमोठे गुण त्याच्या अंगीं नव्हते असें नाहीं. त्या सर्व गुण-गणांच्या अस्तित्वाबद्दल त्याची स्वतःची पक्की खात्री आणि इतरांचा पूर्ण विश्वासही पण होता. मग तो त्या गुणांचा उपयोग कां करीत नाहीं, हें मात्र सर्वांना गूढ येऊन पडलें होतें. आपल्या अंगीं बीजरूपानें वसत असलेल्या सर्व सद्गुणांचा कांहीं कालपर्यंत विकासच होऊं द्यावयाचा नाहीं, असा त्याच्या मनाचा निश्चय झाला असावा, असें त्याच्या त्या चमत्कारिक वर्तनावरून कोणाही चाणाक्ष मनुष्याला सहज ताडतां आलें असतें. पण हा तर्क बरोबर आहे कीं चुकलेला आहे, हें ठरविण्याला मात्र कांहीं मार्ग उरला नव्हता. तो आतां बराच मोठा झाला होता. त्याचें त्याला स्वतःचें हित आतां कळूं लागलें होतें. अठरावें वर्ष संपून, एकोणिसाव्या वर्षाला नुकतीच सुरुवात झाली होती. कारण काय असेल कोण जाणे, पण अलीकडे पंधरावीस दिवस त्याचा चेहरा बराच प्रफुल्लित झालेला दिसत होता. खिन्नतेच्या जुलमी राजाचा पराभव करून उल्लसिततेनें आपलें साम्राज्य सुरू केल्याचें दिसूं लागलें. मुखकमलावर प्रसन्नतेची छाया थोडीथोडी चमकूं लागली. अशा प्रकारचा अतर्कित बदल झालेला पाहून सर्वांना आनंद वाटला आणि आतां मुलगा निवळूं लागणार असे तर्क-वितर्क त्यांनीं सुरू केले. पण एके दिवशीं संध्याकाळीं फिरून मूळ स्वभावानें उलट खाल्ली. सगळ्या कपाळभर आठ्यांनीं आपलें जाळें पसरलें. नयनद्वय विचार करण्यांत गर्क झाले आणि मुखानें म्लानतेच्या व्रताचा अंगीकार केला. कसाबसा रात्रीचा फलाहार उरकून घेऊन स्वारी शयनमंदिरांत गेली. पण निद्रादेवीची दृष्टि वक्र असल्यामुळें झोंप म्हणून कशी ती येईना. या मंचकावरून त्या मंचकावर आणि या कुशीवरून त्या कुशीवर, असे नाना प्रकार त्यानें करून पाहिले. शेवटीं निरुपाय झाल्यावर बाहेरील शांत आणि उघड्या

हवेंत जाऊन इकडे तिकडे फेऱ्या घालाव्या असें ठरवून तो बाहेर पडला. मध्यरात्र उलटून गेली होती. शीतल चंद्रप्रकाशानें सर्व पृथ्वीतलावर आपलें धवल आवरण पसरलें होतें. विचाराच्या भरांत मार्ग आक्रमण किती केला इकडे स्वारीचें लक्षही गेलें नाहीं. मध्येंच स्तब्ध राहणें, भराभर चालणें, आणि स्वतःशींच कांहीं तरी पुटपुटणें, वगैरे प्रकार मधून मधून सुरू होते. स्वारी बरीच दूरवर गेली. दोन तीन कोसांची मजल झाली असेल. रात्र संपूं लागली पण स्वारीचे विचार संपले नाहींत. प्रातःकाळच्या मंजुळ स्वरानें गायन करणाऱ्या भाटांच्या किलकिलाटांनीं तो शुद्धीवर आला व आपण अशा भलत्या वेळीं किती लांबवर चालत आलों याचें स्मरण त्याला आतां झालें. हा विचार त्याच्या मनांत येतो न येतो तोंच एक विलक्षण देखावा त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्यासमोर थोड्याशा अंतरावर एका वृद्ध स्त्रीचें शव पडलें होतें. जवळच एक वीस बावीस वर्षांचा तरुण बसला असून त्या स्त्रीचें डोकें आपल्या मांडीवर घेऊन तो रुदन करीत होता. रडून रडून त्याचे नेत्र आरक्त झाले होते आणि आवाज अगदीं खोल गेला होता. आपल्या भेसूर आक्रंदनानें रात्रीच्या नैसर्गिक शांततेला तो अधिकच भेसूर करून टाकीत होता. आमच्या विचारी बालकाला हा सर्व विवक्षित प्रकार पाहून प्रथमतः थोडेंसें भय वाटलें, पण थोड्या वेळानें धीर येऊन भयाची जागा दयेनें पटकावली. आपले सर्व विचार बाजूला ठेवून तो त्या तरुणाकडे वळला. परस्परांची दृष्टादृष्ट होतांच एकमेकांच्या चित्तवृत्ति उचंबळल्या. अंतःकरणांत घास करीत असणाऱ्या मानवी दयेला पाझर फुटून ती दृश्य स्वरूपानें डोळ्यांमधून बाहेर पडूं लागलेली पाहून त्या तरुणाला किंचित् बरें वाटलें. अतिशोकाचा डोईजड भार थोडासा हलका झाल्याचा भास झाला. ही त्या तरुणाची शोचनीय स्थिति पाहून त्या बालकालाही गहिंवर आला. त्याचा कंठ दाटून आला आणि त्याच्या मनांत जरी कांहीं बोलावयाचें होतें तरी त्याला तें बोलतां येईना. शेवटीं मोठ्या कष्टानें तो म्हणाला :—“ हे तरुणा, तूं या अशा भयंकर वेळीं शोक कां करीत आहेस ? ही वृद्ध स्त्री तुझी कोण ? आणि तिला हें अकाल मरण कसें आलें ! ” हे शब्द ऐकून त्या तरुणाला फार वाईट वाटलें. कमी झालेला शोक फिरून द्विगुणित होऊं पाहूं लागला. पूर्वीचें सर्व विकल स्मृतिचित्र त्याच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभें राहिलें. दुःखाचा कडेलोट होऊन स्फोट होतो कीं काय असें

त्याला वाटूं लागलें. रडूं आवरतां आवरेना. शोकाचे हुंदके आणि मायेचे उमाळे अपरिमित होऊं लागले. शब्दाला अवकाश मिळेना. अखेरीस एकदांचा तो तुटक भाषेंत अडखळत अडखळत त्याला म्हणाला, “ हे सुकुमारा, तूं कोणीही ऐस. मला तुझी भीति मुळींच वाटत नाहीं. तूं स्वभावानें फार दयालु दिसतोस. कारण तसें नसतें तर या अशा दिवसांत नेहमीं आढळून येणाऱ्या प्रसंगानें तुला इतके भडभडून आलें नसतें, पण अशा भयंकर वेळीं या निर्जन अरण्यांत तूं काय म्हणून एकटा भटकत फिरत आहेस ? माझ्याप्रमाणें तूंही कोणी दुःखी प्राणीच असला पाहिजेस. तसें नसतें तर या शुभ्र चांदण्याबद्दल तूं अशा रीतीनें आपली अरसिकता व्यक्त केली नसतीस, आणि पहांटेच्या गोडगोड व कोंवळ्या शोभेचा लोभ तुला इतक्या लवकर सुटता ना. तूं आणि मी बहुतकरून समदुःखीच असलों पाहिजे. आणि असें जर आहे, तर मग माझ्या हृदयद्रावक दुःखाच्या लांबलचक कहाणीनें तूं आपल्या अनुभवीत असलेल्या दुःखांत अधिक भर टाकूं कां इच्छितोस ? मी अतिशय गरीब पोरका पोर आहें. जन्मतःच आपली जबाबदारी न ओळखतां बापानें मला आईच्या स्वाधीन केलें. थोरला भाऊ दोन तीन वर्षांपूर्वीं दुष्काळांत मरण पावला. वयाचीं दहा पंधरा वर्षें होईपर्यंत आईनें काबाडकष्ट करून कसेंबसें मला लहानचें मोठें केलें. पण पुढें मला तें बघवेना. सत्तर वर्षांची म्हातारी साऱ्या दिवसभर खडून चार घांस मिळवून आणते, आणि त्यापैकीं तीन घांस मला देऊन एका घांसावर दिवस आणि रात्र मिळून ती आपली भूक शांत करिते, ही स्थिति पाहून मला फार वाईट वाटे. एके दिवशीं मी आईला न विचारतां घरांतून तसाच बाहेर पडलों आणि येथून आठ दहा कोसांवर असलेल्या एका शहरीं जाऊन डोळे मिटून एका मुसलमान मनुष्याच्या येथें नोकरी धरिली. आपल्या पोटापुरते आपणाजवळ ठेवून बाकीचे उरलेले मोलमजुरीचे पैसे आईकडे दर महिन्याच्या महिन्यास मी पाठवून देत असे. अशा स्थितींत सरासरी मीं चार पांच वर्षें काढलीं. माझा धनी माझ्यावर प्रेम करीत असे व मधून मधून द्रव्याचें साहाय्य करून दयेच्या उपकारानें मला तो आपला आभारी करी. परंतु त्याचा मोठा दोष म्हटला म्हणजे हा कीं तो महंमदी धर्मप्रसारक होता. मीं धर्मांतर करावें, हा त्याचा पहिल्यापासून मला आग्रह ! मी तर त्या गोष्टीला कधींच कबूल झालों नाहीं. सुमारें एक महिना झाला असेल, “ माझी

आई आजारी असून आसन्नमरण झाली आहे, खावयाला एक फुटकी कवडीही नाहीं, मग औषधपाण्याला पैसा कोठून असणार! एकसारखा माझा ध्यास घेतला आहे " अशा प्रकारचा घरचा निरोप मला येऊन पोंचला. मी मालकाजवळ रजा मागितली, पण त्या वेळीं काम फार असल्यामुळें ती मला मिळाली नाहीं. अशा रीतीनें निरुपाय झाल्यामुळें होते नव्हते ते सर्व शिल्लक पैसे आईच्या औषधासाठीं आणि पोटगीसाठीं मीं माझ्या मित्राबरोबर तिच्याकडे रवाना केले. तिनें त्या पैशांवर पंधरा वीस दिवस मोठ्या मिनतवारीनें काढले. पण तिचा आजार कांहीं केल्या मागें हटेना. आपण या रोगांतून वांचत नाहीं, असें तिच्या मनानें पक्कें घेतलें. मरतां मरतां पुत्रमुख पहावें म्हणून तिनें मला घरीं येण्याची आग्रहाची विनंति केली, व बरोबर पैसे घेऊन येण्यास सांगितलें. भाकरी रोजच्या रोज वेळेवर मिळत गेली तर कसाबसा रडतरखडत आठ दहा दिवस प्राण धारण करतां येईल, नाहीं तर एक दोन दिवसांतच राम म्हणण्याची पाळी येणार, अशी स्थिति येऊन पोंचली. मजजवळ तर या वेळीं विष खावयालाही पैसा नव्हता. मी एवढा करतसवरता पोरगा असून आईचा प्राण अन्नासाठीं खास जाणार, असें मला वाटलें. ही सर्व हकीकत मीं आपल्या धन्याच्या कानावर घातली, त्यांच्याही डोळ्यांत ती ऐकून अश्रुबिंदु आले; पण ही अडवणुकीची योग्य संधि आहे असें जाणून तो मला म्हणाला कीं, 'जर आतां तूं मुसलमान होत असशील तर, नव्हे तरच मी तुला साह्य करीन. आतांपर्यंत तुझ्या पुष्कळ बयादी ऐकल्या. यापुढें तूं माझी आज्ञा मोडून चालणार नाहीं.' असें त्यांनीं मला निक्षून सांगितलें. आपण आतां पुढें काय करावें, हा प्रश्न मला येऊन पडला. मीं विचार करावयाचा तितका केला ; पण निश्चय कांहीं केल्या ठरेनाच. आईचें मायाजाल तोडून टाकावे कीं धर्माचें संरक्षण झुगारून द्यावें, या दोन स्थितींत माझें मन हेलकावे खाऊ लागलें. आईचें प्रेम मूर्तिमंत मजपुढें उभें राहिलें. धर्माचा पाठिंबा मीं आजमावून पाहिला. धन्याच्या दुराग्रहाबद्दल माझी पूर्वींच खात्री पटली होती. मुसलमानांच्या धर्माबद्दल मला स्वाभाविक अनादर वाटूं लागला आणि त्यांचें जुलमाचें धर्मांतर माझ्या अंगावर शहारे आणूं लागलें. माझें मन उद्विग्न झालें. डोळ्यांत रक्तता आणि वक्रता प्रादुर्भूत झाली आणि कार्योत्सुक हात आज्ञेची वाट पाहूं लागले. पण दुर्दैवानें त्या वेळेस मी क्रोध-

वश झालों नाहीं. मीं आईला निरोप पाठविला कीं, ‘ तुझ्या पोटीं मी आलों खरा, पण तुझे प्राण वांचविण्याचें सामर्थ्य माझे अगीं नाहीं. मला फार शरम वाटते कीं, मी तुला असा निरोप पाठवितों. मजजवळ अन्न नाहीं. तूं आपली दाद परमेश्वराजवळ माग. तो कृपेचा समुद्र आहे. तो इच्छेचा कल्पतरु तुला पूर्ण मनोरथ करील. तुझा माझा सहवास इतकाच. परलोकची यात्रा तुला सुखकर होवो ! मी माझा हिंदुधर्म कदापि सोडणार नाहीं. आई, या अपराधाबद्दल तूं आपल्या बाळाला क्षमा कर ! ’ असा मी निरोप पाठवून चुकलों खरा ; पण माझें मला बरें वाटेना. आईचा मृत्यु मला भेवडावूं लागला, काय झालें कोण जाणें, पण मला आईच्या जीवितापुढें धर्माचें महत्व कांहींच वाटेना. मी धर्मांतर करण्यास एका क्षणांत तयार झालों. पण अशा महत्त्वाच्या बाबतींत आईच्या सल्ल्यावांचून पाऊल टाकणें मला बरें वाटेना. मी धन्याला न विचारतांच आईची भेट घेण्यासाठीं आज रात्रीं त्या शहरांतून बाहेर पडलों. आणि या ठिकाणीं येऊन सल्ला विचारल्यावर आईचे प्राण वांचविणार अशी माझी योजना होती. पण ईश्वरी नेमानेम कांहीं निराळेच ठरले होते. कर्माची शिदोरी बरोबर घेऊन लिंगदेहाच्या प्रवासास निघण्याचा निश्चय आधींच मुक्रर झालेला होता, फक्त माझा निरोप घेण्याचाच काय तो अवकाश होता. आमची दोघांची दृष्टादृष्ट होतांच आईचा आल्हाद मला त्या जगांतून नाहींसा झाला. माझ्यापुढें एका वृद्ध स्त्रीचें हें शव मात्र दिसत आहे ! हा दुःखकरक वृत्तांत ऐकून चरित्रनायक बालकाची स्थिति काय झाली असेल ती वर्णन करतां येणें शक्य नाहीं. त्याच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहूं लागल्या. बालकानें प्रेमपुरःसर त्या तरुणाला आलिंगन दिलें, आणि तो उच्च स्वरानें म्हणाला, ‘ हे तरुण पुरुषा, माझ्या नूतन मित्रा, तूं असा आक्रोश करूं नकोस. तुझी ही हकीकत माझ्यां अंतःकरणाला घरे पाडीत आहे. या वृद्ध स्त्रीचें शव पाहून मला भडभडून येतें. असो. ईश्वरी इच्छा तशीच असली, तर आपण तिला विरोध काय करणार ? तूं मोठा निश्चयी, चतुर आणि उदात्त पुरुष दिसतोस. तूं तर्क केलास त्याप्रमाणें मीही तुझ्यासारखाच दुःखी मनुष्य आहें. माझी आई निवर्तल्याला फार दिवस झाले. तिचा प्राण जात असतांना माझ्या जन्मांतरीच्या आत्म्यानें तो वांचविण्यासाठीं कृतघ्नपणें तुझ्याप्रमाणें कांहीं खटपट केली नाहीं. या घटकेपर्यंतही

तिच्या उपकाराची फेड माझ्या हातून झाली नाहीं. केवळ इच्छा मात्र हृदयांत उद्‌भूत झाली आहे. ती महान् साध्वी होती! ती आपल्या मुलांवर अत्यंत प्रेम करीत असे. पण तींच मुलें आपल्या आईशीं बेइमान झालीं. तिच्या शरिरांत कट्यार खुपसून तिचा प्राण घेणाऱ्या परकीयांना प्रत्यक्ष तिच्या पोटच्या कांहीं कांहीं पोरांनीं मदतसुद्धां केली. तुझ्यांत आणि त्यांच्यांत कोण विलक्षण राक्षसी फरक हा! कांहीं कांहीं पुत्ररत्नें तर अशीं होतीं व आहेत कीं आपली आई कोण ही कल्पनादेखील त्यांच्या स्वप्नीं वागत नाहीं. आणि जी अस्तित्वांत होती कीं नाहीं याजबद्दलच संशय, ती मेली म्हणून या मायेच्या पुतळ्यांना हळहळ ती काय वाटणार? तिच्या उपकारांचें स्मरण ते कसे ठेवणार आणि त्या उपकारांची फेड तरी ते कशी करणार? तुझ्यासारखे सर्व लोक कृतज्ञ असते तर आज हे जग इतकें भेसूर दिसलें नसतें. तुझ्याप्रमाणें मला मात्र माझ्या आईबद्दल निःसीम प्रेम वाटत आहे. एक ती तरी मला सजीव भेटली पाहिजे, नाहीं तर मी तरी तिला निर्जीव होऊन भेटणारच. गड्या तरुणा, तूं तुझ्या आईसाठीं धर्मांतर करण्याला प्रवृत्त झालास, पण मी तुला सांगतों कीं, माझ्या आईसाठीं मी पाहिजे तें करण्यास तयार आहें. माझी आणि माझ्या आईची गांठ पडलीच पाहिजे. तिच्या दुधाची मला तहान लागली आहे. मी तिला माझ्या हयातींत पाहणार. तुला आश्चर्य वाटेल, पण मी तुला सत्य गोष्ट सांगतों कीं, तुझी आणि माझी आई एकच आहे. आणि ती मृतावस्थेमध्यें आहे. तुझ्या या आईच्या शवाप्रमाणें तिचें शव तुला कदाचित् दिसत नसेल; पण म्हणून मी सांगतों ती गोष्ट तूं खोटी मानूं नको. तूं आपल्या जागृत कल्पनेला विचार. ती तुला तुझ्या विस्मृत आईचें छिन्नविच्छिन्न शव प्रत्यक्ष दाखवील. आणि तुझ्या या आईच्या योग्यतेपेक्षां त्या आईची योग्यता फार मोठी आहे. तुला हिच्याबद्दल जर इतकें प्रेम, इतकी कळकळ आणि इतकी आस्था वाटत आहे, तर मी सांगतों त्या आईबद्दल तुला अधिकच प्रेम वाटलें पाहिजे. आणि तें आतां वाटूंही पण लागेल. ही एक आई पैदा केली तर तुझ्या मातेप्रमाणें स्वतंत्रतेच्या संजीविनीनें सर्वांना जिवंत उठवितां येईल. आतां तूं या आईबद्दल आशा सोडून दे. ती तुला भेटणें अशक्य आहे. आणि माझ्याबरोबर आपल्या दोघांच्या आईला सजीव करण्यासंबंधीं खटपट कर. हिचा पुनरुद्धार करण्यासाठीं आपण हवा

तो स्वार्थत्याग करूं या. हिच्या उपकाराचें स्मरण करून तें ऋण सव्या फेडून टाकण्याची शपथ वाहूं या. जन्म देणाऱ्या आईला वांचविण्यांत पुण्य आहेच आहे. पण देहादिक सर्व इंद्रियें सुखाच्या मार्गानें वृद्धिंगत करणाऱ्या आईला जीवदान देण्यांत अधिक पुरुषार्थ आहे. आपण याच मार्गाचा अवलंब करूं या. देव आपल्याला यशस्वी करो!" हें त्या विचारी बालकाचें अश्रुतपूर्व भाषण ऐकून त्या तरुणाच्या सकल मनोवृत्ति बदलून उचंबळूं लागल्या. एका नवीन दिशेनें आणि दैविक विचाराचें उच्छृंखल वारें त्याच्या अंगांत संचार करूं लागलें. त्या दोघांचीं मनें एक झालीं. त्यांनीं एकमेकांना मिठ्या मारल्या; आणि दोघांच्याही चेहऱ्यांवर मंदस्मित चमकूं लागलें. पण इतक्यांत सहस्ररश्मि उदयाचलावर विराजमान् झालेला दिसूं लागला. तेव्हां त्यालाच परस्परांच्या अभिवचनांबद्दल साक्षी ठेवून ते दोन लोकोत्तर पुरुष आपापल्या उद्योगाला लागावें म्हणून विरहाच्या उदासीनतेसह आणि कार्याच्या उत्सुकतेसह मार्ग आक्रमण करण्यास प्रवृत्त झाले.

ही गोष्ट घडून आल्याला दहा-पंधरा दिवस लोटले असतील नसतील, इतक्यांतच श्रीशिवाजीमहाराजांनीं आपल्या वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी एका उदार, धाडशी आणि तरुण वीरपुरुषाच्या अलौकिक सामर्थ्याच्या मदतीनें तोरणा किल्ला सर करून त्याच्याच हस्तें स्वतंत्रतामातेच्या कृपाछत्राखालीं नांदणाऱ्या भावी स्वराज्याच्या भव्य इमारतीची मुहूर्तमेढ रोविली, अशी लोकवार्ता त्या वेळीं सर्व महाराष्ट्रभर जिकडे तिकडे पसरून राहिली होती.

## शर्यतीमधील एक प्रसंग : : १२

स्वतंत्र. काळ : ता. ५-७-१९०७

हिंदुस्थानांत पुष्कळ लोक अजून असे आहेत कीं, ज्यांचीं राज्यें गेलीं असून ते अद्यापि राजांमध्यें मोडतात. पण यांत इंग्रज सरकारची मात्र बिलकूल कसूर नाहीं. वास्तविक पाहिलें असतां ते राजे म्हणून म्हटले जातात ही केवळ इंडियन लोकांचीच चूक आहे. ज्यांचें राज्य काढून घेतलें आहे त्याला राजा हा शब्द लावला जावा हा शब्दशास्त्रांतील एक अक्षम्य गुन्हा होय. आणि सर्व गुन्हे हद्दपार करून टाकण्याकरतां हिंदुस्थानांत अवतीर्ण झालेल्या इंग्लिश लोकांनीं हाही गुन्हा होऊं न देण्याविषयीं तजविजी केलेल्या नाहींत असें नाहीं. ज्यांच्यापाशीं राज्य उरूं दिलेलें नाहीं त्यांना इतःपर कोणीही राजा म्हणूं नये, असे जाहीरनामेसुद्धां इंग्लिशांनीं आपल्याकडून काढले आहेत. तरी पण अज्ञानी लोकांपुढें इंग्लिशांचेंही कांहीं शहाणपण चालत नाहीं. ते त्यांना राजे म्हणतातच. अशा राजांचा वर्ग हिंदुस्थानांत हल्लीं बराच मोठा आहे. अशा वर्गापैकीं एक राजे कांहीं दिवसांपूर्वीं एक घोडयाची शर्यत चालली असतां तेथील मजा पाहण्याच्या इच्छेनें आले होते. शर्यत पाहण्याकरतां एक भव्य तंबू उभारलेला असून त्यांत बरेच लोक बसतील अशी जागा तयार केलेली होती. मध्यभागीं कांहीं उंच जागा केलेल्या असून त्या मात्र भरावयाच्या राहिलेल्या होत्या. बाकी खालच्या सर्व जागा भरून गेल्या होत्या. त्यांतच मी एके ठिकाणीं बसलों होतों. तंबूमध्यें बहुतेक युरोपियन लोकांचीच गर्दी होती. आणि त्यांतल्या त्यांत सुद्धां युरोपियन पुरुषांपेक्षां बायकांच्या गर्दीचें प्रमाण जास्त होतें. त्यांनीं न भरलेल्या जागेवर मधून मधून कांहीं श्रीमंत व्यापारी, कांहीं बडे पार्शी, कांहीं सामान्य मुसल-

मान, कांहीं सरदार, आणि कांहीं नेटिव राजांची रिकामटेकडीं मुलें वगैरे मंडळी बसलेली होती. शर्यत सुटण्याला अगदीं थोडा वेळ राहिला, इतक्यांत वर सांगितलेल्या राजेसाहेबांची स्वारी तंबूमध्यें आली. कोणीही नवीन मनुष्य आला म्हणजे हा कोण असावा, अशाबद्दल जिकडे तिकडे आपसांत जिज्ञासा आणि पृच्छा चालू होत असे. हे राजेसाहेब आले त्या वेळीं तेथें जनसमुदायामध्यें जी कुजबूज झाली तिजवरून मला असें कळलें कीं, ज्यांचें राज्य पूर्वी एकदां कदाचित् साऱ्या हिंदुस्थानभर पसरलें असतें अशा राजांच्या एका घराण्यांतील हे राजे आहेत. त्या घराण्याचा पूर्वींचा दरारा आणि हल्लींची त्यांची अपमानास्पद स्थिति, पूर्वींचे त्या कुळांतील प्रौढ प्रतापी राजे आणि हल्लींचे हे त्या घराण्यांतील पुरुष, ही स्थिति पाहून माझ्या मनाला अतिशय वाईट वाटलें. माझें मन अशा खिन्नतावस्थेमध्यें होतें इतक्यांत कोणी त्या राजेसाहेबांना खुर्ची दाखविली आणि ते आपल्या खुर्चीवर येऊन बसूं लागले. त्या वेळीं पूर्वींच्या संबंधानें त्या राजेसाहेबांच्या हाताखालील असे कोणी चार पांच सरदार तेथें बसलेले होते, ते राजेसाहेबांना पाहून उठले, त्यांनीं राजेसाहेबांना मुजरा केला, आणि हे राजेसाहेब त्यांस दाखविलेल्या खुर्चीवर बसल्यानंतर पाठीमागून ते आपापल्या जागीं बसले. तो देखावा पाहून माझ्या मनाला फार वाईट वाटलें. आणि माझ्या मनांत अनेक विचार उत्पन्न होऊं लागले :— " हा आपला राजा ! वास्तविक आपण याची प्रजा ! याच्या पूर्वजांचे आपल्या देशावर आणि आपल्या देशांतील लोकांवर अनंत उपकार झालेले आहेत ! याच्या पूर्वजांनीं आपल्या देशाला देश बनविलें आणि आपल्या लोकांना स्वतंत्र केलें. याच्या पूर्वजांनीं आपल्या धर्माच्या संरक्षणाकरतां लढाया केल्या आणि आपल्या पूर्वजांचे योगक्षेम यांनीं चालविले. त्या महात्म्यांचे हे वंशज असून यांच्यावर आज किती दुर्धर प्रसंग आला आहे पहा ! त्यांना कोणी फुकटचा सन्मानदेखील देत नाहीं ! हे आज सभेंत आले तर त्यांना उठून खडी ताजीम देण्याइतकेसुद्धां कोणी गरीब राहिले नाहींत. हें केवढें आश्चर्य आहे ! हे राजेसाहेब तेथें आले असतां त्यांना मुजरा करण्याकरतां फक्त चार-पांच जुन्या सरदारांनींच उठावें काय ? या जुन्या सरदारांवरच फक्त त्यांनीं उपकार करून ठेवले आहेत काय ? आम्ही या ठिकाणीं बाकीचे इंडियन लोक थोडे थोडके आहों ? आणि आमच्यावर यांचे कांहींच उपकार

झाले नाहींत काय? आज हे इतके गरीब झाले काय, कीं यांना मुजरा करण्याकरतां उठण्याइतका कमी योग्यतेचा माणूस हल्लीं कोणीच उरला नाहीं! जेथें सर्व लोकांनीं उठून खडी ताजीम द्यावयाला पाहिजे, तेथें चार पांच जुन्या सरदारांपेक्षां दुसरें कोणीही निघूं नये ही किती दुःखाची गोष्ट आहे! पण हजारों लोकांच्या समुदायामध्यें आपल्याला खडी ताजीम देण्याकरितां फक्त चार-पांचच जुने सरदार उठले, आणि बाकी कोणी आपल्याकडे फारसें लक्षही दिलें नाहीं, हें पाहून मला जसें वाईट वाटत आहे, तसेंच खुद्द राजेसाहेबांना वाटत असेल काय? किंवा नेहमींच्या अपमानाच्या संवयीमुळें त्यांचें लक्ष असल्या गोष्टीकडे मुळींच जात नाहीं, हें पाहण्याकरितां मीं त्यांच्याकडे आपली दृष्टि वळवली त्या वेळीं त्यांची मुद्रा फार खिन्न आणि उदास दिसत होती, व त्यांचें लक्ष त्या तंबूंत मध्यभागीं ज्या उंच जागा केलेल्या होत्या त्यांच्याकडे पूर्णपणें वेधून गेलें असल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. आणि तें पाहून माझ्या मनांत फिरून विचार उचंबळूं लागले. "महाराज या मध्यभागाच्या उंच जागेकडे कां बरें इतकें टक लावून बघत आहेत! गव्हर्नरसाहेबांकरतां तयार केलेली ही जागा पाहून महाराजांच्या मनांत काय बरे विचार घोळत असतील! बहुतकरून महाराज आपले मनांत म्हणत असतील, ही उंच जागा कोणाकरतां तयार केलेली आहे? माझे पूर्वज असल्या मुद्दाम तयार केलेल्या सिंहासनतुल्य जागेवर सदोदित बसत असत. आणि वास्तविक पाहिलें असतां माझाही तेथेंच बसण्याचा मान! पण आज तें सर्व जाऊन मला लोकांच्या सिंहासनाच्या खालीं एका बाजूला कोठें तरी बसण्याचा प्रसंग आला आहे! आणि ज्याच्यावर मी बसलों असतों ती सिंहासनाची जागा दुसऱ्यांच्याकरतां राखून ठेवण्यांत आलेली आहे. मी आणि माझे पूर्वज कोणत्याही दरबारांत गेलों असतां तेथें सर्वजण उठून आम्हांला खडी ताजीम देत असत. परंतु तोच मी आतां इतक्या अधोगतीला येऊन पोहोंचलों कीं, माझ्यासाठीं त्या पांचाहून कोणाही सहाव्याला उठण्याची आवश्यकता वाटत नाहीं!" असे विचार मनांत चालले आहेत तों इतक्यांत तंबूच्या बाहेर बरीच गडबड सुरू झाली व तिचा प्रवेश हळूहळू आंतही होऊं लागला. थोडयाच वेळांत तंबूंतील सर्व लोक उठून उभे राहिले आणि गव्हर्नरसाहेब, त्यांच्या पत्नी, व इतर कांहीं मंडळी आंत येऊन दाखल झाली. तंबूच्या दरवाजापासून मध्यभागची उंच

जागा फारशी दूर होती असें नाहीं. तरी पण वाटेंतील प्रतिष्ठित मंडळींशीं शेकहँड करीत करीत सिंहासनापाशीं येईपर्यंत गव्हर्नरसाहेबांना दोन तीन मिनिटें लागलीं. परंतु त्यांच्या मडमसाहेब एके ठिकाणीं जास्त वेळ बोलत उभ्या राहिल्यामुळें सर्व मंडळीला त्यांच्यासाठीं म्हणून आणखी दोन मिनिटें उभें राहावें लागलें! याप्रमाणें सरासरी पांच मिनिटें उभे राहिल्यानंतर, गव्हर्नरसाहेब आणि त्यांच्या मडमसाहेब आपल्या उच्च सिंहासनारूढ झाल्यावर सर्व लोक खालीं बसले. हा जो विरोध माझ्या डोळ्यांदेखत दिसून आला तो पाहून तर माझें मन फारच उद्विग्न झालें. " गव्हर्नरसाहेबांच्या मडमसाहेबांसाठीं देखील आपल्या देशांतील मोठमोठे लोक दोनदोन तीन-तीन मिनिटें वेडयांसारखे खडे उभे राहतात आणि प्रत्यक्ष आपले राजे आले असतां त्यांना सन्मान देण्याला चार किंवा पांच यांहून कोणी जास्त निघत नाहींत, हें केवढें पूर्णविस्मरण! आपल्या राजांना आपण मान दिला नाहीं, तर त्यांना कोण मान देईल? आणि ते कसे मोठे होतील? आपणच त्यांना मोठे केलें पाहिजे. एरवीं त्यांना उत्तेजन कसें मिळेल?" असे विचार माझ्या मनांत घोळत आहेत, इतक्यांत शर्यतींतील घोडे सुटण्याची वेळ झाली त्यामुळें सर्वांचें लक्ष तिकडे वेधून गेलें. घोडे बरोबर उभे करण्यांत आले. शर्यत सोडणारे साहेब एका हातांत घडयाळ आणि दुसऱ्या हातांत खुणेचें निशाण घेऊन घडयाळाकडे पाहत उभे राहिले; व बरोबर साडेचारावर कांटा येतांक्षणीं साहेबांच्या हातांतील निशाणानें इशारत दिली आणि सर्व घोडे भरधांव पळण्याला सुरुवात झाली. सर्वांच्या खिशांतून बायनॉक्युलर्स बाहेर पडल्या आणि कोणता घोडा शर्यत जिंकणार याबद्दलच्या अनुमानांना प्रारंभ झाला. परंतु हा सगळा वेळ आमचे महाराज काय करीत होते? घोडे अगदीं पळूं लागले, तरीदेखील ते यत्किंचितसुद्धां उत्सुक झालेले दिसले नाहींत. लोकांत आपापल्या आरश्या काढून त्यांचीं भिंगें पुसण्याची गडबड सुरू झाली तरी हे आपले स्वस्थच होते! आणि सर्व लोक शर्यतीच्या वर्तुळाकडे लक्षपूर्वक पाहत असतां यांची दृष्टि तेथें जमलेल्या सर्व युरोपियन आणि इंडियन लोकांच्या तोंडांकडे लागलेली होती. ती त्यांच्या तोंडावरील उदासीनता पाहून त्यांच्या मनांत काय विचार चालले असतील याची कल्पना करणें फारसें कठीण नव्हतें. ते म्हणत असतील कीं, " काय हा खेळ चालला आहे! लोक या शर्यतीच्या

खेळाकडे पाहत आहेत, पण मी आपल्या नशिबाच्या खेळाकडे पाहत आहे! आमचें घराणें या शर्यतीच्या खेळांत एकदां सर्वांच्या पुढें होतें. पण दुर्दैवानें तें आमचें घोडें थकून आज खालीं बसलें आहे! जेव्हां दैवाची अनुकूल दृष्टि आमचेकडे वळेल तेव्हां आम्ही हिंदुस्थानांतील राजे फिरून आपल्या शर्यतींत सगळ्यांच्या पुढें धांवू लागूं! हे लोक वेडे तर नाहींत? यांत हे काय पाहतात?" बहुतकरून त्यांच्या मनांत असले विचार चालले असावेत. आपल्या राज्याची आणि आपल्या देशाची झालेली अशी हीन स्थिति पाहून माझ्याही डोळ्यांतून अश्रुबिंदु वाहूं लागले आणि माझ्या तोंडून पुढील उद्गार निघाले :—"या शर्यतींतील घोडे म्हणजे केवळ पशु होत आणि पशूंना ज्ञान नसतें असें आपण समजतों; तरी पण तेसुद्धां एकमेकांच्या पुढें जाण्यासाठीं अगदीं प्राण टाकीत आहेत! पण आम्हां इंडियन मनुष्यांना त्यांच्याइतकीही महत्त्वाकांक्षा नाहीं. इंग्लिशांचें घोडें हिंदुस्थानच्या शर्यतींत आपल्या घोड्यांच्या पुढें गेलेलें आहे, हें चांगलें नाहीं. आपण मागें राहतां कामा नये. हिंदुस्थानांत राज्याकरितां शर्यत पुष्कळ दिवसपर्यंत सुटलेली आहे. आणि त्या शर्यतींत युरोपियन लोक आज पुष्कळ पुढें गेलेले आहेत. एका घोड्याच्या पुढें दुसरा घोडा जाऊं लागला तर त्या मूढ पशूलादेखील वाटतें कीं, मी याला पुढें जाऊं देणार नाहीं. हिंदुस्थानांतील राजांनो आणि लोकांनो, आपणही अशीच ईर्षा धरली पाहिजे कीं, आपल्या देशाच्या मैदानावर जी ही राज्याची शर्यत चाललेली आहे, त्यांत आपण हिंदुस्थानांतील लोक कोणालाही पुढें जाऊं देणार नाहीं."

—एक शर्यत पाहणारा

## लो० टिळक हेच अध्यक्ष व्हावेत : : १३

काळ : अग्रलेख, ता. ९-८-१९०७

● 'लोकमान्य' ही पदवी टिळकांना लोकांनीं दिली कीं कोणा पुढाऱ्यानें दिली याबद्दल थोडा वाद आहे. टिळक कौन्सिलांत गेल्यानंतर त्यांचा उल्लेख नामदार म्हणून करण्यांत येऊं लागला. काळकर्त्यांनीं १९०० सालांत "लोकमान्य व राजमान्य" हा लेख लिहून प्रतिपादन केलें कीं, खरी लोकसेवा केल्यानें कोणालाही लोकमान्यता प्राप्त होण्यासारखी आहे. ह्या लेखानंतर टिळकांना 'लोकमान्य' या मायन्याचीं पत्रें येऊं लागलीं. काळच्या ता. १३।९।१९०१ च्या अंकांत अनंत मित्र यांच्या पत्रांत टिळकांना 'लोकमान्य' म्हटलें आहे व ता. २७।९।१९०१ च्या संपादकीय स्फुटांत काळकर्त्यांनीं त्यांना 'लोकमान्य' म्हटलें आहे. ता. ६।९।१९०१ च्या अकांत महादेव चिंतामण पेंडसे यांच्या पत्रांत काळकर्त्यांना 'लोकमान्य' म्हटलेलें आहे. यानंतरही काळ पत्रांत टिळकांचा उल्लेख रा. रा. असा अनेक वेळां करण्यांत आलेला आहे व काळ पत्रांत काळकर्त्यांना अनेक वेळां 'लोकमान्य' म्हणण्यांत आलें आहे. भाला व राष्ट्रमत या पत्रांनीं 'लोकमान्य' हें टिळकांचें अभिधान सर्वमान्य केलें.

काँग्रेसची बैठक जवळ जवळ येत चालली आहे, व लो. टिळक यांना अध्यक्षस्थान देण्याविषयींची दोन-तीन वर्षें यशस्वी व्हावयाची राहिलेली खटपटही त्या मानानें नागपूर प्रांतांत विशेष जोरानें चालू झाली आहे. या खटपटीचा आणि नागपूरच्या रिसेप्शन कमिटींतील मताधिक्याचा जरी अद्यापि निकाल बाहेर आला नाहीं, तथापि आपल्या विरुद्ध पक्षाला या कामांत

खात्रीनें यश येणार, असें नेमस्त लोकांना वाटूं लागलें आहे. नेमस्त लोकांचे जरी बाकीचे पुष्कळ अदमास चुकतात, तरी हा त्यांचा अदमास बरोबर उतरला आहे. इतपत त्यांची बिनचूक अनुमान करण्याची बुद्धि वाढली आहे ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. असो, आतां लो. टिळक हे बहुतेक अध्यक्ष खास होतात अगर अध्यक्षाची जागा नाकारण्याचा तरी मान खात्रीनें मिळवितात, येथपर्यंत मजल येऊन ठेपली असें पाहून आतां आपल्या नेमस्त लोकांच्या अगदीं गळ्याला पाणी लागण्याची वेळ आली, आतां मूग गिळून उपयोग नाहीं, असें नेमस्तांतील कित्येकांना वाटूं लागलें आहे; व त्याची पडछाया चंद्राच्या प्रकाशांत अंधुक अंधुक दिसूं लागली आहे. या नेमस्त पक्षाचें हल्लीं असें एक म्हणणें आहे कीं, ज्यांना यंदाकरितां अध्यक्ष निवडण्याचा प्रयत्न चालला आहे ते सर्व बाजूंनीं चांगले आहेत, परंतु कॉंग्रेसच्या राजकीय सुधारणेचा मार्ग आणि त्यांचा राजकीय सुधारणेचा मार्ग हे मात्र एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत. असा उपोद्घात करून कॉंग्रेसचे मार्ग कोणते याच्याबद्दल चालू कृष्णपक्षामधील नुकत्याच एका इंदुप्रकाशामध्यें विवरण करण्यांत आलेलें आहे. कायदेशीर राजकीय चळवळ हा कॉंग्रेसचा गेल्या वीस वर्षांतील मार्ग आहे. त्या मार्गापासून लो. टिळक हे भटकलेले आहेत, सबब त्यांच्या हातांत कॉंग्रेसचीं सूत्रें देणें बरोबर होणार नाहीं, असें प्रतिपक्षाचें म्हणणें आहे. परंतु अध्यक्षांच्या निवडणुकीचा प्रश्न क्षणभर बाजूला ठेवून यावर नेमस्त पक्षांतील लोकाना असें विचारलें पाहिजे कीं, आज वीस वर्षें कॉंग्रेसचा आपण म्हणतां तसा मार्ग आहे खरा, परंतु हा केवळ जुनाटपणाचाच प्रश्न आहे किंवा काय? लोकांना काय पाहिजे? कॉंग्रेसचा हल्लींचा मार्ग वीस वर्षांचा जुना आहे इकडे लोक पाहतात, किंवा वीस वर्षें कॉंग्रेस या रेम्याडोक्या पद्धतीनें भरवून काय परिणाम झाला याला विशेष महत्त्व दिलें पाहिजे. वीस वर्षें ज्या मार्गानें जाऊन कांहीं फायदा झाला नाहीं त्या मार्गाचें बंड माजवावयाचें, किंवा तो तुच्छ आणि त्याज्य मानावयाचा? कांहीं तादृश परिणाम झाला नाहीं हेंच तो मार्ग तुच्छ मानण्याला मुख्य कारण आहे. परंतु तेंच कारण जर तो मार्ग पूज्य मानण्याला नेमस्त लोक पुढें आणीत असतील, तर मोठें आश्चर्य आहे! एकंदर सगळ्या राष्ट्राचे डोळे फिरून गेले असतां नेमस्त लोकांची मात्र तीच दृष्टि कायम

राहावी, हें दुर्दैव आहे. पूर्वीचे मार्ग बदलले पाहिजेत, असेंच आतां सर्वांना वाटूं लागलें आहे. मागील अनुभवावरून पुढील शहाणपण शिकावयाचें नाहीं तर मग मागील अनुभव घेत बसण्याची खटपट तरी कशाला पाहिजे? वीस वर्षांच्या मार्गानें जर इंग्लिश लोक आपल्याला कांहीं एक देत नाहींत तर ते मार्ग बदललेच पाहिजेत. मार्ग जरूर बदलावेत पण त्यांचीं नांवें मात्र जरूर तींच ठेवावींत. पूर्वीचे आपले मार्ग कायदेशीर होते, आणि आपले पुढील मार्गही कायदेशीरच सहणार. मार्ग बदलले तरी त्यांतील कायदेशीरपणाचें नांव बदलण्याची कोणाचीही इच्छा नाहीं. आपण स्वदेशोन्नतीसाठीं जें करूं तें सर्व कांहीं कायदेशीरच! नेमस्त भ्रमत आहेत ते येथेंच. आज वीस वर्षें त्यांनीं "राजमान्य राजश्री"चीं जीं वळणें गिरविलीं आणि जे खरडे घासले तेवढेंच काय तें कायदेशीर, आणि त्याच्या पलीकडे कायदेशीरपणाची जणूं काय मर्यादाच नाहीं, असें ते समजतात. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. खऱ्या कायदेशीरपणाची मर्यादा अतिशय विस्तृत आहे. हिंदुस्थान देश इंग्लिशांचा नसतांना तो त्यांनीं घेतला हासुद्धां जर कायदेशीरपणा आहे, तर जो आपला स्वतःचाच आहे, त्या हिंदुस्थान देशाच्या उन्नतीसाठीं एक मार्ग निरुपयोगी ठरल्यास दुसरा उपयोगांत आणणें ह्यांत बेकायदेशीरपणा तो कोणता! हिंदुस्थान देश इंग्लिशांचा नसतांना तो त्यांनीं घेतला या कायदेशीरपणाच आहे! यावरून कायदेशीरपणाचा प्रांत किती अमर्याद आहे, याची कोणालाही कल्पना करतां येईल; हा कायदेशीरपणाविषयींचा जगत्प्रसिद्ध सर्वमान्य आणि सुधारलेला सिद्धांत नेमस्त लोकांना मान्य नाहीं कीं काय? नसेल तर त्यांनीं स्पष्टपणें तसें जाहीर करावें. यांत कांहीं गैरकायदेशीरपणा आहे कीं काय? हिंदुस्थान इंग्लिशांचे नसतांना तें त्यांनीं घेतलें हें इंग्लिशाचें कृत्य कायद्याला सोडून झालें, असें मानण्याचें धाडस नेमस्त लोक करीत आहेत कीं काय? ते जर असला राजद्रोह करीत असतील, तर लाला लजपतराय यांनाच हद्दपार करण्याचा सन्मान इंग्लिशांनीं आधीं कां दिला, हें समजणें कठिण आहे. इंग्लिशांनीं हिंदुस्थान घेतलें हा बेकायदेशीरपणा! मग नेमस्त लोकांच्या कायदेशीरपणाच्या कल्पनांची कमाल झाली म्हणावयाची! यांत काय बेकायदेशीरपणा झाला? सुराज-उद्दवल्याचें राज्य उमीचंदाच्या मदतीनें क्लाइव्हसाहेबांनीं घेतलें यांत काय बेकायदेशीरपणा झाला? औरस संतति नाहीं आणि दत्तक घेण्याची

परवानगी नाहीं, अशा स्थितींत इंग्लिशांनीं कांहीं दहा पांच राज्यें खालसा केलीं म्हणून यांत काय बेकायदेशीरपणा झाला ? हिंदुस्थानचा व्यापार बुडवून त्या ठिकाणीं आपला सुरू करण्याच्या सदिच्छेनें हिंदुस्थानांतील मालावर जबर जकात बसावी आणि विलायती मालाला पूर्ण मुभा मिळावी अशा हेतूनें कायदे करून जर इंग्लिशांनीं रास्त रास्त हिंदुस्थानांतील व्यापार बुडविला, तर ह्यांत बेकायदेशीरपणा काय झाला ? नेमस्त लोकांच्या बेकायदेशीरपणा-विषयीं जर अशा कांहीं संकुचित कल्पना असल्या तर त्या त्यांनीं लवकर टाकून देण्यास शिकलें पाहिजे. यांत बेकायदेशीरपणा यत्किंचितही नाहीं ! दुसऱ्यापासून राज्य घेण्यांत किंवा दुसऱ्याचा व्यापार बुडवून टाकण्यांत बेकायदे-शीरपणा कसला आला आहे ? परंतु या गोष्टी कोणी नेटिवांनीं नेमस्तांना सांगून कधीं पटावयाच्या नाहींत. कारण, त्यांचा सगळा विश्वास काय तो इंग्लिश लोकांवर ! म्हणून आम्ही म्हणतों कीं, नेमस्तांनीं खुद्द इंग्लिशांनाच विचारून या प्रश्नाची शहानिशा करून घ्यावी. हिंदुस्थानचें राज्य तुम्हीं घेतलें आणि हिंदुस्थानांतील व्यापार तुम्ही बुडविला यांत बेकायदेशीरपणाचें वर्तन तुम्हीं केलें कीं काय, असें पाहिजे तर नेमस्तांनीं वाटेल त्या साहेबाला विचारून पाहावें ! हें सगळें अत्यंत कायदेशीरपणाचें वर्तन आहे, असेंच तो उत्तर देईल ! हें आम्ही बेकायदेशीरपणाचें काम केलें, असा कबूलजबाब देणारा लाखांमध्यें एकसुद्धां इंग्लिश मनुष्य प्रतिज्ञेनें सांपडणार नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांचें राज्य आम्हीं घेतलें आणि त्यांचे व्यापारधंदे बुडविले हा आम्हीं बेकायदेशीरपणा केला, असें जर इंग्लिश लोक म्हणूं लागतील, तर त्यांना हिंदुस्थानांतून आपलें चंबूगवाळें आटपून विलायतेस जाण्याची पाळी येईल. कारण, मग त्यांना हिंदुस्थानांत राहण्याला वाजवीपेक्षां अधिकारच उरणार नाहीं. परंतु ते न्यायभीरु आणि पापभीरु इंग्लिश लोक अशा रीतीनें आपण होऊन आपलें चंबूगवाळें आटपून आजपर्यंत विलायतेस गेले नाहींत, यावरू-नच सदर कृत्यांचा कायदेशीरपणा शाबीत होत आहे. तो इंग्लिशांनीं तोंडानेंच कशाला सांगावयाला पाहिजे आहे ? कायद्यांत राजा जसा कोणताही अपराध करीत नाहीं, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत इंग्लिश मनुष्यही कांहीं बेकायदे-शीरपणा करीत नाहीं ! अशी जर स्थिति आहे तर नेमास्तांनीं भलतीच शंका घेणें ह्याचा अर्थ काय ? सारांश, कायदेशीरपणाची मर्यादा फार विस्तृत आहे !

त्या मर्यादेच्या आंत काँग्रेसनें आपले मार्ग बदलण्याला कोणतीही हरकत नाहीं. काँग्रेस आजपर्यंत भाषणें, ठराव आणि अर्ज या गोष्टी करीत होती. आतां स्वराज्य, स्वदेशी आणि बहिष्कार या गोष्टी कराव्या असा राष्ट्रीय पक्षाचा कल आहे. आणि लो. टिळक हे अध्यक्ष झाले तर ते याच गोष्टी प्राधान्येंकरून लोकांच्या पुढें मांडतील. यांत बेकायदेशीरपणा तो काय होणार आहे ? इंग्लिशांनीं दुसऱ्यांचें राज्य घेणें हा देखील कायदेशीरपणा आहे तर मग आपण आपलें स्वतःचें स्वराज्य मागणें ह्यांत काय बेकायदेशीरपणा ? आणि हिंदुस्थानचा व्यापार बुडवून तेथें इंग्रजी जिन्नस फैलावणें हा देखील जर कायदेशीरपणा आहे, तर हिंदुस्थानांतील व्यापार हिंदुस्थानांतच वाढविणें ( तोसुद्धां इंग्लंडांत नव्हे ) ह्यांत काय बेकायदेशीरपणा ? कारण, स्वदेशी आणि बहिष्कार म्हणजे काय आहेत ? तीं निव्वळ हिंदुस्थानांतील व्यापार हिंदुस्थानभर वाढविण्याचीं सामान्य साधनें आहेत. त्यांत बेकायदेशीरपणा कसला आला आहे ? इंग्लिश लोक आपले गुरु आहेत. त्यांच्यापासून आपण इतर गोष्टी शिकतों तसा कायदेशीरपणाही आपण त्यांच्यापासून शिकला पाहिजे. इंग्लिश लोक जितक्या कायदेशीरपणानें वागत असतील तितक्या कायदेशीरपणानें वागण्याला आपल्यालाही कांहीं हरकत नाहीं. इंग्लिशांकरितां कायदेशीरपणा निराळा आणि इतरांकरितां कायदेशीरपणा निराळा, असा भेदभाव या इंग्रजी रामराज्यामध्यें थोडाच असणार आहे ! कारण, एकच कायदा आम्ही सर्व लोकांना लागू करूं असें राणीनें आपल्या अशक्य सनदेंत राजीखुषीनें आणि अक्कलहुषारीनें स्पष्ट लिहून दिलें आहे ! त्यामुळें आपलीं हीं स्वराज्याबद्दलचीं आणि आपल्या व्यापाराबद्दलचीं सर्व कृत्यें यथास्थित रीतीनें करून तीं कायदेशीरच आहेत असें म्हणावयाला आपण इंग्लिशांपासून शिकलें पाहिजे. काँग्रेसचे निरुपयोगी झालेले मार्ग आपण खुशाल आणि जरूर बदलावे, पण आपण कोणतेही मार्ग बदलले तरी ते सगळे कायदेशीरच आहेत असें प्रतिपादन करण्याला मात्र आपण कधीं चुकूं नये. शिवाय नवीन नवीन म्हणून असें काय आतांच करावयाचें आहे ? स्वावलंबन, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार हेच येऊनजाऊन मोडके तोडके मार्ग पूर्वीच्या अर्जाच्या जागीं येणार आहेत. पण यांची कथा काय ? A successful rebellion is a revolution या न्यायानें क्रॉमवेलची

क्रांति, वुइल्यम दि थर्डची स्थापना, आणि फ्रेंच रेव्होल्यूशन या गोष्टीदेखील कायदेशीर झालेल्या आहेत ; आणि १८५७ सालच्या नानासाहेबांच्या बंडाला जर यश आलें असतें, तर तेंसुद्धां कायदेशीर झालें असतें ! उदार मताच्या इंग्रजी तत्त्वदृष्टीप्रमाणें कायदेशीरपणाची इतकी सार्वत्रिक व्याप्ति असतांना एखाद्या नेमस्तांनीं स्वदेशीचा आणि बहिष्काराचा मार्ग कायदेशीर चळवळींत येईल किंवा नाहीं याच्याबद्दल कांक्षा काढीत बसावें ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. नवे कायदेशीर चळवळीचे मार्ग स्वीकारावयाचे म्हणजे कांहीं बंड करावयाचें आहे असें नाहीं. स्वराज्य आणि व्यापार यांची वृद्धि हा आपला सगळ्यांचा मुख्य हेतु आहे. आणि तो जेणेंकरून साधेल त्या सगळ्या मार्गांचें अवलंबन करून त्यांत यश मिळविणें हें आपलें मुख्य काम आहे. या कामांत यश मिळणें म्हणजे त्याबरोबर कायदेशीरपणाचें सर्टिफिकेटही मिळतेंच. आणि इंडियन पिनल कोडच्या प्रत्येक कलमाकडून तावून-सुलाखून घेऊन एकेक शब्द आपल्या अर्जांत लिहिणाऱ्या योद्ध्याला जर त्या हातीं घेतलेल्या कामांत यश आलें नाहीं तर त्याच्या कायदेशीरपणाला कोण कुत्रा विचारणार आहे ! यश हा कायदेशीरपणा आहे. यशासारखा दुसरा कायदेशीरपणा कोणताही नाहीं. ‘ End justifies the means ’ हें वाक्य कांहीं तुमच्या-आमच्यासारख्या कोणी बिनसुधारलेल्या नेटिवानें बनविलेलें नाहीं ! अशा स्थितींत लहानशा, क्षुद्र, आणि अगदीं शेवटच्या नंबरच्या नवीन मार्गाचें अवलंबन करतांना नेमस्तांना इतकें अवघड वाटावें हें आश्चर्य आहे. लो. टिळक यांना अध्यक्ष केलें म्हणून ते कांहीं कॉंग्रेसच्या प्लॅटफॉर्मवरून लोकांना बंड करण्याला सांगणार आहेत असें नाहीं. कोणी कोणाला सांगून बंडें होत नसतात. आणि लोकांची बंडाची तयारी झाली, म्हणजे ते कॉंग्रेसच्या अध्यक्षांनीं सांगण्याची वाट पाहण्याकरितां थांबूनही बसणार नाहींत. बंड करा असा हुकूम करण्याचा बहुमान फक्त परकीय राज्यकर्त्यांच्या अरेरावी अत्याचारांकडेच आहे. त्यांना जोंपर्यंत इंग्लिश लोक आपल्या दाबाखालीं ठेवीत आहेत, तोंपर्यंत कॉंग्रेसचे अध्यक्ष कोणीही झाले तरी हरकत नाहीं. परंतु कॉंग्रेसचे अध्यक्ष कोण होतात इकडे इंग्लिशांचें बरेंच लक्ष असतें. यावरून सर्व हिंदुस्थानभर बंडाचा हुकूम सोडणाऱ्या आणि बंडाचें निशाण फडकविणाऱ्या आपल्या अत्याचारांवर

इंग्लिशांना बरोबर दाब ठेवतां येईनासा झाला आहे असें दिसतें. असें असेल तर मात्र मोठी भयंकर स्थिति आहे. परंतु ती इंग्लिशांची इंग्लिशांना सुधारतां येण्यासारखी आहे. कॉंग्रेसचे अध्यक्ष कोणीही झाले तरी त्यांचा त्या स्थितीशीं कांहीं संबंध नाहीं. म्हणून लो. टिळक हे अध्यक्ष होण्याला कांहीं अडचण नाहीं. परंतु अर्ज करण्यापासून कांहीं फायदा नाहीं. भिक्षांदेहीच्या वृत्तीनें आपल्याला कोणी कांहीं देत नाहीं. आपण स्वावलंबन शिकलें पाहिजे, आणि स्वदेशी व बहिष्कार यांचा फैलाव जिकडे तिकडे झाला पाहिजे, असें लो. टिळक उघड उघड म्हणतात म्हणून नेमस्तांचा त्यांच्यावर कटाक्ष असेल, तर मात्र गोष्ट वेगळी आहे. पण या गोष्टी कोणता नेमस्त बोलत नाहीं आहे ? नेमस्त लोकसुद्धां अगदीं याच गोष्टी खाजगी भाषणांतून बोलत असतात. तेसुद्धां हिंदुस्थानांतील द्रव्यापहारामुळें कंटाळलेले नाहींत ? इंग्लिशांच्या उद्दामपणानें त्यांच्याही अंगाचा संताप होत नाहीं ? हिंदुस्थान हें हिंदुस्थानांतील लोकांकरतांच आहे या तत्त्वाचें ते खाजगी भाषणांतून जोरानें प्रतिपादन करीत नाहींत ? अर्ज हा कागदाचा व्यय आणि सभा ही प्राणवायूची उधळपट्टी, असे निराशेचे उद्‌गार त्यांच्याही तोंडून अतिशय आवेशानें निघत नाहींत ? या सगळया गोष्टी जर त्यांना डांचतात तर मग लो. टिळक आणि नेमस्त लोक यांच्यामध्यें फरक तो काय राहिला ? सगळयांचीं मनें आंतून जर एकच झालेलीं आहेत तर मग लो. टिळक यांना अध्यक्षस्थान न देतां आमच्या नेमस्तांच्या कंपूपैकीं कोणाला तरी तें दिलें पाहिजे असा आग्रह धरण्यांतील मतलब काय ? नेमस्त लोकांपाशीं केसरी पत्र नसल्यामुळें त्यांचे विचार झांकलेले आहेत, त्यांचें खरें हृद्‌गत सरकारला अद्यापि कळलें नाहीं, त्यामुळें अशा नेमस्त लोकांकडून सरकार जास्त फसलें जाण्याचा संभव आहे. म्हणून सरकारच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां असे आमच्यासारखेच पटाईत आणि बिलंदर नेमस्त पाहिजेत, असे जर यांत कांहीं नेमस्तांचे डावपेच असले तर मात्र न कळे ! पण ह्या फसवण्याच्या युक्त्या राजकारस्थानाच्या कामांत अनभिज्ञ आणि अनभ्यस्त अशा सरळ स्वभावांच्या लोकांना काय समजणार ? आम्ही तर सरळपणानें असें समजतों कीं, सरकारच्या डोळ्यांत अशा रीतीनें धूळ टाकणें म्हणजे सरकारला निव्वळ फसवणें होय ! गुप्त संभाषणांतून प्रकट होणाऱ्या वरील मतांच्या दृष्टीनें पाहतां वास्तविक जहाल

आणि नेमस्त यांच्यांत फारसा फरक नाहीं. जहाल हे आपले साधेभोळे आणि बोलून चालून उघडे खळगे आहेत, पण नेमस्त म्हणजे बाहेरून संभावित आणि गोजिरवाणे दिसणारे केवळ तृणाच्छादित खळगे होत. कोणीही झाले तरी, हिंदुस्थानांतील लोक हे सगळे खळगेच ! आतां त्यांपैकीं उघडे खळगे चांगले किंवा गवतानें ज्याचीं तोंडें झांकलीं आहेत ते खळगे चांगले याबद्दलची निवड करणें हें सरकारचें काम आहे. ज्यानें त्यानें आपल्या आवडीप्रमाणें आपला खळगा पसंत करावा. लोक भिन्नरुचि असल्यामुळें कोणाला कसा खळगा आवडेल हें दुसऱ्यांनीं काय सांगावें ? सामान्य समजूत अशी खरी कीं, उघडया खळग्यापेक्षां झांकलेला खळगा वाईट ! पण सरकारला जर तो प्रिय असला तर सरकारनें त्यांत पडावें ! "भिन्नरुचिर्हि लोकः" असें म्हणून इतरांनीं स्वस्थच बसलें पाहिजे. परंतु कॉंग्रेसचा प्रश्न हा सरकारपेक्षां लोकांचाच जास्त आहे. याकरितां लोकांना जे अध्यक्ष जास्त प्रिय आहेत ते लो. टिळकच अध्यक्ष व्हावेत हेंच उचित आहे.

---

## तें झाड अजून आहे ना हो! : : १४

स्वतंत्र. काळ : ता. २१-६-१९०७

लेखक—क्ष

मीं एक मोठें झाड पाहिलेलें होतें. कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत सर्व हिंदुस्थानचें आक्रमण करण्याकरितां इंग्लिशांनीं जो मोठा थोरला रस्ता बांधला आहे त्यापैकीं एका रस्त्याच्या भागाला एका लहानशा टेकडीवर तें झाड होतें. तें कोणी तरी साहेबानें तेथें लाविलेलें असलें पाहिजे. कारण रस्त्याच्या कडेला झाडें लावण्याचा नाद युरोपियन लोकांना फार असतो. तें झाड शंभर दीडशें वर्षांचें जुनें दिसत होतें. शेजारच्या गांवचे लोक असें सांगतात कीं, पूर्वीं त्या ठिकाणीं मुसलमानी धर्माची एक मोठी भव्य मशीद होती, परंतु ती हळूहळू खणून काढून तिच्या जागीं हें झाड लावण्यांत आलें. या झाडाचा विस्तार वाढतां वाढतां अतिशय वाढलेला आहे. याच्या खांद्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा चारी दिशांनीं लांबलांब पसरलेल्या असून, यांचा अग्रभाग तर जणूं काय ढगांना भोकेंच पाडीत चालला आहे कीं काय असा भास होतो. अशा या विस्तीर्ण वृक्षाच्या वरील भागाकडे पाहून आश्चर्य करीत असतां एकाएकीं माझी दृष्टि त्याच्या बुंधाकडे वळली. पण तेथेंही असाच विलक्षण चमत्कार! वृक्षांना वर जशा खांद्या असतात तशाच त्या खालींही असतात कीं काय असा क्षणभर मला संशय उत्पन्न झाला. कारण बुंधाजवळच्या त्याच्या चोहोंकडे पसरलेल्या असंख्य मुळ्या ह्याही वरील खांद्यांप्रमाणेंच अतिशय विस्तीर्ण होत्या. आणि "उर्ध्वमूलमधःशाखम्" अशा जातीच्या झाडाचें जें वर्णन आहे त्यापैकींच हें अधःशाख झाड असावें असें मीं क्षणभर अतिशय भाविकपणानें मानलें! तीं त्या प्रचंड

वृक्षाचीं मुळें भूमीमध्यें फार खोल खोल गेलेलीं आहेत, असें आसपासचे लोक सांगत होते ! तें ऐकून शेषाच्या डोक्यांना त्यांच्यापासून कांहीं इजा होऊं नये अशी जरी मीं परमेश्वराची करुणा भाकली, तरी तेथील प्रत्यक्ष स्थिति पाहतां त्या मुळांची अवस्था फारच भिन्न झालेली होती. दरसाल वाहत वाहत येणाऱ्या पाण्यानें त्या मुळांच्या भोंवतालची माती धुपून जाऊन तीं बहुतेक उघडीं पडलीं होतीं. जीं कित्येक जमिनींत शिरलेलीं दिसत होतीं, त्यांचा खोलपणा अजमावून पाहण्यासाठीं मीं मुद्दाम त्यांच्या सभोंवतालची माती उकरून पाहिली तों जमिनींत त्यांच्या-दृढतेकरितां फारच थोडी माया असलेली माझ्या प्रत्यक्ष दृष्टीस पडली. अशा रीतीनें बहुतेक मुळें उघडीं पडलेलीं पाहून हा वृक्ष, आपला हा वरील अवाढव्य विस्तार आतां सावरणार तरी कशाच्या जोरावर, अशी मला काळजी पडली. पावसाळ्याला नुकतीच सुरुवात झालेली होती. आकाशाच्या निर्जन मैदानांत मेघांच्या रोज नवीन नवीन टोळ्या जमत होत्या. त्यांच्या मंद गर्जना पृथ्वी-तलाच्या किनाऱ्यावर हळूहळू ऐकूं येऊं लागल्या होत्या ! विजांच्या तोफांचे लखलखाट आणि कडकडाट यांना किंचित् किंचित् प्रारंभ होऊं लागला होता ! खवळलेले वारे आपल्या शयनगृहेंतून जागे होऊन गगनतलाच्या पटांगणावर आपले घोडे हळूहळू फेकूं लागले होते ! ही सगळी आकाशांतील तयारी पाहून मला त्या झाडाबद्दल चिंता वाटूं लागली आणि त्याची ती स्थिति पाहून माझ्या मनाला वारंवार हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याची आठवण होऊं लागली ! उघड्या पडलेल्या मुळांच्या त्या झाडाकडे पाहून आतां या वर्षाकाळच्या तडाक्यांत या झाडाचें कसें होईल अशा विचारांनीं माझ्या मनाला त्रस्त करून सोडलें असतां मीं त्या झाडाकडे पाहून अनेक वेळां दीर्घ उच्छ्वास सोडले आणि अखेरीस त्या झाडाला अनुलक्षून माझ्या तोंडून पुढीलप्रमाणें उद्‌गार निघाले—" हे वृक्षा, तुझीं मुळें धुपून उघडीं पडलीं असलीं म्हणून तुला भिण्याचें कारण नाहीं ! हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याप्रमाणें तूंहि कदाचित् आणखी हजारों वर्षें या भूमीवर गर्वानें उभा राहूं शकणार नाहींस कशावरून ! अहो, त्या वाटेनें जाणारे वाटसरू हो, ते झाड अजून आहे ना हो ! तुम्हीं तें पाहिलें असलें तर मला कोणी तरी त्याचा वृत्तांत सांगा हो ! "

# असंतोषावर औषध : : १५

काळ: अग्रलेख, ता. १९-७-१९०७

● १९०६ सालीं पुणेकरांनीं लो. टिळकांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त उत्सव करण्याचें ठरवून वर्गणी जमविली होती ( काळ ता. २९-६-१९०६. ) लो. टिळक यांची नाखुषी असल्यामुळें हा उत्सव मोठया कष्टानें बंद ठेवण्यांत आला. ( काळ ता. ६-७-१९०६) उत्सवांत सामील होणारांचें बाबतींत बरीच चहाडखोरी झाली होती. बलाढय सरकार क्षुब्ध होतें तेव्हां निःशस्त्र लोक तोंडपुजेपणा करतात त्यांचा फाजील भरंवसा धरण्यांत शहाणपणा नाहीं.

मुंबईच्या टाइम्सनें मुंबई इलाख्यांतील राजद्रोह या विषयावर नुकताच एक लेख लिहिला आहे. हल्लीं हिंदुस्थानांत जो असंतोष वाढत आहे, त्याचें मुख्य कारण वर्तमानपत्रांतील लेख होत, अशी सरकारची समज झाल्यामुळें वर्तमानपत्रांवर खटले करावे म्हणजे हल्लींचा असंतोष नाहींसा होईल असें सरकारास सहजगत्याच वाटूं लागलें आहे. वर्तमानपत्रांवर फिर्यादी करण्याचा सल्ला देण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारकडे होता. तो हिंदुस्थान सरकारनें एक सर्क्युलर काढून आपल्या हाताखालील प्रांतिक सरकारांना देऊन टाकल्याचे पूर्वींच प्रसिद्ध झालेलें आहे. हा हिंदुस्थान सरकारचा ठराव निरनिराळ्या स्थानिक सरकारांनींही आपापल्या हद्दींतून प्रसिद्ध केला आहे. त्याप्रमाणें मुंबई सरकारनें आपल्या इलाख्यांत जो ठराव प्रसिद्ध केला आहे त्याला अनुलक्षून टाइम्सचा प्रस्तुतचा लेख आहे. मुंबई सरकारच्या सर्क्युलरमध्यें अशी एक इच्छा प्रदर्शित केलेली आहे कीं, या सर्क्युलरप्रमाणें स्थानिक सरकारला मिळालेल्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा प्रसंग

आपल्यवार येणार नाहीं अशी सरकारला आशा आहे. परंतु टाइम्ससारखे सल्लागार जोंपर्यंत अहमहमिकेनें आपली कोणीही न विचारलेली सल्लामसलत देण्याकरितां पुढें पुढें धांव घेत आहेत तोंपर्यंत सरकारची ही आशा शेवटास जाणें बरेंच कठिण आहे. राजे तर शहाणे लागतातच, परंतु त्यांचे सल्लामसलतगार राजांहूनही अधिक शहाणे असावे लागतात. परंतु सरसकट इंडियन लोकांचा आणि त्यांत विशेषतः ब्राह्मणांचा द्वेष करणारे असे जे कोणी सल्लागार आहेत, त्यांच्या डोक्यांत अतिलोभ आणि अतिद्वेष यांनीं शहाणपणाला प्रस्तुत क्वचितच जागा मोकळी ठेवली आहे. अशा स्थितींत पंजाब, बंगाल आणि मद्रास येथील सरकारांप्रमाणेंच मुंबई सरकारचीही दशा होणार अशी फार भीति आहे. इतर इलाख्यांतील सरकारी डोक्यांतील बुद्धिपात पाहून मुंबई इलाख्यांतील लोकांना मोठा अभिमान वाटत होता कीं, आपल्या येथील सरकारनें आपलें डोकें असंख्य चहाडखोरांपासून (टिळक ज्युबिलीखेरीज इतर प्रकरणांत) सुरक्षित ठेवून आपली बुद्धि पतन पावूं दिली नाहीं. परंतु हा अभिमान बाळगण्याला इतःपर जागा उरणार नाहीं, असें टाइम्सचे लेखक लोकांना आश्वासन देत आहेत. टाइम्सचें असें म्हणणें आहे कीं, आमच्या पश्चिम हिंदुस्थानांत, म्हणजे मुंबई इलाख्यांतही शांत डोक्याचे कांहीं पुढारी नाहींत असें नाहीं. ते नेमस्त आहेत. त्यांच्यामध्यें स्वदेशभक्ति नाहीं असें नाहीं, परंतु ते नेमस्त देशभक्त आहेत. 'Sober Patriotism' हा एक नवीन गुण शोधून काढून तो टाइम्सनें या पुढाऱ्यांच्या गळ्यांत अडकवून या युक्तीनें एव्हांपासूनच त्यांना चढवून ठेविलें आहे. आणि मूर्ख लोकांना फूट पाडण्याला एवढीही युक्ति पुरी होते. आपल्याला नेमस्त देशभक्त टाइम्सनें म्हटलें आहे एवढ्याच शिफारशीनें शेफारून जाऊन पुष्कळ लोक आपण जणूं काय साहेबांच्याच रक्तामांसाचे आहों असें मानून आपल्या इतर देशबंधूंवर सापाप्रमाणें उलटून पडण्याला कधींही कमी करणार नाहींत, असें मागील उदाहरणांवरून म्हणण्याला पुष्कळ जागा आहे. मुंबई इलाख्यांतील नेटिव लोकांत आज इतकी फूट पडली, तरी तूर्त इंग्रजी कार्यभाग साधत आहे. नेटिव लोकांपैकीं कांहीं व्यक्तींना अगर एखाद्या वर्गाला जेव्हां छळावयाचें असेल, तेव्हां त्यांच्यापैकीं "शाबास! शाबास! असेंच करावयास पाहिजे होतें! आतां या कृत्यानें आमच्या देशाचें खरें

कल्याण होईल!" असें म्हणणारे कांहीं लोक सरकारच्या पाठीशीं असावे लागतात. असलीं नराधमें मुंबई इलाख्यामध्यें बनवून ठेवण्यासाठींच टाइम्सची ही दूर दृष्टीची तजवीज आहे. तेव्हां पंजाबांत ज्याप्रमाणें आर्यसमाजिस्ट लोकांनीं सरकारच्या तरफदारीचा जाहीरनामा काढला किंवा बंगाल्यांत दरभंग्याचे महाराज काढीत आहेत, तशा नमुन्याचा मॅनिफेस्टो आतां मुंबई इलाख्यांत लोकांच्या सहजस्फूर्तीनें सरकारची न्यायबुद्धि वर्णन करण्याकरितां निघण्याला मुळींच अडचण पडणार नाहीं! येणेंप्रमाणें शत्रूच्या बाजूकडील एक पक्ष आपल्या हाताखालीं घालून टाइम्सकर्ते दुसऱ्या पक्षावर घसरले आहेत. या पक्षाबद्दल टाइम्सचें असें म्हणणें आहे कीं, हा पक्ष ब्राह्मणवर्गामध्यें फार प्रबळ झालेला आहे. या पक्षाचे बेत राज्य उलथून पाडण्याचे आहेत. या वर्गामधून नेहमीं राजद्रोहाच्या नद्या उगम पावून चोहोंकडे पसरत असतात. त्यांचीं भाषा अपशब्दप्रचुर असते, आणि साहसकर्माला उत्तेजन येईल अशा प्रकारचे विचार त्यांत नमूद केलेले असतात. याच पक्षामध्यें या गांवाहून त्या गांवीं नेहमीं फिरणारे कित्येक वक्तेही आहेत, अशी टाइम्सला खबर लागली आहे! व या वक्त्यांचीही एक सुव्यवस्थित संस्था असून तिच्या एकतंत्रानें या वक्त्यांचें काम चाललेलें असतें, अशीही टाइम्सची माहिती आहे! हे वक्तेही सरकारबद्दल द्वेष आणि सरकारी अधिकाऱ्यांबद्दल तिरस्कार वगैरे गोष्टी लोकांच्या मनावर ठसवीत असतात. तसेंच विद्यार्थ्यांचीं मनें बिघडवून त्यांचीं मतें बदलण्याचाही बुद्धिपुरस्सर प्रयत्न चाललेला असतो! युरोपियन स्त्रिया आणि गृहस्थ यांची कुचाळी करावी असें विद्यार्थ्यांना शिकविलें जातें, असेंही टाइम्सचें म्हणणें आहे! ही वरील सर्व विधानें सत्याला सोडून आणि द्वेषाला धरून केलेलीं आहेत हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. युरोपियन स्त्रियांची आणि सभ्य गृहस्थांची टवाळी करण्याला कोणीही विद्यार्थी शिकविला जाणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा जो हल्लीं अंतिम हेतु बनला आहे, तो साध्य करून घेण्याला असल्या हलकटपणाच्या आणि पाजीपणाच्या गोष्टी आवश्यक नाहींत, हें तत्त्व हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांनासुद्धां कळून चुकलेलें आहे. आपलें इष्ट कार्य फार भव्य आहे, व त्या मानानें आपल्या अंगची योग्यताही तशीच भव्य असली पाहिजे, हें तत्त्व न कळण्याइतका अज्ञानदशेमध्यें हल्लीं स्वराज्याचा कोणताही भक्त नाहीं. आपल्याला स्वराज्य पाहिजे

असें मनापासून मानणें हा जर गुन्हा असेल, तर तो गुन्हा अलीकडे प्रत्येक मनुष्य करूं लागला आहे. परंतु त्याच्या सिद्धीसाठीं नीच मार्गाचें अवलंबन करण्याचा गुन्हा करण्याला एकही इंडियन तयार होणार नाहीं, हें अँग्लो-इंडियनांनीं पक्कें समजावें. सत्याचा आणि न्यायाचा धोपट मार्ग खुला असतांना युरोपियन लोकांना आणि त्यांच्या बायकांना पाहून त्यांची टवाळकी करण्यांत कोण आपला कालक्षेप करीत बसणार आहे? तुच्छ गोष्टींकडे तुच्छ दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. बिचाऱ्या युरोपियन स्त्रिया आणि सभ्य गृहस्थ रस्त्यानें एकट्या जावोत अगर टोळीनें जावोत, त्यांच्यापासून स्वराज्य-प्राप्तीवर जोंपर्यंत कांहीं अनिष्ट परिणाम होत नाहीं, तोंपर्यंत त्यांच्याकडे कोण लक्ष द्यावयाला खोळंबलें आहे? परंतु विद्यार्थ्यांच्या मनांत स्वराज्याप्राप्तीची लालसा उत्पन्न झाली आहे याबद्दलच जर कोणाला वाईट वाटत असेल आणि त्या कारणास्तव वड्याचें तेल वांग्यावर काढावयाचें असेल, तर मात्र गोष्ट वेगळी. परंतु असें केल्यानें ती स्वराज्याप्राप्तीची लालसा थांबेल असे मात्र त्यांनीं समजूं नये. ती लालसा तरुण आणि वृद्ध सर्व अंतःकरणांतून उत्पन्न झाली आहे, आणि ती झालीच पाहिजे. ती जेथें उत्पन्न झाली नसेल, तेथें ती उत्पन्न करणें हें प्रत्येक वर्तमानपत्राचें आणि प्रत्येक फिरत्या वक्त्याचें कर्तव्यकर्मच आहे. वक्त्यांनीं आणि वर्तमानपत्रकर्त्यांनीं ही स्वराज्यप्राप्तीची लालसा लोकांच्या मनांमध्यें उत्पन्न न करावी, तर काय करावें? सरकारनें लाला लजपतराय आणि अजितसिंग यांना विनाकारण चौकशीवांचून उचलून हद्दपार केलें म्हणून त्यांनीं सरकारांवर पोवाडे रचावे? किंवा मोर्लेसाहेबांनीं उदार तत्त्वांच्या राज्यपद्धतीची आशा दाखवून अखेरीस जबरदस्तीचीं तत्वें अमलांत आणलीं आणि सर्व लोकांच्या आशेला तोंडघशीं पाडलें याबद्दल ते सत्यवक्ते धर्मराज आहेत असें म्हणून लोकांनीं त्यांच्या-बद्दलचीं स्तोत्रें गावीं? सरकारच्या हातून असलीं अप्रिय आणि अहितकर कृत्यें झालीं म्हणजे वर्तमानपत्रकार त्याबद्दल प्रतिकूल टीका करणारच. आणि ती देखील सरकारनें मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क दिला आहे म्हणून करणार. तेव्हां अशी प्रतिकूल टीका सहन करण्याचें सामर्थ्य ज्या सरकारमध्यें नसेल, त्यानें हा मुद्रणस्वातंत्र्याचा अधिकार लोकांना देण्याच्या भानगडींतच पडूं नये यासारखें सुख नाहीं. मग लोक निःसंशय वर्तमानपत्रांतून कांहींही लिहिणार

नाहींत, मग त्यांना दुसरे उपाय काय सुचतील ते ते करतील. पण आमच्या सरकारला लिबरल सरकार म्हणून लौकिक तेवढा पाहिजे आहे, परंतु पद्धति मात्र रशियन सरकारची योजावयाची आहे! या दोन्ही परस्परविरुद्ध गोष्टी कशा जमाव्या? वास्तविक पाहिलें असतां सरकारचे आणि टाईम्सचे हे प्रयत्न असंतोषाच्या निर्मूलनासाठीं आहेत. परंतु वर्तमानपत्रांवर खटले केल्यानें असंतोष कसा शांत होईल? ब्राह्मणवर्चस्वाच्या केंद्रस्थानच्या वर्तमानपत्रांवर सरकार खटले करीत नाहीं म्हणून कां हिंदुस्थानांतील लोक असंतुष्ट झालेले आहेत? नाहीं, तें अगदीं निराळ्या कारणासाठीं असंतुष्ट झालेले आहेत. त्यांना असें वाटत आहे कीं, "आपलें राज्य आपल्या हातून निघून गेलेलें आहे, व तें इंग्लिशांनीं घेतलें आहे. हिंदुस्थान हा पूर्वीं एकदां आपला स्वतः-चा देश होता आणि त्यांत आपण पूर्णपणें स्वतंत्र होतों. परंतु हल्लीं तेथेंच, आपण परतंत्र झालेले आहों. आणि ज्या इंग्लिशांनीं आपलें राज्य घेतलें आहे ते हिंदुस्थानांतील कोटयवधि रुपये दरसाल स्वदेशांत नेतात आणि फिरून स्वराज्याचे हक्क आपल्याला देण्याची ते यत्किंचितूही आशा दाखवीत नाहींत." असे विचार लोकांच्या मनांत घोळूं लागल्यामुळें लोक असंतुष्ट झाले आहेत. त्याला वर्तमानपत्रकर्ते काय करणार? वर्तमानपत्रकर्त्यांनीं त्यांना सांगितलें कीं, तुमचें राज्य इंग्लिशांनीं घेतले आहे? इंग्लिशांनीं काय चोरून हिंदुस्थानचें राज्य घेतलें आहे कीं ती बातमी वर्तमानपत्रकर्त्यांनीं फोडली नसती, तर हिंदुस्थानांतील लोकांना कळलीच नसती? लाहोर, दिल्ली, आग्रा, काशी कलकत्ता, डाका, झांशी, लखनौ, नागपूर, सिंध, सातारा, पुणें, अर्काट, तंजा-वर वगैरे ठिकाणचीं शून्य राजसिंहासनें, राजवाडे आणि किल्ले इंग्रजांच्या ह्या सत्कृत्याची द्वाही प्रत्यहीं आबालवृद्धांसमोर फिरवीत असतां त्यांना वर्तमानपत्र-कर्त्यांची मदत कशाला पाहिजे आहे? या जुन्या स्वराज्यशून्य देखाव्यांच्या खिन्न आणि उदासीन अशा निःशब्दतेनें इंग्लिशांबद्दल जितका असंतोष उत्पन्न होतो त्याच्या एकशतांशही अतिशय कडक वर्तमानपत्राच्या अतिशय कडक लेखांनीं होत नसेल. १८५७ सालीं लोकांमध्यें अतिशय असंतोष माजला होता. तेव्हां कोणतीं वर्तमानपत्रें होतीं? हिंदुस्थानांतील जुन्या आनुभविक लोकांचें तर असें मत आहे कीं, असंतोष वाढण्यापेक्षां वर्तमानपत्रांनीं उलट त्याची वाफ निघून जाते. याकरितां असंतोषाचीं जीं हीं खरीं कारणें आहेत,

त्यांच्यावर जर सरकारपाशीं कांहीं उपाय असेल तर तो सरकारनें जरूर योजावा. स्वराज्याचे हक्क नाहींत म्हणून लोकांत असंतोष उत्पन्न झाला आहे. सरकारनें स्वराज्याचे हक्क द्यावे म्हणजे लोकांत संतोष उत्पन्न होईल. परंतु तसें न करतां वर्तमानपत्रकर्ते, वक्ते, आणि विद्यार्थी यांच्यावर खटले करीत सुटणें म्हणजे केवळ गैरमुत्सद्दीपणाचें आणि सूड उगविण्याचें लक्षण आहे. सरकारच्या असल्या कृत्यांनीं सरकार आपल्याला जास्त शत्रु मात्र उत्पन्न करून घेत आहे. लाला लजपतराय आणि अजितसिंह ह्यांना हद्दपार केल्यानें किंवा रावळपिंडीच्या पांचपन्नास सभ्य गृहस्थांवर खटले केल्यानें, किंवा बंगाल्यांतील युगांतर, नवशक्ति वगैरे पत्रांवर राजद्रोहाचीं कलमें लागू केल्यानें आपल्याला एक तरी मित्र झाला आहे असें सरकारला वाटतें काय ? असें वाटत असेल तर सरकार निखालस फसत आहे. पंजाबच्या आर्यसमाजानें लाला लजपतरायांच्या विरुद्ध जो मॅनिफेस्टो काढला आहे, त्यावर सरकारचा विश्वास आहे ? त्यांतील एक अक्षरही खरें नाहीं ! बलाढय सरकार क्षुब्ध झालें असेल तेव्हां निःशस्त्र झालेले लोक वाटेल तसा तोंडपुंजेपणा बोलतात म्हणून त्यांत त्यांचें खरें अंतःकरण असतें कीं काय ? असल्या बनावट जाहीरनाम्यांनीं जर ब्रिटिश राज्य बळावत असेल, तर सरकारनें आपल्या पोलिस अधिकाऱ्यांकडून रोज असले जाहीरनामे बनवावे आणि रोज वाचावे ! दरभंग्याचे महाराज जो एक खलिता सरकारच्या सुप्रसन्नतेसाठीं बाबू भूपेंद्रनाथ बोस यांच्या संमतीनें बनवीत आहेत, तो आपल्या उपयोगी पडेल असें सरकारला वाटत आहे ? किंवा लाला लजपतराय यांना चौकशीवांचून हद्दपार केलें असल्याबद्दल मुंबईच्या मेथाप्रभुति मंडळींनीं एका चकारशब्दानेंसुद्धां सभेंत मुंबईची नापसंती प्रदर्शित केली नाहीं म्हणून हे आपले खरे मित्र आहेत असें सरकारला वाटतें काय ? काश्मीरचे महाराज, कोल्हापूरचे महाराज, किंवा बोबिलीचे महाराज यांच्याप्रमाणें तोंडापुरता गोंडा घोळणाऱ्या लोकांचें जें सैन्य आहे त्यांत इंग्लिशांचा खरा मित्र एकही सांपडणार नाहीं. हे सगळे सरकारला फसविणारे आणि त्या फसविण्याबद्दलही स्वार्थाचा मोबदला साधून घेणारे असे लोक आहेत. खरें सांगावयाचें असेल, तर हिंदुस्थानांत जन्मलेला मनुष्य मनापासून इंग्लिशांच्या बाजूचा क्वचितच सांपडेल. बाहेरून कोणी कांहीं बोलोत, परंतु आंतून 'हिंदुस्थान हिंदुस्थानांतील लोकांकरितांच

असलें पाहिजे ' असें प्रत्येकाला वाटत आहे. फार काय, जे आज इंग्लिशांच्या चाकरींत आहेत, त्यांनाही मनांतून असेंच वाटत आहे! आणि पगाराचें बंधन हें कांहीं मोठेंसे टणक दोरखंड आहे असें नाहीं. नेटिव सैन्यांतील लोकांचेही असेच विचार आहेत! आणि ते तसे कां असणार नाहींत? हिंदुस्थान हा काय त्यांचा देश नव्हे? किंवा तो आज त्यांच्या ताब्यांत नाहीं हें काय त्यांना कळत नाहीं? अशी लोकस्थिति आहे आणि ती सरकारला समजली पाहिजे. लोकांचीं मनें बदललेलीं आहेत आणि तीं आतां प्रेस, प्रॉसिक्यूशन्स, सभाबंदी, हद्दपारी, जादा पोलिस किंवा गुरखे शिपाई, यांच्या दटावणीनें थांबावयाचीं नाहींत. अशा प्रसंगीं जे शहाणे राज्यकर्ते असतात, ते प्रजेमधील संतोष वाढवून असंतोष नाहींसा करतात. आमचे इंग्रजी राज्यकर्ते कोणत्या वर्गांतील आहेत, हें त्याच्या कृतीवरून ठरवावयाचें आहे.

---

## इंग्लिशांची परोपकारबुद्धि : : १६

काळ: अग्रलेख, ता. २६-७-१९०७

इंग्लिशांच्यासारखे इमानी राज्यकर्ते दुसरीकडे क्वचितच आढळतील! त्यांनीं एकदां एखाद्या देशाला आपला म्हणून म्हटलें म्हणजे त्याला ते कधींही अंतर देत नाहींत. शुद्ध साधूचीं लक्षणें! ज्या देशावर त्यांनीं एकदां कृपा केली त्या देशाची सर्व चिंता संपलीच म्हणून समजावें. स्वतःच्या सुखाच्या, संपत्तीच्या आणि स्वातंत्र्याच्या त्रिविध तापानें संतप्त झालेल्या लोकांनीं एकदां त्यांच्यावर भार टाकण्याचा अवकाश, मग त्यांनीं स्वस्थ बसावें, इंग्लिश लोक त्यांचें कोणतेही अडूं देत नाहींत. आणि कसाही आपत्काळ आला तरी ते त्यांचें योगक्षेम चालवितात. खुद्द परमेश्वर म्हणून तरी तो याच्यापेक्षां आपल्या भक्तजनांचें जास्त काय करतो? असे परदेशहितकारक राज्यकर्ते लाधण्याला कपाळीं पुण्याई लागत असते. ज्या देशाचें अनेक जन्मार्जित पूर्वसंचित उभे

राहतें त्या देशाचीच असल्या लोकांशीं गांठ पडते, आणि ते तावडतोब त्यांच्या उद्धाराला लागतात! हे साधु लोक परोपकाराकरितां सर्व जगभर गूढ स्वरूपानें पर्यटन करीत असतात, परंतु ज्या लोकांचें पूर्वसुकृत फलोन्मुख होण्याची वेळ आलेली असते, त्यांनाच फक्त यांचें दर्शन घडतें आणि ते सर्व संकटांपासून मुक्त होतात. अलीकडे साधु लोकांवर कोणाचा विश्वास नाहीं. साधु म्हणजे पहिल्या नंबरचे भोंदू असे सर्व लोक समजतात. परंतु इंग्लिशांची गोष्ट तशी नाहीं. त्यांच्या साधुत्वाबद्दलची साक्ष स्वानुभावावरून हिंदुस्थानांतील सर्व लोकांना पटलेली आहे. या साधूंची आणि हिंदुस्थानची गांठ दोन-तीन शतकांपूर्वी अकस्मात् पडली. भूतांची दया हेंच संतांचें भांडवल होय असें जे आपल्या इकडील एका कवीनें म्हटलें आहे, त्याप्रमाणें त्या भांडवलावर व्यापार करण्याकरतां हे साधु हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं प्रथमतः दिल्लीच्या बादशहावर दया केली, आणि तेथून त्यांनीं हळूहळू सुरतेस आपला एक मठ स्थापन केला, व त्या मठांतून त्यांनीं आपला परोपकाराचा व्यापार सुरू केला. हिंदुस्थानांतील लोक संपत्तीमध्येंच मग्न झाले आहेत आणि त्यांना वैराग्य म्हणजे काय हें माहीतसुद्धां नाहीं असें पाहून त्या सज्जनांचें अंतःकरण गहिंवरून आलें, आणि हिंदुस्थानांतील लोक स्वतंत्रतेच्या दुर्दशेमध्यें लोळत पडलेले पाहून ते कृपाघन अगदीं पाझरून गेले. तेव्हां पतितोद्धारासाठीं त्यांनीं आपलें प्रयत्न सुरू केले. परंतु सज्जन म्हटला कीं त्याच्या पाठीमागें दुर्जन असावयाचाच. एकनाथाचा पैठणच्या ब्राह्मणांनीं काय थोडा छळ केला! आणि तुकारामबुवांच्या वाटेंत मंबाजीबुवा किती वेळ आडवा आला, हें कोणाला माहीत नाहीं? तीच दशा इंग्लिशांची झाली! या साधूंचा छळ करण्याकरितां शिवाजी, डुप्ली, सुराजउद्दवाला, मिरजाफर, चेतसिंग, अयोध्येच्या बेगम, हैदर, टिपू, शिंदे, होळकर, पेशवे, नाना फडणीस, रणजितसिंह, नानासाहेब, लक्ष्मीबाई वगैरें अनेक दुर्जन त्यांच्या मार्गांत आडकाठ्या आणूं लागले. परंतु साधूच ते! ते काय असल्या संकटांना जुमानतात! त्यांनीं निश्चय केला कीं, "कोणी निंदा कोणी वंदा! आपुला स्वहिताचा धंदा!" त्यांनीं एकदां हिंदुस्थानला आपलें म्हटल्यावर ते त्याची उपेक्षा कशी करतील! त्यांनीं हिंदुस्थानाला शिवाजीपासून बचाविलें, पेशव्यांपासून वांचविले, अकबराच्या भितीपासून मुक्त केलें, धनमदाच्या वाईट परि-

णामाची धास्ती उरू दिली नाहीं, आणि स्वराज्यांत व स्वातंत्र्यांत उत्पन्न होणाऱ्या असंख्य काळज्या त्यांनीं दूर पिटाळून लाविल्या! आतां हिंदुस्थानांतील लोकांना त्यांनी कांहीं करावयाचें ठेविलें नाहीं. त्यांनीं खुशाल सारा दिवसभर 'हरि हरि' म्हणत बसावें, अशी त्यांनी त्यांची सुस्थिति करून सोडली आहे! शिवाय शमदमादिक जीं शांतपणाचीं लक्षणें तीं त्यांनीं हिंदुस्थानांत पूर्णपणें बिंबवून ठेविलीं आहेत.

परंतु ह्यावरून कोणी असें समजूं नये कीं, शमदमाखेरीज बाकीचीं कोणतींच ऐहिक सुखें हिंदुस्थानांतील लोकांनीं भोगूं नयेत अशी इंग्लिश लोकांची इच्छा आहे. हळूहळू त्यांना सर्व ऐहिक सुखेंही ते उपभोगूं देत आहेत. थोडेंसें बेताबाताचें आणि नेमस्तपणाचें, अजीर्ण न होईल इतक्या तऱ्हेचें लोकांनीं जेवण जेवण्याला त्यांचीं कांहीं हरकत नाहीं! तसेंच द्रव्यासंबंधानें देखील. हिंदुस्थानांतील लोकांनीं द्रव्य बाळगूच नये असा कांहीं त्यांचा आग्रह नाहीं. हलकट दर्जाच्या सगळ्या जागा त्यांनीं सरसकट खुल्या करून ठेविल्या आहेत. आणि स्वराज्य देखील हिंदुस्थानांतील लोकांना नसावें असें त्यांचें बिलकूल मत नाहीं. फार काय, पण ते स्वतः आपण होऊन हिंदुस्थानांतील लोकांना स्वराज्य देणार आहेत! पण त्याला योग्य वेळच येत नाहीं! योग्य वेळ आल्यावर ते स्वराज्य देण्याला देखील कधीं सोडणार नाहींत! पण ती योग्य वेळ इंडियन लोक कधीं आणणार आहेत कोण जाणे! तरी पण तोंपर्यंत इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांत कोणतीही कमतरता नसावी म्हणून इंडियन लोकांच्या सर्व हौशी इंग्लिश लोक आपलेकडून पुरवीत आहेत. इतर देशांतील इतिहास वाचून हिंदुस्थानांतील लोकांना असें वाटूं लागलें आहे कीं, आपल्या देशालाही कोणी तरी देशभक्त असले पाहिजेत. आणि हिंदुस्थानच्या सर्व गरजा भागविण्याचा आणि सर्व हौशी पुरविण्याचा पत्कर इंग्लिशांनीं घेतला असल्यामुळें, हिंदुस्थानच्या इतिहासांतील ही उणीव भरून काढण्याकडे इंग्लिशांनीं हल्लीं आपलें लक्ष पोंचविलें आहे. हिंदुस्थानांत व्यापार नाहीं, इंग्लिश लोक आपल्या घरचा कोट्यावधि रुपयांचा माल आणून हिंदुस्थानाच्या बाजारांत मांडीत आहेत. हिंदुस्थानांत शूर शिपाई नाहींत, इंग्लिश लोक आपल्या सोजिरांच्या पलटणी नवीन नवीन तयार करून हिंदुस्थानांत पाठवीत आहेत! हिंदुस्थानांत करारी,

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रमांक
अनुक्रम ७३६९२ ...... दि: १९५९
१८८०
नों: दि: २८-२-


बुद्धिमान अंमलदार नाहींत, इंग्लिश लोक आपल्या देशांतील अगदीं कातड्याचें काम करणारापासून तों थेट लॉर्ड लोकांपर्यंत, चलाख आणि रद्दड, सरसकट सर्व लोकांना आपल्या घरांतून काढून हिंदुस्थानांत मोठमोठ्या दर्जाच्या जागांवर पाठवीत आहेत. कोणींकडून तरी हिंदुस्थानाला कांही कमीं पडूं नये ही मनांतील इच्छा. हल्लीं स्वदेशहिताकरितां संकटे सोसणाऱ्या आणि आत्मयज्ञ करणाऱ्या लोकांची संख्या कमी आहे असें वाटून इंग्लिशांनीं ती उणीव भरून काढण्याकडे आपलें लक्ष पोंचविलें आहे, असें दिसतें आणि म्हणूनच ते हल्लीं कित्येकांवर खटले करीत आहेत. इतक्या सगळ्या खटपटी करून शेवटीं एकदांचे हिंदुस्थानांतील लोक स्वराज्याकरितां तयार व्हावे, एतदर्थ इंग्लिशांची ही सर्व खटपट आहे. इंग्लिशांनीं पाहिलें कीं, इंडियन लोक मोठे आळशी आणि अतिशय सोशिक आहेत. नुसती परतंत्रता हें त्यांना दुःखच नसून त्यांतच कित्येकांना भूषणही वाटूं लागलें आहे. याकरितां त्यांना तुरुंगाच्या शाळेच्या आंत आणि मुलांना शाळेच्या तुरुंगाच्या बाहेर ढकलून अतिशय चिडविलें पाहिजे. सर्प चिडविल्यावांचून फणा वर काढीत नाहींत आणि लांकडें घर्षणावांचून ज्वाळा बाहेर टाकीत नाहींत, हें तत्त्व लक्षांत आणून इंग्लिश लोक हल्लीं हळूहळू आपल्याला स्वराज्याच्या हक्काला योग्य करीत आहेत. आणि ते मोठे करारी, चिकाटीचे, दृढनिश्चयी आणि दीर्घोद्योगी असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नांना यश आल्यावांचून कधींही रहावयाचें नाहीं, अशी फार भीति आहे !

परंतु स्वराज्याच्या योग्यतेचे प्रयत्न हे नेहमीं दोन्ही बाजूंनीं व्हावयाला पाहिजे असतात. एकट्या इंग्लिशांनींच बिचाऱ्यांनीं सदा सर्वकाळ किती खटपट करावी ! आपणही आपल्या बाजूनें त्यांना थोडा हातभार लाविला पाहिजे. मात्र दोघांच्या प्रयत्नांच्या वेळा अर्थातच भिन्न भिन्न होणार. त्यांना जी वेळ योग्य वाटेल तीच आपल्याही सोईची होईल असें नेहमींच जमणार नाहीं. त्यांना तरी सर्व वेळा सोईच्या कोठें असतात ? चार-पांच वर्षांच्यापूर्वी ट्रान्सवालच्या लढाईत इंग्रजी सैन्य आणि कारखान्यांत इंग्रजांचे मुत्सद्दी जेव्हां चिंतातुर होऊन गेलेले होते, त्या वेळीं गुन्ह्यावांचून चौकशी आणि चौकशीवांचून हद्दपारी इत्यादि युक्त्यांनीं चिडवून इंडियन लोकांना स्वराज्याकरितां लायक करून सोडण्याला इंग्लिशांना तरी कोठें फुरसत होत होती ?

हल्लीं हिंदुस्थानांत जी अस्वस्थता आहे तीच बोअर लढाईचे वेळींही होती. असंतोषाचा पारा हल्लीं जर शंभर डिग्रीवर चढलेला असेल तर १९०१।२ सालां-तही तो बहुतेक तितकाच वर चढलेला होता. असें असून त्या वेळीं कोणी रशियन अधिकाऱ्यांनीं कांहींसुद्धां गडबड कां केली नाहीं ? आणि तेव्हां इंडियन पुढाऱ्यांना चौकशीवांचून हद्दपार करण्याचे हुकूम स्टेट सेक्रेटरी-साहेबांनीं तरी कां सोडले नाहींत ? प्रत्येक जण आपआपली संधि पाहत असतो. आणि फक्त मूर्ख मनुष्य मात्र दुसरे आपल्या योग्य संधीचा फायदा घेत असतां अवेळीं आवेशाला चढून विनाकारण फसतात. याकरितां प्रत्येकानें आपल्याला योग्य संधि कोणती आहे हें पाहूनच प्रयत्न केले पाहिजेत. बोअर लढाईचे वेळीं हिंदुस्थानांत असंतोष नव्हता असें नाहीं; किंवा तो दाबून टाकण्याला बलाढ्य इंग्लंडपाशीं सामर्थ्य नव्हतें असेंही नाहीं. तरी पण एकीकडे आपला हात दगडाखालीं सांपडला असतां हिंदुस्थानांतील असंतोष जास्त वाढवून घेण्याला धूर्त इंग्लिश लोक तेव्हां तयार नव्हते. हल्लीं इंग्लंडची बोअर लोकांशीं चाललेली लढाई संपली आहे, आणि इंग्लंडचा मित्र जो जपान देश त्यानें रशियाचा पराभव केल्यामुळें वायव्येकडील सरहद्दीवरील रशियन स्वारीचीही इंग्लिशांची भीति नाहींशी झालेली आहे आणि या परिस्थितीमुळें हद्दपारी, सभा-बंदी, क्षुल्लक फिर्यादी वगैरे पोरखेळ करण्याला इंग्लिशांना फावलें आहे. इंग्लि-शांना असल्या गोष्टी करण्याला ही निःसंशय मोठी योग्य संधि सांपडली आहे. परंतु इंग्लिशांना जी योग्य संधि, ती त्यांच्या अंमलाखालील इतर लोकांना नेहमीं अयोग्य संधि होय, हा राजकारस्थानांतील सिद्धान्त पाश्चिमात्य लोकांनीं केव्हांच ठरवून टाकलेला आहे. उदाहरणार्थ, इंग्लंडला जी संधि तीच आपली संधि असें आयर्लंड कधींही मानीत नाहीं; उलट 'England's difficulty is our opportunity' असें आयरिश लोक म्हणत असतात. इंग्लंड जेव्हां पेंचांत सांपडलें असेल, तेव्हां ती आपली योग्य संधि होय, हें तत्त्व आयर्लंड-मधील लहान मुलांनादेखील माहीत झालेलें आहे. आयर्लंडला जर कांहीं करावयाचें असतें, तर त्यानें इंग्लंड बोअर लढाईमध्यें गुंतलें होतें त्याच संधीचा फायदा घेतला असता; व हल्लींही कित्येक आयरिश लोक दुसऱ्या एका भावी संधीसाठीं टपून बसले आहेत, असे तिकडील कांहीं पत्रांच्या धोरणावरून दिसत आहे. जगाचें राजकीय वातावरण अलीकडे पुष्कळ दिवस निरभ्र होतें. त्यांत

हल्लीं लहान लहान ढग उत्पन्न होऊं लागले आहेत व ते फार दुश्चिन्हकारक आहेत. जपान आणि सॅनफ्रान्सिस्को यांची धुसफूस बरेच दिवसांपासूनची आहे. तिची ज्वाळा फारशी मोठी भडकेल असा कोणाचाही अजमास नव्हता. परंतु मदांध झालेल्या राजांवर परमेश्वर संकट कोणीकडून आणतो याचा कांहीं नेम नाहीं. तूर्त या भांडणाची मजल इतकी येऊन ठेपली आहे कीं, अमेरिकेची लढाऊ गलबतें पॅसिफिक महासागरांत नांगर टाकण्याच्या बेतांत असून जपानी लोक अमेरिकन मालाला बहिष्कार घालण्याच्या विचारांत आहेत. पॅसिफिक महासागरांत ही लढाई जुंपली, तर ॲटलांटिक महासागरांतील अमेरिकेच्या हक्कांच्या संरक्षणासाठीं अमेरिकेशीं मित्रभावानें वागणाऱ्या जर्मनीच्या लढाऊ गलबतांवरील तोफा इंग्लंडवर शिस्त धरतील, असा फार संभव आहे, आणि येणेंप्रमाणें योग जुळून आला तर या भयंकर लढाईच्या भोंवऱ्यांत सांपडून इंग्लंड गरगर फिरूं लागल्यावांचून दुसरें गत्यंतरच नाहीं. ती आपली संधि आहे, असे आयरिश लोक म्हणत आहेत.

परंतु कोणत्याही लढाईपासून जगाचें कधींही खरें हित झालेलें नाहीं. त्यामुळें इंग्लंड या लढाईमध्यें न सांपडावें असें आम्ही मनापासून इच्छितों. कारण, हिंदुस्थानांत आपल्या पाठीमागें असंतोषाची इतकी आग पेटवून ठेवून जर्मनीसारख्या शत्रूच्या लढाईत इंग्लंडनें उडी घेणें कधीं तरी समंजसपणाचें होईल काय ? बंगाल विभागलेला, बाबूलोक मुसलमानांच्या विरुद्ध चवताळलेले, लाला लजपतराय आणि सरदार अजितसिंग हद्दपार झालेले, सभा भरविण्याची बंदी, वर्तमानपत्रांचीं तोंडें बंद केलेलीं, शाळेंतील मुलें शाळांतून काढून टाकलेलीं आणि एकंदर लोक असंतोषाच्या आणि उपासमारीच्या शेवटच्या पायरीवर गेलेले. अशा स्थितीमध्यें हिंदुस्थान असतांना इंग्लंडचें जर्मनीशीं युद्ध सुरू होईल तर पाठीमागें हिंदुस्थानांत काय होईल आणि काय न होईल याचा कांहीं नेम नाहीं. अशी आपल्या अडचणीची संधि इंग्लंडनें हिंदुस्थानला घेऊं देणें ही गोष्ट इंग्लंडच्या मुत्सद्दीपणाला काळिमा लावणारी होईल. याकरितां कांहीं प्रख्यात आणि ठळक लोकांचें जें एक कौन्सिल नेमण्याचें आमिष मिंटो आणि मोर्ले यांनीं पुढें आणलें आहे, ती फार चांगली युक्ति आहे. हिंदुस्थानांतील प्रख्यात आणि ठळक माशांपैकीं कांहीं जण तरी आपल्या माना या गळामध्यें ओवून घेतल्यावांचून कधींही राहणार नाहींत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !

# प्रतिनिधींच्या बहुमतानें अध्यक्षांची निवड : १७

काळ : अग्रलेख, ता. १३-१२-१९०७

● रासबिहारी घोष यांना सुरत कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडण्यांत आल्यामुळें राष्ट्रीय विचारांच्या लोकांमध्यें कॉंग्रेसच्या सूत्रधारांबद्दल विश्वास राहिला नाहीं. लो. टिळक अध्यक्ष व्हावेत असा लेख काळकर्त्यांनीं यापूर्वीं लिहिला होता. त्यानंतर लाला लजपतराय यांची सुटका झाल्यामुळें त्यांना अध्यक्ष करावें असें मत तयार झालें होतें. या दोघांपैकीं कोणीही अध्यक्ष करा-पण तो नियुक्त प्रतिनिधींच्या बहुमतानें करा, असा राष्ट्रीय पक्षाचा आग्रह होता. लोकांचे हक्क जुमानले नाहींत म्हणजे दंडेली होते-ती सुरतेस झाली.

हिंदुस्थानांत कॉंग्रेस उत्पन्न होऊन हल्लींचें हें तेविसावें वर्ष सुरू आहे. इतक्या वर्षांत दरसाल कॉंग्रेसमधील अग्रस्थानाच्या खुर्चीवर कोणी तरी अध्यक्ष बसत आलेलाच आहे. परंतु इतके दिवस या गोष्टीकडे कोणाचें फारसें लक्ष गेलेलें नव्हतें. जे कोणी अध्यक्ष निवडण्याचें काम करीत त्यांनीं निवडलेला अध्यक्ष सर्व राष्ट्र कबूल करीत असे, आणि कॉंग्रेसचें काम सुरळीतपणें पार पडे. परंतु अलीकडच्या या दोन-तीन वर्षांत मात्र अध्यक्षांचा हा प्रश्न जितक्या महत्त्वाचा, तितकाच भानगडीचाही तो होऊन बसला आहे. इतके दिवसपर्यंत कॉंग्रेसच्या कामाचीं सूत्रें हालविणारा अध्यक्ष निवडून देण्याची जी पद्धत अंमलांत होती ; ती कॉंग्रेस एकवीस वर्षांपूर्वींच्या अज्ञानावस्थेमध्यें असल्यामुळें कदाचित् सयुक्तिक असेल. एकवीस वर्षांच्या पूर्वींच्या अज्ञानावस्थेंत अज्ञानाच्या पालकांनीं अज्ञानाची सर्व कांहीं व्यवस्था नीटनेटकी लावून देणें हें ठीकच होतें ; व त्याबद्दल त्याचे आभार मानणेंही जरूर आहे. परंतु आतां

एकवीस वर्षांच्या कायदेशीर इयत्तेच्या दृष्टीनें कॉंग्रेस सज्ञान अवस्थेंत आल्यानंतर तिनें आपल्या जुन्या पालकांपासून कृतज्ञतापूर्वक आणि आभारपूर्वक आपले हक्क आपल्या हातांत घेण्याची इच्छा प्रदर्शित केली, तर त्यांत कांहीं गैरवाजवी होणार आहे असे नाहीं. इतके दिवसपर्यंत कॉंग्रेसमधील कित्येक सूज्ञ पुढाऱ्यांच्या सल्लयानें ठिकठिकाणच्या रिसेप्शन कमिट्या अध्यक्षांची निवड करीत असत. परंतु ही पद्धत फारशी चांगली उपयोगी पडूं शकत नाहीं, असें अलीकडच्या दोन तीन वर्षांच्या खडतर अनुभवावरून दिसून येऊं लागलें आहे. विशेषतः यंदांच्या वर्षी जे इष्ट आणि अनिष्ट प्रकार घडून येत आहेत, त्यांवरून तर या अध्यक्ष निवडण्याच्या पद्धतीमध्यें कांहीं तरी फेरबदल केलेच पाहिजेत, असें प्रत्येक समंजस आणि शांतताप्रिय मनुष्याला वाटूं लागणें अगदीं स्वाभाविक आहे. आणि अशा दृष्टीनें पाहतां आम्ही सर्व लोकांच्या विचाराकरितां जी अध्यक्षांच्या निवडणुकीची पद्धत येथें सादर करीत आहों, तिच्याविषयीं त्यांचें अनुकूल मत पडेल अशी आम्हांला आशा आहे.

हिंदुस्थानची नॅशनल कॉंग्रेस ही वस्तुतः हिंदुस्थानांतील लोकांची होय. सबब त्या सभेचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार प्रथमतः हिंदुस्थानांतील लोकांकडेच येतो. परंतु सर्व लोक कॉंग्रेसमध्यें येऊं शकत नाहींत व येतही नाहींत. त्यांच्या वतीचे प्रतिनिधि मात्र कॉंग्रेसमध्यें येतात. म्हणून अध्यक्ष निवडण्याचा मूळचा जो सर्व लोकांचा हक्क तो त्यांच्या प्रतिनिधींना प्राप्त होतो. अशा रीतीनें एखाद्या वर्षीच्या राष्ट्रीय सभेचे जितके प्रतिनिधि होतील तितक्यांना वास्तविकपणें आपला अध्यक्ष निवडण्याचा हक्क पोंहोचतो. पण हा हक्क फार व्यापक होतो. हिंदुस्थानच्या इतक्या सर्व निरनिराळ्या प्रांतांतील प्रतिनिधींचीं मतें गोळा करून निकाल करण्याला जीं कांहीं अंतर्व्यवस्थेचीं साधनें पाहिजेत, तीं आज कॉंग्रेसपाशीं नाहींत. त्यामुळें सगळ्या प्रतिनिधींचीं मतें घेतां येणें शक्य होणार नाहीं. सगळ्यांचीं मतें घेणें हा पहिला व उत्तम मार्ग जर कांहीं उपायांनीं शक्य होत असेल, तर तो स्वीकारण्याला कोणतीच हरकत नाहीं. परंतु शक्याशक्यतेच्या अडचणींमुळें सर्व हिंदुस्थानांतील प्रतिनिधींच्या मताधिक्याप्रमाणें अध्यक्ष निवडण्याची ती व्यापक बाजू कांहीं काळपर्यंत सोडून देणें अपरिहार्य आहे. शिवाय ज्यांचा पैसा त्यांना मत

देण्याचा हक्क, हाही एक न्याय अर्वाचीन व्यवस्थेमध्यें प्रधान म्हणून गणला गेलेला आहे. त्याप्रमाणें हल्लींच्या पद्धतीनें हिंदुस्थानांतील एक एक प्रांतच एकेक वर्षी सर्व खर्च आपल्या शिरावर घेऊन कॉंग्रेस भरवीत असतो, हें सर्वांना माहीतच आहे. तेव्हां ज्या वर्षी जो प्रांत कॉंग्रेसचा खर्च आपल्या शिरावर घेईल त्या वर्षी त्या प्रांतांतील लोकांच्या प्रतिनिधींना त्या वर्षीचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार असावा, असें ठरविल्यास त्यांत कांहीं गैर-वाजवी होणार नाहीं. अध्यक्ष निवडण्याचा हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा हक्क त्यांच्या सर्व प्रतिनिधींना, आणि त्या प्रतिनिधींचा हक्क (इतकीं मतें गोळा करणें अशक्य असल्यामुळें) फक्त जेथें कॉंग्रेस भरावयाची त्या प्रांतांतील प्रतिनिधींना प्राप्त झाल्यानंतर, त्यांच्या मताधिक्याप्रमाणें अध्यक्षाची निवड व्हावी हें अगदीं सरळ आणि न्यायाला धरून आहे. अशी व्यवस्था झाली तर पक्षाभिमानाच्या तंट्यांना आणि भांडणांना जागाच उरणार नाहीं. वरील पद्धतीप्रमाणें नैसर्गिक रीतीनें प्रत्येक प्रांतांतील लोकांच्या प्रतिनिधींना प्राप्त होणारे हक्क आजपर्यंत कोणी तरी लोक स्वतःच्या बळजबरीनें किंवा दुसऱ्यांच्या अज्ञानामुळें बळकावून बसलेले असल्याकारणानें अध्यक्षाच्या निवडणुकीचें साधे प्रश्नही अलीकडे अतिशय विकोपाला जाऊं लागले आहेत. आणि या प्रश्नांचा जर राष्ट्रांतील विचारी लोकांनीं लवकरच कांहीतरी निकाल लावला नाहीं, तर हे वाद यंदापेक्षां पुढल्या वर्षी आणि पुढल्यापेक्षां त्याच्या पुढल्या वर्षी जास्त माजून विनाकारण आपसांतील एकी (जिची आज अत्यंत आवश्यकता आहे ती) नष्ट होऊन दोघांच्या तंट्यावर आपलें हित साधून घेतलेल्या आणि घेणाऱ्या इंग्लिशांचा मात्र डाव मधल्यामधें चांगला साधेल ! म्हणून दुसऱ्या कशाकरितां नसेल तर निदान या कारणाकरितां तरी अध्यक्षाची निवड इतःपर जेथें कॉंग्रेस असेल त्या प्रांतांतील प्रतिनिधींच्याच बहुमतानें होणें अवश्य आहे.

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका वगैरेसारखे जे देश आहेत तेथेंही त्यांचे अध्यक्ष असतात, व तेही अशाच रीतीनें म्हणजे मतदारांच्याच मताधिक्यानें निवडले जातात. ती पद्धत आपण उचलण्याला शिकलें पाहिजे. हल्लीं नेमस्त आणि जहाल, राजनिष्ठ आणि देशनिष्ठ, हिंदु आणि मुसलमान असे आपल्या-मध्यें अनेक मतमूलक आणि जातिमूलक पक्ष निघाले आहेत. आणि या

पक्षांच्या चढाओढीमुळेंच अंशतः प्रस्तुत वाद सुरू झाले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे जे पक्ष एकदां उत्पन्न झाले आहेत, ते आतां कोणालाही बंद करतां यावयाचे नाहींत. तरी पण त्यांचे तंटे राष्ट्रीय विनाशाच्या मजलेपर्यंत जाऊं न देतां त्यांना योग्य मर्यादेंत ठेवणें आवश्यक आहे. या नवीन उद्भवणाऱ्या भिन्नभिन्न पक्षांच्या अंगांत जो जोम उत्पन्न होत आहे, त्याला विवक्षित मर्यादेंत मनसोक्त बागडण्याला मुभा दिली असतां तो बाहेरच्या प्रदेशांत मग फारशी नुकसानी करणार नाहीं, असें संभवनीय आहे. याकरितां राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या जागेसाठीं जे उमेदवार म्हणून पुढें आणावयाचे ते आणण्याच्या कामांत या सगळ्या पक्षांना पूर्णपणें मोकळीक असावी. प्रत्येक पक्षानें पाहिजे तर आपला उमेदवार पुढें उभा करावा, व येथपर्यंत पक्षाभिमानाची मजल अव्याहत असूं द्यावी. परंतु याचा पुढील शेवटचा निकाल मात्र पूर्णपणें प्रतिनिधींच्या मताधिक्यावर अवलंबून असावा. आजपर्यंत एकंदर बावीस वेळां अध्यक्ष नेमले गेलेले आहेत; त्यांच्यांतील सामान्य आणि विशेष गुण लक्षांत घेऊन विचार केला असतां शिक्षण, संपत्ति, सन्मान, समाजांतील योग्यता, सार्वजनिक कामाविषयींची तत्परता, स्वराज्याच्या प्राप्तीविषयींची उत्कट इच्छा, इत्यादि गुणांच्या बाबतींत आपण अध्यक्षाच्या जागेकरितां जो उमेदवार म्हणून उभा करावयाचा तो कशा दर्जाचा असला पाहिजे याच्याबद्दलची बरोबर कल्पना लोकांच्या लक्षांत येणें फारसें कठिण आहे असें नाहीं. तशा प्रतीचे उमेदवार निरनिराळ्या पक्षांनीं आपापल्या वतीनें उभें करावे. इतकी मोकळीक त्या त्या पक्षांना मिळाल्यास त्यांच्याही समाधानाला या व्यवस्थेंत पूर्ण जागा राहील, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

अशा रीतीनें उमेदवार पुढें आले म्हणजे आपल्याला निवडणुकीकरितां योग्य ते उपाय योजणें त्यांना जरूरच पडणार आहे आणि त्यांनीं आपापलीं विशिष्ट मतें मतदार लोकांमध्ये सांगत फिरणें आणि त्याविषयींचा उपदेश करणें हें ओघालाच येणार आहे. रूझवेल्ट, ब्रायन, ग्लॅडस्टन, चेंबरलेन वगैरेसारखी मंडळी इतर देशांत निवडणुकीच्या उद्देशानें देशांतून संचार करीत फिरलेली आहेत, अशी सुधारलेल्या राष्ट्रांतील उदाहरणें आपल्या इकडील लोकांना माहीत नाहींत असें नाहीं. त्या धर्तीवर इकडील अध्यक्षांच्या जागे-

करतां उभे राहिलेले उमेदवार आणि त्यांच्या त्यांच्या पक्षांतील इतर मंडळी जर स्वमतप्रसारार्थ निवडणुकीच्या प्रदेशामध्यें संचार करण्याकरितां निघाली तर त्यापासून लोकांना अतिशय उत्कृष्ट प्रकारचें राजकीय शिक्षण मिळणार आहे आणि त्याची किंमत सगळ्यापेक्षां जास्त आहे. कोणी तरी लोक कोणा तरी मनुष्याला अध्यक्ष निवडतात आणि तो अध्यक्ष दोन तीन दिवसांत कांहीं तरी गडबड-गुंडा करतो, असा हल्लींचा प्रकार आहे. हा फारसा इष्ट नाहीं. आपण ज्याला अध्यक्ष निवडणार त्याचीं मतें काय आहेत आणि तो आपल्या देशाच्या भावी उन्नतीला कोणतें वळण लावणार हें लोकांना समजावें आणि लोकांची कशी स्थिति आहे आणि त्यांना कोणत्या राजकीय महत्त्वाकांक्षा शिकविल्या पाहिजेत, हें अध्यक्ष होणाऱ्या माणसांना समजावें, अशी योजना झाल्यास ती फारच उत्कृष्ट होईल. कारण, लोकशिक्षणाचें काम यांत अनायासानें होईल. अध्यक्ष कोणीही होवो, परंतु राष्ट्रांतील लोकांपुढें सर्व बाजू मांडल्या जाऊन त्यांना आपल्या राजकीय परिस्थितीविषयीं आणि भावी उन्नतीच्या मार्गाविषयीं विचार करण्याची संवय लागेल, या फायद्याची बरोबरी दुसऱ्या कोणालाही करवणार नाहीं. ज्याचीं मतें लोकांना जास्त पसंत पडतील, त्याच्या बाजूनें प्रतिनिधींचें मताधिक्य जास्त पडून तो अध्यक्ष निवडून येईल, आणि यांत कोणालाच तंट्याला जागा राहणार नाहीं. देशांत जितके जास्त चांगले लोक बनतील तितके आज आपल्याला पाहिजे असल्याकारणानें होतां होईल तोंपर्यंत जुने अध्यक्षच फिरून फिरून न निवडतां दरवर्षी नवीन नवीन अध्यक्ष निवडण्याची पद्धत ठेवणें अत्यंत इष्ट आहे.

याप्रमाणें उमेदवार उभे राहून त्यांनीं आपापले राजकीय विचार लोकांच्या पुढें मांडले म्हणजे नंतर मग त्या प्रांतांतील लोकांच्या प्रतिनिधींनीं आपलें मत देण्याचा प्रश्न पुढें येतो. या ठिकाणीं लोकांचे प्रतिनिधि कोण असावेत या प्रश्नाचाही उलगडा होणें अवश्य आहे. कॉंग्रेसचे डेलिगेट होण्याला असुकच पात्रता असावी अशाबद्दलचे नियम करण्याची वेळ आली आहे, असें खुद्द कॉंग्रेसलाही अद्यापि वाटत नाहीं. तरी पण जेथें कॉंग्रेस व्हावयाची त्या प्रांतांत तेथील प्रतिनिधींच्या मताधिक्यावर अध्यक्षांची निवड अवलंबून असावयाची असल्याकारणानें तेथें कांहीं निर्बंध असला तर वाईट नाहीं. आणि अशा दृष्टीनें पाहिलें असतां मागच्या सर्व राष्ट्रीय सभांमधील प्रतिनिधि,

बॅरिस्टर, सॉलिसिटर्स, वकील, कोणत्या युनिव्हर्सिटीचे ग्रॅज्युएट, डॉक्टर, मेडिकल प्रॅक्टिशनर, एंजिनियर, सरदार, जहागिरदार, इनामदार, ऑनररी मॅजिस्ट्रेट, ज्यूरर, असेसर, लवाद, पेन्शनर्स, निरनिराळ्या धर्मपंथांतील मुख्य, म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांमधील लोकनियुक्त सभासद, वर्तमानपत्रकर्ते, व्यापारी, कांहीं नियमित इयत्तेवर शेतसारा आणि इन्कमटॅक्स देणारे वगैरे लोक हे प्रतिनिधि होण्याला लायक असावेत असा नियम जरूर वाटल्यास करतां येण्यासारखा आहे. परंतु या नियमानें किंवा या नियमाशिवाय, जाहीर सभेमध्यें जे कोणी प्रतिनिधि निवडले जातील त्यांना अध्यक्ष निवडण्याचा अधिकार असावा. व जेथें कॉंग्रेस भरावयाची असेल तेथें मतें तपासून मोजण्याकरितां आगाऊ नेमून ठेवलेल्या कमिटीकडे त्यांनीं आपली मतें कोणत्या तरी ठराविक तारखेच्या आंत पत्रद्वारें पाठवावीं व त्यांचीं मतें जमेस धरली जाण्याकरितां त्यांनीं आपल्या व्होटिंग पेपरबरोबर प्रतिनिधीची जी ठरलेली फी असेल तीही पाठविली पाहिजे. ज्यांची फी येईल त्यांचींच मतें मोजलीं जातील, हा नियम मात्र अगदीं कडक रीतीनें अंमलांत आणला पाहिजे. असें केल्यानें कॉंग्रेसच्या खर्चाकरितां पैसे जमविण्याचा जो त्रास पडतो तो पुष्कळ अंशीं नाहींसा होईल, निरनिराळे पक्ष आपल्या बाजूचा अध्यक्ष निवडून यावा म्हणून जितकी जितकी जास्त खटपट करतील तितके तितके कॉंग्रेसच्या खजिन्यांत प्रतिनिधींच्या फीचे पैसे जास्त जमा होतील, व त्या पैशांतून कॉंग्रेसचा खर्च भागून इतरही कित्येक लोकोपयोगी कामें करतां येतील. प्रतिनिधींची जी फी असेल त्याच्या पांचपट किंवा त्याहून अधिक रक्कम देणारास रिसेप्शन कमिटीच्या सभासदाचा मान असावा. परंतु त्यांना अध्यक्षांच्या निवडणुकीमध्यें मत मात्र एकच असावें. प्रतिनिधि निवडण्याच्या सभा मात्र डिसेंबरमध्यें भरणाऱ्या कॉंग्रेसच्या तयारीला पूर्ण अवकाश मिळण्याकरितां आक्टोबरमध्येंच पार पाडणें जरूर आहे. म्हणजे आपला चालू सालचा अध्यक्ष कोण, रिसेप्शन कमिटींतील सभासद कोण, आणि प्रतिनिधींच्या फीचे पैसे किती गोळा झाले आहेत, याचा उलगडा होऊन वर्किंग कमिटीला कामाला लागण्याला अडचण पडणार नाहीं. या प्रतिनिधि निवडण्याच्या सभा तालुक्याच्या व तालुक्यापेक्षां अधिक दर्जाच्या गांवांतून भरवाव्या, व आसपासच्या खेडेगांवांतीलही लायक लोक ह्या सभांतून प्रतिनिधि म्हणून निवडले जावेत. आक्टोबरअखेरीस

अध्यक्षांची निवड झाल्यानंतर पुढें कोणा लायक मनुष्याला आपण प्रतिनिधि व्हावें असें वाटलें तर त्यानें आपली फी भरल्यानंतर त्याला प्रतिनिधि होण्याला कांहीं अडचण नसावी. फक्त पूर्वी होऊन गेलेल्या अध्यक्षांच्या निवडणुकींत ढवळाढवळ करण्याचा त्याला त्या वर्षी हक्क पोंचूं शकला नाहीं म्हणजे झालें.

ही किंवा अशाच तऱ्हेची, पण निवडणुकीच्या तत्त्वाची, दुसरी एखादी पद्धत सुरू करण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे. रिसेप्शन कमिटीच्या तीन-चतुर्थांश मतांच्या व्यवस्थेमध्यें निवडणुकीचें तत्त्व फारच मर्यादित आणि संकुचित झालेलें होतें. तें विस्तृत करून सर्व प्रतिनिधींना मत देण्याचा हक्क दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ही योजना लवकर अमलांत आणली नाहीं तर पुढें जास्त बखेडे माजतील. वाफेच्या यंत्रांत जास्त वाफ जमल्यास तिला मोकळी सोडण्याची टाळाटाळ उपयोगी नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत आणून व हल्लीं जे प्रकार घडून येत आहेत ते पाहून लोक या वर दिलेल्या निवडणुकीच्या पद्धतीचा विचार व ती अमलांत आणण्याचा प्रयत्न करूं लागतील अशी आम्हांस आशा आहे.

## स्वदेशभक्तीचें एक उदाहरण : : १८

स्वतंत्र. काळ : ता. २३-८-१९०७

नेपोलियनच्या वेळीं इंग्लंड आणि फ्रान्स या दोन देशांच्या दरम्यान भयंकर वैमनस्य वाढलेलें होतें, आणि नेपोलियन आपलीं गलबतें घेऊन इंग्लंडच्या किनाऱ्यावर केव्हां झडप घालील अशी भीति इंग्लंडमधील सर्व लोकांना प्रत्येक क्षणीं वाटत होती. म्हणून नेपोलियनच्या हालचालींवर नजर ठेवण्याकरितां इंग्लिश चॅनेलमध्यें ॲडमिरल कॉलिंगवुड यांच्या काफिल्याची नेमणूक झालेली होती. कॉलिंगवुड हा एक फार चांगला गृहस्थ होता. ट्रॅफलगारच्या लढाईमध्यें प्रसिद्धीस आलेल्या नेलसनच्याच बरोबरीची याची योग्यता होती. परंतु तो इतका मोठा ऑफिसर असून त्याचा स्वभाव फार शांत आणि मनमिळाऊ होता. त्याच्या आयुष्यांतील बहुतेक दिवस समुद्रावरच गेलेले होते. आणि त्याच्या बायकामुलांची व त्याची क्वचितच गांठ पडत असे. परंतु असें होतें तरी स्वदेशसेवेसाठीं तो या सगळ्याही गैरसोई अतिशय उल्हासवृत्तीनें सहन करीत असे. तरी पण मधून मधून त्याच्या मनांत या स्थितीबद्दल कधीं खिन्नता उत्पन्न होत नसे असें मात्र नाहीं. तो इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामधील समुद्रावर आपले रखवालीचें आणि टेहळणीचें काम करीत असतां एक तरुण फ्रेंच मुलगा लढाईचा कैदी म्हणून त्याच्या हातीं लागला. या मुलाची त्याच्या बापापासून लहानपणींच ताटातूट झालेली असल्यामुळें त्याला पितृसुख कसें असतें, हें फारच थोडें माहीत होतें. परंतु या मुलाचा बाप आणि ॲडमिरल कॉलिंगवुड यांचा परस्पर स्नेह असल्यामुळें कॉलिंगवुड हे त्या मुलाशीं फार सलगीनें आणि प्रेमानें वागत असत. तो १८ वर्षांचा तरुण फ्रेंच शिपाई आपल्या कैदेंतील एकांतवासाला थोडक्याच दिवसांत अगदीं

कंटाळून गेला, आणि आत्महत्या करून या संकटांतून मोकळें व्हावें असे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले होते. एके दिवशीं अशा तऱ्हेच्या काहीं कल्पनांनीं त्याचें डोकें व्यग्र झालेलें असतां ॲडमिरल कॉलिंगवुड हे हळूच त्याच्याजवळ आले आणि त्याच्या खांद्यावर हात टाकून त्याला म्हणाले– "अरे बच्चा, इतक्यांत तूं एवढा त्रासून गेलास ! तुला या कैदखान्यांत पडून अजून एक महिनादेखील झाला नसेल, तों तूं इतका कंटाळलास ! मग मीं काय करावें ! मी त्रेचाळीस वर्षे या कैदखान्यांत पडलेला आहे ? मी खोटें सांगत नाहीं. खरोखरच या समुद्रावर मीसुद्धां तुझ्यासारखाच एक कैदी आहे. या समुद्रानें मला चोहोंकडून वेष्टिलेलें आहे. माझ्याभोंवतीं या लाटांचा गराडा पडलेला आहे. जिकडे पाहावें तिकडे लाटाच ! लाटांशिवाय दुसरें कांहीं डोळ्यांना दिसत नाहीं, किंवा कानांना ऐकूं येत नाहीं. ह्या लाटांवरील फेस उडून माझे केस पांढरे झाले आहेत, आणि त्याच्या तुषारांनीं माझी कंबर वांकून गेली आहे. माझा बहुतेक जन्म या समुद्रावर गेला आहे. खुद्द इंग्लंड-मधील प्रदेशाचीही मला फारच थोडी माहिती आहे. मी आपल्या देशाला फक्त नकाशावरून ओळखतों. पण जरी मीं आपल्या देशाला कधींही पूर्णपणें पाहिलें नाहीं, तरी त्याच्यावर माझी अतिशय भक्ति आहे. आणि एखाद्या गुलामाप्रमाणें मी त्याची चाकरी करीत आहें. पण स्वदेशासाठीं असेंच करावें लागतें. त्याला काय इलाज आहे ! अशीं स्वदेशप्रीतीचीं बंधनें आपल्याला असणें यांतच मोठेपणा आहे हें खरें. तरी पण कधीं कधीं हीं बंधनें फार जड होतात ! अशी स्थिति झालेली आहे. माझ्याकडे पाहून तूं आपलें समाधान करून घे. तुझी लवकरच सुटका करून देण्याची तजवीज करीत आहे. आणि बहुतकरून या बंदिवासांतून माझ्या आधीं तूंच मोकळा होशील. कारण नेपोलियननें इंग्लंडशीं तह केला नाहीं, तर मला बहुतेक या समुद्रावरच मरेपर्यंत राहावें लागेल." अशा रीतीनें ॲडमिरल कॉलिंगवुड यांनीं त्याला मुक्ततेचें आश्वासन दिल्यानंतर मध्यंतरीं दुसरें कांहीं संभाषण चाललें असतां, मध्येंच कॉलिंग-वुड यांनीं त्या मुलाला मोठ्या आश्चर्यानें विचारलें कीं, "तुझा बाप आणि मी एकमेकांचे चांगले स्नेही असून त्यांच्याबद्दल तूं मला कांहींच प्रश्न विचारीत नाहींस हें कसें ?" यावर त्या मुलानें पुष्कळ आढेवेढे घेतल्यानंतर असें उत्तर दिलें कीं, "मला समजूं लागल्यापासून मीं आपल्या वडलांना फक्त एकदांच

पाहिलें होतें. त्यांची मला कांहीं आठवण नाहीं, तेव्हां त्यांच्याबद्दल मी काय विचारूं ?" हे त्याचे शब्द ऐकून कॉलिंगवुडचें हृदय अगदीं गहिंवरून आलें, आणि स्वतःची स्थिति त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहून तो म्हणाला, "माझीही अशीच स्थिति होणार ! इंग्लंडमध्यें माझ्या दोन मुली आहेत. त्यादेखील एक दिवस असेंच म्हणणार कीं, आमच्या बाबांना आम्हीं फारसें पाहिलेलेंच नव्हतें ! तरी पण त्यांच्यावर माझी अतिशय प्रीति आहे. मी इतक्या दूर आहें तरी येथून मी त्यांना शिकवितों. मी या गलबतावरून त्यांच्यावर नजर ठेवितों. दररोज मी त्यांना एक पत्र लिहितों. त्यांनीं काय अभ्यास करावा आणि कोणतीं पुस्तकें वाचावीं हें मी त्यांना सांगतों. कोणत्या कल्पना आणि कोणते विचार त्यांनीं मनांत बाळगावे हें मी त्यांना कळवितों. मी येथून त्यांना रागें भरतों आणि येथून त्यांच्याशीं फिरून गोड होतों. त्या काय करतात, कसले पोषाख करतात, आणि कोणत्या प्रीतिपाशांत सांपडतात हें सगळें मी येथें बसून जाणतों. त्यांचीं लग्नें होतील, आणि त्यांचे नवरे माझे जांवई होतील. बापानें आपल्या मुलांकरितां जें कांहीं करावयाचें तें सर्व मी येथून करीत आहें. तरी पण जर या माझ्या मुली मला प्रत्यक्ष भेटूं शकल्या नाहींत तर या सगळ्याचा काय उपयोग ! माझ्या मुली एक दोन वर्षांच्या लहान होत्या, तेव्हां मीं त्यांना घेतलें होतें. पण तेव्हांपासून कधीं मीं त्यांना मांडीवर घेतलें नाहीं, किंवा माझ्याजवळ त्या खेळल्या नाहींत ! तेव्हां अर्थातच तूं जसा आपल्या बापाबद्दल उदासीन आहेस तशाच त्याही माझ्याबद्दल असणार. जो कधीं दृष्टीस पडत नाहीं अशा बापावर कोण प्रीति करणार ? मी जो त्यांचा बाप त्या माझ्याबद्दल त्यांची काय कल्पना असणार ? दररोज माझें त्यांना पत्र जातें, तोच त्यांचा बाप ! किंवा त्या पत्रांत मी ज्या उपदेशाच्या गोष्टी लिहितों तोच आपला बाप, अशीही कदाचित् त्यांची कल्पना होत असणार ? दररोज माझें त्यांना पत्र जातें, तोच त्यांचा बाप ! किंवा त्या पत्रांत मी ज्या उपदेशाच्या गोष्टी लिहितों तोच आपला बाप अशीही कदाचित् त्यांची कल्पना होत असेल ! पण अशा उपदेशाच्या गोष्टींवर कोण प्रेम करणार आहे ? प्रेमाला मूर्तिमंत मनुष्य लागत असतो. आणि जो मनुष्य कधीं दृष्टीस पडत नाहीं, त्याच्यावर प्रेम तरी कसलें बसणार ? कारण, जो दृष्टीस पडत नाहीं तो आहे असें तरी कशावरून ? तो असून नसून सारखाच!

त्याच्यावर कोणीही प्रेम करीत नाहीं, आणि तो मेला तरी त्याच्यासाठीं कोणीही रडत नाहीं!" असें म्हणून दोन्ही हातांच्यामध्यें आपलें तोंड खालीं घालून तो ढळढळां रडूं लागला. परंतु तो रडण्याचा हुंदका गेल्यानंतर फिरून ॲ० कॉलिंगवुड हे सांगूं लागले कीं, "माझी प्रकृति उतारवयामुळें अलीकडे फार अशक्त झाली आहे, तेव्हां मला आतां या दगदगींतून सोडवा, अशा अर्थाचा मीं कांहीं दिवसांपूर्वीं इंग्लंडकडे एक अर्ज पाठविला होता. परंतु तिकडून मला असा जबाब आला कीं, दुसरा कोणी तुमच्या योग्यतेचा तुमच्या जागीं नेमण्याला मनुष्य नसल्यामुळें तुम्हींच तेथें राहिलें पाहिजे. हा जबाब आला आणि त्याच्याबरोबर माझ्या शूरपणाबद्दल सन्मान, पदव्या आणि सोन्याचीं पदकेंही पुष्कळ आलीं. परंतु त्यांचा काय उपयोग! तीं पदकें मीं आपल्या हृदयावर धारण केलीं, पण त्या पदकांच्या खालीं माझ्या हृदयाच्या आंत काय विचार चालले आहेत ते कोणाला माहीत आहेत? आरमाराच्या खात्यांत इतके लोक असून माझ्या जागेवर येण्याला कोणीसुद्धां लायक मनुष्य सांपडत नाहीं, हें माझें दुर्दैव होय! माझ्या मुलांबाळांची आणि माझी गांठ पडल्यावांचून मला कांहीं बरें वाटणार नाहीं. पण अशी वेळ केव्हां येणार! माझी येथून सुटका होईल, आणि मी आपल्या मुलींना भेटावयाला जाईन, तोंपर्यंत बहुतकरून वृद्धापकालानें माझी दृष्टि अंध होईल, आणि त्या मुलींना पाहण्याचें सुख मला कधींही लाभणार नाहीं!" परंतु हा गहिंवर येऊन गेल्यानंतर फिरून त्याच्या मनामध्यें कुटुंबाची प्रीति आणि स्वदेशाची प्रीति यांची तुलना चालून त्याच्या मनाचा कांटा अखेरीस स्वदेशप्रीतीकडेच झुकला. आणि त्या आवेशांत त्याच्या तोंडून पुढील उद्‌गार निघाले, "मला जरी माझ्या कुटुंबाबद्दल अशा रीतीनें प्रेम वाटतें आहे तरी माझ्या देशाचें वैभव वाढावें इकडेच माझें बहुतेक लक्ष नेहमीं लागलेलें असतें. इंग्लंडमध्यें जाऊन रिकामटेकडेपणानें फिरण्यांत तरी काय आहे? त्याच्यापेक्षां इंग्लंडच्या स्वतंत्रतेविरुद्ध चाल करून येणाऱ्या फ्रान्सच्या महत्त्वाकांक्षेला प्रतिबंध करण्याकरितां एखाद्या तटबंदीप्रमाणें मी येथें उभा आहें, हेंच माझें मुख्य कर्तव्य आहे. लंडनच्या रस्त्यांत निरुद्योगी लोकांच्या गर्दींत मोठ्या डामडौलानें ह्या माझ्या शरीरानें फिरत राहण्यापेक्षां, इंग्लंड आणि फरान्स यांच्या दरम्यानच्या तटबंदीच्या भिंतींत मी मरून या माझ्या देहाची जास्त भर पडली

तर त्यांतच मला खरा आनंद आहे.” असे त्याच्या तोंडून उद्गार निघाले व अखेरीस त्याच्या इच्छेप्रमाणें समुद्रावरच त्याचा अंत झाला.

---

## कॉंग्रेस मोडण्याकरितां नेमस्तांचीं कारस्थानें : १९

काळ: अग्रलेख, ता. ३-१-१९०८

● कॉंग्रेसमध्यें फूट पाडून ती मोडून टाकण्याचा घाट नेमस्तांनीं सरकारच्या चिथावणीनें घातला, असें मानण्यांत येत होतें.

सुरत येथील कॉंग्रेसमधील मुख्य मुख्य व महत्त्वाच्या गोष्टी मागील आठवडयांत घडून आल्या. त्या गोष्टी घडल्यापासून आतांपर्यंत जवळ जवळ आठ दिवसांची अवधि लोटून गेली आहे आणि एवढया अवधींत पुष्कळांना पुष्कळ प्रकारची संधि मिळालेली आहे. व या संधीचा दुरुपयोग करण्याला, ती ज्यांना सांपडली, त्यांनीं बिलकूल मागेंपुढें पाहिलेलें नाहीं. वर्तमानपत्रकारांचें कर्तव्य-कर्म म्हटलें म्हणजे आपल्या देशबांधवांना आपल्या देशाच्या उन्नतीचें तात्का-लिक साधन दाखवून देणें हें होय. व ह्या कर्तव्यकर्माची जबाबदारी साप्ताहिक वर्तमानपत्रांपेक्षां दैनिक वर्तमानपत्रांवर दिवसांच्या गणतीच्या मानानें पाहिलें तर निदान सातपटीनें तरी अधिक आहे, हें कोणाच्याही लक्षांत येईल. पण इतकी संधि हातांत असतांही तिचा केवळ खोटया बातम्या पसरविण्याकडे दुरुपयोग केलेला पाहून कोणालाही अंतःकरणापासून वाईट वाटल्यावांचून राहावयाचें नाहीं. सुरतेस नेमस्त पक्षानेंच कॉंग्रेसमध्यें बखेडा घालण्याला आधीं सुरुवात केली असतां, त्या बाजूचे अन्याय झांकून ठेवून जहाल पक्षासंबंधानेंच आपल्या पत्रांतून उलटया बोंबा मारण्याकरितां नेमस्त पक्षाकडील दैनिक पत्रांचा उपयोग व्हावा, ही अत्यंत शोचनीय स्थिति आहे. सुरतेस अंतःस्थ कार-स्थानांच्या द्वारानें आपणच बखेडा करून फिरून तेथून साळसूदपणाच्या तारा पाठवावयाच्या आणि आपल्या जागेवर आल्यानंतर बनावट विधानांनीं भरलेले

विषारी लेख लिहावयाचे, म्हणजे ही सौजन्याची कमाल होय! नेमस्तांना दैनिक पत्रांचा हा फायदा होता. मुंबई-पुण्याचीं अँग्लोइंडियन व नेटिव दैनिक पत्रें हीं सर्व आपल्याच बाजूचीं आहेत, हें नेमस्तांना माहीत होतें व त्या पत्रांतून हव्या तशा बातम्या प्रसिद्ध करवून त्यांनीं आपला डाव साधून घेतला आहे. परंतु असत्य गोष्ट आधीं सांगितली म्हणजे ती खरी ठरते, असें मुळींच नाहीं! जहाल पक्षाचीं दैनिक वर्तमानपत्रें मुंबई इलाख्यांत नाहींत, व बंगाल्याकडे कांहीं असलीं तरी त्यांतील तारा तीन दिवसांनीं पाठीमागून इकडे यावयाच्या म्हणजे, त्या अर्थात् बऱ्याच शिळ्या झालेल्या असावयाच्या. हीं कारणें नेमस्त लोकांच्या डोळ्यांपुढें स्पष्ट असल्यामुळें, त्या पक्षाच्या लोकांना आपल्या बाजूनें लोकांच्या मनांत कळवळा उत्पन्न करण्याला दोन चार दिवसांची चांगली संधि सांपडली व तेवढ्या संधींत त्यांनीं वाटतील तशा खोट्या बातम्या पसरवून घेतल्या आहेत, आणि वाटतील तसे खोटे ग्रह उत्पन्न करून दिले आहेत! सुरतेच्यासारखी जेव्हां एखादी प्रचंड गडबड एखाद्या ठिकाणीं उत्पन्न होते, तेव्हां काय झालें आहे हें जाणूं इच्छिणाऱ्या लोकांचीं मतें आरशासारख्या स्थितींत असतात. त्यांच्यापुढें पहिल्यानें नेमस्त येऊन उभा राहिला, तर नेमस्ताचें प्रतिबिंब त्यांत पडतें. परंतु तेथून नेमस्ताला ढकलून देऊन त्याच्या जागीं जर राष्ट्रीय पक्ष उभा राहिला तर त्याचेंच प्रतिबिंब त्या आरशामध्यें स्पष्टपणें दिसूं लागेल. याकरितां नेमस्त पत्रांनीं उत्पन्न केलेला गैरसमज दूर करण्याकरितां सर्व लोकांपुढें राष्ट्रीय पक्षाची खरी हकीकत मांडणें अत्यंत आवश्यक आहे. सुरतेच्या बैठकीला आठ दिवस होऊन गेल्यानतर व तेथील बहुतेक सर्व कच्ची हकीकत लोकांना कळल्यानंतर आतां सुरतेस कोणत्या दिवशीं आणि किती वाजतां कोणती सभा भरली होती वगैरेसारखी माहिती देत बसण्यांत फारसें स्वारस्य उरलेलें नाहीं. परंतु आतांपर्यंत सुरतेस ज्या गोष्टी घडल्या, त्या कशा घडल्या, कोणाकडून घडल्या, व त्या त्यांना टाळतां आल्या असत्या किंवा नाहीं, वगैरे प्रश्नांचें आधारपूर्वक विवेचन करणें, हेंच आतां जास्त फायदेशीर आहे.

* * *

काँग्रेस यंदा मोडली, असा पुष्कळांचा समज झालेला आहे; परंतु ती यंदा मोडलेली नाहीं. ती पुष्कळ दिवस मोडत आलेली आहे. बरींच वर्षें सुरू

झालेली मोडण्याची क्रिया यंदा सुरतेस समाप्त झाली एवढेंच. काँग्रेसपासून अमुक फायदे झाले आणि तमुक फायदे झाले असें जरी नेमस्त लोक तोंडानें बोलत असत, तरी त्यांच्या अंतःकरणांत, ते मनुष्यच असल्यामुळें, त्यांना नेहमीं निसर्गतः असें वाटत असे कीं, काँग्रेसपासून खरोखरच व्हावें तसें कांहीं एक देशाचें हित होत नाहीं व जहाल पक्षाचे लोक तर काँग्रेसच्या निरुपयोगीपणाविषयींचीं मतें उघड प्रतिपादन करीत असत. परंतु काँग्रेस मोडण्याला नेमस्तांना याच्याशिवाय आणखीही एक कारण असे. काँग्रेसच्या कामाचा आणि खर्चाचा बराचसा बोजा नेमस्त लोकांच्या अंगावर पडत असे. ह्या तादृश फायद्यावांचून केवळ नुकसानीचा बोजा इतःपर आपल्या डोक्यावर वाहण्याला ते कंटाळलेले होते. अशा स्थितींतच कर्झनसाहेबांच्या अरेरावी-पणामुळें बंगाल इलाख्याचे दोन तुकडे करण्यांत आले. या वंगभंगाच्या घातुक कृत्यामुळें बंगालचे लोक अतिशय त्वेषाला चढले, व त्यांनीं सभांची गर्दी, लोकांना उपदेश, स्वदेशी चळवळ, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वयंसेवकांच्या टोळ्या, वगैरे अनेक अशस्त्र प्रतिकाराचे उपाय अमलांत आणण्याला सुरुवात केली. तेव्हां राष्ट्रीय सभेच्या भिक्षांदेहीपेक्षां बंगालच्या या स्वदेशी चळवळीच्या स्वावलंबनामध्यें हिंदुस्थानांतील सर्व लोकांना जास्त चित्ताकर्षकता दिसूं लागली, व सर्वांचें मन तिकडेच वेधलें. राष्ट्रीय सभेच्या पानचट उपायां-संबंधानें सर्वांचें विटलेलें मन स्वदेशी चळवळ, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या ओजस्वी आणि तेजस्वी उपायांकडे अतिशय उत्सुकतेनें धांव घेऊं लागलें. या सार्वत्रिक इच्छेचा ओघ इतका अप्रतिकरणीय होता कीं, वाराणसी नगरासन्निध ना. गोखल्यांसारखे नेमस्त पुढारीही त्या स्वदेशी बहिष्काराच्या ओघांत वेगानें गटंगळ्या खात वहात वहात चालले. या गोष्टीला एक वर्ष लोटलें, पण या वर्षांत त्या चळवळीचा जोर कमी न होतां तो उलट वृद्धिंगतच होत गेला. अखेरीस या चळवळींत जें कांहीं थोडेंसें गुप्त होतें किंवा कमी होतें, त्याची उघड उघड भर मि. दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्याच्या काँग्रेस-मध्यें घातली. स्वराज्य हा हिंदुस्थानांतील लोकांचा अंतिम हेतु असला पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. पूर्वीं दारूचा ढीग तयार झालेला होता. मि. दादा-भाई यांनीं त्यावर ठिणगी ठेवली ! त्या संयोगापासून साऱ्या हिंदुस्थानच्या मनामध्यें भयंकर भडका उडून गेलेला आहे. परंतु ही लोकपक्षाकडून लढाईची

तयारी होत असतां सरकार आणि इतर युरोपियन लोक कांहीं निजून राहिलेले नव्हते. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, इत्यादिकांच्या योगानें हिंदी लोक दादाभाईनीं दाखविलेलें स्वराज्य घेणार, म्हणजे ते आपल्या हातांतून आपली सत्ता घेणार, दुसरें कांहीं नाहीं, हा अर्थ इंग्लिशांच्या मनांत पक्का ठसला व ते स्वसत्तेच्या संरक्षणाच्या उद्योगाला ताबडतोब लागले. त्या वेळीं मोर्लेसाहेब नुकतेच अधिकारारूढ झालेले होते. ज्या कामांत पाऊल पुढें टाकलें असेल त्याच कामांत तें कालत्रयींही मागें घ्यावयाचें नाहीं, असें इंग्रजी हट्टाचें आणि धीटपणाचें ब्रीद असल्यामुळें बंगालच्या विभागणीचें पाऊल कायम ठेवून मोर्लेसाहेबांनीं दुसरीकडे भित्रेपणानें बरींच पावलें मागें घेतलीं. डीसेंट्रलायझेशन कमिशन, ॲडव्हिसरी बोर्ड, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांची सुधारणा, आणि इंडिया कौन्सिलमध्यें दोन नेटिव सभासदांची नेमणूक, हीं चार पावलें बंगाल्यांतील चळवळीमुळें आणि सर्व हिंदुस्थानांतील अस्वस्थतेमुळें मोर्लेसाहेबांनीं मागें घेतलीं. पण असल्या मृगजळाला पाहून फसून त्याच्यामागें धांवत सुटण्याइतके मूर्ख आतां हिंदुस्थानांत कोणीही उरलेले नाहींत, असें पाहून इंग्रजी मुत्सद्यांनीं दुसऱ्या कावेबाजपणांना सुरुवाती केल्या. हिंदुस्थानांतील सगळेच लोक स्वराज्यासाठीं खवळलेले आहेत हें खरें. तथापि, जे अर्धवट बोटचेपे लोक आहेत, त्यांना कांहीं लालूच दाखवून आपल्या बाजूला फितूर करून घेतलें, तर स्वराज्याच्या हल्ल्यापासून आपलें परकीय राज्य आणखी कांहीं दिवसपर्यंत तरी टिकेल, असा इंग्लिशांच्या मनांत विचार आला. आपले देशबांधव स्वराज्यप्राप्तीचा प्रयत्न करीत असतां त्यांना भलत्याच मार्गाला लावण्याला आणि त्यांच्या प्रयत्नांचा जीव घेण्याला त्यांच्यांतलेच कसलेले नीच लोक पाहिजेत, एरवीं भलत्यासलत्या, बिनशिक्षणाच्या आणि बिनवजनाच्या, लोकांकडून हें काम व्हावयाचें नाहीं, हें लक्षांत आणून इंग्लिशांनीं नेमस्त लोकांकडे नजर फेंकली. पण या गुप्त बेताची पहिली बातमी मि. मोर्ले यांनीं आर्ब्रोथ येथील आपल्या भाषणामध्यें फोडली आणि यानंतर याच धोरणाचा दुसरा अनुवाद सिमल्यास व्हाइसरीगल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें सिडिशस मीटिंग्स बिलाच्या वेळीं उघडपणें सरकारी अधिकाऱ्यांकडून करण्यांत आला. नेमस्त लोकांनीं जहालांपासून विभक्त झालें पाहिजे, त्यांनीं त्यांचा संबंध तोडून टाकला पाहिजे, आणि त्यांच्याबद्दलच्या बातम्या त्यांनीं आम्हांला सांगितल्या पाहिजेत, अशा

गूढार्थाचे स्पष्ट उद्गार सरकारतर्फे निघाल्यानंतर त्यावर ना. गोखले वगैरे मंडळींनीं आपल्या भाषणांतून अप्रत्यक्ष रीतीनें कशी मंजुरी दिली, हें ज्यांच्या लक्षांत असेल, त्यांना हल्लींच्या काँग्रेसमधील दुही कशी झाली असावी, हें चटकन् समजेल.

* * *

मोर्ले, मिंटो, ॲडमसन, बेकर याच साहेबांनीं केवळ नेमस्तांना फितूर करण्याचा प्रयत्न केला आहे असें नाहीं. अलीकडे कित्येक दिवस लंडन टाइम्स, बाँबे टाइम्स वगैरेसारखीं ॲंग्लो-इंडियन पत्रेंदेखील नेहमीं नेमस्तांच्या कानींकपाळीं हेंच तत्त्व ओरडत आलीं आहेत कीं, बाबांनो, तुम्ही आपल्या जहालबंधूंचें सख्य आणि सामर्थ्य सोडून विभक्त आणि अशक्त व्हा म्हणजे आम्ही तुम्हांला तुम्ही मागाल तें देऊं. या फसवणुकीला बळी पडण्याइतके नेमस्त लोक अजून दुधखुळे राहिले असतील असें कोणालाही वाटलें नव्हतें. परंतु देशद्रोहाच्या चिथावणीला अद्यापि पुष्कळ मान आहे, असें दिसतें! नेमस्त लोकांचे पुढारी ॲंग्लो-इंडियन लोकांच्या जाळ्यांत पूर्णपणें सांपडले व त्या ॲंग्लो-इंडियनांच्या चिथावणीमुळेंच कांहीं तरी निमित्त काढून आपल्या देशबंधूंपासून विभक्त होण्याचा नेमस्तांनीं विचार ठरविला असला पाहिजे असें उघड उघड सिद्ध होतें. कारण, एरवीं यंदाच नेमस्तांना जहालांपासून आपली फारकत करून घेण्याला काँग्रेसच्या मागील इतिहासामध्यें दुसरें कांहीं गुप्त आणि खरें कारण घडून आल्याचें कोठेंही दिसून येत नाहीं. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण हीं तत्त्वें तर सरकारला असह्य आणि डोईजड झालेलीं होतींच. परंतु या सगळ्यांच्यापेक्षां दादाभाईंच्या स्वराज्याची कल्पना सरकारला फार भयप्रद वाटूं लागली. स्वराज्याची कल्पना मि. दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्याच्या काँग्रेसमध्यें पेरली आणि कलकत्त्याच्या हायकोर्टानें ती कल्पना कायदेशीर आहे असें ठरविलें. यामुळें सरकारच्या परकीय राज्याच्या वाटेंत हें स्वराज्याचें एक मोठें विघ्नच येऊन पडलें होतें. तेव्हां ते कोणा तरी पाहुण्याकडून परस्पर काढून टाकलें गेलें तर बरेंच झालें, असें सरकारी अधिकाऱ्यांना वाटलें असलें तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं काँग्रेस जसजशी जवळ येऊं लागली तसतशी काँग्रेसच्या कँपमधून अशी उडत उडत

बातमी बाहेर फुटूं लागली कीं, यंदाच्या कॉँग्रेसमध्यें स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण हे चार ठराव अजिबात गाळून टाकले जाणार आहेत! सरकारची इच्छा आणि नेमस्तांची कृति यांच्यामध्यें हें जें वाजवीपेक्षां फाजील साम्य दिसून येत आहे, हें खरोखर प्रत्येकाच्या दृष्टीनें अक्षम्य आहे!

* * *

यंदाच्या कॉँग्रेसच्या ठरावांचा मसुदा हा अनेक बातम्यांमध्यें एक मोठा वादग्रस्त विषय होऊन राहिला आहे. जहाल पक्षाचा संशय बळावत जाण्याला हेंच मुख्य कारण झालें. कॉँग्रेसच्या ठरावाचा खरा मसुदा, यंदा शेवटपर्यंत इतक्या निकरावर गोष्टी गेल्या तरी, कोणालाही पाहावयाला मिळाला नाहीं. कॉँग्रेसमध्यें विचाराकरितां घ्यावयाचे ठराव नेहमीं कॉँग्रेसच्या आधीं पुष्कळ दिवस प्रसिद्ध होतात. तसे यंदा ते करण्यांत आले नाहींत. यासंबंधानें येथील ज्ञानप्रकाशानें पुढील धरसोडीचीं आणि डळमळीत कारणें दिलेलीं आहेत तीं पाहून कोणालाही हंसू आल्यावांचून राहणार नाहीं. "दरसालची वहिवाट पाहतां सब्जेक्ट कमिटीच्या बैठकीच्या वेळीं ठरावांचे मसुदे कमिटीच्या मेंबरांत वांटण्यांत येतात. ठरावाचे हे मसुदे अखेरचे नसून सब्जेक्ट कमिटींत त्यांमध्यें फेरफार करण्यांत येतो व प्रसंगीं राष्ट्रीय सभेच्या बैठकींतही त्यांत कमीजास्त करण्यांत येतें. आगाऊ ठरावांचे मसुदे हातीं टाकण्याबद्दल मागणें करण्याचा कोणासही अधिकार नाहीं. त्यांत महत्त्वाच्या ठरावांचे मसुदे करण्याचें काम कांहीं सोपें नव्हतें. सुरतेस छापखान्याची अडचण असल्यामुळें वेळेवर काम छापून मिळत नसे." ज्ञानप्रकाशाचीं हीं सर्व कारणें खोडसाळ आणि पोरकट आहेत, हें कोणाच्याही लक्षांत येईल. बहुतकरून ना. गोखल्यांना दाखविल्याशिवाय कोणी तरी नवशिक्या लेखकानें हीं कारणें चुकून दिलेलीं असावींत असें दिसतें! सब्जेक्ट्स कमिटीच्या वेळीं ठरावाचे मसुदे मेंबरांना वांटतात हें खरें; पण ते मसुदे त्याच्या आधीं छापून प्रसिद्ध झालेले नसतात, असें मात्र नाहीं. ही गोष्ट ज्ञानप्रकाशानें आपल्या फायली उजेडांत आणून मागील कॉँग्रेसच्या आधींचे कांहीं अंक चाळले असतां त्याच्या सहज दृष्टोत्पत्तीस येईल. इतकेंच नव्हे तर खुद्द यंदाच्याही ठरावांची संक्षेपरूप आणि सारांशरूप तार खुद्द ज्ञानप्रकाशानेंच किती तरी दिवस आधीं छापून प्रसिद्ध

केली होती ! दुसरें एक वेडगळ कारण असें सांगण्यांत आलेलें आहे कीं, महत्त्वाच्या ठरावांचे मसुदे करण्याचें काम कांहीं सोपें नव्हतें. ही सबब कितपत खरी आहे हें आपण पाहूं. २४ नोव्हेंबर १९०७ रोजीं सुरतेस रिसेप्शन कमिटीची सभा होऊन जी कामाची वांटणी झाली त्यांत ठरावांचा मसुदा तयार करण्याचें काम ना. गोखले यांजकडे त्या दिवशींच सोंपविण्यांत आलें. ता. २४ नोव्हेंबरपासून तों ता. २५ डिसेंबरपर्यंत ना. गोखल्यांना ठरावांचा मसुदा तयार करतां आला नाहीं, हें कोणाला तरी संभवनीय वाटेल काय ? ना. गोखले हे इतके अज्ञानी आहेत काय, कीं ठरावांच्या मसुद्याचे दोन चार ताव तयार करण्याला त्यांस एक महिनाही पुरूं नये ! असलीं कारणें पुढें आणून ज्ञानप्रकाशमधील लोक आपल्याच पुढाऱ्यांचें बुद्धिमांद्य अप्रत्यक्ष रीतीनें लोकांपुढें मांडण्याच्या दोषाला पात्र होत आहेत, हें त्यांनीं विसरतां कामा नये. बरें, जर एक महिन्याच्या अवधींतही ठरावांचा मसुदा तयार करण्याचें हें कठीण काम करतां येणें शक्य नव्हतें, तर मग काँग्रेसच्या आधींच ठरावांच्या मसुद्याची सारांशरूप तार ज्ञानप्रकाशानें छापलीं होती ती कशावरून ? जर मसुदा तयार करण्याचें अवघड काम ता. २६ डिसेंबरपर्यंतही पुरें झालेलें नव्हतें, तर ज्ञानप्रकाशची या विषयासंबंधींची पहिली तार खोटी असली पाहिजे असें म्हणणें प्राप्त होतें ! यावरून ज्ञानप्रकाशमध्यें खोट्या तारा प्रसिद्ध होत असतात, असें लोकांनीं अनुमान काढलें तर तें इष्ट आहे काय ? "सुरतेस छापखान्याची अडचण असल्यामुळें वेळेवर काम छापून मिळत नसे" हें जें कारण सांगण्यांत आलेलें आहे तें मात्र अगदीं खरें आणि अतिशय महत्त्वाचें आहे यांत शंका नाहीं ! परंतु याहीपेक्षां दुसरें अत्यंत महत्त्वाचें एक कारण सुरतेचे लोक सांगत होते तें असें कीं, ज्या छापखान्यांत ठरावांचा मसुदा छापावयाला दिला होता तेथील प्रूफरीडरची आरशी आयत्या वेळीं हरवल्यामुळें त्यानें विलायतेहून मागवलेली आरशी २६ तारखेपर्यंत येऊन पोहोंचली नाहीं म्हणून ठरावांचा मसुदा मिळण्याला फार अडचण पडली ! हेंही एक महत्त्वाचें कारण ज्ञानप्रकाशानें कां घातलें नाहीं कोण जाणे ! असो. कोणी कितीही दडवादडवी केली तरी सत्य हें जगाला कळून चुकलेलें आहे. स्वराज्य, बहिष्कार वगैरे विषय काँग्रेसमध्यें न यावेत अशी अधिकाऱ्यांना इच्छा झाली आणि काँग्रेसच्या

कार्यक्रमांतून ते विषय गळले. आणि याचा आधीं गवगवा होऊं नये म्हणून शेवटपर्यंत ठरावांचा खरा आणि कायमचा मसुदा (उमीचंदाच्या हातांत द्यावयाचा नव्हे) बाहेर पडूं शकला नाहीं, हें आतां सर्वांना माहीत झालेलें आहे.

* * *

स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण इत्यादि विषय गाळलेला काँग्रेसचा कार्यक्रम हा नेमस्तांनीं जहालांना घातलेला दुहेरी पेच होता. हे चार ठराव वगाळलेल्या काँग्रेसमध्यें तुम्ही रहा, नाहीं तर काँग्रेस सोडून तरी जा; असें नेमस्तांचें सरकारच्या फायद्यासाठीं जहालांना म्हणणें होतें. या दोहोंपैकीं कोणतीही गोष्ट जहालांनीं पत्करली असती तर ती त्यांना अपायकारकच होती. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण वगैरे महत्त्वाचे ठराव गाळलेली काँग्रेस पत्करावी तर तें वाईट, आणि इतक्या बावीस वर्षांची काँग्रेस सोडावी तर तेंही वाईटच, अशी जहालांना पंचाईत येऊन पडली. दांत उपटून टाकलेल्या नागिणीप्रमाणें या चार तत्त्वांनीं विरहित अशी काँग्रेस झाली किंवा काँग्रेसमध्यें नेमस्त आणि जहाल यांची फाटाफूट होऊन तिचे तुकडे झाले, तरी हे दोन्हीही परिणाम सरकारला इष्टच होते. परंतु हिंदुस्थानांतील लोकांना मात्र ते अत्यंत अनिष्ट होते. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आपल्या राष्ट्राचें या दोहोंपैकीं कोणतें तरी एक अहित करण्याला आपण कारणीभूत होत आहों व सूत्रधारी सरकारच्या हातांत आपण या कामीं कळसूत्री बाहुल्याप्रमाणें खेळत आहों हें मठ्ठ डोक्याच्या आणि मंद स्वदेशभक्तीच्या नेमस्त लोकांच्या मुळींच लक्षांत येईना. त्यामुळें स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण वगैरे तत्त्वें काँग्रेसच्या कार्यक्रमांत कायम ठेवणें, हें जहाल पक्षाचें एक अवश्य कर्तव्यकर्म होऊन बसणें भाग पडलें.

* * *

मित्रहो, नेमस्तांनीं सरकारच्या चिथावणीनें आणि मदतीनें यंदा जहाल लोकांना "काँग्रेस सोडा, नाहीं तर शिळपट काँग्रेसमध्यें तरी शिरा" असा दुहेरी शह कसा दिला होता, याची बरोबर कल्पना तुमचे लक्षांत वरील हकीकतीवरून आलीच असेल. दैनिक पत्रांतील भाराभार येणाऱ्या तारांनीं आणि मोठाल्या टाइपांच्या हेडिंगांनीं वाचकवर्ग तूर्त अगदीं गोंधळून गेलेला असेल; परंतु त्यांनीं त्या एकतर्फी तारांवर विश्वसून राहण्यांत मतलब नाहीं. त्याया-

धीशापुढें अनेक साक्षीदार आपल्या लबाडीचा आणि लुच्चेगिरीचा क्षणभर गलबला माजवून निघून गेल्यानंतर त्या सगळ्या पुराव्यांतील खरें काय आहे, हें शांतपणानें पुरावा चाळून काढावें लागतें. तसें प्रस्तुतच्या स्थितींत वाचकवर्गानींही करावयाला पाहिजे आहे. आणि तें त्यांना सुलभ रीतीनें करतां यावें म्हणून सर्व पुराव्याच्या गोष्टी आणि निशाण्यांचे कागद व्यवस्थित रीतीनें जुळवून संगतवार सर्व पुरावा त्यांच्यापुढें आम्ही मांडीत आहों. काँग्रेस मोडण्यांत गुन्हेगार कोण, हें न्यायाधीश वाचकांनीं ठरवावयाचें आहे. परंतु तें फक्त ता. २६ किंवा २७ डिसेंबरच्या गोष्टींवरूनच कोणालाही बरोबर रीतीनें ठरवितां येणार नाहीं. या प्रश्नाचा पूर्वीपासूनचा इतिहास पाहिला म्हणजे जहालांपासून कांहीं तरी खुसपट काढून विभक्त होण्याचा बेत मूळपासून कोणाचा होता, हें लक्षांत येईल व यासाठींच मागील कारणांचें येथपर्यंत उद्घाटन करण्यांत आलें आहे. नेमस्तांना कधींही सोडावयाचें नाहीं, ते आणि आपण एकाच देशांतील देशबंधु आहों, तेव्हां आपण दोघेही एकत्र राहिलों, तरच आपण इंग्लिशांच्याविरुद्ध कांहीं टिकाव धरू शकूं, अशी नॅशनॅलिस्ट लोकांची पक्की निष्ठा असतांनाही त्यांच्यावर नेमस्तांनीं कसा दुहेरी पेंच घातला होता, हें वर सांगितलेंच आहे. त्यांनीं जहालांच्या गळ्याभोंवतीं दुहेरी धारेचा पाश टाकला होता. तो पाश हातानें काढावयाला जावें तर बाहेरच्या धारेनें हात कापतो आणि न काढावा तर आंतल्या धारेनें गळा कापतो, अशा भयंकर परिस्थितींत आंतून देशद्रोही आणि बाहेरून मानभावी अशा नेमस्त लोकांनीं जहाल पक्षाला आणून ठेविलें होतें. इंग्लिशांच्या चढवण्यानें चढून जाऊन जहाल लोकांपासून विभक्त होण्याचा नेमस्त लोकांचा बेत आधींपासूनच थोडा थोडा फुटूं लागलेला होता. ता. २३ डिसेंबर रोजीं एक नेमस्त आणि एक जहाल अशा दोन मद्रासी मित्रांमध्यें काँग्रेसबद्दल संभाषण चाललें असतां त्यांतील नेमस्त मित्रानें पुढील उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे: " We moderates have been very patient till now, we shall be firm this year. We shall see that you nationalists are excluded from the Congress this year. We challenge you to have a separate Congress of your own. Mr. Metha alone has the right grip of the present

situation." सर फेरोजशहा मेथा यांची टाइम्सच्या स्पेशल कॉरस्पाँडंटनें या काँग्रेसच्यासंबंधानें गांठ घेतली, तेव्हां त्यांनीं काँग्रेसचे विभाग झालेच पाहिजेत, असेच उद्‌गार काढले आहेत. त्याच बातमीदारानें डॉ. रासबिहारी घोस यांचीही मुलाखत घेतली होती. त्या वेळीं डॉक्टरसाहेबांनीं पुढील प्रकारचे उद्‌गार काढलेले आहेत: "He was glad, very glad personally, that the split had occurred. It was bound to come sooner or later." काँग्रेसचे दोन तुकडे झाले, याबद्दल डॉ. रासबिहारी घोस यांना स्वतःला आनंद होत आहे, हें पाहून कोणालाही दुःख वाटल्यावांचून राहणार नाहीं. वर दिलेलें इंग्रजी वाक्य हें काँग्रेस मोडल्यानंतरचें आहे; परंतु डॉ. घोस यांनीं काँग्रेस भरण्याच्या आधीं जें आपलें अध्यक्षांचें म्हणून भाषण तयार केलें होतें त्यांतसुद्धां या भावी गोष्टीचा स्पष्ट उल्लेख त्यांनीं केलेला आहे. ते म्हणतात कीं, "It has been said that there is a hopeless division in our ranks and that we have now come to the parting of ways... Secession is the only course open to it." ता. २७ डिसेंबर रोजीं काँग्रेसचे दोन तुकडे होण्याच्या आधीं डॉ. रासबिहारी घोस यांना ही भावी गोष्ट इतक्या स्पष्टपणें कळलेली असावी हें मोठें आश्चर्य आहे! यावरून कांहीं तरी करून काँग्रेस मोडावयाचीच, असें सगळ्या नेमस्त मंडळींचें एक गुप्त संगनमत तरी झालेलें असलें पाहिजे, किंवा डॉ. रासबिहारी घोस हे मोठे त्रिकालज्ञानी महर्षि तरी असले पाहिजेत, असें म्हणणें प्राप्त होतें. परंतु डॉक्टरसाहेब हे असले कोणी त्रिकालज्ञानी महर्षि वगैरे नसून, सामान्य सन्मानाची इच्छा बाळगणारे एक सामान्य प्राणी आहेत, हें सगळ्यांनीं सुरतेस पाहिलें आहे! असो. सगळ्या नेमस्तांचा काँग्रेस मोडण्याविषयींचा असा कांहीं गुप्त कट झालेला असला, तर त्याबद्दल हा इतका पुरावा बाहेर फुटला आहे, हा कांहीं थोडा नाहीं. कारण गुप्त कटांतील सर्व बातम्या गुप्त ठेवण्याविषयीं कटवाले नेहमींच प्रयत्न करीत असतात. त्यामुळें अशा प्रसंगीं पुष्कळ पुरावा मिळणें कठीण असतें. तरी पण त्या मानानें हा बाहेर आलेला पुरावा पुष्कळ आणि महत्त्वाचा आहे, अशी कोणाही धूर्त मनुष्याची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं.

* * *

मोर्लेसाहेबांपासून तों थेट टाइम्स ऑफ इंडियाच्या एडिटरपर्यंत अधिकारी आणि अनधिकारी अँग्लो-इंडियन लोकांची उठावणी, त्या उठावणीवरून जहाल पक्षाला घातलेला दुहेरी पेच, आणि त्या द्वारानें काँग्रेस मोडून जहालां-पासून विभक्त होण्याचे नेमस्तांचे बेत, या गोष्टी क्रमानें कसकशा घडून येत होत्या, हें वरील विवरणावरून ध्यानांत येण्यासारखें आहे. इंग्लिशांच्या हिताकरितां जहालांना आपल्यामधून फेंकून द्यावयाचें, असा निंद्य हेतु याप्रमाणें ठाम करून डिसेंबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यांत नेमस्तांचे डेलिगेट लोक सुरतेस जमा होऊं लागले. येथपर्यंतच्या विवेचनावरून सिद्ध झालेला नेमस्त लोकांचा हेतु लक्षांत बाळगला असतां पुढें काँग्रेसमध्यें जी गुंतागुंत झाली, ती अगदीं सुलभ रीतीनें उलगडली जाते. नेमस्त लोकांना सरकारच्या बाजूला चिकटून राहावयाचें आहे, ही त्यांची कल्पना वाचकांच्या मनांत एकदां ठाम बसली म्हणजे पुढील सर्व गोष्टींचें कोडें त्यांना आपोआप उकलतां येईल. नेमस्त लोकांसारखे धूर्त आणि वस्ताद लोक क्वचितच सांपड-तील, हें त्यांच्या वतीनें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. काँग्रेस मोडून व जहालांना झुगारून देऊन मोर्लेसाहेबांच्या उघड सूचनेप्रमाणें सरकारच्याभोंवतीं जमा होण्याचें नेमस्तांचें जरी गुप्तपणें संगनमत ठरलेलें असलें तरी नेमस्त लोक तें सगळें रहस्य काळजीपूर्वक दाबून ठेवून काँग्रेसच्या कायमपणाबद्दल बाह्यत्कारी अतिशय कळकळ प्रकट करीत होते हें कबूल आहे. त्यामुळें पुष्कळ जहाल लोक त्यांच्या या मानभावीपणानें सहजगत्या फसले गेले. तरी पण आंतून जहाल लोकांना दूर ढकलण्याकरितां अनेक युक्त्या योजण्यांत येत होत्या. फक्त आपल्याच नेमस्त लोकांना बोलावून आणि जहालांपैकीं कोणालाही आधीं योग्य काळपर्यंत बातमी कळूं न देऊन सुरतेच्या रिसेप्शन कमिटीचा गडबडगुंडा कसा उडवून देण्यांत आला, हें सर्वांना माहीतच आहे. त्यानंतर जहाल प्रतिनिधींच्या वाटेंत दुसऱ्याही कित्येक अडचणी ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला. जहाल पक्षाचे लोक हे निसर्गतः गरीब असावयाचे हें ठरलेलें आहे. त्यांना डेलिगेटची वीस रुपये फी ही आधींच जास्त झालेली असतां, त्यांच्यावर सालमजकुरीं भोजनखर्चाचा म्हणून आणखी दहा रुपयांचा बोजा घालण्यांत आला. बहुधा ही जेवणाची फी पांच रुपये असते. ती वस्तुतः वाढविण्याचें यंदा कांहीं कारण नव्हतें. परंतु अशा उपायानें जहाल डेलिगेट

स्वाभाविकपणेंच कमी जमतील व आपलें मताधिक्य कायम राखण्याला ही गोष्ट मदत करील, असा बहुधा नेमस्तांचा तर्क असावा. पण हा त्यांचा तर्क त्यांच्या कमनशिबानें सपशेल चुकला. गरिबी तरी आपली तरतूद गरिबीमध्येंच लावून घेण्याची कांहीं तरी तजवीज करते. चार पांच दिवसांचा भोजनखर्च पांच रुपयांमध्यें आवरणें शक्य आहे, असें वाटून गरीब डेलिगेटांनीं पांच रुपयांमध्यें जेथें व्यवस्था होईल, अशी एक कँप काढली व त्यामध्यें सगळे गरीब डेलिगेट पांच रुपये वांचविण्याच्या इच्छेनें जमा होऊं लागले; व कॉंग्रेस मोडण्याकरितां आलेले श्रीमंत डेलिगेट दहा रुपये दराच्या खाणावळींत जाऊन चैनीनें राहूं लागले. परंतु व्यापारांतील फ्री ट्रेडचें तत्त्व सुरतेसही काम करूं लागून एका कँपचा दर पांच रुपये असल्यामुळें दुसऱ्या श्रीमंतांच्या कँपलाही आपला दर पांच रुपयेच करणें भाग पडलें. नेमस्तांच्या मनांतून जर जहालांना ते जहाल म्हणून दूर ढकलावयाचें नसतें, तर हा दरांतील फरक नाहींसा झाल्यानंतर आतां तुमची आमची जेवण्याची व राहण्याची कँप एकच करूं या, असें नेमस्तांनीं बंधुप्रेमानें साहजिकपणेंच आपल्या नॅशनॅलिस्ट बंधूंना म्हटलें असतें. पण जे सरकारच्या मर्जींतले नेमस्त लोक त्यांनीं इतक्या खालच्या पायरीवर उतरण्याची तसदी काय म्हणून घ्यावी? आणि ज्यांना कॉंग्रेसमधून दूर सारावयाचें, असा मनांतील गुप्त परंतु दृढ संकल्प, यांच्याबद्दल ते इतकें अगत्य कसें दाखविणार? या नेमस्तांच्या युक्तीमुळें जहाल लोक जेवणें, रहाणें, वगैरेमधून तर आयतेच दूर ढकलले गेले. आतां फक्त कॉंग्रेसमधून त्यांना दूर ढकलून द्यावयाचें राहिलें होतें. आणि त्या उद्योगाला नेमस्त पुढारी अतिशय जारीनें लागले.

* * *

नेमस्त पक्ष म्हणजे शुद्ध एक कोळसा आहे. तो जितका उगाळावा तितका तो जास्त काळा निघणार. अशा त्या नेमस्तांची कर्तबगारी काय सांगावी! जहाल पक्षास इतक्या बाजूंनींही अडवून त्या पक्षाची तृप्तता झाली नाहीं. त्या पक्षांतील कित्येक सभ्य लोकांनीं जहालांच्या विरुद्ध सुरतेंतील गुजराथी लोकमत क्षुब्ध करण्याचा एक अतिशय निंद्य प्रयत्न सुरू केला. त्यांतील घाणेरडेपणा पाहून या नेमस्तांच्या युक्त्यांबद्दल कोणालाही किळस आल्यावांचून रहाणार नाहीं. नेमस्तांनीं आपल्याला "मवाळ" हें एक नांव स्वकष्टानें

संपादन करून घेतलेलें आहे, हें सगळ्यांना माहीतच असेल. या नामाभिधानानें लो. टिळक यांनीं आपल्या केसरी पत्रामध्यें गुजराथी नेमस्तांचाही निर्देश केलेला आहे. परंतु गुजराथी भाषेमध्यें "मवाळ" या शब्दाचा अर्थ "नपुंसक" असा होतो, असें गुजराथी न जाणणाऱ्या जहाल प्रतिनिधींना सुरतेस गेल्यानंतर कळलें! "मवाळ" या शब्दाचे हे दोन अर्थ लक्षांत येऊन कोणी नेमस्तानें गुजराथी भाषेमध्यें हस्तपत्रकें वाटून भोळ्या बापड्या गुजराथी लोकांना असें भासविलें कीं, टिळकांनीं तुम्हांला "नपुंसक" म्हटलें आहे व ते तुमची निंदा करीत आहेत. या नेमस्तांच्या अपवादाचें क्षालन करण्याकरितां लो. टिळकांनीं सुरत येथील बालाजीच्या टेकडीवर भरलेल्या सात आठ हजार लोकसमुदायापुढें एक जाहीर व्याख्यान दिलें, व त्यांत आपला गुजराथी लोकांना दुखविण्याचा बिलकुल हेतु नाहीं, असें त्यांनीं फार सुंदर रीतीनें सिद्ध करून दाखविलें व नेमस्त लोक काँग्रेसला मागें ढकलून नेत आहेत तें बंद करणें तुमच्या हातांत आहे, याकरितां या कामीं तुमची सहानुभूति असावी अशी लो. टिळक यांनीं गुजराथी लोकांना विनंति केली. त्यामुळें नेमस्तांचा हा डाव फसला. लो. टिळकांप्रमाणेंच रा. खापर्डे, बाबू अरविंद घोष वगैरे मंडळीही हल्लीं राष्ट्राची स्थिति कशी काय आहे, नेमस्त लोकांचे काय बेत चालले आहेत, आणि त्यावर जहाल लोकांनीं काय केलें पाहिजे, वगैरे सर्व गोष्टी लोकांना समजावून सांगत होते. अशा रीतीनें जें लोकमत जहाल पुढारी बनवीत होतें, तें ढासळून पाडण्याकरितां नेमस्त पक्षानें दि. ब. अंबालाल साखरलाल आणि मि. अल्लीमहमद भीमजी या दोन योद्धयांना तोंडघशीं दिलें होतें. परंतु त्यांच्या वाक्चातुर्यानें सामान्य जनसमूहाचें मत म्हणण्यासारखें मुळींच बदललें नाहीं.

* * *

नेमस्त पक्षाचे असे डावपेच चाललेले आहेत असें पाहून, आपलें काम अगदीं व्यवस्थित आणि पायाशुद्ध ठेवण्याचा जहाल पक्षानें निश्चय करून त्याप्रमाणें ता. २४ रोजीं आपल्या कामाला सुरुवात केली. मंगळवार ता. २४ रोजीं तिसरे प्रहरीं नॅशनॅलिस्ट पक्षाचे लोक एकत्र जमा झाले व बाबू अरविंद घोष यांच्या अध्यक्षतेखालीं कामाला सुरुवात झाली. नंतर रा. नरसिंह चिंतामण केळकर, संपादक मराठा, यांची सेक्रेटरीचे जागीं नेमणूक

झाली व त्यांच्या द्वारें नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सचें म्हणणें आणि मागणें नेमस्त पक्षाला कळवावें असें ठरलें. त्या वेळीं कॉन्फरन्सपुढें मुख्यत्वेंकरून दोन प्रश्न होते. कलकत्ता येथील बाविसाव्या काँग्रेसमध्यें स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या विषयांवर जे ठराव पास झाले आहेत, ते सरकारच्या खुशामतीकरितां गाळून टाकून काँग्रेस मागें न्यावी, अशी जी नेमस्त पक्षाची युक्ति आहे ती आपण चालू द्यावी कीं काय हा प्रश्न, आणि डॉ. घोष यांच्या अध्यक्षतेविषयींचा दुसरा प्रश्न. यांपैकीं जरी अध्यक्षांच्या प्रश्नासंबंधानेंच पूर्वीपासून मुख्य वाद माजलेला होता, तरी देखील जसजशी काँग्रेस जवळ येत चालली, तसतसा हा वाद काँग्रेसमध्यें, आपल्यामुळें फूट पडूं नये, या उदात्त हेतूनें सर्व जहाल प्रतिनिधि आपल्या मनांतून हळूहळू विसरून जाऊं लागले होते. व त्या हेतूस्तव आपल्या मनाचा जास्त मोठेपणा दाखवून जहाल लोक असेंही म्हणूं लागले कीं, बाविसाव्या राष्ट्रीय सभेच्या ठरावांपासून यंदाची काँग्रेस मागें हटावयाची नाहीं, असें जर नेमस्त लोक आश्वासन देण्याला तयार होतील, तर अध्यक्षाच्या निवडणुकीला आम्ही कांहीं एक हरकत घेणार नाहीं, व सर्व काम सुयंत्रितपणें चालूं द्यावें. ही मागणी अगदीं समंजसपणाची होती. परंतु तीही नेमस्त लोकांना पटेना. बाविसाव्या काँग्रेसमधील उपरिनिर्दिष्ट चार ठराव गिळून नेमस्त आपलें तोंड बंद करून बसले होते. तें उघडण्याकरितां अध्यक्षांच्या निवडणुकीच्या रूपानें त्यांचें नाक दाबून धरणें अवश्य झालेलें होतें. बाविसाव्या काँग्रेसइतक्या मजलेवर तेविसावी काँग्रेस राहील इतकी अट नेमस्तांनीं कबूल केली असती, म्हणजे अध्यक्षाबद्दलचा सगळा तंटा एका क्षणांत मिटत होता. अध्यक्षाचा वाद हा कांहीं खऱ्या महत्त्वाचा वाद नव्हता. काँग्रेसची पुढें गेलेली मजल मागें हटूं नये हा नॅशनॅलिस्ट पक्षाचा मुख्य वादाचा प्रश्न होता.

* * *

परंतु पांच सहाशें नॅशनॅलिस्ट लोकांनीं नाक दाबण्याचा प्रयत्न केला तरी हट्टास पेटलेले नेमस्त लोक कांहीं केल्यानें आपलें तोंड उघडीनात. ता. २४ डिसेंबर रोजीं नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सची पहिली बैठक झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक हस्तपत्रकाचें लहानसें चिटोरें वांटण्यांत आलें. त्यांत नेमस्त पक्षाकडून असें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें कीं, यंदाच्या काँग्रेसच्या

ठरावाच्या यादींत स्वराज्य, बहिष्कार वगैरेबद्दलचे ठराव गाळले आहेत, असें कालच्या सभेंत सांगण्यांत आलें; तसें त्यांनीं तेथें सांगावयाला नको होतें; ही बातमी निराधार आहे अशी एक मोघम प्रेसनोट मि. गांधी यांच्या सहीनें प्रसिद्ध झाली होती. परंतु अशानें नॅशनॅलिस्ट पक्षाचीं मनें शांत होणें शक्य नव्हतें. नॅशनॅलिस्ट लोकांना तेविसाव्या काँग्रेसच्या ठरावाची यादी प्रत्यक्ष पाहिजे होती. तुमची बातमी निराधार आहे असें म्हणणारांनीं आपली बातमी खरी कशी आहे, हें साधार दाखवावयाला पाहिजे होतें, व तें मि. गांधीसारख्यांच्या सहीवर भागण्यासारखें नव्हतें. मे. मेथा, वाच्छा आणि गोखले हे या काँग्रेसच्या मागें हटविण्याच्या कामांत मुख्य सूत्रधार आहेत, हें सगळ्यांना माहीत झालेलें होतें. तेव्हां त्यांच्यापैकीं कोणाच्या तरी सहीनें ठरावाबद्दलची साधार बातमी पुढें आल्याशिवाय इतर प्रेसनोटांच्या खडर्यावर कोणाचाही पक्का विश्वास बसण्यासारखा नव्हता. परंतु आपल्याविरुद्ध साशंक झालेल्या लोकांची अशा रीतीनें खात्री करून देण्याला मे. मेथा, वाच्छा, गोखले वगैरे कोणीच तयार नव्हते. कारण असें करणें हें त्यांच्या खऱ्या हेतूविरुद्ध झालें असतें. नॅशनॅलिस्ट पक्षाचें लोक कॉन्फरन्समध्यें जमत आहेत आणि बाविसाव्या वर्षीं काँग्रेसची जी स्थिति होती ती कायम ठेवा, अशी एकदिलानें आपली विनंति करीत आहेत, ही बातमी नेमस्तांच्या बादशहांना लागली नसावी असें नाहीं. आणि एवढ्याच मागणीवर जर तंटा तुटत होता तर ती मागणी कबूल करण्याला मोठेंसें कठीण होतें असेंही नाहीं. परंतु तितकेंही करण्याला बादशहांची स्वारी तयार नव्हती! नॅशनॅलिस्ट पक्षाची वाजवी मागणी कबूल करून काँग्रेसमध्यें ऐक्य राखणें हें मेथा आणि कंपनीच्या हातांत होतें तें त्यांनीं केलें नाहीं. यावरूनही काँग्रेस मोडण्याला खरे कारणीभूत कोण झाले, हें वाचकांच्या लक्षांत येईल. काठ्या घेऊन धांवले म्हणजेच काँग्रेस मोडते असें नाहीं. काठ्या उगारणें हा अडाणी लोकांचा मार्ग आहे. शहाणे आणि म्हणून जास्त लबाड लोक आपलीं यंत्रें पाताळांत दडवून ठेवतात आणि तेथून गुप्तपणें आपलीं कारस्थानें जुळवून आणीत असतात. तसा उद्योग मेथा आणि कंपनीनें चालविलेला होता. यामुळें काँग्रेस मोडण्याचें सर्व खापर याच कंपनीच्या डोक्यावर येऊन फुटत आहे. बाविसाव्या काँग्रेसमधील स्वराज्य, बहिष्कार वगैरेचीं तत्वें सर फेरोजशहा मेथा यांना

कबूल नव्हती, हें टाइम्सच्या बातमीदारानें त्यांची जी मुलाखत घेतली त्यामध्येंही स्पष्ट झालेलें आहे. सरकारला बायकॉट आवडणार नाहीं म्हणून सर फेरोजशहा मेथा यांना बायकॉट नको आहे व स्वराज्यासंबंधानें त्यांचें असें मत आहे कीं, हल्लीं चालू असलेल्या राज्यपद्धतींतच कांहीं सुधारणा करणें, हें श्रेयस्कर होय व साम्राज्यांतील इतर भागांप्रमाणें आपल्याला राजकीय हक्क मिळावयाचे हा आपला अतिशय दूरचा आणि कालावधीनें साध्य होणारा अंतिम हेतु असावा, हेंच फायदेशीर आहे. बहिष्कार, स्वराज्य वगैरे संबंधानें ज्यांचीं अशा प्रकारचीं मतें आहेत, ते बाविसाव्या काँग्रेसमधील सगळे ठराव आपण शाबूत ठेवूं, असें अश्वासन लबाडी केल्याशिवाय कोणत्या तोंडानें देऊं शकणार ? आणि असें जर स्पष्ट आहे, तर आम्हीं मागील ठराव गाळले नाहींत अशी जी मि. गांधी यांच्याकडून या मंडळींनीं प्रेसनोट काढविली ती शुद्ध लबाडीची, खोडसाळपणाची आणि आपल्या अंतःकरणांतील समजाहून दुसऱ्यांचा भिन्न समज उत्पन्न करणारी अशी होती, व ही लबाडी या लोकांनीं जाणून बुजून केली, व या कामांत या लोकांनीं मि. गांधीसारख्या प्रामाणिक सभ्य गृहस्थाला समजून उमजून फसवलें, असें निष्पन्न होत नाहीं काय ? परंतु हा प्रश्न इतरांपेक्षां गांधी यांचा जास्त आहे. याबद्दल मि. गांधी यांनीं या प्रामाणिक लोकांपासून जबाब मागितला पाहिजे. परंतु मेथा आणि कंपनीचें खरे डावपेच याच्यापेक्षांही जास्त स्पष्ट रीतीनें इतर साधनांवरून दिसत होते. ता. २५ रोजीं या मंडळींनीं काँग्रेसकरितां कॉन्स्टिटयूशनचा म्हणून एक मसुदा प्रसिद्ध केला. त्याचें मराठी भाषांतर आम्हीं आपल्या मागील अंकामध्यें दिलेलेंच आहे. तो मसुदा लक्षपूर्वक वाचला असतां नॅशनॅलिस्ट लोकांना काँग्रेसमधून काढून टाकण्याकरितां या नेमस्तांचे पाताळयंत्री प्रयत्न कसकसे चालले होते, हें स्पष्ट दिसून येईल. स्वराज्य हा नॅशनॅलिस्ट लोकांचा मुख्य हेतु होय. त्याला या काँग्रेसच्या घटनेमध्यें कोठेंही जागा नव्हती. त्याच्याऐवजीं दुसरेंच कांहीं तरी एक थोतांड उभें करण्यांत आलें होतें व त्याला जे कबूल असतील त्यांनाच फक्त राष्ट्रीय सभेचे डेलिगेट होतां यावें, अशी वरपासून खालपर्यंत युक्ति योजण्यांत आलेली होती. प्रॉव्हिनशियल काँग्रेस कमिटया आणि डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमिटया अशा दोन नवीन संस्था यांत निर्माण केलेल्या होत्या, व त्यांत या नेमस्तांच्या मताचे जे नेमस्त लोक असतील तेच सभासद

असावेत अशी योजना केलेली होती व १९०९ सालापासून या नेमस्त लोकांच्या आणि नेमस्त तत्त्वांच्या प्रॉव्हिनशियल आणि डिस्ट्रिक्ट कमिट्यांनीं मात्र कॉंग्रेसकरितां डेलिगेट निवडावे, असें ठरविलें होतें. आजपर्यंत ज्या सार्वजनिक सभा, जाहीरसभा किंवा इतर संस्था डेलिगेट निवडून देत असत, त्यांचा तो हक्क काढून घेण्यांत आला होता आणि फक्त नेमस्तांच्या द्वारानेंच कॉंग्रेसचे नवीन प्रतिनिधि आंत सोडण्याची युक्ति योजलेली होती. यांत नॅशनॅलिस्ट लोकांना कोठेंही जागा नव्हती, व त्या पक्षाला आपल्यामधून अजिबात काढून टाकण्याची सोय केलेली होती. हें नेमस्तांचें कपट ज्यांच्या लक्षांत येईल, ते कॉंग्रेस मोडल्याबद्दल नेमस्त लोकांनाच सर्वतोपरी जबाबदार धरतील. या कृष्णकारस्थानांवरून ही कॉंग्रेस सोडण्याबद्दल, तिला मागें हटविण्याबद्दल आणि तिच्यांतून नॅशनॅलिस्ट पक्षाला काढून टाकण्याबद्दल नेमस्तांचे आंतून लबाडीचे आणि बाहेरून संभावितपणाचे कसे प्रयत्न चालले होते, हें सर्वांच्या लक्षांत येईल.

* * *

वर लिहिलेली कॉंग्रेसची कॉन्स्टिटयूशन ता. २५ रोजीं भरलेल्या नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्समधील लोकांच्या हातांत पडली आणि तेव्हां नेमस्तांची लुच्चेगिरी सगळ्यांच्या पूर्णपणें लक्षांत बिंबली, आणि सर्वांना नेमस्तांचा अतिशय त्वेष आला. तरी पण बाविसाव्या कॉंग्रेसमधील प्रगति कायम ठेवण्याला नेमस्त लोक तयार असतील तर अध्यक्षाबद्दल आपण प्रश्न काढावयाचा नाहीं, परंतु आपल्या या तडजोडीच्या सूचना जर विरुद्ध पक्षानें मान्य केल्या नाहींत, तर मात्र अध्यक्षाच्या निवडणुकीपासून तो थेट अखेरपर्यंत प्रत्येक ठरावावर उपसूचना आणावयाच्या, असा सर्वांनुमतें ठराव पास झाला व प्रत्येक प्रांतातर्फे एकेक सभासदाची मिळून नेमलेल्या कमिटीनें तह जुळवून आणावा, असेंही ठरलें आणि त्या दिवशींची सभा बरखास्त झाली. कांहीं मध्यस्थ लोक मध्यस्थी करण्याकरितां इकडून तिकडे खेपा घालीत होते. लाला लजपतराय मि. अल्फरेड नंदी, मोतिलाल घोस, मि. सरय्या वगैरे गृहस्थांनीं गाडीच्या घोडयांना बरीच तसदी दिली, तरी पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. लो. टिळक, बाबू अरविंद घोष, रा. खापर्डे, डॉ. मुंजे, डॉ. मुकरजी, मि. सेन व मि. पिले वगैरे नॅशनॅलिस्ट लोकांनीं नेमलेल्या कमिटींतील मंडळीही नेमस्त

लोकांच्या पुढाऱ्यांची गांठ घेण्याकरितां गेली होती. परंतु नेमस्त लोकांच्या अंगांत इतका अहंकार शिरला होता कीं, मि. सुरेंद्रनाथ बानर्जी खेरीजकरून त्या वेळीं त्यांची कोणी गांठही घेतली नाहीं. या उद्दामपणांतील थोडासा अंश जर नेमस्तांनीं कमी केला असतां, तर काँग्रेस खात्रीनें वाचत होती. पण जिच्यामध्यें नॅशनॅलिस्ट लोकांचा अंतरभाव झालेला आहे ती काँग्रेस जिवंत राहावयाला नको, अशी ज्यांची इच्छा त्यांनीं आपला उर्मटपणा आणि अरेरावी-पणा अशा प्रसंगीं कमी करणें सोयीचें नव्हतें. नॅशनॅलिस्ट पक्ष तंटा मिटविण्याला तयार होता. त्या पक्षांतील लोकांना काँग्रेस पाहिजे होतो. ती आम्हांला मोडावयाची नाहीं म्हणून त्यांनीं सभेमध्यें आपलें स्पष्ट मत व्यक्त केलें होतें व नेमस्तांपैकीं कोणी मोडूं लागले तरी त्यांना तसें करूं द्यावयाचें नाहीं, असा सर्वांचा मनोदय होता. परंतु नुसत्या एका पक्षाच्या चिथावणीनें दुसरा पक्ष जोंपर्यंत काँग्रेस मोडण्याला सज्ज होऊन उभा राहिला आहे, तोंपर्यंत विचाऱ्या जहाल पक्षाचे संकल्प कितीही शुद्ध असले तरी त्यांचा काय उपयोग आहे ? सर्व लाजलज्जा आणि सभ्यपणाचा आडपडदा सोडून नेमस्त पक्षाच्या वतीचीं कित्येक वर्तमानपत्रें आपले खरे मनोदय हल्लीं स्पष्टपणें बरळूं लागलीं आहेत, व नॅशनॅलिस्ट पक्ष तडजोडीकरितां आला तरी तडजोड करावयाची नाहीं, असा दुराग्रह नेमस्त कंपूत ठरलेला असल्याचें निर्लज्जपणें कबूल करण्यांत येत आहे. येथील ज्ञानप्रकाशपत्र म्हणतें, "राष्ट्रीय सभेच्या सुयंत्रित चाललेल्या गाडयाचीं चाकें मोडणाऱ्या गृहस्थास ते बोलावतील तेव्हां व बोलावतील तेथें सर्वांनीं येऊन भेटावें असा स्नेहसंबंध राहिलेला नव्हता, त्यांत आश्चर्य तें काय ? विरुद्ध पक्षास 'शत्रु' म्हणणाऱ्या, **Danger Signal** देणाऱ्या, शिष्टाचार न्याय सर्व सोडून आपल्या दंडुक्या अनुयायांच्या जोरावर मागणी कबूल करावयास लावूं म्हणून धमकी घालणाऱ्या गृहस्थाची शिष्टाई ती कोणती ऐकावयाची ?" यावरून नेमस्तांची कारणें कांहींही असोत ते तडजोडीला पुढें आले नाहींत, हें त्यांच्याच तोंडून कबूल होत आहे. ते तडजोडीला आले असतें, म्हणजे तडजोड होत होती; आणि तडजोड झाली असती म्हणजे काँग्रेस वांचत होती. ही गोष्ट त्यांचे हातांत असून देखील त्यांनीं ती केली नाहीं. इतकेंच नव्हे तर ती न केल्याबद्दल नेमस्तांना भूषणही वाटत आहे, हें ज्ञानप्रकाशमधील पुढील वाक्यावरून व्यक्त होत आहे. "नव्या पक्षाचे पुढारी म्हणतात कीं,

जुन्या पक्षाचे लोक आपल्याशीं तडजोड करतात हें म्हणणें शब्दशः बरोबर आहे, व तो जुन्या पक्षावर आरोप नसून त्यांना आपल्या मताप्रमाणें वागण्याचें धैर्य आहे असें दाखविणारी प्रशंसा आहे." या सगळ्या प्रमाणांवरून कॉंग्रेस मोडण्याचें सगळें श्रेय नेमस्तांकडेच आहे, हें बारीक दृष्टीनें शोधून पाहणाऱ्या लोकांच्या तेव्हांच लक्षांत येईल.

ता. २६ रोजीं कॉंग्रेस भरण्याचा समय जवळ येऊन ठेपला, तरी तडजोडीची कांहीं आशा दिसेना, तेव्हां पूर्वी ठरल्याप्रमाणें अध्यक्षांच्या सूचनेलाही उपसूचना व्यवस्थित रीतीनें आणावयाची, ही गोष्ट नाशिकचे रा. रा. बाबासाहेब खरे, वकील, यांनीं मंडपामध्यें सर्व नॅशनॅलिस्ट लोकांना कळविली व येथें नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्समध्यें ठरलेल्या ठरावाचें काम तात्पुरतें संपलें. अजूनही तडजोड जमली तर पाहावी म्हणून लो. टिळक यांचे प्रयत्न चालले होते व ते ठरावाची यादी पाहावयाला मागत होते. परंतु तशी कांहीं तडजोड झाली नाहीं तर उपसूचना आणावयाची ऐवढें ठरवून नॅशनॅलिस्ट पक्षाची मंडळी अध्यक्ष वगैरे येण्याची वाट पाहत स्वस्थ बसली होती. अखेरीस एकदांची ना. गोखले मि. वाच्छा, मि. सुरेंद्रनाथ बानर्जी, सर फेरोजशहा मेथा, डॉ. रासबिहारी घोस वगैरे मंडळींची मिरवणूक मंडपामध्यें येऊन दाखल झाली, त्या वेळीं त्यांच्यावर 'शेम शेम' वगैरे सन्मानसूचक शब्दांची जी पुष्पवृष्टि झाली तिच्याबद्दल जबाबदार कोण ? तेथून मंडपामध्यें गडबडीला हळूहळू सुरवात झाली, व मि. सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या भाषणाला अटकाव करण्यांत तिचें पर्यवसान झालें. त्या पहिल्या दिवशींच्या वर्तणुकीचा दोष नेमस्त लोक जहालांवर घालीत आहेत. परंतु यांत त्यांची विचारशून्यता मात्र व्यक्त होत आहे. नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सच्या बैठकी कांहीं चोरून चाललेल्या नव्हत्या, त्या राजरोसपणें भरत होत्या. वर्तमानपत्रांचे बातमीदार त्यांना हजर होते, इतकेंच नव्हे तर कित्येक नेमस्त पक्षाचे कट्टे अभिमानी लोकही आम्ही नॅशनॅलिस्टच आहों, असें प्रतिज्ञेवर लिहून देऊन आंत घुसले होते. तेव्हां त्या त्या कॉन्फरन्समधून काय ठरलें, हें सर्वांना माहीतच आहे. त्यांत मेथा आणि अध्यक्ष आले म्हणजे 'शेम, शेम' म्हणून ओरडावें आणि बाबू सुरेंद्रनाथ बोलवायास उठले म्हणजे त्यांना बोलूं देऊं नये, असें कधीं ठरलें असल्याचें लपून छपून नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्समध्यें आलेल्या एकाद्या नेमस्त मनुष्याला ठाऊक असल्यास त्यानें

प्रसिद्ध करावें असें जहाल पक्ष त्याला उघडपणें आव्हान करीत आहे. आणि असा जर कांहीं पुरावा त्यांच्यापाशीं नसेल, तर त्यानें निराधार आक्षेप घेण्याचें बंद केलें पाहिजे, हे त्याच्या सभ्यपणाचें एक कर्तव्यकर्म आहे. तडजोड किंवा उपसूचना या कायदेशीर दोन गोष्टींपेक्षां जहाल पक्षाच्या कार्यक्रमांत तिसरी गोष्ट बिलकूल ठरली नव्हती. जहाल पक्षाच्या मनांतून नेमस्तांना तडजोडीसाठीं आडवावयाचें होतें. पण तें कसें ? कायदेशीर आणि पद्धतशीर रीतीनें ! उपसूचनेनें, दांडगाईनें नव्हे ! त्यांना रिसेप्शन कमिटीचे अध्यक्ष मि. मालवीयांच्या भाषणापासूनच सुरवात करता आली असती व मग दि. ब. अंबालाल साखरलाल यांची सूचना तरी ऐकून काय म्हणून घेतली असती ? मि. सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या बोलण्याला हरकत करावी असें जहालांना आधीं कसें ठरवितां आलें असतें ? मि. सुरेंद्रनाथ हेच अनुमोदन देणार आहेत असें कोणालाही कळलेलें नव्हतें. मग जो वक्ता ठरलेला असल्याचें कळलेलेच नाहीं, त्याचें भाषण बंद पाडण्याविषयीं आगाऊ बेत कसा करतां येईल, हें दीर्घ कल्पनेच्या फक्त एक नेमस्तांसच माहीत ! वस्तुस्थिति अशी कीं, पहिल्या दिवसाची गडबड ही अगदीं भिन्न कारणांनीं उत्पन्न झाली असली पाहिजे. तिच्याशीं जहालांचा कांहीं एक संबंध नाहीं. सर मेथा हे आपल्या अरेरावी वर्तनानें आणि डॉ. रासबिहारी घोष हे अध्यक्षस्थानाविषयींच्या अतितृष्णेनें सामान्य लोकांमध्येंही अतिशय तिरस्कारणीय झालेले होते. आणि त्यांची मनःस्थिति या दोन व्यक्ति मंडपांत येतांक्षणींच ' शेम, शेम ' या शब्दांनीं व्यक्त झाली. आणि तेवढ्या उद्‌गारांनीं लोकांचे मनोविकार तृप्त होऊन मंडपांत पुनरपी शांतता सुरू झाली. आणि कॉंग्रेसच्या कामाला शांतपणानें सुरुवात झाली. मि. मालवीयांचें स्वागतपर भाषण लोकांनीं शांतपणें ऐकलें. त्यांत फक्त एकदांच काय तो ' नो, नो ' अशा आरोळ्यांचा आवाज उत्पन्न झाला. पण तो केव्हां ? नागपुरास कॉंग्रेस व्हावयाची ठरली होती; परंतु परमेश्वराची इच्छा ती सुरतेस भरावी अशी होती, अशा अर्थाचें एक वाक्य मि. मालवीयांच्या भाषणांत आलें, तेव्हांच काय तो फक्त एकदां गलबला झाला. यावरून हा गलबला नॅशनॅलिस्ट लोकांनीं उठविलेला नव्हता हें स्पष्ट होतें. सुरतेस कॉंग्रेस व्हावी अशी परमेश्वराची इच्छा होती हें म्हणणें लबाडीचें आहे, व तशी मेथा आणि मंडळीची

मात्र इच्छा होती ही खरी गोष्ट होय, असें ज्यांचें मत होतें त्यांच्याकडून मि. माल्वीयांच्या वरील वाक्याला हा निषेध आलेला असावा, हें उघड आहे. असले निषेध ज्यांचीं विरुद्ध मतें असतात ते नेहमीं व्यक्त करीत असतात. ह्याच्याशीं नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सचा कांहीं एक संबंध नाहीं. आपल्याला काँग्रेसची प्रगति कायम राखावयाची आहे, हें जें महत्कृत्य आपण अंगावर घेतलें आहे, त्यांत कोणत्याही व्यक्तीच्या उच्छृंखलपणानें व्यत्यय येऊं नये म्हणून मुद्दाम लो. टिळक यांनीं नॅशनॅलिस्ट पक्षांतील लोकांना कॉन्फरन्स-मध्यें एकत्र जमविलें होतें व सर्वांच्या मतानें तडजोड किंवा उपसूचना हा मार्ग ठरला होता. त्यामुळें जहाल पक्षाला मुख्य सूचनेला अनुमोदन मिळून उपसूचनेची वेळ येईपर्यंत स्वस्थ बसण्यापलीकडे दुसरें कांहीं करावयाचें नव्हते. उपसूचना आणण्याचा निश्चय करून स्वस्थ बसलेल्या जहाल लोकांच्या दृष्टीनें सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या भाषणांत व्यत्यय आणून आपल्या उप-सूचनेला उशीर लावण्यांत कांहीं मतलब नव्हता. तेव्हां ते बाबू सुरेंद्रनाथ यांच्या भाषणाला हरकत काय म्हणून करतील ? तर मग साहजिकपणेंच असा प्रश्न येतो कीं, ही हरकत कां करण्यांत आली ? आमच्या मतें बाबू सुरेंद्रनाथ यांनीं मिदनापूरच्या कॉन्फरन्समध्यें पोलीसची मदत मागवली व कित्येकांनीं "ट्रेटर" म्हटलें, या गोष्टींतच या दंग्याचें मूळ शोधून पाहिलें पाहिजे. नेमस्त पुढाऱ्यांना व्यक्तिशः केलेल्या गुन्ह्याबद्दल जर त्यांना सामान्य जनसमूहाकडून योग्य बक्षीस मिळालें तर त्याचा दोष नॅशनॅलिस्ट पक्ष काय म्हणून सहन करून घेईल ? बाबू सुरेंद्रनाथ यांनीं मिदनापूर येथें एकदां परकीय पोलिसांची मदत घेतल्यानंतर मग स्वकीयांच्यापुढें I must be heard अशा आरोळ्या मारून काय व्हावयाचें आहे ? ज्या लोकांनीं आपलें बोलणें ऐकून घेतलें नाहीं त्यांच्यावर Vote of censure पास करण्याची बाबूसाहेबांची तयारी होती. पण मिदनापूर प्रकरणाबद्दल हें आपल्यावरच Vote of censure आहे, असें जेव्हां त्यांना कळलें तेव्हां त्यांच्या मसुद्याचा कागद एकाएकीं कोठें हरवून नाहींसा झाला ! असो. या हकीकतीवरून पहिल्या दिवशीं गडबड करण्यांत नॅशनॅलिस्ट पक्षाचा कांहीं फायदा नव्हता व त्यांनीं ती गडबड केलेलीही नसून दुसऱ्या कोणी यःकश्चित् लोकांनीं व्यक्तिशः आरडाओरड केली आणि तेवढ्यानें घाबरून जाऊन लांबट टेबलभोंवतालच्या

प्रधान मंडळीनें सभा विनाकारण दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब ठेवली. नेमस्त लोकांनीं त्या दिवशींच जर जास्त नेट दाखविला असता तर त्यांना सभा चालवितां आली असती. परंतु ज्यांच्या मनांतून खरोखरच काँग्रेस चालवावयाची असेल त्यांना हें लागू! जे कांहीं तरी खुसपट काढून काँग्रेस मोडण्याकरितां निमित्तावर टेकले होते, त्यांना हें काय होय ?

पहिल्या दिवशींच्या बैठकींत जहालांनीं दंगा केला, अशी जर नेमस्तांची कल्पना झालेली होती, व कांहीं झालें तरी काँग्रेस मोडावयाची नाहीं अशी जर त्यांची इच्छा असती, तर जहाल लोक नुसती उपसूचना पुढें आणूनच न थांबतां काँग्रेसमध्यें गडबडही करीत आहेत असें त्यांच्या कल्पनेप्रमाणें त्यांना कळल्यानंतर तरी काँग्रेस टिकविण्याकरितां जहालांच्या तडजोडीचें काय म्हणणें आहे, हें ऐकण्याला प्रामाणिक नेमस्तांनीं तयार व्हावयाला पाहिजे होतें. २६ व्या तारखेच्या संध्याकाळचे चार वाजल्यापासून तों २७ तारखेच्या दुपारच्या १ वाजेपर्यंत नेमस्तांना वीस एकवीस तास रिकामे होते, त्यांचा त्यांनीं काय उपयोग केला ? इतक्या अवधींत त्यांना जहालांच्या कमिटीला भेटण्याचीही फुरसत झाली नाहीं ! प्रत्येक बादशहा आपापल्या बंगल्यांतील सिंहासनावर स्वस्थ विराजमान होऊन राहिलेला होता ! नेमस्तांनीं तडजोडी-करतां यत्किंचितही प्रयत्न केला नाहीं. यावरूनसुद्धां त्यांच्या मनांतून काँग्रेस मोडावयाची होती हें सिद्ध होतें. परंतु ते इतक्या अवधींत अगदींच स्वस्थ बसले होते असें नाहीं. त्यांनीं काँग्रेस मोडण्याकरितां पुष्कळ खटपटी सुरू केल्या. तडजोड हा काँग्रेस बचावण्याचा एकच मार्ग होता. तो न करतां ज्यांनीं दुसरे मार्ग अवलंबिले ते काँग्रेस मोडण्याकरतांच गुरुवारच्या रात्रीं जागत बसले होते, असें मात्र म्हणावयाला काय हरकत आहे ? एका तडजोडीनेंच फक्त काय तो उपसूचनेचा प्रसंग टळणार, असें स्पष्ट असतां त्या तडजोडी-बद्दल कांहीं एक तजवीज न करतां, शुक्रवारीं एक वाजतां नेमस्त पुढारी आदल्या दिवशींच्या स्थितींतच फिरून काँग्रेसमध्यें येऊन बसले, त्या वेळीं त्यांनीं काँग्रेस बचावण्याकरितां काय तजविजी केल्या होत्या ? कालच्या-सारखाच फिरून आज प्रसंग आला, तर त्याच्याविरुद्ध त्यांनीं काय उपाय योजिले होते ? आदल्या दिवसाप्रमाणेंच आज आपल्याला लोकांनीं बोलूं न दिलें तर काय करावयाचें म्हणून नेमस्तांनीं ठरविलें होतें ? पूर्वींच्या आणि

पुढच्या, गुरुवारच्या आणि शुक्रवारच्या स्थितींत त्यांनीं काय सुधारणा आणि फरक केला होता ? बाह्यात्कारी कांहीं नाहीं ! अशी तजवीज करणें हें रिसेप्शन कमिटीचे चेअरमन आणि जनरल सेक्रेटरी यांचें कर्तव्यकर्म होतें. तशी तड-जोडीची किंवा बंदोबस्ताची कांहीं एक तजवीज न करतां हे गुळाचे गणपति हात हालवीत खुर्चीत येऊन बसले, यांत दंग्याचे खापर जहालांच्या डोक्यावर फोडून काँग्रेस मोडून आपण जहालांपासून विभक्त व्हावयाचें, याच्याशिवाय त्यांचा दुसरा हेतु काय असणार ? दुसरें कोणी तरी सदिच्छेनें प्रेरित झालेलें मनुष्य कांहीं तरी नवीन बंदोबस्त केल्याशिवाय मंडपामध्यें पाय ठेवण्याला तयार झालें असतें काय ? नेमस्त लोक शुक्रवारीं पोलिसांची मदत घेऊन मंडपामध्यें बंदो-बस्त ठेवतील, व काँग्रेसचें काम सुरळीत चालवतील, असें पुष्कळांस वाटलें होतें. परंतु नेमस्त लोक फार वस्ताद ! त्यांच्यासारखे धूर्त फक्त काय ते एकटे इंग्लिश लोकच ! पोलीस बोलावले तर आपल्यावर वाईटपणा येईल, हें पहिलें अनिष्ट, आणि जहालांच्या वाढत्या प्राबल्याची काँग्रेस जिवंत राहील हें दुसरें अनिष्ट, आणि मग जहालांनीं दंगा करून काँग्रेस मोडली, असा कांगावा करण्याला आपल्याला जागा सांपडणार नाहीं हें तिसरें अनिष्ट. अशा अनेक कारणांमुळें नेमस्तांनीं आपल्यापैकीं काळीं डगलीं घालून फिरणाऱ्या लोकांची मदत मोठ्या धूर्तपणानें मागितली नाहीं. ही सल्ला नेमस्तांपैकीं ज्यानें दिली असेल त्याला खरोखर धूर्तपणाकरितां एक बक्षीस दिलें पाहिजे ! नेमस्तांना शुक्रवारच्या काँग्रेसमध्यें बंदोबस्तापेक्षां दंग्याचीच जास्त अपेक्षा होती असें त्यांनीं पोलीस न आणतां बदमाष लोक आणले होते यावरूनही स्पष्ट होतें. त्यांनीं रातोरात व्हालंटियर बदलले, आणि दुसरे दिवशीं मंडपांत शेंकडों गुंड, खलाशी, भय्ये, नाखवे, बदमाष वगैरे लोक आले होते यावरून व्यवस्था ठेवण्यापेक्षां मोडण्याचीच त्यांची तयारी जास्त दिसत होती. इतकी तयारी असल्यावर दंगा होण्याला काय उशीर ! तरी पण आपल्या बाजूनें विरुद्ध पक्षाला कांहीं निमित्त सांपडूं नये म्हणून नॅशनॅलिस्ट पक्ष शुक्रवारीं फार जपून होता व काँग्रेसमधील बादशाही उद्दामपणाच्याविरुद्ध आणि तडजोडीविषयींच्या कर्णबधिरतेविरुद्ध आपल्या हातामध्यें कायदेशीर असें जें उपसूचनेचें शस्त्र आहे तेवढ्यांतच तृप्तता मानून जहाल लोक अगदीं स्तब्ध बसले होते. सुरेंद्रनाथ टेबलावर उडी

मारून उभे राहिले, त्यांची बोलण्याची इच्छा तृप्त झाली. आणि आतां काँग्रेसचें काम पद्धतशीर रीतीनें चालेल असें सर्वांना वाटूं लागलें. लो. टिळक यांनीं यांच्यापूर्वींच चेअरमनला एक चिठ्ठी लिहिली होती. दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांची कमिटी नेमून तडजोडीविषयीं कांहीं तरी निकाल ठरेपर्यंत अध्यक्ष निवडण्याचें काम थोडा वेळ लांबणीवर टाकावें, असें त्या चिठ्ठींत लिहिलें होतें. मागच्या काँग्रेसचे चार ठराव नेमस्तांनीं घेण्याचें कबूल केलें असतें म्हणजे अध्यक्षाचा वाद एका क्षणांत मिटत होता. पण लो. टिळक यांच्या चिठ्ठीला कांहींच उत्तर आलें नाहीं. तेव्हां सुरेंद्रनाथचें भाषण संपल्याबरोबर ते आपली उपसूचना पुढें मांडण्याकरितां प्लॅटफॉर्मवर तावडतोब गेले. दर-सालची वहिवाट म्हटली म्हणजे अध्यक्षांच्या निवडणुकीला चारपांचजणांचें टेकू मिळतात आणि मग सर्वांचीं मतें घेऊन टाळ्यांच्या गर्जनेंत अध्यक्षांची निवडणूक होते. परंतु यंदां तसें कांहींच झालेलें कोणाला दिसलें नाहीं. मि. सुरेंद्रनाथचें भाषण संपून लोकमान्य टिळक प्लॅटफॉर्मवर जातात तोंच म्हणजे सुमारें अर्ध्या किंवा पराकाष्ठा एक मिनिटाच्या अवकाशामध्यें एका सपोर्टरचें जंगी भाषण; तुम्हांला हे अध्यक्ष पसंत आहेत म्हणून चेअरमननें विचारलें, व लोकांनीं होय म्हणून सांगणें, आणि अध्यक्षांचें राज्यारोहण होणें, हीं सगळीं कारकें आटपूनसुद्धां गेलीं, असें नेमस्त लोक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करीत आहेत. परंतु ही असंभवनीय गोष्ट सत्य आहे असें जरी क्षणभर मानलें, तरी लो. टिळक यांना आधीं उपसूचना आणण्याचा हक्क कायम होता, हें त्यांनीं पाठविलेल्या नोटिसीवरून स्पष्ट होत आहे. परंतु डॉ. घोस यांच्या राज्यग्रहणाच्या ओघांत असली न्यायबुद्धि पूर्ण निषिद्ध होती असें दिसतें. लोकांनीं कबूल करण्याच्या आधींच मी अध्यक्ष झालों आहें असें डॉ. घोस लोकांना सांगूं लागले व ज्या शिस्त आणि सभ्यतेचा नेमस्त दुसऱ्यांना आदल्या दिवशीं उपदेश करीत होते ती शिस्त आणि सभ्यता लो. टिळक हे बोलण्याकरितां पुढें आल्याबरोबर मोडण्याला त्यांनीं सुरुवात केली. शिवाजीनें दोन वेळां सुरत लुटली. आतां तिसऱ्यानें टिळक आले आहेत तेव्हां, 'हे गुज-राथी लोकांनो, तुम्ही जागे व्हा आणि चेता' अशा अर्थाची हँडबिलें मंडपांत वांटून गुजराथी लोकांना नेमस्तांनीं आधींच चिडवून ठेवलें होतें. त्यांतच खुद्द रिसेप्शन् कमिटींतील "नो, नो" ची भर पडल्यामुळें जिकडे तिकडे

एकच दंगा होण्याला सुरुवात झाली व अखेरीस पोलीस येऊन त्यांना मंडप मोकळा करावा लागला. दंग्यांत काय काय झालें, जोडे कोणाला बसले आणि खुर्च्या कोणी फेंकल्या, वगैरे हकीकती आतां शिळ्या झालेल्या असल्यामुळें त्या आम्ही येथें देत नाहीं. दंगा चेतवून दिल्याबरोबर हल्लींची काँग्रेस बिनमुदतीनें तहकूब ठेवून मंडपांतून मागच्या दरवाजानें पळून पोलीसच्या मदतीनें आपापल्या बंगल्यावर जाऊन नेमस्त मंडळी आपल्या सोवळ्या कन्व्हेन्शनच्या विचाराला लागली! पहिला नवरा मरून दुसरा नवरा करणाऱ्या हॅम्लेटच्या आईनेंसुद्धां इतकी घाई केली नसेल! ताबडतोब दुसऱ्या दिवसाला नेमस्तांची कन्व्हेन्शन रचना तयार! कोणी म्हणतात ती मुंबईहून आधींच आणलेली असली पाहिजे! इतक्याउपर तरी तडजोड व्हावयास पाहिजे होती, तरीदेखील ती नेमस्तांनीं केली नाहीं, आणि कन्व्हेन्शन काढली. यावरून काँग्रेस मोडण्याचा नेमस्तांच्या पोटांतील गुप्त हेतु अगदीं स्पष्टपणें बाहेर पडत आहे. असो. या एकंदर हकीकतीमध्यें नेमस्तांचे डावपेंच कसे होते, सरकारच्या भुलथापीला ते कसे बळी पडले, त्यांनीं काँग्रेस मोडण्याचा कसा घाट घातला, आणि तडजोड न करण्याचा दुराग्रह चालविल्यामुळें अपयशाचें खापर जें त्यांच्या मनांतून जहालांवर टाकावयाचे होतें तें अखेरीस त्यांचें त्यांच्यापुढें आयतेंच कसें आलें हें प्रस्तुतच्या लेखांत आम्हीं दाखविलें आहे.

## विविध विचार : : २०

काळ : अग्रलेख, ता. १६-८-१९०७

● मूळ लेखास मथळा नाहीं.

लाला लजपतराय यांना कारणावांचून पकडून चौकशीवांचून हद्दपार केल्याची गोष्ट घडून आली त्या दिवसापासून सरकारनें अशी ही विलक्षण गोष्ट कां केली याबद्दल लोकांनीं जरी अनेक तर्क चालविले आहेत तरी या प्रश्नाचा समाधानकारक उलगडा अद्यापि कोणाला झाला नाहीं. परंतु आतां एकेक बातमी हळूहळू बाहेर पडत चालली आहे, असें दिसतें. लाला लजपतराय आणि अफगाणिस्थानचे अमीर यांच्यासंबंधाची जी गोष्ट बाहेर आली आहे ती सर्वथैव खोटी आहे यांत शंका नाहीं. परंतु ती खरी असो किंवा खोटी असो, लाला लजपतराय यांच्या हद्दपारीचा त्या गोष्टीशीं इंग्लिशांच्या वेडगळ मनांत खात्रीनें संबंध असला पाहिजे. आर्यसमाजाच्या कामांत माझा मुलगा पुष्कळ पैसे खर्च करीत होता म्हणून त्याला पकडून हद्दपार केलें, असें जें लाला लजपतराय यांच्या वडिलांचें म्हणणें तेंच खरें कारण आहे, असें मानणें म्हणजे वेडगळपणाची कमाल आहे! असल्या पोरकट कारणासाठीं इंग्लिश लोक खात्रीनें कोणाला चौकशीवांचून हद्दपार करणार नाहींत. अमीर हबीबुल्लाखान यांच्यासंबंधानें इंग्लिशांच्या मनांत कांहीं तरी विकल्प असल्याचीं चिन्हें अमीरसाहेब हिंदुस्थानांत प्रवास करीत होते तेव्हांपासूनच दिसून येत होतीं, आणि तेव्हांपासूनच नेटिव लोकांचे अमीरसंबंधानें काय विचार आहेत इकडे इंग्लिशांचें लक्ष लागलें असावें असें दिसतें. लंडन टाइम्सच्या एका स्पेशल बातमीदारानें बाबू बिपिनचंद्र पाल यांचीं भाषणें हुडकून काढून त्यांतून थोडे दिवसांपूर्वी पुढील मजकूर

आपल्या अन्नदात्याकडे पाठविला आहे. "The Napoleon of India would probably come from without her forntiers. Ameer Habibulla Khan might be the Nepoleon of India and champion her cause. But ultimately the India Government was destined to be a Republic similar to the United States of America, with an Upper Chamber of feudatory chiefs and a Lower Chamber of the common people." यांतील भावार्थ असा आहे कीं, हिंदुस्थानचा नेपोलियन हिंदुस्थानांत उत्पन्न न होता तो हिंदुस्थानच्या बाहेरून येईल. कदाचित् अमीर हबीबुल्लाखान हेच हिंदुस्थानांत नेपोलियन होतील, आणि ते हिंदुस्थानच्या हिताकरितां लढतील. परंतु तें कांहीं झालें तरी अखेरीस एवढें ठरलेलें आहे कीं, हल्लींचें इंडियन सरकार नाहींसें होऊन त्याच्या जागीं अमेरिकेंतल्याप्रमाणें लोकसत्तात्मक राज्यपद्धति सुरू होईल. आणि त्या लोकसत्तात्मक राज्याच्या हॉउस ऑफ लॉर्ड्समध्यें हिंदुस्थानचे नेटिव राजे बसतील आणि हॉउस ऑफ कॉमन्समध्यें हिंदुस्थानचे सामान्य लोक बसतील. अशा अर्थाचा जो मजकूर लंडन टाइम्समध्यें थोडे दिवसांपूर्वीं प्रसिद्ध झाला आहे, त्यावरूनसुद्धां इंग्लिशांना अमीर आणि हिंदुस्थानांतील लोक यांच्या दरम्यानच्या गुप्त राजकीय संबंधांत संशय आला असला पाहिजे असें दिसतें. लाला लजपतराय यांनीं अमीरांना जें पत्र धाडल्याची कादंबरी रचण्यांत आलेली आहे, त्या पत्रांत मुख्यत्वेंकरून दोन गोष्टी आहेत; एक अमीरानें हिंदुस्थानवर स्वारी करून यावें ही, आणि दुसरी अशी कीं, हिंदुस्थानांतील पंजाबी, शीख वगैरे लोकांचें सैन्य इंग्लिशांविरुद्ध उठण्याला तयार आहे. यांपैकीं पहिल्या गोष्टीला आधार इंग्लिशांनीं बाबू बिपिनचंद्र पाल यांच्या बारिसाल येथील भाषणामधून ज्याप्रमाणें काढला आहे, त्याप्रमाणें सैन्याच्या फितुरीसंबधाचा आधार त्यांना गुजराणवाला येथील इंडिया पत्रावरून मिळाला आहे, असें दिसतें. सदर इंडिया पत्रांत अमेरिकेंत असलेल्या सरहद्दीवरील एका शिपायाचें नेटिव शिपायांना उद्देशून लिहिलेलें एक पत्र छापलें आहे. हें सरहद्दीवरील शिपायाचें पत्र हस्तपत्रकाच्या स्वरूपानें छापून जिकडे तिकडे वांटण्यांत आलें होतें, असें इंग्लिशांचें म्हणणें आहे.

त्याच्या प्रती रिझर्व सैन्यांतील प्रत्येक शिपायाच्या हातांत गेलेल्या असून लष्करांतून चाकरी सोडून निघालेल्या शिपायांच्या हातांतही त्या पडलेल्या आहेत; इतकेंच नव्हे, तर या रिझर्व सैन्यापैकीं एक इसम इंग्लंडांत असतां त्याच्याकडेही तें पाठविण्यांत आलें असावें असें दिसतें. या हस्तपत्रकांत कांहीं विशेष राजद्रोहाचा मजकूर होता असें नाहीं. आपण हिंदुस्थानांतील लोक नेहमीं ज्या गोष्टी बोलतों आणि ज्या बहुतेक अंशीं खऱ्या असतात, त्याच त्यामध्यें लिहिलेल्या आहेत. तरी पण पराचा कावळा करून तें हस्तपत्रक छापल्याबद्दल गुजराणवाला येथील इंडिया पत्रावर फिर्याद होऊन त्यास शिक्षाही देण्यांत आलेली आहे. ही जी एकंदर हकीकत बाहेर आलेली आहे, व इंग्लिशांचें हल्लीं जें वर्तन चाललें आहे, त्यावरून हिंदुस्थानच्या सैन्यांत फितुरी करण्याचा आणि हिंदुस्थानांत अमीराला बोलावून आणण्याचा खरोखरच प्रयत्न चालविलेला आहे, अशी इंग्लिशांची समजूत झालेली असली पाहिजे. आणि म्हणूनच त्यांच्या हातून असलीं वेडगळपणाचीं कृत्यें होत असलीं पाहिजेत. परंतु अशा वेळीं हिंदुस्थानांतील लोकांनीं आपल्या परकीय आणि अतएव दीन व गरीब झालेल्या राज्यकर्त्यांवर रागावूं नये. या वेळीं तें घाबरलेले आहेत आणि भिऊन गेलेले आहेत. अशा वेळीं कोणाचें डोकें जाग्यावर राहणार आहे? एवढें थोरलें हिंदुस्थानचें राज्य जाण्याची वेळ म्हणजे कांहीं लहानसान भयंकर वेळ नव्हे! अशा वेळीं त्यांच्या डोक्यांतून अविवेकाच्या छिद्रांमधून त्यांची अक्कल कोठें हरवली, तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं.

* * *

राज्य जाण्याचें लक्षण केव्हां समजावें अशाविषयीं बेकननें कांहीं खुणा दिलेल्या आहेत. राजाच्याविरुद्ध लोक वारंवार आणि बेधडकपणानें अपशब्द वापरूं लागले, आणि त्याच्याबद्दलच्या नाहीं नाहीं त्या वाटाघाटी करूं लागले, म्हणजे समजावें कीं, तें राज्य जावयाचें! तसेंच सरकारच्याविरुद्ध खोटया बातम्या उठवून लोक मुद्दाम पसरवूं लागले, आणि त्या खोटया बातम्यांवरही लोकांचा विश्वास बसूं लागला, म्हणजे समजावें कीं राज्य जावयाचें! अनेक पक्ष आणि त्यांच्यांत निर्भीडपणाचीं भांडणें आणि उघड उघड वादविवाद, अशा गोष्टी होऊं लागल्या, म्हणजे समजावें कीं राज्य जावयाचें! अशा खुणा

इंग्लिशांचा तत्त्वज्ञानी बेकनसाहेब यानें लिहून ठेवल्या आहेत. तें पाहून तशींच हीं चिन्हें हिंदुस्थानांत हल्लीं आपल्या राज्याला होत आहेत असें वाटून इंग्लिश लोक अगदीं गडबडून गेले आहेत. तेव्हां या धांदलींत त्यांच्या डोक्यांतील अक्कल कोठें हरवली तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं. खोट्या बातम्या पसरविण्याची ही जी खूण लॉर्ड बेकन यांनीं सांगितली आहे, तीही पंजाबमध्यें इंग्लिशांच्या दृष्टोत्पत्तीस येत चालली आहे. त्यावरूनही आपलें राज्य जाण्याची त्यांची भीति अगदींच निराधार नाहीं हें कोणाच्याही लक्षांत येईल. जिच्यावर आपलें राज्य जाण्याची भीति इंग्लिशांनीं रचिली आहे ती प्रस्तुत प्रसंगीची खोटी बातमी म्हटली म्हणजे पंजाबांतील प्लेगसंबंधींची होय. विहिरींत विष टाकून त्याच्या द्वारानें इंग्लिश लोक नेटिवां-मध्यें प्लेगचा प्रसार करतात अशी खोटी बातमी पसरवून, या बातमीवर इंग्रजी राज्याच्या शत्रूंनीं पंजाबी लोकांचा दृढतर विश्वास बसविलेला आहे. प्लेगनें सहसा इंग्लिश लोक मरत नाहींत ही गोष्ट सर्वांना मशहूर आहे. त्यामुळें विहिरींत विष टाकून नेटिवांत मुद्दाम प्लेग पसरविला जातो या कल्पनेवर लोकांचा साहजिकपणें विश्वास बसतो, आणि आपल्याला मुद्दाम इंग्लिश लोक मारीत आहेत असें लोकांना वाटतें. परंतु यांत लोकांचा मोठासा दोष आहे असें नाहीं. शहाण्या लोकांमध्यें अशी बातमी पसरविण्याविषयीं कोणी कितीही प्रयत्न केला तरी त्या बातमीवर कोण विश्वास ठेवणार आहे? इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतील लोकांपासून उकळलेल्या कोट्यवधि रुपयांचा आपल्या जातभाईंना मोठमोठे पगार देण्याच्या कामांत अपव्यय न करतां जर त्यांनीं ते पैसे लोकांना सुशिक्षित करण्यांत खर्च केले असते, तर त्या लोकांनीं खात्रीनें असल्या बातम्यांवर विश्वास ठेवला नसता. लोकांना मुद्दाम अज्ञान अवस्थेंत ठेवण्याचा हा परिणाम आहे. इंडियन लोकांना जाणूनबुजून अज्ञानांत ठेवून जे इंग्लिश लोक आपले अनेक राजकीय फायदे साधून घेऊं पाहत आहेत, त्यांनीं त्या अज्ञानाच्या स्थितीपासून उत्पन्न होणारे तोटेही सोसण्यास तयार असले पाहिजे. शिवाय विहिरींत विष टाकून प्लेग उत्पन्न करून, इंग्लिश लोक नेटिवांना मारतात अशी लोकांत बातमी पसरविल्याबद्दल इंग्लिशांना मोठें वाईट वाटावयाला पाहिजे आहे असें नाहीं; किंवा त्यांना या बातमीबद्दल मोठासा सात्त्विक राग आणून दाख-विण्याचेंही कांहीं कारण नाहीं. आम्ही मोठे पापभीरु, आमच्या पायाखालीं

कधीं मुंगीदेखील मरावयाची नाहीं, अशा आम्हां धर्मात्म्यावर आम्ही विहिरींत विष टाकून प्लेगनें आमच्या प्रियकर इंडियन प्रजेला मारतों असा आरोप करणें ही केवढी गोष्ट आहे, अशा प्रकारचे कांगावे करण्याचें इंग्लिशांना मोठेंसें प्रयोजन आहे असें नाहीं! इंग्लिशांनीं विहिरींत विष टाकून प्लेगानें माणसें मारलीं असतील किंवा नसतील, हा प्रश्न वेगळा आहे. त्याच्याबद्दल आपण पुढें विचार करूं. पण प्लेगनें माणसें मारलीं म्हणजे मरतात आणि दुसऱ्या कोणत्याही युक्तीनें इंडियन माणसें मरत नाहींत अशी का गोष्ट आहे? हिंदुस्थानांतील लोक प्लेगनें मेले तरच ते मेले, असें का म्हणावयाचें आहे? हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं विहिरींतून विष टाकून क्षणभर प्लेग नसेल उत्पन्न केला, पण त्यांनीं दुसरें एक विष टाकून प्लेगपेक्षां शतपटींनीं भयंकर असा एक रोग कायमचा हिंदुस्थानांत उत्पन्न करून ठेवला नाहीं का? त्याची वाट काय? दारिद्र्य हा रोग प्लेगपेक्षां कमी भयंकर म्हणून इंग्लिशांना वाटतो कीं काय? या दारिद्र्याच्या रोगाची सांथ इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत नाहीं उत्पन्न केली? या रोगाचें विष फक्त पंजाबांतील विहिरींतूनच नव्हे तर सर्व हिंदुस्थानच्या पृष्ठभागावर इंग्लिश लोक आज दीड-दोनशें वर्षे रानरोसपणें फेंकीत आहेत आणि त्या विषाचा परिपक्व परिणाम अलीकडे कित्येक वर्षेपर्यंत हिंदुस्थानांतील लोक सोशीत आहेत. या दारिद्र्याच्या विषाच्या मानानें पाहिलें असतां प्लेगच्या विषाची पुडी म्हणजे शुद्ध अमृत होय! कारण प्लेगनें जो मेला त्याला उद्यां आपल्या स्वतःच्या आणि आपल्या बायकापोरांच्या पोटाला कसें मिळेल याची कधीं काळजी उरत नाहीं! परंतु जो दारिद्र्याच्या विषारी हवेंत जिवंत राहतो, त्याला रोजचाच प्लेग! परंतु शेतकऱ्यांचा कायदा, दुरुस्त केलेलें लँड रेव्हिन्यु कोड, लग्नांत आणि अंत्यविधींत कमी खर्च करण्याविषयीं सुधारकांनीं चालविलेल्या चळवळी, महाग दारूंत फार पैसे खर्च होऊं नयेत म्हणून दिवसेंदिवस स्वस्त केले जात असलेले ताडीचे पिठे, अन्नाची उणीव पडलीच तर सहकुटुंब सहपरिवारसुद्धां पालनपोषण करण्यासाठीं तयार असलेल्या मिशनरी संस्थांची वाढ, वगैरे अनेक सोयींमुळें इंग्रजी अंमलाखालील चैनीच्या दारिद्र्यांत जिवंत राहणें मुळींच कठीण नाहीं, असें कोणी म्हणेल, तर या दारिद्र्यानें मेलेले लोकही थोडेथोडके आहेत असें नाहीं. दारिद्र्य आणि दुष्काळ यांनीं कितीतरी लोक दरसाल हिंदुस्थानांत मृत्युमुखीं

पडत आहेत ! हे कोणी मारले ? इंग्लिशांनीं उत्पन्न केलेल्या दारिद्र्यानेंच कीं नव्हे ? इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतून कोटयवधि रुपये इंग्लंडांत लांबविले नसते, तर आज खात्रीनें इतके लोक बळी पडले नसते. या सगळ्या मृत्यूंबद्दल तरी निदान इंग्लिशच जबाबदार आहेत का नाहींत ? बाकी कोणी असेंही म्हणावयाला चुकावयाचें नाहीं कीं, हिंदुस्थानांतील गरीब लोक आपल्या गरिबीबद्दल जबाबदार आहेत. परंतु हा न्याय फार चांगला आहे ! इंग्लिशांनीं हजार ढोंगांनीं लोकांचे पैसे हरण करून न्यावे आणि उलट लोक गरीब झाले याचा दोष दुसऱ्यावर ठेवावा हें विलक्षण आहे ! हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं पारतंत्र्याचें विष टाकून दारिद्र्याचा प्लेग उत्पन्न केला, ही गोष्ट अनेक इंग्रजी लेखकांनींसुद्धां कबूल केली आहे. तेव्हां अशा रीतीनें इंग्लिश लोक दारिद्र्याच्या सांथीनें हिंदुस्थानांतील असंख्य लोकांच्या मृत्यूला कारणीभूत होत आहेत हें स्पष्ट आहे. इंग्लिशांनीं विष टाकून प्लेग उत्पन्न केला नसला तरी दारिद्र्य उत्पन्न केलें आहे हें खास. त्याच्याबद्दल इंग्लिशांनीं काय क्षिति बाळगली आहे, कीं आम्ही प्लेग पसरवितों अशी खोटी बातमी पंजाबी लोकांनीं आमचे-विरुद्ध उठविली म्हणून त्यांनीं एवढे कांगावे करावे ? बाकी पंजाबी लोकांचें एक चुकलें खरें ! इंग्लिश लोक विष टाकून प्लेग पसरवितात ही निराधार बातमी पसरविण्यापेक्षां इंग्लिश लोक दारिद्र्याचा प्लेग पसरवितात ही साधार बातमी जर त्यांनीं प्रत्येक खेडेगांवांतील प्रत्येक शेतकऱ्याला सांगितली असती, तर जास्त फायदा झाला असता. आणि, कारण कोणतेंही असलें तरी मरण हें जोंपर्यंत एकच आहे, तोंपर्यंत निराधार बातमीपेक्षां यापुढें लोकांनीं साधार बातम्याच पसरवाव्या हें बरें. आणि असल्या साधार बातम्यांनाही इंग्लिशांच्या कृपाळु राज्यपद्धतीखालीं कांहीं तोटा नाहीं. खऱ्या बातम्या नसतील तेव्हां कदाचित् खोटयांची मदत घेणें इष्ट होईल. पण दारिद्र्य, दुष्काळ इत्यादि प्लेगपेक्षांही भयंकर सांथी राजरोसपणें उत्पन्न केलेल्या असून त्यांच्याकडे ढुंकून-सुद्धां न पाहतां प्लेगबद्दलच्या नवीन बातम्या बनविणें म्हणजे इंग्लिश लोकांच्या इतके वर्षांच्या खऱ्याखुऱ्या परिश्रमावर पाणी ओतण्यासारखें होणार आहे. प्लेगच्या विषाची बातमी खोटी असली पाहिजे अशा कल्पनेवर येथपर्यंत विचार झाला. परंतु इंग्लिश लोक रसायनशास्त्रामध्यें आणि नेटिव लोक अज्ञानशास्त्रामध्यें अतिशय पटाईत असल्यामुळें इंग्लिश लोक प्यावयाच्या

पाण्यांत कांहीं तरी औषधि टाकून प्लेग पसरवीत असतात असें लोकांना वाटलें तर तेंही अगदींच निराधार आहे असें नाहीं.

* * *

टोळ हे प्राणी मनुष्यांना किती त्रास देतात आणि पिकांचें किती नुकसान करतात याच्याबद्दलचा अनुभव सर्वांना आहेच व याच्यावर काय उपाय योजावा याच्याबद्दल पुष्कळ लोक विचार करीत आहेत. उंच जाळीं करून त्यांत त्यांना धरण्याचा प्रयत्न सफळ होत नाहीं याकरितां त्यांच्यावर कांहीं रासायनिक प्रयोग करावे अशी कल्पना निघाली आहे. माशा वगैरेसारखे जे प्राणी आहेत त्यांच्यामध्यें 'फुंगस' या नांवाचा एक रोग आहे. या रोगानें माशा वगैरे प्राणी मरतात असें आढळून आल्यानंतर या रोगाचा प्रयोग टोळांवर करून पहावा अशी कल्पना Cruelty to Animals वगैरेसंबंधाच्या संस्था जारीनें चालविणाऱ्या ख्रिश्चन लोकांच्या मनांत येऊन ब्रेझिल देशांतील एका प्राणिशास्त्रवेत्त्यानें या 'फुंगस' नामक रोगाची लस काढून त्याच्यापासून इनॉक्युलेट करण्याकरितां त्यानें एक रासायनिक विषमय द्रव्य तयार केलें. आणि ती विषारी लस टोळांच्या शरिरांत घालून त्यानें ब्रेझिलमध्यें दुसरें मुलकोवाल गांव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याच्या प्रयोगाची हकीकत टाइम्सनें येणेंप्रमाणें दिली आहेः—त्यानें एका प्रयोगाच्या खोलींत तीनशें टोळ कोंडून त्यांपैकीं सहाजणांना सदर विषारी लसीनें इनॉक्युलेट केलें. तेव्हां दुसरे दिवशीं ते सहा तर मेलेच, परंतु पुढें त्यांचा संसर्ग त्या तीनशें लोकवस्तीच्या गांवांत जिकडे तिकडे पसरून प्लेगाची मृत्युसंख्या वाढूं लागली व सरासरीनें दररोज पंधराजण मरूं लागले! या प्रयोगांतील एक मुख्य गोष्ट सांगावयाची राहिली आहे ती ही कीं, हा इनॉक्युलेशननें मारण्याचा प्रयत्न ज्यांनीं केला ते कनवाळू ख्रिस्ती धर्मांतील एक रेव्हरंड आहेत. सारांश, हृदयावरील कपड्याचा आकार आणि हृदयांतील दयार्द्रपणाचा नेहमींच संबंध असतो असें नाहीं. असो. टोळांना मारण्याकरितां इनॉक्युलेशनचा उपयोग गेलेला स्पष्टपणें दिसत आहे. इतकी जर रसायनशास्त्राची विलक्षण कसबें पाश्चिमात्य लोकांचें अंगांत भरलेलीं आहेत, तर तसलेंच एखादें इनॉक्युलेशन त्यांनीं एखाद्या इष्ट देशांतील अनिष्ट लोकांकरितां शोधून उपयोगांत आणलें नसेल कशावरून, असें हिंदुस्थानांतील अडाणी लोकांना वाटल्यास

तें अगदीं क्षम्य आहे. कारण हा सगळा इंग्रजांच्या अद्भुत ज्ञानाचा अपराध आहे! बाकी त्यांना रसायनशास्त्राचें वगैरे अद्भुत ज्ञान असलें म्हणून ते त्याचा माणसें मारण्याकरितां लढाईच्या खेरीज अन्यत्र उपयोग करतील असें आम्ही कधीं म्हणणार नाहीं! त्यांनीं टोळ मारण्याकरितां विषारी लशीचा उपयोग केला असेल! पण म्हणून हिंदुस्थानांतील माणसें मारण्याकरितां ते मुलकोवालप्रमाणें विषारी लशीचा उपयोग करतील कीं काय? टोळांची गोष्ट निराळी आहे! टोळ कांहीं कराच्या रूपानें सरकारच्या उधळपट्टीला पैशाची मदत करूं शकत नाहींत! परंतु हिंदुस्थानांतील लोकांचें तसें नाहीं, ते फार सद्गुणी आहेत. त्यांच्यांत टोळांच्या अंगांतील कांहीं एक दुर्गुण नाहींत. टोळांप्रमाणें ते अलीकडे कोणाच्याही मुलखावर टोळधाड घालीत नाहींत किंवा टोळांप्रमाणें मोठमोठे जमाव करून त्यांचे थवेच्या थवे कोणाच्या मनामध्यें लवमात्रही भीति उत्पन्न करीत नाहींत. भूक लागली तरी आपले घरच्या घरीं बसून उपासानें भुकेचें शांतवन करून घेतात! असल्या उत्कृष्ट नागरिकांना कोण विष घालून मारणार आहे? तरी पण शास्त्राच्या प्रगतीमुळें लोकांना कधीं कधीं संशय येतो.

* * *

शास्त्रज्ञान हें सदुपयोगाकरितां आहे हें खरें; परंतु कोणी त्याचा दुरुपयोग करीत नाहींत असें मात्र नाहीं! मेस्मेरिझम अथवा समाधिशास्त्र हें एक चांगलें शास्त्र आहे व याचा उपयोग पूर्वींचे आपल्यांतील लोक परमेश्वरापासून मोक्षपद चोरून घेण्याकरितां करीत असत. हल्लीं अमेरिकेंतही या शास्त्राचा बराच प्रसार झाला आहे. पण ते सर्व लोक ऐहिक दृष्टीचे असल्यामुळें ते या स्वर्गलोकच्या शिडीचा उपयोग नरकलोकांत उतरविण्याकरितां करीत आहेत! नुकतीच अशी एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे कीं, ही मेस्मेरिझमची विद्या साध्य करून घेतलेला एक अमेरिकेंतील चोर एका श्रीमंत बाईच्या घरीं गेला आणि मी तुझ्या नवऱ्याचा स्नेही आहे असें सांगून त्यानें तिच्याशीं बोलण्याला सुरुवात केली. या लोकांच्या डोळ्यांमध्यें एक प्रकारचें दुष्टपणाचें पाणी असतें, तें ओळखून ती बाई घाबरली. त्या वेळीं त्या दुष्ट मनुष्यानें तिच्या तोंडावरून कांहीं वेळ हाताचे पासेस करून तिला बेशुद्ध पाडिलें आणि तिच्या पेटयांतून आणि कपाटांतून जडजवाहिर होतें तें घेऊन तो पळून गेला! असे जुन्या शास्त्रांचे नवीन दुरुपयोग करण्याला पाश्चिमात्य लोक शिकले आहेत.

म्हणून साध्याभोळ्या पूर्वेकडील लोकांना पुष्कळ संशय येतात. बाकी हा अमेरिकन चोर थोडेसें चुकला. दुसऱ्याची नजर भुलवून आणि अक्कल गुंग करून सोडून त्यानें पैसे आणि जडजवाहिर आपल्या हस्तगत केलें, येथपर्यंत तो बरोबर होता; पण पुढें त्यानें पळून जावयाचें नाहीं. जेथें त्यानें चोरी केली तेथेंच त्यानें निर्लज्जपणानें आणि धीटपणानें थांबावयाचें; मी चोर नाहीं, साव आहे व मी स्वकष्टार्जित हक्कानें आणि आपल्या अलौकिक ज्ञानानें हें द्रव्य संपादिलें आहे, असें सिद्ध करून द्यावयाचें; आणि मेहेरबानीखातर व दयार्द्र अंतःकरणाच्या मुरवतीसाठीं पाहिजे तर त्यानें त्या बाईचें मोलमजुरी करून किंवा भिक्षा मागून पोट भरेनासें झाल्यास दुसऱ्यांनीं चालविलेल्या अनाथगृहामध्यें तिला नेऊन ठेवण्याची व्यवस्था करावयाची! परंतु या शिष्टसंप्रदायाच्या गोष्टी आहेत. सगळ्यांनाच साधतात असें नाहीं. परंतु वास्तविक चोरांना जर आपल्या धंद्यांत सुधारणा करावयाची असेल, तर शास्त्रीय ज्ञानाच्या बळानें चोरी करण्याला आणि प्रतिष्ठितपणानें, बेशरमपणानें आणि कायदेशीरपणानें चोरलेली जिन्नस उपभोगिण्याला त्यांनीं शिकलें पाहिजे!

* * *

दैवी शक्ति ही कांहीं विलक्षण चीज आहे. मेसमेरिझममध्येंही तीच शक्ति आहे. ह्या दैविक शक्तीचे अनेक चमत्कार दृष्टीस पडतात. मेसमेरिझममध्यें ज्याप्रमाणें असलेल्या ज्ञानाचा लोप होऊन मनुष्याला झोंप लागते, त्याप्रमाणें झोंप लागलेली असतांना त्या झोंपेंत नसलेल्या ज्ञानाचाही कधीं कधीं मनुष्याचे ठिकाणीं प्रादुर्भाव होतो, हे सगळे दैवी शक्तीचे खेळ होत! झोंपेंत स्वप्नाच्या द्वारानें आगामी गोष्टींविषयीं ज्ञान झाल्याचीं उदाहरणें आपल्यामध्यें थोडकीं आहेत असें नाहीं. परंतु ज्यांचा असल्या गोष्टींवर विश्वास नसतो असल्या नास्तिक लोकांमधील असल्या गोष्टी असल्या म्हणजे त्या चांगल्या ठसतात. लॉर्ड लिटल्टन हे एके दिवशीं निजले असतां मध्यान्ह रात्रीं आपल्या खोलींत कांहीं पंख वाजत आहेत, असा त्यांना भास झाला व कांहीं वेळानें आपल्या बिछान्याकडे कोणाचीं तरी पावलें वाजत आहेत असें त्यांना वाटलें. नंतर ते उठून बसले तेव्हां एक शुभ्र वस्त्र धारण केलेली सुंदर स्त्री त्यांच्यापुढें उभी असलेली त्यांना दिसली व तुम्हांला आतांपासून तीन दिवसांनीं बरोबर बारा वाजतां मृत्यु येईल, असें तिनें सांगितलें व ती अदृश्य

झाली. या गोष्टीवर लॉर्ड लिटलटन यांचा भरंवसा बसला नाहीं. ते पुढें नेहमीं-प्रमाणें हॉउस ऑफ लार्ड्‌समध्यें गेले, व तेथें त्यांनीं भाषणें वगैरे केलीं. परंतु तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं त्यांना खिन्नता वाटूं लागली. त्यांच्या मित्रांनीं त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला, आणि घरांतील सर्व घडयाळें दहा मिनिटें पुढें करून ठेवलीं. त्यामुळें खऱ्या मध्यान्ह रात्रीपूर्वी दहा मिनिटें बारा वाजले, नंतर रात्रीचे बारा वाजले, आतां मला भीति नाहीं, त्या स्त्रीनें सांगितलेलें भविष्य खोटें आहे, असें लॉर्ड लिटलटन हे म्हणाले. नंतर आतां मला झोंप येत आहे, असें म्हणून ते निजले. पण खरे बारा वाजण्याची जेव्हां वेळ आली, तेव्हां त्या वेळेबरोबर ते मरण पावले. ही जुनी गोष्ट नवीनच प्रसिद्धीस आलेली आहे. परंतु यावरून दैवी शक्तीचें सामर्थ्य किती विलक्षण आहे याची चांगली कल्पना येते.

* * *

या सृष्टींत सर्वज्ञ मनुष्याला जितकें दिसत आहे, त्याच्यापेक्षां पुष्कळ जास्त आहे असें जें म्हणतात तें खोटें नाहीं. वरील गोष्ट ही भूतयोनींतील एका भुताची गोष्ट झाली. परंतु असे अदृश्य प्राणी या भूतयोनीमध्यें किती आहेत याची कल्पनाही करतां येणार नाहीं. मेल्यानंतर अपरिपूर्ण वासना राहिलेले पुष्कळ आत्मे भूतयोनीमध्यें वास्तव्य करीत असतात, अशी आपल्या शास्त्रांतील कल्पना पूर्वीपासूनचीच आहे. परंतु पाश्चिमात्य लोकही आतां या कल्पनेवर विश्वास ठेवू लागले आहेत. कॉन्टेम्पोररी रिव्ह्यूमध्यें मि. बार्लो यांनीं एका लेखांत या भूतयोनींतील आत्म्यांचा फार विलक्षण रीतीनें उल्लेख केलेला आहे. भूतप्रेतपिशाच्चादिकांच्या ज्या गोष्टी आपण ऐकतों त्यांतील तत्त्व हेंच आहे कीं, ज्यांची वासना राहत नाहीं ते उत्तम गतीला जातात, परंतु ज्यांची आशा अतृप्त राहिली आहे त्यांचे लिंगदेह सूक्ष्मरूपानें आपल्या अतृप्त वासना कशा तरी संतृप्त करून घेण्यासाठीं भूतयोनींत कोठें तरी संचार करीत असतात, हें आपल्या अध्यात्मशास्त्रांतील तत्त्व आणि मि. बार्लो यांचें तत्त्व यांच्यामध्यें फारच साम्य दिसून येतें. ते म्हणतात कीं, अर्वाचीन सुधारणेच्या समाजरचनेमध्यें किती तरी गरीब लोक आपल्या वासना तृप्त करण्याला असमर्थ होऊन मरण पावतात. अन्नवस्त्राच्या अगदीं साध्या गरजासुद्धां ज्यांच्या भागल्या नाहींत, असे किती तरी लोक अलीकडच्या ह्या सुधारलेल्या

राज्यांतून मरून जात आहेत. हे अतृप्त वासनेचे आत्मे मोठे भयंकर होत असें मि. बार्लो यांचें मत आहे. दुःखाच्या अतिरेकानें, किंवा उपासमारीनें, किंवा असंतोषानें जे प्राणी इहलोकीं आपले प्राण सोडतात त्यांचे आत्मे या पृथ्वीलाच धरून राहतात, आणि दुसऱ्या कोणाच्या तरी शरीराचा आश्रय करून ते सूक्ष्मरूपी आत्मे आपल्या अतृप्त वासना तृप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. या विचारसरणीप्रमाणें पाहिलें असतां आपल्या ह्या हिंदुस्थानाच्या वातावरणांत येथील सरकारच्या डोक्यावर असे अतृप्त वासनेचे आत्मे किती तरी तरंगत फिरत असले पाहिजेत ! बार्लोसाहेबांनीं सगळ्या जगांतील पातकामुळें एकंदर लोकांवर हें अदृश्य भूतांच्या वासनेचें ओझें किती जड जमलें आहे, याचें भयानक वर्णन केलें आहे, परंतु तें आपल्याला नको. आपल्याला आपल्या हिंदुस्थानापुरताच विचार करावयाचा आहे. त्या हिंदुस्थानांत इंग्रजांनीं उत्पन्न केलेल्या ( प्लेगनें पाहिजे तर नका म्हणूं, पण ) दारिद्र्यानें आणि दुष्काळानें, वस्त्रावांचून आणि अन्नावांचून उपाशी मेलेल्या लोकांचे आत्मे या बार्लोसाहेबांच्या तत्त्वाप्रमाणें किती जमले असतील ? ते जरी आपल्याकडून सूक्ष्मरूपानें राहण्याची तजवीज करीत आहेत तरी हिंदुस्थानांतील प्लेग, दारिद्र्य व दुष्काळ, यांच्या योगानें त्यांची संख्या इतकी कांहीं भयंकर वाढत आहे कीं, या विस्तीर्ण हिंदुस्थानच्या पृष्ठभागावरील वातावरणांतील जागा तरी त्यांना राहण्याला पुरी होते किंवा नाहीं याची शंका उत्पन्न होण्याची वेळ आली आहे ! हे अतृप्त वासनेचे असंख्य आत्मे आपल्या वरील वातावरणांत अतिशय गर्दीमुळें एकमेकांशीं खेंचाखेंची करीत कोणत्या व्यवसायांत व्यापून गेलेले असतील बरें ! ज्यांनीं दुष्काळांत आपल्याला अन्न दिलें नाहीं आणि थंडींत वस्त्र दिलें नाहीं त्यांच्यावर ते डोळे वटारून पाहत असतील काय ? पण यांत इंग्लिशांचा कांहीं एक दोष नाहीं बरें ! मागील इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतून अतोनात पैसा नेल्यामुळें जरी अलीकडे येथें दुष्काळ पडूं लागले आहेत हें खरें आहे, तरी हे असंख्य अतृप्त आत्म्यांनो, हल्लींचे इंग्लिश लोक निःसंशय फार ममताळु आहेत. त्यांनीं तुमच्याकरितां मॅन्शनहाउस फंड काढला होता, हें तुम्हीं विसरतां कामा नये ! हे भूतयोनींतील इंडियन नागरिकांनो, तुम्ही दुष्काळांत मेल्यामुळें वखवखलेले असाल हें खरें; पण साहेब लोक आपल्या मेजवानीचीं ताटें टेबलावर मांडून बसले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 63692 दि: 17/4/...
क्र. 9660 नों: ...



असतां तेथें तुम्ही मुंग्यांसारखे जमा होऊन तीं पंचपक्वान्नी ताटें भेसूर आणि अस्पर्शनीय करूं नका ! कारण इंग्लिश लोक खरोखरच फार कनवाळु आहेत ! त्यांनीं हा इन्कम टॅक्स मुद्दाम तुमच्याकरितांच काढला होता बरें ! पण मध्यंतरीं सरहद्दीवरील आफ्रिडी वगैरे दुष्ट लोकांनीं लढाई सुरू केली त्याला ते विचारे काय करतील ! हे अतृप्ततेंत मरण पावलेल्या असंख्य प्राण्यांनो, कोणीं इंग्लिश मनुष्य कांहीं एखादा चैनीचा पदार्थ खाऊं अगर पिऊं लागल्यास तुम्ही तेथें जमाल, आणि हें "मला पाहिजे, मला पाहिजे," असें म्हणून आपल्या अश्रवणीय शब्दांनीं भयंकर किंकाळ्या फोडूं लागाल, व "मी दुष्काळांत मेलों आहे", "मी चार महिने उपासमार सोसून मेलों आहे", "माझीं पोरेंबाळें डोळे खोल जाऊन आणि पोटाला खळगे पडून अन्न अन्न करीत मेलीं आहेत!", "हें अन्न मला पाहिजे. तुम्ही मला त्या वेळीं अन्न खाण्याला मिळूं दिलें नाहीं. आतां मीही तुम्हांला हें अन्न खाऊं देणार नाहीं, हें मला पाहिजे, आम्ही हें हिसकून घेऊं, तें भूतयोनीच्या अधिष्ठानानें दूषित करून टाकूं" असें म्हणण्यापर्यंतही कदाचित् तुमच्या अवशिष्ट राहिलेल्या मनोविकारांची मजल जाईल ! पण खबरदार ! कोणत्याही साहेबाच्या खान्यासभोंवतीं तुम्हीं अशी दंगल माजवितां कामा नये. पार्थिव विचार हे जर तुमच्याबरोबर अंतराळामध्यें सुद्धां येत असतील, तर बाकीच्या मनोविकारांबरोबर राजनिष्ठाही तुमच्या त्या हवेंतील वसाहतीमध्यें आलीच असली पाहिजे. तिचें तुम्ही स्मरण करा. किंवा वातावरणांतील तुमच्या त्या बेटांत प्रजासत्ताकच राज्यपद्धति आहे, कीं जेथें राजनिष्ठा हा गुन्हा मानला जातो ? साहेब लोकांना येथें राज्य करावयाचें असल्यामुळें त्यांना रेशमाचे, मखमलीचे, भरजरीचे, वगैरे अनेक उंची उंची पोषाख, वेळीं अवेळीं घालावे लागतात; पण त्या उंची पोषाखांभोंवतीं तुम्ही कसरीप्रमाणें जमा होऊं नका, आणि आम्ही वस्त्रावांचून थंडींत कुडकुडत मेलों, असें म्हणून ते पोषाख घालणारांच्या अंगाला तुम्ही बारीक टांचण्यांप्रमाणें बोचूं नका ! कारण, त्यांनीं बहुतेक दुष्काळांच्या वेळीं थंडीच्या दिवसांत तुमच्याकरितां घोंगडया वाटलेल्या आहेत ! तसेच ते विचारे साऱ्या दिवसभर हिंदुस्थानच्या कल्याणाची काळजी वाहून थकून रात्रीं क्षणभर निजले असतां, आणि लाला लजपतराय यांना हद्दपार केलें आहे, आतां त्यांच्या पाठीमागें हिंदुस्थानांत बंड होण्याची भीति राहिली नाहीं, अशा प्रकारच्या

सुखस्वप्नांचीं चित्रें त्यांच्या मनाच्या मॅजिक लँटर्नच्या पडद्यावर पडत असतां तुम्ही त्यांच्या निजावयाच्या खोलींत आणि बिछान्यावर ऐन मध्यरात्रीं जमा होऊं नका, आणि तेथें अकाळविकाळ किंकाळ्या फोडूं नका! परंतु तुम्हांस सभ्य आचरणाविषयीं उपदेश करण्याची पृथ्वीवरील माणसांना फारशी आवश्यकता आहे असें नाहीं. पगार, पेन्शन, पदव्या, किताब, सन्मान, लेव्हीचें बोलावणें वगैरे गोष्टींबद्दलच्या ज्यांच्या वासना तृप्त झाल्या नाहींत अशाही लोकांचे कोणी शिळे आणि ताजे आत्मे तुमच्यामध्यें मिसळलेले असतीलच ते हा तुमचा बंडखोरपणा मोडतील, तुमचें धैर्य खचवितील, तुमचा तेजोभंग करतील, तुमच्यांत फूट पाडतील आणि अशा रीतीनें तुम्हांला नम्रपणाचे, सभ्यपणाचे आणि राजनिष्ठेचे धडे ते खात्रीनें शिकवतील. तुमच्या त्या तरंगणाऱ्या बेटावर अशी जर कांहीं कारस्थानीपणाची व्यवस्था झाली नाहीं, तर मात्र फार भयंकर स्थिति होणार आहे! या जड सृष्टींतील हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या विरुद्ध आधींच भयंकर असंतोष माजला आहे. आणि आकाशांत त्यांच्या डोकीवर जर तुम्हीही असा बंडखोरपणा सुरू कराल तर जिवंत लोक आणि मेलेल्या लोकांचे आत्मे यांच्यामध्यें सांपडून इंग्लिश लोकांची फारच त्रेधा उडून जाईल! तुमच्या राज्यांतील असंख्य रहिवाशांच्या अनेक दिवसांच्या सांचलेल्या अतृप्ततेचें ओझें वरून सहन करणें हें तर अशक्यच आहे; परंतु खालून आणि वरून असा दोहोंकडून जर एकदम मारा होऊं लागेल तर त्याच्यापुढें कोणत्याही शत्रूची सुटका होण्याची आशा नाहीं. शिवाय तुमच्यासारखे शत्रु वरून उत्पन्न झालें तर फारच पंचाईत पडणार आहे. इंग्लिशांपाशीं बंदुका, तोफा वगैरे पुष्कळ साधनें आहेत पण तीं फक्त जिवंत माणसांना मारण्याकरितां आहेत. जिवंत माणसांनीं कितीही गडबड केली तरी त्यांना ताबडतोब ठार मारून टाकण्याजोगीं शस्त्रास्त्रें इंग्लिशांपाशीं पुष्कळ आहेत; व जिवंत माणसें मारण्याला तेवढीं पुरशीं होत नसतील तर पाश्चिमात्य शास्त्रवेत्ते पाहिजे तर आणखी नवीन शोधून काढतील! पण तुमच्याविरुद्ध त्या बिचाऱ्यांनीं काय करावें? वायवीय परमाणूंच्या भिमथडी तट्टांवर बसून आतां येथून मारा करून फिरून एका क्षणामध्यें गनिमी काव्याच्या पद्धतीनें कित्येक मैलपर्यंत कूच करून दुसऱ्याच ठिकाणाहून तुम्ही मारा करूं लागलां, तर तुमच्याविरुद्ध चालणारें असें काय शस्त्र

आज इंग्लिशांच्या हातांत आहे! पण याच्यावर एक कायद्याची मात्र तोड आहे. हे तुम्ही ढगाच्या पहाडांतील रानटी, जंगली आणि बिनसुधारलेल्या प्रदेशांत राहणाऱ्या आत्म्यांनो, अलीकडे हेग कॉन्फरन्समध्यें लढाईसंबंधानें काय नवीन नियम झाले आहेत, हें तुम्हांला माहीत आहे? पृथ्वीवरील कोणत्याही सैन्यावर आकाशांतून वरून तोफेचे गोळे किंवा दुसरें कोणतेंही शस्त्र फेंकावयाचें नाहीं, असें नुकतेंच ठरलेलें आहे! त्या नियमाप्रमाणें तुम्हांला वरून लढाई करतां येणार नाहीं! आणि एखाद्या पवनलहरीच्या विमानावर बसून येऊन तुम्हीं जर खालीं कांहीं शस्त्रें फेंकलीं तर तें तुमचें कृत्य शांतता-परिषदेच्या नियमाप्रमाणें बेकायदेशीर ठरेल हें तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा! पण तुम्हांला इतक्या बेकायदेशीरपणाच्या कचाट्यांत सांपडण्याचा कदाचित् प्रसंगच्च येणार नाहीं. कारण, इंग्लिश लोक फार सुज्ञ आणि उदार अंतःकरणाचे आहेत. ते बहुतकरून लवकरच हिंदुस्थानला स्वराज्याचे हक्क देऊन सगळ्या आत्म्यांना संतुष्ट करण्याच्या विचारांत आहेत.

## माझ्या पर्वता ! : : २१

काळ : अग्रलेख, ता. २८-२-१९०८

तुझी माझी फार दिवसांत गांठ नाहीं ! मी तुझ्या दर्शनाला पुष्कळ दिवसांत आलोंच नाहीं. अशा स्थितींत एके दिवशीं संध्याकाळीं माझें लक्ष तुझ्याकडे गेलें. तेव्हां तूं माझ्याकडे रागावून पाहत आहेस असें मला वाटलें. तुझी मुद्रा बदलेली दिसली. माझ्याविषयींचें प्रेम त्या मुद्रेंत कोठेंच दिसेना. पूर्वी तुझी चर्या अशी नव्हती. पूर्वीं मीं तुझ्याकडे पाहिलें म्हणजे तुझें माझें अंतःकरण एक होऊन जात असे, तूं माझ्याशीं हंसत असत, आणि माझ्याशीं प्रेमाच्या आणि ज्ञानाच्या गोष्टी सांगत तूं किती तरी वेळ बसत असस ! ती तुझी आनंदभरित मुद्रा नाहींशी होऊन तूं माझ्याकडे रागानें डोळे वटारून पाहत आहेस असें माझ्या मनाला वाटलें. ती संध्याकाळची वेळ होती. सूर्य अस्तास जाऊन अंधःकार गगनप्रदेशाचा ताबा हळूहळू आपल्या हातांत घेऊं लागला होता. त्या अंधःकाराची छटा तुझ्यावर पडून कदाचित् तुझी चर्या अशी खिन्न, उद्विग्न, उदासीन आणि कोपाविष्ट दिसत असावी, असा मला एकंदर संशय आला. आणि म्हणून मीं फिरून एकदां तुझ्याकडे पाहिलें. परंतु सृष्टींतील सकल जड मानलेल्या वस्तूमध्येंही चैतन्य वास्तव्य करीत असतें अशा प्रकारची एक कल्पना माझ्या मनामध्यें प्रबळ झालेली असल्याकारणानें तुझ्याकडे मीं फिरून पाहिलें तेव्हांही तूं मला रागावलेलाच दिसलास. पण या वेळीं फक्त तुझी मुद्राच रागाची नसून तूं दुरून आपले अदृश्य हात पुढें करून आपल्या अश्राव्य शब्दांनीं मला अतिशय रागें भरत आहेस असा मला भास झाला ! 'तूं आणि मी इतके जीवश्च कंठश्च स्नेही असतां तूं इतके दिवसांत माझ्याकडे आला नाहींस !' अशा ज्या शब्दांनीं तूं मला टोचीत होतास. ते शब्द प्रत्यक्ष

माझ्या कानांनीं ऐकिले ! त्या वेळीं माझ्या डोळ्यांतून पाणी आलें. तुझी भेट झाल्याला किती दिवस होऊन गेले तें माझ्या मनानें मोजले. आणि नंतर मी प्रेमभरानें सद्गदित होऊन तुला विनवून असें सांगितलें कीं, "हे माझ्या पर्वता, मी तुला विसरलों नाहीं ! तूं माझ्या सर्व सुखाचें आणि ज्ञानाचें अधिष्ठान आहेस ! अशा तुझी विस्मृति मला कशी बरें पडेल !" माझ्या पर्वता, हे माझ्या वाणीनें मनांतल्या मनांत उच्चारिलेले शब्द तूं ऐकिले नाहींस काय ? ही कल्पनेची भाषा खात्रीनें तुला माहीत आहे. आपण या भाषेमध्यें किती तरी वेळां एकमेकांपाशीं बोललेलों आहों ! पण त्या दिवशीं संध्याकाळीं तूं माझे वरील शब्द ऐकिले नसावेस असा संशय येण्याला कारण आहे. कां कीं, त्या दिवशीं मात्र मी आपल्या घरांत निजलों असतां मी तुला भेटायला येण्याच्याऐवजीं तूंच मला भेटण्याकरितां आलास ! लोक पर्वताकडे जातात, पर्वत कोणाकडेही जात नाहीं, असा नेहमींचा सत्य व्यवहारांतील सिद्धान्त आहे. पण हे माझ्या पर्वता, ते व्यावहारिक सृष्टींतील सर्व सिद्धान्त झुगारून देऊन स्नेहातिरेकामुळें तूं माझ्या जवळ आलास. मित्रपणाच्या लोहचुंबकानें तुला खात्रीनें माझ्या जवळ ओढून आणलें ! "पण हे माझ्या मित्रा, तूं इतक्या लांब माझ्याकरितां चालून कशाला आलास ? मी तुझ्याकडे येणारच होतों—पण तूं आधीं चालत आलास कसा ? तुला चालत येण्याजोगता इतका विस्तीर्ण रस्ता मिळाला तरी कोठें ? तूं जमिनीवरून चालू लागल्यानें कोणा अनाथ प्राण्यांना कांहीं दुखापत तर झाली नाहीं ना ? किंवा इंद्रानें पूर्वी पर्वताचा पक्षच्छेद केला त्या वेळीं समुद्रांत दडून राहून स्वपक्षसंरक्षण केलेल्या मैनाकाच्या कुळांत तुझा जन्म झालेला आहे कीं काय ? तसें असेल, तर मग इंद्राच्या वज्राघातापासून बचावलेल्या पक्षांच्या उपयोगानें बहुतकरून तूं अंतरिक्ष मार्गानेंच या ठिकाणीं आला असला पाहिजेस ! पण हें सगळें जरी शक्य असलें, तरी तूं एवढा मोठा प्रचंड आणि विस्तीर्ण असून माझ्या घराच्या या लहानशा दारांतून आंत आलास कसा ? आणि या माझ्या लहानशा घरांत माझ्या जवळ येऊन बसण्याला तुला स्थलसंकोच तरी कसा झाला नाहीं ?" असे अनेक प्रकारचे तर्क माझ्या मनांत त्या वेळीं आले. पण मी आपल्या मित्राचें सान्निध्य प्रत्यक्ष अनुभवीत असल्यामुळें प्रत्यक्षाला आणखी दुसरें प्रमाण काय पाहिजे ! हे माझ्या पर्वता, त्या वेळची तुझी मुद्रा मात्र

आदल्या दिवशींच्या संध्याकाळच्या मुद्रेहून अगदीं भिन्न होती. या वेळीं सूर्योदयकालाच्याप्रमाणें तुझ्या चर्येवर प्रेम आणि हास्य यांच्या छटा स्पष्ट दिसत होत्या. तूं माझ्या जवळ बसलास, तूं मला कुशल प्रश्न विचारलेस, आणि तुझें माझें पुष्कळ वेळपर्यंत प्रेमाचें संभाषण झालें. नंतर तूं माझा निरोप घेऊन निघून गेलास. पण पुढें कांहीं वेळानें माझ्या खोलींत आलेल्या सूर्याच्या किरणांनीं मला जागें करून सांगितलें कीं, "मीं पर्वताला पाहिलें असें जें तुला वाटत आहे, तें स्वप्न होय." या सत्यज्ञानानें मला फारसा आनंद झाला असें नाहीं. याच्यापेक्षां माझें स्वप्नच कायम टिकतें तर मला त्यांत अधिक संतोष होता! पुष्कळ स्वप्नें कायम टिकण्यालायक असतात! तींच स्वप्नें डोळ्यांपुढें दिसत राहावीं, आणि त्यांच्यावर ज्या निद्रेनें आपलें आवरण पसरलेलें असतें ती निद्राही तशीच कायम टिकावी, अशी मनुष्याच्या मनाला पुष्कळ वेळां फार उत्कंठा असते. पण हें जागृतींतील जगत् फार निर्दय आहे! पण माझ्या पर्वता, तुझी माझी त्या वेळीं गांठ पडली होती, हें स्वप्न असलें म्हणून तरी काय झालें! हें जें सत्य सत्य म्हणून मिरविलें जातें तें जग तरी काय आहे? तें देखील एक स्वप्नच आहे! मात्र तें मोठें स्वप्न आहे; आणि दीर्घकाल टिकतें. आणि हें लहान स्वप्न होय! —पण अखेरीस दोन्ही स्वप्नेंच? त्या मोठ्या स्वप्नांत ज्यांचा निदिध्यास सदोदित लागलेला असतो, त्या वस्तु पुष्कळ वेळां या लहान स्वप्नांतून प्रत्यक्षवत् दिसतात, असा एक सामान्य समज आहे. त्यावरून सुद्धां, हे माझ्या पर्वता, माझें तुझ्यावर किती प्रेम आहे, हें व्यक्त होत आहे. मीं किती तरी वेळां आपलीं सुखदुःखें तुला सांगितलेलीं आहेत. तुझ्या पार्श्वभागीं येऊन बसल्यावांचून मला कसें तें समाधान होत नाहीं. मी व्यावहारिक चिंतेनें आक्रान्त आणि दुःखानें पीडित झालों असतां तुझ्याजवळ येणें हेंच माझें औषध. इहलोकींच्या सांसारिक संतापाला तुझ्यासारखा वैद्य दुसरा कोणी नाहीं. माझे विचार हे सगळे तुझे विचार. तूं माझे उत्कृष्ट ग्रंथ. माझ्या स्वतंत्रतेच्या कल्पना या साऱ्या तुझ्या कल्पना. तूं माझ्या ज्ञानाची शाळा आणि तूं माझ्या समाधानाचा उगम. ऐहिक संकटांनीं व्यग्र होऊन मी तुझ्याकडे आलों असतां माझे सुस्कार तुला ऐकूं आले आणि माझे अश्रुबिंदु तुझ्या अंगाला गार लागले, म्हणजे तूं माझ्या जवळ येऊन माझें समाधान केलें नाहींस असें

कधींही झालें नाहीं. साडेतीन हात उंचीच्या अल्पदर्शी मनुष्याचें समाधान करण्याला तुझ्यासारख्या उच्च आणि उदात्त प्रकृतीच्या विभूतीला काय प्रयास आहेत? मनुष्याचें खिन्न मन आल्हादित करण्याला तुझ्यापाशीं अनेक साधनें आहेत. तुझी वनश्री पाहून तिच्या ठिकाणीं कोण रममाण होणार नाहीं? तुझ्या घरीं कोणी उद्विग्न मनुष्य आला, तर त्याचा तूं किती तरी आदरसत्कार करतोस ! तो जेथें बसावयाची इच्छा करील तेथें गालिचा पसरलेला; मुखमार्जनासाठीं त्याला वाटेल त्या ठिकाणीं झरे आपले स्वच्छ पाण्याचे पेले भरून तयार; त्याच्या घर्मबिंदूंचें अपनयन करण्याकरितां मंजुळ वारे हातांत पंखे घेऊन जेथें तेथें उभे; त्याच्या संतापांत सूर्यकिरण आपल्या संतापाची जास्त भर घालूं लागतील, तर त्याच्या निवारणासाठीं मोठमोठे तरुवरसुद्धां हातांत छत्र्या घेऊन जागोजाग खडे ! इतक्या सगळ्या नैसर्गिक वैभवामध्यें एखादा मनुष्य एखाद्या एकान्त स्थळीं येऊन बसला, म्हणजे त्याला कसली उद्विग्नता राहणार आहे ! उद्विग्नता या संसाराची आणि या जगताची ! पण तें सगळें खालीं टाकून देऊन मनुष्य पर्वत-शिखरारोहण करूं लागला, म्हणजे तो जसा देहानें तसाच मनानेंही कांहीं कालपर्यंत तरी निदान या संसाराचा निःसंशय त्याग करतो. आणि म्हणूनच बहुतकरून साधु लोक नेहमीं गिरिकंदरीं किंवा पर्वताग्रीं वास करण्याची लालसा धरीत असावेत! तुमच्यासारखे पर्वत हे खरोखर मनुष्य आणि परमेश्वर यांच्यामधील मध्यस्थ होत. तुम्हां पर्वतांचें शिखरारोहण केलें, म्हणजे इहलोकाचे आशापाश आपोआपच मागें राहतात, आणि परमेश्वर तेथून सन्निध भासूं लागतो. प्रथमतः अभ्यासाकरितां कां होईना, कृत्रिम रीतीनें जर या संसाराचा त्याग करावयाला शिकावयाचें असेल, तर गिर्यारोहणासारखा उत्तम उपाय दुसरा नाहीं. हा उपाय निम्मे वेदान्त शिकवितो. असल्या दिव्य शक्तीच्या पर्वतांपैकींच, हे माझ्या पर्वता, तूं एक आहेस आणि म्हणूनच तुझ्यावर माझी इतकी निष्ठा बसलेली आहे. वैराग्य, वेदान्त आणि विश्वंभराची लीला यांचा उपदेश प्रत्यक्ष ठसवून देणारा गुरु तुझ्यासारखा दुसरा कोणी नाहीं. परमेश्वराच्या भजनीं चित्तवृत्ति लावून देण्याच्या कामांत साधुसंतां-प्रमाणें तुम्ही सगळेच पर्वत मोठे कुशल आहां यांत शंका नाहीं. तरी पण तुमच्या सगळ्यांमध्यें श्रेष्ठ हिमालय पर्वत होय. तुम्हां पर्वतांच्या अंगांमध्यें

परमेश्वराच्या सन्निध नेण्याचें जर सामर्थ्य आहे, तर सर्वांतील मुख्य –सगळ्या पर्वतांचा बादशहा— जो हिमालय पर्वत त्याचें दर्शन आपल्याला व्हावें अशी इच्छा कोणाला वाटणार नाहीं? तो पर्वतांचा राजा —तो हिमालय पर्वत— मनुष्यांना ईश्वराची प्राप्ति करून देण्याच्या सद्धेतूनें वर जाण्याकरितां निघाला तो त्या आवेशाच्या भरांत जातां जातां इतका उंच गेला कीं, भगवान् नारा-यण आणि परमात्मा शंकर यांचीं स्वर्गीय वसतिस्थानें खालीं राहिलीं आणि आपलीं शिखरें त्यांच्या वसतिस्थानांच्या वर गेलीं, याचेसुद्धां परोपकाराच्या उत्कंठेपुढें त्या महात्म्याला भान राहिलें नाहीं आणि तेव्हांपासून बदरिका-श्रमामध्यें भगवान् नारायण आणि कैलासशिखरीं परमात्मा शंकर हे वास करीत आहेत असा जनप्रवाद प्रचलित झाला! अशा प्रकारचे थेट भगव-च्चरणारविंदापर्यंत जाऊन पोहोंचणारे जे जिने ते चढून जाण्याचा ज्यांना योग आला असेल ते खरोखर धन्य होत! परंतु हे माझ्या पर्वता, माझा तूर्त तूंच हिमालय पर्वत आहेस! मनाची प्रसन्नता जेथें उद्भवते तेथून परमेश्वराचें अधिष्ठान मुळींच दूर नाहीं. तुझ्या पार्श्वभागीं बसून प्रातःकाळच्या अनेक प्रशांतगंभीर प्रसंगीं मी आकाशाकडे दृष्टि करून त्यांतील सत्त्वगुण इतका कांहीं प्यायलों आहे कीं, देवांना देखील स्वर्गलोकामध्यें इतकें अमृत कधीं प्यावयाला मिळालें नसेल! हे माझ्या पर्वता, तुझ्यापायीं कांहीं कमी नाहीं, आणि म्हणूनच माझें तुझ्यावर इतकें प्रेम बसलें आहे. पण मित्रा, मला तुज-पाशीं सांगावयाला वाईट वाटतें कीं, तुलाही कांहीं शत्रु आहेत. त्यांना तुझ्या-मध्यें कांहीं अलौकिकपणा किंवा कांहीं दैविक शक्ति बिलकूल दिसत नाहीं. ते कधीं तुझ्या शिखरावर गेले, तरी जसे वर जातात तसे खालीं उतरतात. तुझ्या चोहोंबाजूंनीं पसरलेले नानाविध रंगांचे चित्रपट, तुझें सदय अंतःकरण विरघळून त्यांतून वाहूं लागलेले निर्मळ झरे, तुझ्या शिखराग्रांवरून स्पष्ट दिसणारे सूर्यचंद्रांचे उदयास्त, किंवा गलबताप्रमाणें संथपणें तरंगत भर उन्हा-तून आकाशसमुद्रांत घिरट्या घालीत राहणाऱ्या प्रचंड गृध्रपक्ष्यांचे तुझ्या शिखरांवरून दिसणारे उदरप्रदेश, यांपैकीं कशाच्यानेंही त्यांच्या मनावर परि-णाम होत नाहीं. ते तुझ्या शिखरावर गेले तरी त्यांचें मुख प्रसन्न होत नाहीं, त्यांच्या नेत्रप्रांतांत आनंदाचे अश्रुबिंदु उद्भवत नाहींत, त्यांचें अंतःकरण सद्गदित होत नाहीं, आणि त्यांच्या तोंडांतून "अहाहा! काय ही परमेश्वराची

लीला !" असे ईश्वराचे धन्यवाद कधींही निघत नाहींत. ते अधम पर्वत म्हणजे दगड आणि माती यांचा एक मोठा थोरला गोळा असें समजतात. माझ्या पर्वता, हे त्यांचे शब्द आहेत बरें! तुझ्याविषयीं माझी कल्पना अशी कधीं देखील नाहीं आणि तुझ्याविषयींचे लोकांचे हे शब्द उच्चारल्याबद्दलसुद्धां मला अतिशय वाईट वाटत आहे. हे तुझे शत्रु आपल्याला अरसिक असें म्हणून घेत असतात व याच किताबामध्यें त्यांना मोठें भूषण वाटत असतें. परंतु हा गुण परमेश्वरानें पुष्कळ लोकांच्या अंगामध्यें ठेवला नाहीं, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. मित्रा, कवीचें काव्य आणि तुझी शोभा ही अरसिकांच्या करितां नाहींत!—अथवा इतर कोणाला तूं आवडोस अगर न आवडोस माझें मात्र तुझ्यावर निस्सीम प्रेम आहे, हें मी तुला खात्रीनें सांगतों. ही तुझ्या माझ्या प्रेमाची गोष्ट ऐकून इतरांनाही आपापल्या प्रियकर पर्वतांची आठवण होईल. पुष्कळ लोकांच्या प्रीतींतील पुष्कळ वन्य स्थळें आणि गिरिकंदरें असलीं पाहिजेत. तीं त्यांच्या दृष्टीसमोर त्यांना दिसूं लागतील, तेथें अनुभवलेल्या शांततेचें आणि उपार्जिलेल्या ज्ञानाचें त्यांना स्मरण होईल, आणि त्या पूर्वस्मृतीच्या मनोविकारानें उचंबळलेल्या सत्त्ववृत्तीचे झरे डोळ्यांच्या कोपऱ्यांतील बारीक बांध फोडून उच्छृंखलपणानें खळखळा वाहूं लागतील! पण अरसिकांना काय! ज्यांना पर्वत म्हणजे दगड आणि माती यांचा गोळा असें वाटतें, त्यांच्या डोक्यामध्यें दगड आणि मुखामध्यें माती परमेश्वरानेंच भरलेली असली पाहिजे!

---

# अदृश्य क्रांतिकारकांची परिषद् : : २२

काळ : अग्रलेख, ता. २०-३-१९०८

● काँग्रेस नुकतीच होऊन गेली होती; दुष्काळ-निवारणासाठी रिलीफ फंडाच्या योजना सुरू झाल्या होत्या.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां कोण कशा प्रकारच्या खटपटी करीत असतात याबद्दल कोणाला कल्पनाही करतां यावयाची नाहीं. जे प्रपंचापासून परावृत्त झालेले, ज्यांचा वस्तुतः इहलोकीच्या भवचक्रामध्यें सांपडलेल्या असंख्य प्राण्यांच्या सुखदु:खाशीं अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं, असें सत्पुरुषसुद्धां आपला हिंदुस्थान देश स्वतंत्र व्हावा अशा इच्छेनें प्रेरित होऊन उद्योग करीत आहेत, हें कोणाला सांगितलें तर खरेंसुद्धां वाटणार नाहीं. जसा मनुष्य, तसे त्याचे उद्योग असतात. रजोगुणी किंवा तमोगुणी मनुष्याचे स्वतंत्रतेकरतां झाले तरी, रजोगुणी आणि तमोगुणीच उद्योग असावयाचे. परंतु सत्पुरुष हे सत्त्वगुणाचे मूर्तिमंत पुतळे असल्यामुळें त्यांचे प्रयत्न सत्त्वगुणाच्या मर्यादेंतच नेहमीं संचार करीत असतात. रजोगुणी आणि तमोगुणी प्रयत्न जड, मूढ व स्थूल बुद्धीच्या मनुष्यांना दिपवून टाकण्याला समर्थ झाले, तरी स्वतंत्रतेच्या सुलभतेचें खरें सामर्थ्य सत्त्वगुणाच्या सन्निकर्षामध्येंच असतें ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा सत्त्वगुणाचा अतिरेक ज्यांच्या अंगामध्यें वास्तव्य करीत आहे अशा सत्पुरुषांना इहलोकीं काय अशक्य आहे? अशा योग्यतेचे एक सत्पुरुष हिमालयाच्या एका गुहेमध्यें राहत असत; पूर्वाश्रमीं पाश्चिमात्य विद्येंत आणि संन्यासाश्रमी योगबलांत त्यांच्यासारखा दुसरा कोणीही नव्हता. त्यांच्या मनांत स्वदेशाची स्वतंत्रता ही एक कल्पना अतिशय प्रबळ झालेली होती; व ती कल्पना कशी सिद्धीस जाईल याच्याबद्दल

त्यांना रात्रंदिवस निदिध्यास लागलेला होता. आपल्याला जी वस्तु पाहिजे असेल त्या वस्तूवर अधिष्ठान करणारी आणि तिच्यावर आपला अंमल चालविणारी अशी जी कोणी देवता असेल, तिला आराधनानें संतुष्ट करून घेऊन आपली मनःकामना तृप्त करण्याचा आपल्यामध्यें एक मार्ग आहे, हें सर्वांना माहीतच आहे. इंद्रजिताला आपल्या शत्रूंवर जय मिळवावयाचा होता, तेव्हां त्यानें निकुंभिलेच्या देवालयामध्यें जाऊन रक्तमांसादिकांच्या अनेक हविर्भागांनीं अग्नीला संतुष्ट करून त्याजपासून एक अतुल शक्तीचा रथ मिळविला; तसेंच कौरवांना मारून पांडव आपल्या शिबिरामध्यें निजलेले असतां त्या आपल्या शत्रूंचा घात करण्याकरितां एका घुबडाच्या उदाहरणानें उत्तेजित होऊन अश्वत्थाम्यानें महादेवाची आराधना आरंभिली, आणि अग्निकुंडामध्यें आपल्या शरीराची आहुति देण्यापर्यंत मजल आणून स्वहेतुसिद्ध्यर्थ त्यानें त्या देवतेला प्रसन्न करून घेतलें; इत्यादि कथा सुप्रसिद्धच आहेत. अशीं मागची उदाहरणें पाहून वर सांगितलेल्या हिमालयस्थ सत्पुरुषांनींही एकदां आपल्या इष्ट देवतांचें आराधन करण्याचें योजिलें. त्यांचें इष्ट म्हणजे अर्थातच स्वतंत्रता हें होय. आणि ती स्वतंत्रता ज्यांनीं ज्यांनीं आपल्या देशाला मिळवून दिली त्या त्या सर्व विभूति म्हणजेच स्वतंत्रतेच्या देवता होत. या स्वतंत्रतेच्या देवता त्यांनीं आपल्या संकल्पसामर्थ्यानें आपल्या समोर स्थापित केल्या. आपण पुष्कळ प्रयत्न केले, परंतु त्यांत यश येत नाहीं, तेव्हां ज्यांना असल्या क्रांतीच्या कामांत जयश्रीनें माळ घातली आहे अशा लोकांचा सल्ला विचारावा व त्यांनीं आपआपल्या देशांच्या स्वातंत्र्याकरतां काय काय उपाय योजिले हें त्यांच्यापासून प्रत्यक्ष ऐकून घ्यावें अशा हेतूनें त्यांनीं या स्वतंत्रतेच्या देवतांचें आवाहन केलें. इच्छाशक्तीचें सामर्थ्य विलक्षण आहे ! जे सामान्य दृष्टीला लयाला गेलेले म्हणून वाटत होते ते सर्व स्वतंत्रतेचे संरक्षक महापुरुष त्या ठिकाणीं प्रत्यक्ष हजर झाले. मंत्रबलाच्या योगानें यज्ञामध्यें आपआपल्या हविर्भागाकरतां ज्याप्रमाणें इंद्रादि देवता प्रत्यक्ष येतात, त्याप्रमाणें स्वातंत्र्याच्या सल्ल्याकरतां स्वतंत्रतेच्या अनेक देवता तेथें प्रादुर्भूत झाल्या. पुराणकालापासून तों अगदीं अर्वाचीन कालापर्यंत जे जे महात्मे लोकांच्या स्वातंत्र्याकरतां म्हणून झटले ते ते सर्व आपल्या दिव्य देहांनीं तेथें अवतीर्ण झाले. हिरण्यकशीपूचीं आंतडीं फाडणारा नरहरी, अतिबलाढ्य बळीलाही रसातळाला नेऊन पोंहोचविणारा

ब्राह्मणाचा बटु, एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करणारा जामदग्न्य, रावणाच्या. गुलामगिरीपासून सर्व त्रैलोक्याला सोडविणारा श्रीरामचंद्र, जुलमी आणि मदोन्मत्त राजांमुळें झालेला भूभार हरण करणारा कृष्ण, स्वराज्यप्राप्तीसाठीं झगडणारे पांडव, दंडनीतीचा ग्रंथ चंद्रगुप्ताच्या कारस्थानांतील कृतीनें लिहिणारा आर्य चाणक्य, भरतखंडाच्या स्वतंत्रतेच्या पुनरुपलब्धीसाठीं तळमळणारा पृथ्वीराज, गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजीमहाराज, आणि पेशव्यांच्या कुळांतील पहिले बाजीराव आणि शेवटचे नानासाहेब, या सगळ्या स्वातंत्र्याच्या देवता तेथें प्राप्त झाल्या. परंतु त्या समाजामध्यें आणखीही दुसरी पुष्कळ मंडळी होती ज्यांनीं ग्रीस देशाचें स्वातंत्र्य कित्येक शतकें कायम राखिलें, ज्यांनीं टार्क्विन वंशांतील जुलमी राजांना रोममधून हांकलून लाविलें, ज्यांनीं रोमच्या स्वतंत्रतेकरतां आपल्या बादशहाच्या पोटामध्यें खंजीर खुपसले, आणि अखेरीस रोमचें साम्राज्य रसातळाला नेऊन पोंचविण्याकरतां ज्यांनीं असंख्य हल्ले केले आणि कित्येक शतकेंपर्यंत सर्व युरोप खंडभर धुडगूस घातला, ते सगळे त्या ठिकाणीं हजर झाले. स्वित्झर्लंडमधील वुइल्यम टेल, नेदर्लंडमधील प्रिन्स ऑरेंज, इंग्लंडमधील क्रॉमवेल, फ्रान्समधील डँटन, मिरॅबो, रोबेस्पिअर आणि नेपोलियन, अमेरिकेंतील वॉशिंग्टन, आणि इटलींतील मॅझिनी, गॅरिबाल्डी असे अनेक अर्वाचीन राष्ट्रभक्तही त्या ठिकाणीं हजर झालेले दिसत होते. ह्या हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानच्या बाहेरील स्वतंत्रतेच्या देवता जेथें जमलेल्या होत्या, तेथील त्या अत्यंत पवित्र स्थळाची प्रेक्षणीयता काय वर्णावी? तेथें क्रांतीचा त्वेष उत्पन्न करणारीं रणवाद्यें वाजत होतीं. आणि स्वतंत्रतेचे विजयध्वज स्वतंत्र वायूच्या लहरींनीं फडकत होते. ज्या गुहेमध्यें त्या सत्पुरुषानें ही क्रांतिकारकांची परिषद् भरविली, त्या ठिकाणीं आणखी एक अपूर्व शोभा दिसत होती. भंगलेलीं सिंहासनें, तुकडे तुकडे केलेले मुकुट, फाडून टाकलेलीं छत्रचामरें, चिंध्या झालेलीं अजिंक्य निशाणें, भाल्याच्या टोंकांवर नाचविलीं जाणारीं जुलमी राजांचीं मुडकीं, असे अनेक पदार्थ जमिनीवर पसरलेले दिसत होते. अशा रीतीनें एकत्र जमणाऱ्या या स्वतंत्रतेच्या महावीरांची आणि त्या सत्पुरुषांची वारंवार वाटाघाट चालत असे. जेव्हां जेव्हां त्या सत्पुरुषांच्या मनांत साधनें आणि परिणाम यासंबंधानें कांहीं शंका उपस्थित होत, तेव्हां तेव्हां ही सर्व मंडळी त्याच्यासभोंवतीं जमत आणि "आम्ही

सगळेजण अशीच विवंचना करीत बसत होतों, परंतु भगनान् परमेश्वर अखेरीस स्वतंत्रतेच्या प्रयत्नाला सुखरुपपणें पैलतीराला नेऊन पोंहोचवितो" असें सांगून त्याचें समाधान करीत असत. हे स्वतंत्रतेचे भोक्ते त्या परिषदेमध्यें आपले हृद्गत तोफेच्या तोंडानें बोलत असत, आणि आपले ठराव तरवारीच्या लेखणीनें लिहून ठेवीत असत. अशा रीतीनें यांच्या गुप्त बैठका वरच्यावर होत असत. परंतु देशाची परिस्थिति प्रत्यक्ष पाहिल्यावांचून आपल्याला कांहीं एक ठरवितां येणार नाहीं, असें मनांत आणून ती सर्व मंडळी त्या सत्पुरुषाच्या समागमें एकदां हिमाल्यापासून रामेश्वरापर्यंत पर्यटण करण्याकरतां निघाली. ही मंडळी आकाशमार्गांतून संचार करीत असतां त्यांच्या दृष्टीस एके ठिकाणीं नेटिव्ह शिपायांच्या अनेक पलटणी पडल्या. सगळ्यांच्या हातांत बंदुका होत्या आणि सगळ्यांच्या मिशा पल्लेदार होत्या. तें सैन्य पाहून गॅरिबाल्डी आपल्या मनांत म्हणाला, "असे शिपाई मला मिळते तर मी आपला इटली देश केव्हांच स्वतंत्र करून टाकला असता!" त्या नेटिव्ह सैन्याची टापटीप, शिस्त, कवाईत, भव्यपणा, वगैरे पाहून सर्वांना समाधान वाटलें. ते शूर शिपाई आवेशानें लाल होऊन अतिशय त्वरेनें कूच करून चालल्ले होते. ती त्यांची स्थिति पाहून ते खात्रीनें गुलामगिरीवर रागावलेले असून स्वतंत्रतेच्या प्राप्तीकरतांच इतक्या त्वरेनें कूच करीत असले पाहिजेत, असा त्या आकाशसंचारी मंडळींनीं तर्क केला व इतके शूर शिपाई त्वेषानें लाल होऊन कूच करीत असतां तुम्ही निराश कां होतां असें त्यांनीं त्या सत्पुरुषाला विचारलें. तेव्हां तो म्हणाला, "महाराज, असें नाहीं. आपला तर्क चुकला आहे. यांच्या देशबांधवांनीं एके ठिकाणीं स्वराज्यप्राप्तीकरितां क्रांतीला सुरुवात केली आहे, त्यांचा सूड घेण्याकरतां हे शिपाई मोठ्या त्वेषानें लाल होऊन चालले आहेत!" "काय!" ते सर्वजण म्हणाले, "हे अधम आपल्या देशबांधवांवर बंदुका झाडण्याकरितां त्वेषानें चालले आहेत!" हा देखावा पाहून शिवाजीनें खालीं मान घातली, व मॅझिनीच्या नाकाला नरकाची दुर्गंधि सहन होईनाशी झाली, आणि म्हणून ती सर्व मंडळी तें दूषित झालेलें वातावरण सोडून त्याच्या पुढील अक्षांश-रेखांशाच्या चौकांत गेली. तों तेथें त्यांना एक निराळाच चमत्कार दिसून आला. असंख्य भिकारी लोक त्या ठिकाणीं एकत्र जमलेले होते. तो दारिद्र्याचा समुद्र जिकडे

तिकडे पसरलेला पाहून डँटन, रोबेस्पिअर वगैरे मंडळींना आपल्या फ्रान्स-मधील राज्यक्रांतीच्या वेळची आठवण झाली. "आमच्या देशांतील अशाच भिकारी लोकांनीं एकत्र जमून राजाला आणि राणीला व्हर्सेलिसच्या राजवाड्या-मधून पॅरिसमध्यें आणलें होतें व तसेच हे भिकारी लोक हातांत हातोडे घेऊन निघाले आहेत, तेव्हां ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं." असें ते आपसांत म्हणूं लागले. परंतु त्यांच्यांतील त्या सत्पुरुषानें त्यांचा हा भ्रम लवकरच दूर केला. तो म्हणाला, "यांच्या हातांतील हे हातोडे फक्त खडी फोडण्याकरितांच आहेत. हे दुष्काळी कामावर येथें काम करीत होते, ते आतां सुटल्यामुळें हा दारिद्र्याचा समुद्र तुफान झालेला तुम्हांला दिसत आहे. नाहीं तर कामाच्या वेळीं हे शांतपणानें आपापल्या हुद्यावर बसून खडीचे डोंगर उभारीत असतात! शिवाय एका गरीब लोकांचे जवळून पैसे घेऊन दुसऱ्या गरीब लोकांना अन्नदान करण्याचा ज्या कित्येक परोपकारी कर्णांनीं उद्योग आरंभिला आहे, ते त्यांनीं जास्त दिवस दुष्काळांत जिवंत राहावें म्हणून आतां अन्न वाटणार असल्याकारणानें हे भिकारी लोक येथें थांबलेले आहेत." मृत्यूच्या दरवाजापाशीं इतकी शांतता पाहून हिंदुस्थान हा साधूंचा देश आहे असें म्हणत ते चालले असतां एका वाऱ्याच्या लहरीनें त्यांना बरेंच दूर वाहून नेलें. तों तेथें त्यांच्या दृष्टीस जो देखावा पडला तो पाहून त्यांचें मन समाधान पावलें व तेथें स्वतंत्रतेचें बीज असलेंच पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. हजारों तरुण लोक एकत्र जमलेले पाहून कोणाला असें वाटणार नाहीं? प्रत्येकाची छाती रुंद, दंड पिळदार, बांधा उंच, गळ्यांत पट्टा, हातांत निशाण, असें सैन्य पाहून या गगनसंचारी मंडळींच्या अंगावर स्वातंत्र्याच्या हर्षातिरेकानें रोमांच उभे राहिले व "हें सैन्य आपलीं निशाणें फडकावीत कोणत्या मुलखावर हल्ला करण्याकरितां जात आहे?" असें त्यांनीं त्या सत्पुरुषाला विचारलें. परंतु यावर तो सत्पुरुष कांहींच उत्तर न देतां खालीं मान घालून मुकाट्यानें बसला. तेव्हां यांचें हें अप्रतिम शौर्य आणि हा अद्वितीय उत्साह पाहून तुम्हाला स्वातंत्र्याचें भरतें कसें येत नाहीं, असा त्यांनीं फिरून प्रश्न केल्यावर तो मोठ्या कष्टानें म्हणाला, "महाराज, हे कोणत्याही मोहिमेवर जात नाहींत. तर हे भिक्षा मागण्याकरतां निघालेले आहेत. आमच्या इकडे स्वतंत्रता गेल्या-

पासून भीक मागण्याकरतांच निशाणें फडकविण्याची चाल पडली आहे. परंतु स्वतंत्रता मिळविण्याकरितां भिकेचें साधन हें कांहीं कमी आहे, असें मात्र आपण समजूं नका. दररोज यांनीं निदान एक रुपयाची भीक मागितली, तर एक कोट दिवसांत तेव्हांच एक कोट रुपये मिळवून टाकतील ? आणि मग एवढया रुपयांत काय होणार नाहीं ? तुमच्या देशांतून तुम्हीं अशीं शूर आणि जोरदार पलटणें कां तयार केलीं नाहींत कोण जाणे !" "आम्हांला आमचा देश तावडतोब स्वतंत्र करावयाचा होता !" असे तिरस्काराचे उद्‌गार काढून ते पुढें चालूं लागले; व कांहीं वेळानें ते दुसऱ्या एका वायु-मंडलामध्यें प्रवेश करते झाले. तो तेथें त्यांना एक कडाक्याचा वादविवाद ऐकूं आला. बहुतकरून तो स्वराज्य कसें मिळवावें याविषयींचा वाद असेल. अशा उत्सुकतेनें ते भूपृष्ठाच्या बरेच जवळ येऊन, कान देऊन बारकाईनें ऐकूं लागले. त्या ठिकाणीं पुष्कळ शास्त्रीपंडित जमलेले होते व त्यांच्यापुढें एक धर्मशास्त्राचा प्रश्न निकालाकरितां आलेला होता. सत्यनारायणाचा प्रसाद कसाही असला तरी तो खाल्लाच पाहिजे, आणि विलायती साखर तर खावयाची नाहीं, तेव्हां विलायती साखरेचा केलेला सत्यनारायणाचा प्रसाद खावयाचा किंवा न खावयाचा; आणि देशी साखरेच्या पेढयांची पुडी विलायती सुतानें बांधलेली असली तर ते पेढे खावे कीं न खावे; या प्रश्नाबद्दल मनु, पराशर आणि याज्ञवल्क्य यांचें काय म्हणणें आहे, यासंबंधानें पूर्वपक्ष आणि उत्तर-पक्ष अति जोरानें चाललेले होते. स्वदेशाभिमानाबद्दल इतक्या बारकाईनें विचार चाललेला पाहून त्या मंडळींना एक प्रकारचें समाधान वाटलें. परंतु ज्या क्षुल्लक गोष्टींचा स्वराज्यप्राप्तीशीं फार थोडा प्रत्यक्ष संबंध आहे, त्यांत इतकें रक्त आटविलें जात असलेलें पाहून त्यांना फार वाईट वाटलें व इतक्या कडकडीत सोवळ्या देशाभिमानाला आपण तरी खपूं कीं नाहीं अशी शंका कित्येक पाश्चिमात्य राष्ट्रभक्तांच्या मनांत येऊन ते सगळे दुसरीकडे वळले. तों त्यांना कित्येक स्त्रिया आणि पुरुष एकत्र मिसळून डोळे मिटून परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना करीत असलेले आढळले. त्यांना पाहून या वरील मंडळींच्या मनांत येणेंप्रमाणें विचार आले—" हा स्त्रीपुरुषांचा समाज खात्रीनें हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेकरितांच प्रार्थना करीत असला पाहिजे, कारण आपले तीस कोटि देशबांधव दारिद्र्याच्या आणि परतंत्रतेच्या दुःखाग्नीनें होरपळत

असतां देशाच्या स्वतंत्रतेसाठीं परमेश्वराची प्रार्थना करण्याला कोण उद्युक्त होणार नाहींत ? " असे विचार त्यांच्या मनांत चालले असतां प्रार्थना करणाऱ्या लोकांच्यापुढें कोणतीच मूर्ति दिसेना. म्हणून हे कोणाची प्रार्थना करीत आहेत याबद्दल पुष्कळांना शंका उत्पन्न झाली. अयोध्येचा राम आणि मथुरेचा कृष्ण हे दोघेही आश्चर्यानें चकित होऊन एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. पण पुढें सूक्ष्म दृष्टीनें सर्वांना असें आढळून आलें कीं, हे प्रार्थना करणारे लोक निरीश्वरवादी आहेत. हे कोणत्याही देवाची सत्ता जुमानीत नाहींत. राम-कृष्ण आदिकरून सगळ्या जुन्या देवांचीं सिंहासनें एखाद्या बंडवाल्याप्रमाणें यांनीं उलथून पाडिलीं आहेत व हे धर्माच्या राज्यांतील 'अनार्किस्ट' आहेत. हें समजल्यावर त्या आकाशस्थ मंडळींना अतिशय आनंद झाला व जे धर्मामध्यें क्रांति करणारे असतात त्यांच्याच हातून बहुधा पाश्चिमात्य देशांतून राजकीय क्रांत्या झालेल्या आहेत असें पाहून डोळे मिटून आणि तोंडें उघडून प्रार्थना करणारे हे लोक अट्टल बंडवाले आणि पहिल्या प्रतीचे राजकीय क्रांतिकारक असले पाहिजेत अशी त्यांची दृढ कल्पना झाली. पण इतक्यांत सगळ्या प्रार्थना झाल्यानंतर शेवटची जी प्रार्थना त्यांच्या कानीं आली त्यामुळें त्यांची ही कल्पना समूळ नाहींशी झाली. "हे अस्तित्वांत असणाऱ्या अगर नसणाऱ्या परमेश्वरा, आमच्या हिंदुस्थान देशावर परकीय लोकांचें राज्य सदोदित असूं दे म्हणजे आमचें वित्त आणि जीवित सुरक्षित राहील !" अशा अर्थाची त्यांची प्रार्थना ऐकून हिंदुस्थानच्या त्या प्रॉटेस्टंट लोकांबद्दल आकाशांतील त्या प्रॉटेस्टंट लोकांना अतिशय किळस आली आणि सर्वजण आपापल्या कानांत बोटें घालून पुढें निघाले. बाकीची मंडळी प्रार्थना करणाऱ्या लोकांचा निर्णय करीत असतांना प्रार्थनेंत फारशी गोडी न वाटल्यामुळें युद्धप्रिय नेपोलियन दुसरीकडे कांहीं रजोगुणाचा आणि तमोगुणाचा प्रभाव पाहण्याला मिळेल तर यत्न करावा म्हणून एका ढगाचें विमान करून त्यांतून फिरत होता. तो घाईघाईनें, पण अतिशय आनंदानें, या मंडळींकडे परत येऊन त्यांना म्हणाला, "चला चला ! युद्ध चाललें आहे, लवकर चला ! बहुतकरून ते हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेसाठीं असलें पाहिजे ! बहुतकरून आपल्याला हिंदुस्थानांतील जेना आणि ऑस्टरलिट्झच्या लढाया पाहण्याची संधि आली आहे ! ती फुकट दवडूं नका !

चला ! " असें म्हणून नेपोलियननें त्या सगळ्यांना अतिशय वेगानें ओढून नेलें, तों तेथें दोन पक्ष खरोखरच लढत होते. पण तेथें तोफा, बंदुका वगैरे कांहींच दिसेना. फक्त काठ्या उगारलेल्या आणि खुर्च्या फेंकलेल्या त्यांना दिसत होत्या. पण कदाचित् अलीकडच्या पन्नासपाऊणशें वर्षांत हिंदुस्थानांतील लोकांनीं तोफाबंदुकांपेक्षांही भयंकर अशा ह्या कांहीं तरी नवीन शस्त्रास्त्रांचा शोध लाविलेला असला पाहिजे असें समजून क्रॉमवेल, वॉशिंग्टन, नेपोलियन, गॅरिबाल्डी वगैरे मंडळी मुकाट्यानें राहिली व हिंदुस्थानच्या या जेना आणि ऑस्टरलिट्झच्या लढाईचा काय परिणाम होतो हें पाहत स्वस्थ बसली. पण त्यांना लवकरच समजून आलें कीं, हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेकरतां किंवा असल्या दुसऱ्या कांहीं खुळसट उद्देशाकरतां हें युद्ध नसून, एक वर्षाच्यापूर्वी जितकें खरें आपण बोललों तितकें एक वर्षानंतर बोलावें किंवा त्याच्याऐवजीं कांहीं जास्त खोटें बोलावें, याविषयीं तिऱ्हाइतापाशीं नव्हे, आपापसांतच हें युद्ध चाललें आहे. ही बातमी समजल्यानें स्वातंत्र्याची आणि युद्धाची ज्यांना आशा होती त्यांची पराकाष्ठेची निराशा झाली; व यापुढें हिंदुस्थानच्या स्थितीचें निरीक्षण करण्याच्या हेतूनें संचार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटून त्यांना पुढें जास्त फिरण्याचा कंटाळा येऊं लागला. परंतु इतक्यांत कांहीं पाश्चिमात्य लोकांच्या आरोळ्या त्यांच्या कानांवर आल्या. तेव्हां हें काय आहे हें समजण्याच्या इच्छेनें ते कंटाळलेले असूनही क्षणभर तिकडे वळले. तेथें साहेब लोकांची एक सभा भरलेली होती, व ते आपल्या नेटिव श्रोत्यांना असें सांगत होते कीं, " तुम्ही कांहीं गडबड करूं नका. तुम्हांला सर्व कांहीं हळूहळू मिळेल. आम्ही सगळ्या जगांतील अतिशय सुधारलेले आहों. तुम्हीं स्वराज्याकरतां आणि स्वातंत्र्याकरतां खटपट कशाला करतां ? आम्हीच तुम्हांला आमचें राज्य येथून जातें असें वाटलें म्हणजे खात्रीनें स्वतंत्रता देऊं ! " " हें सगळें लबाडीचें बोलणें आहे ! " नेपोलियन म्हणाला, " आम्हीं जिंकलेल्या लोकांना भुलथापा देऊन असेच दिवस ढकलीत होतों. जिंकलेल्यांना जिंकणाराच्या मनांतून स्वतंत्रता द्यावयाची असती तर त्यांना आधीं जिंकलेंच असतें कशाला, ही गोष्ट प्रत्येक विचारी मनुष्याला समजली पाहिजे. असल्या भुलथापांनीं हे इंडियन लोक फसले तरी आपण निदान फसतां कामा नये, व इंग्लिश लोकच याना स्वराज्याचे हक्क देतील या निष्फळ

आशेवर अवलंबून यांना स्वराज्याचे खरे मार्ग दाखविण्याला आपण अवकाश लावून उपयोगी नाहीं." हा नेपोलियनचा विचार सगळ्यांना पटला.

या परिस्थितीच्या परीक्षणापासून देशांतील अंतःस्थितीचें या मंडळींना बरेंच ज्ञान झालें. या परीक्षणामध्यें स्वराज्य आणि स्वतंत्रता यांच्यासंबंधानें लोकांची जी उदासीनता दिसली ती पाहून त्यांना मोठेंसें समाधान वाटलें असें नाहीं. तरी पण तितक्या पटीनें ते हेतु सिद्धीस नेण्यासाठीं झटण्याची जास्त आवश्यकता आहे अशी मात्र त्यांची पक्की खात्री झाली. नंतर ती सगळी मंडळी परत मनोवेगानें जेथून निघाली त्या हिमालयाच्या गुहेंत शिरली व तेथें तो सत्पुरुष आणि त्या स्वतंत्रतेच्या अनेक देवता यांच्यामध्यें बराच वेळपर्यंत खलबतें चाललीं होतीं. परंतु त्यांतून निष्पन्न काय झालें हें कोणालाच कांहीं माहीत नाहीं. त्या साधूला काय झालें म्हणून विचारण्याच्या उद्देशानें त्याला हुडकून काढण्यासाठीं कित्येल युरोपियन गृहस्थांनींही पुष्कळ श्रम केले, पण त्याचाही कोठें पत्ता लागत नाहीं !

---

## चंद्राचा सोनेरी राजवाडा : : २३

स्वतंत्रलेख. काळ : ता. ६–३–१९०८

अक्षय तृतीयेचे दिवशीं संध्याकाळीं देवदर्शनाहून आल्यानंतर संध्या वगैरे करून ती पितृतिथि असल्यामुळें रात्रीचें जेवणखाण कांहीं व्हावयाचें नसल्या-कारणानें बाबासाहेब अंगणांत टाकलेल्या एका पलंगावर हवा खात बसले होते. व त्यांचा एक चारपांच वर्षांचा लहान मुलगा त्यांचेजवळ बस-लेला होता. बाबासाहेब हे जसे जुन्या शास्त्रादिकांत तसेच नव्या आंग्लविद्येंत पूर्ण पारंगत झालेले होते. ज्योतिष, वैद्यशास्त्र, वेदान्तधर्मशास्त्र वगैरे प्राचीन विद्यांमध्यें त्यांचा हात धरणारा कोणीही नव्हता. व रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, इतिहास, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादि पाश्चिमात्य शास्त्रांमध्यें

त्यांची पुष्कळ गति झालेली होती. सारांश, चतुरस्र आणि आजन्म विद्याव्यासंगी मनुष्याला जितकें सामान्य ज्ञान मिळवितां येणें शक्य असतें तितकें सगळें ऐहिक ज्ञान त्यांनीं प्राप्त करून घेतलें होतें. अशीं ज्ञानसंपन्न आणि विचारी माणसें विरळा आढळतात. अशा मोठ्या माणसांच्या ज्ञानाचा फायदा जर लहान मुलांना त्यांच्या लहानपणापासून होत गेला, तर लहान मुलांच्या बुद्धीला प्रगल्भता प्राप्त होण्याला उशीर लागावयाचा नाहीं, हें साहजिकच आहे. म्हणून बाबासाहेब फुरसतीच्या वेळीं आपल्या मुलाला जवळ घेऊन अनेक सूचक प्रश्नांच्या साधनानें त्याच्या डोक्यांतील बुद्धि-कमलाच्या एकेक पाकळ्या हळूहळू उघडण्याचा नेहमीं प्रयत्न करीत असत. अशा जोपासनेमुळें तो मुलगा लहान असूनही मोठा हुशार झाला होता; व तो आपण होऊनही बाबासाहेबांना पुष्कळ वेळां अडवण्यासारखे प्रश्न विचारी. बाळपणचें वय, अल्पज्ञत्वाचें साम्राज्य, विचारी बुद्धि, आणि या जगामध्यें परमेश्वरानें निर्मिलेले कल्पनातीत असे असंख्य चमत्कार, अशी स्थिति असतांना शोधक प्रश्नांना काय तोटा!

वर सांगितलेल्या दिवशीं संध्याकाळीं बाबासाहेब आणि त्यांचा मुलगा अंगणांत बसले असतां त्यांच्या घराजवळच पश्चिमेच्या बाजूला जो एक लहानसा डोंगर होता त्याच्या शिखराच्या अगदीं जवळ जवळ चंद्राची कोर आली होती. मुलाचें लक्ष तिकडे जाऊन त्यानें बापाला विचारलें, " बाबा, हा चंद्र आतां कोठें मावळणार ? या टेकडीच्या मागेंच याचें घर आहे, होय ना ? तेथें तो आपल्या घरीं जाईल, आणि उद्यां फिरून येईल, खरें ना ? मला आजीनें सांगितलें कीं, तेथें त्याचें घर आहे. खरेंच का हो बाबा, त्याचें घर या टेकडीच्या मागें आहे ?" बाबासाहेबांच्या मनाची स्थिति आधींच कांहीं कारणानें थोडीशी उदासीन आणि निवृत्तिपर झालेली होती. आणि त्यांतच त्या मुलाचा हा साधा पण गहन प्रश्न ऐकून त्यांचें मन विचारामध्यें फारच निमग्न होऊन गेलें. बाबा आपल्या प्रश्नाचें उत्तर न देतां कांहीं विचा-रांत गढून गेले आहेत असें पाहून मुलगा कांहीं वेळ स्तब्ध बसला होता; आणि इतक्यांत त्याला कोणी हाक मारल्यामुळें तो घरांत निघून गेला. पण बाबासाहेबांचे विचार मात्र तसेच चालू होते. ते आपल्याशीं म्हणाले:—

"काय हे लहान मुलांचे प्रश्न! या प्रश्नांचीं कोण उत्तरें देऊं शकणार आहे!

चंद्र कोठें मावळणार म्हणून हा मला विचारतो ! पण मला तरी काय माहीत आहे ? मीं अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें, म्हणून चंद्र कोठें मावळतो असल्या प्रश्नाचें मला तरी याच्यापेक्षां काय जास्त ज्ञान झालें आहे ? ह्याच्या आजीनें ' डोंगराच्या मागें चंद्राचें घर आहे, तेथें तो जातो ' म्हणून जसें कांहीं तरी सांगितलें आहे, त्याचप्रमाणें आमच्या मोठ्या माणसांच्या आजीबाई, जीं शास्त्रें—जीं केवळ मनुष्यनिर्मितच शास्त्रें—त्यांनीं अल्प आणि अपूर्ण ज्ञानानें पाहिलेलें किंवा कल्पिलेलें जें कांहीं आपल्या निःश्रेयसाकरितां म्हणून वर्णिलें असेल त्या चंद्राच्या घरावर आम्ही विश्वास ठेवितों, आणि आब्रह्मस्तंबपर्यंत यच्चावत् सर्व ज्ञेयांचें आपल्याला ज्ञान झालें आहे असें समजून आम्ही सायुज्यमुक्तीच्या गांवाला जाण्याकरितां बांधाबांध करण्याच्या तयारीला लागलों आहों, अशी आपली टिमकी साऱ्या जगभर वाजवितों ! पण खरें ज्ञान आम्हांला तरी काय झालें आहे ? प्रत्यक्ष असें आम्हीं तरी काय पाहिलें आहे ! या ईश्वरी अघटित लीलेचें मूळ कारण काय, आदि हेतु कोणता, हें कशासाठीं चाललें आहे आणि कसें चाललें आहे; हा चंद्र उगवतो कशाला आणि मावळतो कोठें, या ग्रह नक्षत्रांच्या गति इतक्या नियमित कां केल्या आहेत, आणि धूमकेतूसारखे भयंकर उत्पात आकाशामध्यें अनियमित आणि अनिगडित कां सोडले आहेत, अशा प्रकारच्या असंख्य प्रश्नांबद्दल मनुष्याला आणि त्याच्या मोठमोठ्या भाराभर शास्त्रांना काय ज्ञान आहे ? या ईश्वरी रहस्यांतील एक चकारशब्द तरी कधीं बाहेर फुटला आहे काय ? आणि या अज्ञेयत्वाच्या पडद्याच्या आड असलेल्या असंख्य वस्तूंपैकीं एखादी ओझरती तरी मनुष्याच्या कधीं दृष्टीस पडली आहे काय ? आमचे पाश्चिमात्य शास्त्रवेत्ते हेर देवाचें हें गुप्त-रहस्य फोडून बाहेर आणतील, आणि आमचे प्रगमनशाली शोध अज्ञेयत्वाचे ते पडदे फाडून काळोख्यांतील सर्व वस्तु उजेडांत आणतील अशी जर कोणाला घमेंड असेल तर ती आजपर्यंतच्या या जगाच्या अनुभवानें व्यर्थ ठरलेली आहे. मानवी ज्ञानाची गति आहे तितकीच आहे; शनि हा जरी कितीही उत्पातकारक आणि क्रांतिकारक ग्रह असला, तरी त्यालाही ज्याप्रमाणें आपल्या कक्षेच्या बाहेर जातां येत नाहीं, त्याचप्रमाणें मानवी बुद्धि कितीही गडबड करणारी असली तरी तिलाही परमेश्वरानें एक कक्षा नेमून दिलेली आहे. तिच्या आंत तिनें वाटतील तितकीं शास्त्रें लिहावीं, शोध लावावे, किंवा

आणखीही पाहिजे तीं थोतांडें रचावीं. पण त्या कक्षेच्या पलीकडे जाण्याचा मनुष्याच्या बुद्धीला हुकूम नाहीं. तिच्या अंगांत ती ताकद नाहीं. ती त्या कक्षेच्या पलीकडे जाऊ शकणार नाहीं. असल्या अल्प शक्तीच्या आम्हा मनुष्यांचें ज्ञान तें काय असणार? आम्हांला काय समजतें आहे? वेदान्ताचे हात हात उंचीचे ग्रंथ आपल्यापुढें ठेवून आणि शिष्यांच्या टोळ्या आपल्या सभोंवतीं बसवून महापंडित किंवा ढोंगी बुवा जेव्हां शब्दांचे भडिमार करीत असतात, तेव्हां मला कित्येक वेळां त्यांच्याबद्दल मनांतल्या मनांत हसूं येतें! हे शिष्यांना शिकवितात काय आणि सांगतात काय! जें मनुष्याला समजण्या-सारखेंच नाहीं, ते, वक्ते अंधपणानें सांगतात आणि श्रोते भाविकपणानें ऐक-तात, हा देखावा पाहून कोणाला हसूं येणार नाहीं? मनुष्याच्या ज्ञानाची इतकी अल्प मर्यादा असतांही आपल्याला सर्व कांहीं कळतें आहे, परमेश्वर कोठें आहे, तो काय करीत आहे, त्याचे काय हेतु आहेत वगैरेबद्दलची सगळी ब्रित्तंबातमी आपल्यापाशीं आहे अशी घमेंड मारण्याला जें एक प्रकारचें धाष्टर्य लागतें तें या भोंदू लोकांपाशीं आहे असें पाहून मात्र कोणालाही त्यांच्याबद्दल अभिमान वाटणें साहजिक आहे. पण वास्तविक ज्ञानासंबंधानें पाहिलें तर मात्र जिकडे तिकडे ढोपरभरच पाणी. असल्या ह्या अल्पज्ञानापासून मनुष्याच्या मनाचें खरें समाधान कसें व्हावें? मनुष्य जन्मल्यापासून त्याची मुख्य महत्त्वाकांक्षा एकच असतें. प्रत्येक गोष्ट जी म्हणून त्याच्या नजरेपुढें येईल ती आपल्याला समजावी असें त्याला वाटत असते. हें काय, तें काय, ह्याचा संबंध काय, त्याचा हेतु काय? अशा प्रकारच्या अनेक जिज्ञासा त्याच्या बुद्धीवर आपल्या प्रश्नांच्या नांग्या मारीत असतात, आणि त्याची अल्पज्ञ बुद्धि त्या प्रश्नांच्या वेदनांनीं भ्रमिष्ट होऊन गेलेली असते. अशा बुद्धीचें समाधान कसें व्हावें? ज्ञानासाठीं क्षुधित आणि तृषित झालेल्या बुद्धीचें समाधान त्या त्या गोष्टींच्या ज्ञानावांचून कसें होईल? परंतु तसें ज्ञान तर मनुष्याला शक्य नाहीं. मग या सगळ्या खटाटोपाचा उपयोग काय? आमचें हें सुशिक्षण, पंडितत्व, विद्या-विभूषितत्व, म्हणजे केवळ मनुष्याचें ज्ञान किती थोडें आहे, आणि अज्ञान किती मोठें आहे, हें दाखविण्याकरितांच केवळ होय. एखाद्या अमर्याद भुया-रांतील अंधःकार किती आहे, हें दाखविण्याकरितांच फक्त असा एखाद्या दिवलीचा उपयोग होतो, अशी आमचीं ही ज्ञानाची दिवली आहे. अशा

स्थितींत ज्ञानाबद्दल मनुष्यानें कसला अभिमान बाळगावा ? असल्या या सज्ञान अवस्थेमध्यें खरोखर लहानपणची अज्ञानावस्था फार चांगली ! बाळा, मी तुझ्याएवढा लहान होतो तेव्हां मीही आपल्या वडिलोपार्जित घराच्या अंगणांत बसून असाच या मावळणाऱ्या चंद्राकडे पाहत असे, आणि तेव्हां मलाही तुझ्याप्रमाणें असें वाटत असे कीं, चंद्राचें घर या आपल्या डोंगराच्या पाठीमागें आहे. पण ते दिवस आतां गेले. ते फिरून येतील काय ! जेव्हां या टेकडीच्या पाठीमागें चंद्राचें घर आहे आणि तेथेंच तो मावळतो असें मला वाटत होतें, ते दिवस फिरून आले तर मी किती सुखी होईन ! पण आतां तें माझें सुख गेलें ! मी मोठा झालों ! मी सज्ञान झालों ! मला समजूं लागलें कीं, पृथ्वी वाटोळी आहे आणि चंद्र तिच्याभोंवतीं फिरतो, आणि आपल्या इकडे तो मावळला म्हणजे तो अमेरिकेमध्यें जाऊन उगवतो ! असल्या रूक्ष ज्ञानाच्या योगानें या टेकडीच्या मागें माझ्या कल्पनेनें चंद्राकरितां जो एक सोनेरी राजवाडा उभारिला होता तो मात्र वितळून नाहींसा झाला ! पण माझ्या मनाचें सुख आणि समाधान या ज्ञानानें यत्किंचितही वाढलें नाहीं. बाळा ! चंद्राकरितां मीं बांधलेला राजवाडा जरी वितळून गेला तरी तुझा अद्यापि कायम आहे आणि माझ्या या अनुभवाच्या पश्चात्तापावरून माझी अशी इच्छा आहे कीं, तूं या टेकडीच्या पलीकडे चंद्राचा सोनेरी राजवाडा प्रत्यक्ष पाहण्याकरितां कधींही जाऊं नयेस ! कारण, तेथें तो राजवाडा नाहीं असें पाहून तूं पुढें विचारशील कीं, मग चंद्र कोठें जातो ? त्यावर कांहीं उत्तर सांगितलें तरी 'पुढें काय ?' हा प्रश्न राहणारच. मनुष्याच्या ज्ञानव्यापाराची क्षुधा फार भयंकर आहे. आणि तिची पूर्ण तृप्ति इहलोकीं मानवी गुरूंच्या पुस्तकांनीं आणि उपदेशांनीं कधींही होणें शक्य नाहीं. या सृष्टींतील अनेक दैवी चमत्कारांबद्दल जे अनेक मानवी प्रश्न उत्पन्न होतात त्यांचीं उत्तरें कोण देऊं शकणार आहे !

असे विचार त्यांच्या मनांत घोळत असतां चंद्र डोंगराआड नाहींसा झाला आणि जिकडे तिकडे अंधःकारही पसरला. त्या अंधकाराप्रमाणेंच मानवी प्राण्यांच्या अज्ञानाचा अंधःकारही अतिशय निबिड आहे असें पाहून त्यांतून सुटका होण्याकरितां परमेश्वरी कृपेवांचून दुसरें कांहीं साधन नाहीं, असें जाणून बाबासाहेब आपल्या इष्टदेवतेच्या ध्यानामध्यें निमग्न होऊन गेले.

## साहेब आणि मद्रासी : : २४

काळ : अग्रलेख, ता. २७-३-१९०८

● काळकर्त्यांनीं मुद्दाम मद्रासी निवडला काय ? मद्राशांबद्दल महाराष्ट्रीयांना थोडेंबहुत वैमनस्य वाटतें. मराठी राज्य बुडविल्यानंतर सरकारनें सारावसुली सुकर व्हावी म्हणून महाराष्ट्रांत पुष्कळ मद्रासी मामलेदारांची आयात केली होती; तेव्हांपासून तर ही भावना निर्माण झाली नसेल ?

एखाद्या गांवांत अगर शहरांत परक्या ठिकाणचा कोणी मनुष्य आलेला आढळला, तर तो कोण आहे, कोठून आला, जाणार कोठें, त्याचा धंदा काय, त्याचा येथें येण्याचा उद्देश काय, वगैरेबद्दलची माहिती काढणें हें पोलिसच्या अनेक कामांपैकीं एक काम असतें हें बहुतेकांना माहीत असेलच. एकदां कोणी एक मद्रासी गृहस्थ बंगाल्यांतील एका मोठया शहरीं गेला असतां त्याच्याकडे तेथील एक युरोपियन पोलीस अंमलदाराचें लक्ष गेलें, व हा कोण मनुष्य असावा या संबंधानें तेथील खवळून गेलेल्या वातावरणांतील त्या घाबरलेल्या गोऱ्या अंमलदाराच्या मनांत अनेक शंका आल्या. हा कदाचित् स्वदेशीवर व्याख्यान देईल, किंवा हा मद्रासकडील नॅशनल व्हॉलंटियर असेल, किंवा तालुकदार सीक्रेट सोसायटीनें याला पाठविलेला असेल, किंवा प्रिन्सेस यूनियनचा हा एजंट असेल, किंवा गोरक्षणाचा हा उपदेशक असेल, किंवा जमीनदार कॉन्फिडरेशनच्या वतीनें याला कांहीं दुष्ट कृत्य करावयाचें असेल, किंवा हा लोकांना संप करण्याविषयीं सांगण्याला आला असेल, किंवा कदाचित् हा एखाद्या सर्व्हंट्स सोसायटीचा सभासद असेल किंवा कदाचित् याच्या आंतील खिशांत पिस्तुल दडविलेलें असेल, किंवा एखाद्या युरोपियनाच्या

अंगावर बाँबगोळा फेकण्याकरता हा आलेला असेल—अशा प्रकारचे अनेक तर्ककुतर्क त्याच्या हाताखालील नेटिव नोकरांनींही त्याच्या मनामध्यें हळूहळू भरवून दिले. त्यामुळें ज्याच्याबद्दल इतके संशय उत्पन्न होत आहेत, त्याची आपण स्वतःच चौकशी केली पाहिजे, हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें समजून त्यानें त्या मद्रासी मनुष्याला आपले जवळचा एक अडली पाठवून बोलावून आणलें, व आपल्या समोर उभें करून ते साहेब त्याला कित्येक प्रश्न विचारू लागले. त्या वेळीं त्या दोघांच्यामध्यें जो प्रश्नोत्तररूपी संवाद झाला तो ऐकण्यासारखा आहे :—

साहेब—तूं कोण आहेस ?

मद्रासी—कां बरें? तूं कोण मला विचारणार? तूं कोण आहेस, हें तूंच मला आधीं सांग !

सा.:—आम्हांला अरे तुरे म्हणतोस काय? आम्ही येथील पोलीस अंमलदार गोरे युरोपियन साहेबलोक आहों, हें तुला ऐकूं येत नाहीं काय? आम्हांला आधीं तूं सलाम कर.

म.:—मी येथें नुकताच आलेला असल्यामुळें तुम्ही गोरे युरोपियन साहेबलोक अंमलदार आहां हें मला माहीत नव्हतें. पण ज्याअर्थी तुमच्या अंगांत इतका उर्मटपणा भरलेला आहे, त्या अर्थी तुम्हीं कोणी तरी फारच मोठे अंमलदार असला पाहिजे, अशी माझ्या मनाला पक्की खात्री वाटत आहे ! परंतु तुम्ही अंमलदार असलां म्हणून एवढ्याकरितां मी तुम्हांला सलाम केलाच पाहिजे असें नाहीं. मीही एक सभ्य गृहस्थच आहें. तेव्हां तुम्हीं मला सलाम केला, तर मीही तुम्हांला जरूर सलाम करीन. तसेंच अंमलदार झाल्यानें लोकांना अरे तुरे करण्याचा अधिकार येतो असेंही नाहीं.

सा.:—बरें ठीक आहे .तर मग आतां सांगा पाहूं तुम्ही कोठून आलां !

म.:—कां बरें? तुम्हांला याची उठाठेव कशाला पाहिजे?

सा.:—असें नव्हे, कोणी परक्या मुलुखाचा परकी मनुष्य येथें आला असतां तो कोठून आला, कशाला आला, वगैरेबद्दलची नोंद कायद्याप्रमाणें ठेवावी लागते.

म:—असें काय ? तर मग आतां 'तुम्ही कोण व कोठून आला' हा प्रश्न कोणी कोणाला विचारावयाचा ? मला तुम्हीं किंवा तुम्हांला मी ? मला वाटतें,

मींच तुम्हांला हा प्रश्न विचारला पाहिजे आणि त्याचें उत्तर तुम्ही मला दिलें पाहिजे. कारण तुमच्या आणि माझ्या दरम्यान परक्या मुलूखचा परकी मनुष्य कोण? तुम्ही कीं मी? हिंदुस्थान हा माझा देश आहे. त्या देशांत मी कांहीं खात्रीनें परकीय मनुष्य नव्हे. तुम्ही मात्र आमच्या ह्या हिंदुस्थान देशांत परमुलखांतून परकीय लोक आलेले आहां. तेव्हां त्या तुमच्याच कायद्याप्रमाणें तुम्ही कोण, तुम्ही कोठून आलां, तुम्ही येथून जाणार कधीं, आणि तुमचा येथें येण्याचा उद्देश कोणता, या प्रश्नांच्या उत्तरांची नोंद आम्हींच हिंदुस्थानांतील लोकांनीं तुमच्यापासून घेतली पाहिजे.

ह्या त्याच्या भाषणांतील स्पष्टपणा आणि सत्यपणा पाहून तो युरोपियन अधिकारी अतिशय खजील झाला, व आतां याला काय उत्तर द्यावें हें न समजून तो स्तब्ध उभा राहिला. तेव्हां फिरून तो मद्रासी मनुष्य पुढें बोलूं लागला :—आपल्या देशांत परक्या देशचा मनुष्य कधीं आला, कशाला आला, कोठें राहतो, येण्याचा उद्देश काय, आणि जाणार कधीं, याबद्दलची नोंद फार लक्षपूर्वक रीतीनें प्रत्येक देशांतील लोकांनीं ठेवली पाहिजे. परंतु तशी आमच्या देशांतील लोकांनीं ठेवली नाहीं, त्याचें परिणाम आम्हांला सध्यां भोगावे लागत आहेत. तुम्ही हिंदुस्थानांत आलां, त्या वेळीं तुमचा उद्देश काय आणि तुम्ही जाणार कधीं, या प्रश्नाच्या खऱ्या उत्तराची नोंद मागील लोकांनीं करून घेतली असती तर फार बरें झालें असतें. येथें येण्यांत तुमचा उद्देश काय आणि तुम्ही येथून जाणार कधीं, हे प्रश्न लोकांनीं त्या वेळीं तुम्हांला विचारले. पण ते लोक भोळे असल्यामुळें तुमच्या बाह्यशब्दांवर विश्वास ठेवून फसले. आमचा येथें येण्यांतील उद्देश फक्त व्यापाराचाच आहे असें सांगून तुम्हीं येथील राज्य आपल्या हातीं घेतलें, आणि तुम्हीं जाणार केव्हां असा प्रश्न विचारला असतां, "तुम्ही पात्र झालां म्हणजे तुमचें राज्य तुमच्या हातीं देणार तेव्हां!" असें उत्तर तुमच्याकडून मिळत असतें. येण्याचा उद्देश आणि जाण्याची वेळ यासंबंधानें हिंदुस्थानांतील लोकांना खोटीं उत्तरें देण्याचीं तुम्हींच जर अशी चाल घालून ठेवली आहे, तर स्वदेशाच्या स्वतंत्रतेसाठीं स्थापन झालेल्या सीक्रेट सोसायटीजपैकीं माझ्यासारखे जे कोणी सभासद असतील ते तुम्हांला या प्रश्नांचीं खरीं उत्तरें देतील काय? जशीं तुमचीं उत्तरें तशींच त्यांचींही उत्तरें असणार! गुरूची विद्या


गुरूला फळलीच पाहिजे ! खोटा उद्देश पुढें करून त्याच्याआड असलेला आपला खरा हेतु सिद्धीस नेण्याची युक्ति इंडियन लोक तुमच्यापासून शिकले आहेत व ती युक्ति ते हल्लीं या शहरांत तुमच्या डोळ्यांदेखत अगदीं बेमालूमपणानें उपयोगांतही आणीत आहेत !

या शेवटच्या उल्लेखावरून आपल्याविरुद्ध कांहीं तरी भयंकर कट चाललेले असले पाहिजेत, असें समजून ते युरोपियन गोरे अंमलदारसाहेब फारच गर्भगळित होऊन गेले व त्या मद्रासी माणसाच्या धिटाईपुढें त्यांच्या अमलाचें सगळें तेज मावळून जाऊन त्यांचे हातपाय लटलट कापूं लागले. ही स्थिति पाहून तो मद्रासी मनुष्य गालांतल्या गालांत हसूं लागला. तेव्हां तर त्या युरोपियन अंमलदाराला आपला पाणउतारा अगदीं असह्य झाला व तो ढिपळासारखा विरघळून गेला. परंतु अखेरीस त्या मद्रासी मनुष्याला दया आली, व त्या युरोपियन अंमलदाराला जास्त वेळ अशा शरमेच्या स्थितीमध्यें ठेवणें इष्ट नाहीं असें वाटून तो फिरून त्याला म्हणाला, " मेहेरबान, आपण भिऊं नका ! बंगाल्यांत हल्लीं लोकपक्षाच्या वतीनें ज्या भयंकर चळवळी आणि खटपटी चालल्या आहेत, त्यांच्या योगानें आपल्या गोऱ्या अंमलदारांचीं मनें कितपत घाबरलीं आहेत आणि तसें असल्यास त्यांना धीर येण्याकरितां काय जास्त कुमक केली पाहिजे, हें जाणण्याच्या इराद्यानें घाबरलेल्या अंमलदारांच्या नांवनिशीसह रिपोर्ट करण्याकरितां वरिष्ठ सरकारच्या कॉनफिडेन्शल खात्याकडून हल्लीं कित्येक इसम सुटलेले आहेत त्यांपैकींच मी एक आहे. परंतु आपण भिऊं नका. तुमची ग्रेड कमी होईल अशी तुम्हांला बिलकूल शंका वाटूं देऊं नका. तुम्ही घाबरलेले आहां असा तुमच्याबद्दलचा रिपोर्ट मीं कधींही करणार नाहीं ! इतकें आश्वासन मिळाल्यानंतर साहेब खूष झाले व झालेल्या प्रकाराबद्दल हसत हसत ते दोघेही निघून गेले.

REFBK-0006712

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ८०९२
... ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ७३८९२ वि: निबंध
क्रमांक ७८९० नों. दि: २८.२.७९

# भरपूर उजेडासाठीं प्रसिद्ध !




- भरपूर उजेड देतात
- जास्त वेळ टिकतात

**दि बरोडा बॅटरीज लिमिटेड,**
**गोया गेट, बडोदें**

**—सोल एजंट्स—**

**दि पनावा एजन्सीज लिमिटेड**

४३ फोर्बस् स्ट्रीट, **फोर्ट मुंबई नं. १.**

# * साहित्यांतील सुवर्णकण *

न. चिं. केळकर

**ज्ञानेश्वरी सर्वस्व**

ज्ञानेश्वरीचा भावार्थ, निवडक अवतरणें, विस्तृत विवेचन,
कठीण शब्दांचा कोष, विषय सूचि. कि. ५ रु.

**गांवरान गीता**

श्रीभगवद्गीतेचा सुबोध परिचय कि. २ रु.

**फ्रेंच राज्यक्रांति** कि. २॥ रु.

**राज्यशास्त्र** कि. १॥ रु.

द. के. केळकर

**संस्कृति संगम**

वाढवून अद्ययावत् केलेली नवी आवृत्ति कि. ६ रु.

**काव्यालोचन**

सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति कि. ५ रु.

**साहित्यविहार** कि. ३ रु.

कमलाबाई देशपांडे

**स्मरण साखळी** कि. ६ रु.

**हंसरा निर्माता आणि चिमण्या** कि. २ रु.

मनोहर ग्रंथमाला, टिळकरोड, पुणें २.

पंडित पत्रकार व पुढारी यांनीं प्रशंसलेली
"सरस्वती" चीं अमूल्य

## प्रकाशनें

१ कारागृहाच्या भिंती—भाई ना. ग. गोरे मूल्य ३ रु.
२ भारतीय क्रांति आणि राष्ट्रसभा—
आचार्य शं. द. जावडेकर मूल्य १२ आ.
३ काँग्रेसचीं साठ वर्षें—श्री. रा. प्र. कानिटकर मूल्य ८ आ.
४ त्रिमंत्री—योजना ( भाग १ ला ) मूल्य १। रु.
५ पत्री—साने गुरुजी मूल्य ३॥ रु.
६ हिंदी रेल्वे कामगार—भाई वि. न. साने मूल्य १२ आ.
७ त्रिमंत्रि—योजना ( भाग २ रा ) मूल्य १। रु.

## —आगामी प्रकाशनें—

१ लोकमान्य टिळक व महात्मा गांधी—
आचार्य शं. द. जावडेकर
२ फ्राइडचीं पांच व्याख्यानें—भाई ना. ग. गोरे
३ भाई जयप्रकाश यांचीं स्वातंत्र्यवीरांस पत्रें—
संपादक भाई ना. ग. गोरे
४ सन्यत्सेन
५ राष्ट्रसभेचें वनपर्व—आचार्य शं. द. जावडेकर
६ सत्याग्रही-खंडकाव्य-साने गुरुजी

पुस्तकें मिळण्याचा पत्ता—

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

स. रा. देशपांडे
संचालक "सरस्वती"
२९१ शनिवार, पुणें १.




तिरपलेली मान व अवघडलेल्या शिरा नरेंद्र फार्मसीचें **नरेंद्र एम्ब्रोकेशन** चोळल्यानें त्वरित साफ होतात. थकव्यानें आंबलेले सांधे, कंबरेंतील उसण, लचक किंवा इतर वात यांवर हा अनुभविक उपाय आहे. शेजारच्या केमिस्ट किंवा वाण्याकडे विकत मिळतें.

**सोल एजंट,**

**हनुमान एजन्सी, परळ, मुंबई नं. १२.**

## कुटुंबांतील किरकोळ दुखणीं

बरीं करण्यासाठीं डॉक्टर वैद्यांकडे नेहमीं धांव घेणें शक्य नसतें त्याची जरूरीही पण नसते. पोट दुखी, उलटी, अपचन, सर्दी, अंगांत उसण भरणें, दाढदुखी, मुलांचे शौचाचे विकार व या तऱ्हेचे अनेक किरकोळ आजार **जवेरियन जीवन मिक्श्चर** हटकून बरें करतें. कॉलरा व आमांश सारख्या सांथीच्या घातक रोगांवर याचा जादूप्रमाणें उपयोग होतो. डॉक्टरच्या गैरहजेरींत हें नेहमींच उपयुक्त होत असल्यामुळें याची एक बाटली घरांत व प्रवासांत जवळ राखणें दूरदर्शीपणाचें ठरतें. केमिस्टकडे व खेडोपाडीं वाण्यांच्या दुकानीं मिळतें.

**एम. एच. जवेरियन** आणि **कंपनी.**

देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

## य. गो. जोशी प्रकाशन, पुणें

# ❀ वाद-विवेचन-माला ❀

| | | |
|---|---|---|
| १. सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| २. फॅसीझम | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ३. साम्राज्यशाही | ना. गं. गोरे | १-०-० |
| ४. अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ५. लोकशाही | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ६. मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ७. विश्वकुटुंबवाद | ना. गं. गोरे | १-८-० |
| ८. ईश्वरवाद | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ९. गांधीवाद | आचार्य दांडेकर | १-८-० |
| १०. राष्ट्रवाद | कोल्हटकर | २-०-० |
| ११. जडवाद | तर्कतीर्थ जोशी | १-४-० |
| १२. हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | २-८-० |
| १३. मार्क्सचा कॅपीटल सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | १०-०-० |

* या तेरा पुस्तकांत वाद-विवेचन-माला पूर्ण होते. *

—: सोल एजंट :—

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, गिरगांव, मुंबई**

ग्राहकांनीं व पुस्तकविक्रेत्यांनीं पुस्तकें महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई. यांजकडून परस्पर मागवावींत.

# देवकरण नानजी
# इन्शुअरन्स कंपनी लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल, | रु. २०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व विक्री झालेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| आयुर्विम्याचें झालेलें एकंदर काम | रु. ७५,००,००० |
| लाईफ फंड | रु. ५०,३०,००० चे वर |

वजनदार आणि उत्साही व्यक्तींनीं

—एजन्सीसाठीं अर्ज करावेत—

## जिंदगी * आग * अकस्मात्

—हेड ऑफिस—

देवकरण नानजी बिल्डिंग्ज्, मुंबई नं. १.

# देवकरण नानजी इन्शुअरन्स कंपनी लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व विक्री झालेलें भांडवल | रु. १०,००,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) प्राणलाल देवकरण नानजी जे. पी.
(२) चुनीलाल देवकरण नानजी,
(३) राजरत्न नानजी कालिदास मेहता, एम. बी. ई.
(४) माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
(५) कॅप्टन शिवसिंहजी ऑफ पोरबंदर.
(६) ललितचंद्र सी. डी. नानजी.
(७) तनुभाई डी. देसाई, बी. ए. एल्. एल्. बी.
(८) जयंतिलाल रतिलाल त्रिवेदी,
(९) लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर जे. पी.
(१०) विजयचंद्र एन. कंटोल,
(११) हिंमतलाल व. गांधी, मॅनेजिंग डिरेक्टर.

सुरेश के. देसाई, बी. ए. एलएल. बी., मॅनेजर

# आयुष्य—आग—अकस्मात्

सुविद्य आणि रसिक वाचकांचें आवडतें मासिक

# वाङ्मयशोभा

★

संपादकः—**मनोहर महादेव केळकर**, बी. ए,. एल्एल्. बी.

**ना**मांकित आणि नवोदित लेखकांच्या उत्कृष्ट वाङ्मयानें मराठी वाचकांना प्रमुदित करणारें हें मासिक **गेलीं सात वर्षें** अत्यंत नियमितपणें श्री. शारदेची सेवा करीत आहे. **वि**चार प्रवण करणारे उद्बोधक वाङ्मय आणि मनोवेधक ललित साहित्य या दोहोंचा मनोज्ञ संगम वाङ्मयशोभेंतच आढळेल.

**आ**कर्षक सजावट, सुंदर मुखपृष्ठ, मार्मिक व्यंगचित्रें आणि उत्कृष्ट छपाई हीं कांहीं वैशिष्ट्यें. वा. व. **५ रु.** ट. ह. सह.

★

**वाङ्मयशोभा कार्यालय,**

**टिळकरोड, पुणें २.**

★

देशांतील प्रत्येक स्त्री व पुरुष आरोग्यसंपन्न, कणखर आणि दीर्घायुषी व्हावा म्हणून चिकाटीनें, धडाडीनें व सतत कार्य करीत असलेली

## हिंदुस्थानांतील एकमेव आदर्श विमा संस्था

म्हणजेच

टे. २४०२९

व म्हणूनच

**ट्रिनिटी म्यूचुअल**

ॲशुअरन्स · कंपनी · लिमिटेड

प्रमुख कार्यालय ---------- कोट — मुंबई

**श्री. विजयालक्ष्मी पंडित,**

**सौ. हंसा मेहता,**

**सौ. लीलावती मुनशी,**

नामदार श्री. दादासाहेब मावळंकर, नामदार श्री. बाळासाहेब खेर, नामदार श्री. मंगळदास पक्वासा, वीर वामनराव जोशी, श्री. नगीनदास मास्तर, श्री. स. का. पाटील, स्वामी कुवलयानन्द, प्रो. माणिकराव या व इतर अनेक थोरांनीं तिच्या ध्येयनिष्ठ, सेवाभावी व राष्ट्रहितवर्धक कार्याची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे.

## "एकमेवाद्वितीयम्"

ह्या संज्ञेस पात्र झालेल्या या संस्थेच्या आश्रयदात्यांत आपली गणना व्हावी असें प्रत्येकास वाटणें साहजिक आहे.

: मॅनेजिंग डायरेक्टर : **स. पां. नाडकर्णी,**

डी. कॉम्., एम. सी. (मुंबई). ए. सी. आय. आय. (लंडन).

सतत २५ वर्षें नांवाजलेले

तयार कपड्यांचे सर्वांत मोठे व्यापारी

# महिंद्रकर ब्रदर्स

**एकदां समक्ष भेटाच.**

बंबखान्याजवळ
बुधवार पेठ
पुणें २

पोर्तुगीज चर्च—
ट्रामनाक्याजवळ
गिरगांव, मुंबई ४

---

## २५ वर्षें सर्वतोमुखी असलेली

**वझे कृत डांग्याखोकल्यावर अनुभविक औषध**

डांग्या खोकला, कोल्हे खोकला, माकड खोकला असें देशपरत्वें म्हणत असलेल्या खोकल्यावर व इतर सर्व प्रकारच्या खोकल्यांवर उत्तम लागू पडतें.

हें किंचित सारक व पौष्टीक असल्यामुळें लहानांस फार मानवतें व गोड असल्यामुळें आवडतें.


**वझे कफनाशक गोळ्या, ऑफिस, मुंबई नं. ४.**



K.T.DONGRE & Co.
GIRGAON BOMBAY.
के.टी.डोंगरे कंपनी.
गिरगाव मुंबई.

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात






दम्यावरील उपाय आतां ठरून गेला.

पुरोहित श्वासहारी हा एकच असा दम्यावरील उपाय आहे कीं त्याची सुरुवात करतांच कफ सुटतो धाप कमी होते, शौचाची तक्रार उरत नाहीं, पचनक्रिया सुधारते, हळुहळू शक्ति भरून येऊन फुप्फुसें मजबूत होतात व दमा निखालस बरा होतो. दमा, धाप लागणें, पहांटेचा ठसका, कंठदाह करणारा खोकला वगैरेसाठीं **पुरोहित श्वासहारी प्लेन** (निळें पॅकिंग) व बद्धकोष्ट व आम्लपित्त बळावलेल्या दमेकऱ्यासाठीं **पुरोहित श्वासहारी कंपाऊंड** (लाल पॅकिंग) वापरावें. ३, ६ व १२ औंसी बाटल्यांतून अनुक्रमें रु. ३-६ रु. ५-१२ व रु. १० किंमतीस सगळीकडे मिळतें.

दमा, श्वासविकार बरे करणारा एकच डॉक्टरी उपाय




पुरोहित श्वासहारी
डॉ. पुरोहित फार्मसी. कोल्हापूर

# RADIO OPPORTUNITIES

REI courses in Radio Electrical Engineering, Wireless Telegraphy, AMIEE., Air conditioning are advanced modern courses and designed to equip you for the numerous money-making opportunities open to Technicians.

Fresh sessions commence in **June each year.**

HUNDREDS ENROL EVERY YEAR.

**You also can Join after Matriculation**

## Radio Electric Institute

**Pioneers of Radio Education in INDIA.**

**LAMINGTON CHAMBERS., LAMINGTON ROAD, BOMBAY.**

---



## रामतीर्थ ब्राह्मी तेल

**स्पेशल नं. १.**

मेंदूचे ज्ञानतंतु बलवान होऊन सफेत केस काळे होतात व टक्कल पडलेल्या ठिकाणीं केस येतात.

खवडे नष्ट होतात. स्मरणशक्ति व दृष्टीची वाढ होऊन गाढ झोंप लागते. डोकेंदुखी थांबते. प्रत्येक ऋतूंत स्त्री-पुरुष आणि मुलें यांसाठीं अत्यंत फायदेशीर आहे. लिखा आणि ऊवा यांचा नाश करितें.

मोठी बाटली रु. ३-८-० लहान रु. २-०-०

सर्वत्र मिळतें.

## श्रीरामतीर्थ योगाश्रम

४४८ सँढर्स्ट रोड, मुंबई ४.

# अमृतासिंधु

**अमृतसिंधु** :--अनेक अर्क मिश्रित असल्यानें कितीहि वर्षें ठेविलें तरी वाईट होत नाहीं. इतकेंच नव्हे पण अमृतसिंधु बाहेरूनहि लावण्याच्या कामीं आणि पोटांतहि देण्याच्या कामीं फारच नांवाजलेलें असल्यानें गव्हर्नमेंट, लोकलबोर्ड, म्युनिसिपालिटी, स्काउट, को-ऑपरेटिव्हसारख्या मोठमोठ्या संस्थेनें तसेंच विख्यात अधिकाऱ्यांनींहि वापरून प्रशंसापत्रें दिलीं आहेत.

**अमृतसिंधूचा गुणधर्म** :--जखम, डोळे, पोट, दांत, कंबर, छाती, बरगड्या, सांधे वगैरे दुखणें, उसण भरणें, मुका मार, ओकाऱ्या, जुलाब, अजीर्ण, थंडी, ताप, जंतविकार नाकांतून अगर कानांतून दुर्गंधयुक्त पू येणें. अर्ध डोकेंदुखी, डोळे येणें, विषारी जनावरांच्या दंशावर, आणि गुरें, बकरी, कुत्रा, घोडा वगैरे पाळीव जनावरांच्या काहीं जखमा, पोट फुगणें, पाय अगर शरीर सुजून येऊन त्यांत किडे वगैरे पडल्यास अमृतसिंधूनेंन तात्काळ गुण येतो.

**अमृतसिंधूचा उपयोग** :—जखम, डोकेंदुखी, छाती, कंबर, फांसळ्या, गुडघे दुखणें, उसण भरणें, मुका मार; तसेंच विंचू, उंदीर, कुत्रा वगैरे जनावरांच्या दंशावर अमृतसिंधूत थोडा कापूस भिजवून ती जखमेवर ठेवून वरून पट्टी बांधावी. आणि इतर सर्व दुःखांवर थोडें थोडें चोळून लावावें.

**दीनबंधू फार्मसी लि.**, वरळीकर बिल्डिंग, मुंबई नं. ७.


---


### खास वृद्धाकरितां

## शौचास साफ करणारें

# शौचशुद्धिचूर्ण

१ तोळा बाटली किंमत २ आणे.

यानें शौचास साफ होतें. रात्रीं ऊन पाण्यांतून दोन ते तीन मासे घेणें. यानें थकवा वगैरे येत नसल्यामुळें लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांस घेण्यास सोईचें आहे. नेहमीं मळाचा खडा होणें व बद्धकोष्ठ या विकारांवर हें अप्रतिम गुणकारी असून मूळव्याधींतहि याचा चांगलाच उपयोग होतो.

— इतर तीनशेंचेवर औषधासाठीं लिहा —

**आयुर्वेदीय औषधि-भाण्डार २८ शुक्रवार, पुणें २.**


---

# खा
# जा
# व

ग्लूकोज, व्हिटामिन व प्रोटीनयुक्त
खाजावचा खुराक रोज चालू ठेवा.

★

रक्तवधक आंबावडी

स्वादिष्ट रुचिको

****

आपल्या दुकानदारांकडे मागणी करा.

★

## फडके - प्रॉडक्टस्

पौष्टिक खाद्यपदार्थांचे कारखानदार — नागनाथपार, पुणें नं. २

★

# आम्ही मुदतीच्या ठेवी स्वीकारतों

शेअर कॅपिटलबरोबरच अधिक खेळतें भांडवल हाताशीं रहावें म्हणून आम्ही मुदतीच्या ठेवीहि स्वीकारतों. कंपनीची उभारणी भक्कम पायावर झालेली असल्यानें या कंपनींत मुदतीच्या ठेवी ठेवणें हें सुरक्षिततेच्या दृष्टीनें सर्वस्वीं युक्त ठरेल.

★

**—व्याजाचे दर—**

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | ४ टके |
| २ वर्षे | ४½ ,, |
| ३ वर्षे | ५ ,, |

जास्त माहितीकरितां लिहा. सर्व माहिती आनंदानें कळविण्यांत येईल.

**दि डेक्कन ॲग्रि० इंडस्ट्रीज लि० पुणें**

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम........................ दि: ....................

क्रमांक ........................ नों. दि. ....................




BEAUTY PREPARATIONS

'आशा' फेस पॉवडरनें रसिक स्त्रियांत अत्यंत मान्यतेचें स्थान मिळविलें असून फेस पॉवडरप्रमाणेंच हेअर ऑईल्स, नखरंजकें इ. सौंदर्यसाधनें लोकप्रिय आहेत.

Asha
MATCHES THE WORLD'S BEST

एकंदर चालू महर्गतेमुळें

## काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकें

जितक्या कमी किंमतींत द्यावयाची माझी इच्छा होती, तितक्या कमी किंमतींत देतां आलीं नाहींत. याकरितां काळांतील निवडक निबंधांचे पहिले भागांत एक सवलतीचें कुपन टाकलें आहे. सवलतीची समग्र माहितीही त्याच खंडांत दिली आहे. ग्राहकांनीं अवश्य वाटल्यास, त्याचा फायदा घ्यावा.

★

व्यवस्थापक :

य. गो. जोशी-प्रकाशन,

सदाशिव, पुणें २.